
नागमणी
एक रहस्य
प्रसाद शिर्के

# नागमणी एक रहस्य

– प्रसाद सुधीर शिर्के

**B.Com., M.B.A.,BGL**

# नागमणी एक रहस्य

**लेखक –** श्री. प्रसाद सुधीर शिर्के

सर्व हक्क   श्री. प्रसाद सुधीर शिर्के

मो.: ९७६८९१६२१३

**अक्षरजुळणी**

ओवी प्रिंटर्स

मोबाईल : ९७३०१२१३२३

**मुखपृष्ठ**

श्री. अभिषेक ठमके

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

**प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान**
**संपर्क --- ९४२२२८४११६**

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन ---जून २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

‘मनातले जीवन...’ च्या यशानंतर ‘नागमणी एक रहस्य’ हे माझे द्वितीय पुस्तक वाचकांच्या हाती देताना फार आनंद होत आहे. पहिल्या पुस्तकाच्या वितरणासंबंधीच्या बऱ्या–वाईट अनुभवानंतर पुन्हा त्याच पारंपारिक पद्धतीने हे पुस्तक प्रकाशित करण्याची इच्छा नव्हती. त्यामुळे माझे पुढील पुस्तक सहजरित्या अधिकाधीक वाचकांपर्यंत पोहोचण्याकरिता शक्यतो विनामुल्य, ई–पुस्तक स्वरुपात प्रकाशित करायचे हे मनोमन ठरवले होते.

ह्या पुस्तकाच्या कामात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मला ज्यांचे सहाय्य लाभले त्या सर्वांचा मी ऋणी आहे. श्री. अभिषेक ठमके व कु. पंकज कुंभार यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले तसेच श्री. बाळासाहेब गुंजाळ सरांनी प्रुफ रिडींग, सौ. सई विचारे यांनी अल्पदरात ते टंकलिखित करुन दिले. त्याचप्रमाणे कवी श्री. मनिष पांचाळ व रंगकर्मी श्री. सुहास कामत यांचा अभिप्राय... वजा मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल मी या सर्वांचे विशेष आभार मानतो.

नागमणी ही एक काल्पनिक रहस्य कथा आहे. जी वाचकांना एका अद्‌भूत, अलौकिक व रम्य विश्वात घेऊन जाते. ही कथा फक्त करमणूक या एकमेव उद्देशाने लिहिलेली नसून त्यात जागो–जागी जीवनविषयक तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्नही केलेला आहे. ह्या कादंबरीची विशेषता म्हणजे कथेचे रहस्य किंवा ही कथा नेमकी काय आहे हे ती शेवटपर्यंत वाचल्याखेरीज समजत नाही. आजवर ज्यांनी ज्यांनी ती वाचली आहे. त्या सर्वांच्या ती पसंतीस उतरली आहे. त्याचप्रमाणे ती आपल्याही पसंतीस उतरेल अशी आशा करुन इथेच आपले मनोगत थांबवतो.

आपलाच,

प्रसाद शिर्के

पोलिसांनी जराही आवाज न करता धक्का मारुन त्या खोलीचे दार उघडले. तसे आतील सर्व दृष्य त्यांच्या दृष्टीसमोर स्पष्ट झाले. आतमध्ये स्मशान शांतता पसरली होती. त्या खोलीच्या आतमध्ये एक मध्यम वयीन व्यक्ती खुर्चीत शांतपणे, अगदी निश्चल होऊन झोपली होती. त्याने आपली मान खुर्चीच्या मागच्या बाजुस झोकून दिली होती. त्याच्या बाजूला, खाली जमिनीवर एक दहा–बारा वर्षाचा मुलगा आडवा पडला होता. त्याच्या आजूबाजूला सर्वत्र रक्त सांडलेले होते. जे त्याच्याच डोक्यातून बाहेर आलेले आहे, हे त्याच्या डोक्यावरील जखम स्पष्ट करत होती.

या ठिकाणी नेमके काय घडले असावे? बापाने आपल्या मुलाची हत्या का केली असावी? ही बातमी फोनवरुन देणारा व्यक्ती कोण असावा? खुर्चीत शांतपणे झोपलेला हा व्यक्तीच त्याचा बाप असावा का? असे कित्येक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले होते. ज्यांची उत्तरे कदाचित आत खूर्चीमध्ये झोपलेल्या व्यक्तीकडेच असावीत. असा अंदाज बांधत पोलिसांनी त्या खोलीत प्रवेश केला.

जमिनीवर सांडलेल्या रक्तात काही अक्षरे कोरलेली होती. पोलिसांनी जवळ जाऊन ती अक्षरे वाचण्याचा प्रयत्न केला. रक्ताने माखलेल्या त्या जमिनीवर 'प्रत्युषस्वामी' असे लिहिलेले होते. ती अक्षरे खुर्चीमध्ये झोपलेल्या व्यक्तीनेच आपल्या हाताच्या बोटाने लिहिलेली आहेत, हे त्याच्या हाताच्या एका बोटाला लागलेल्या रक्तावरुन अगदीच स्पष्ट झाले होते.

विकी : '' अरे पण ही सर्व कथा याआधीसुद्धा आम्ही ऐकली आहे.''

जय : '' पण यावरुन हा वेडा आहे हे सिद्ध होत नाही ना?''

विकी : '' माझे आता ठाम मत झाले आहे की, हा कोणी सामान्य व्यक्ती नाही.''

जय : ''बरं ठिक आहे. चल बघू आज पण प्रयत्न करुन, आज काही वेगळे हाती लागते का?'' प्रकाशने त्या खोलीच्या दरवाजाला असलेले टाळे उघडून खोलीचा दरवाजा हळूच उघडला.

तो आतमध्ये शांतपणे बसला होता. जणू तो ध्यानालाच बसला होता अशी त्याची मुद्रा दिसत होती. खोलीचे दार उघडताच त्याचे बंद असलेले डोळे आपोआपच उघडले गेले. आणि त्याच्या मुखातून आपसूकच काही उद्गार बाहेर पडू लागले.

जीवनातील प्रत्येक सत्यामागे
एक असत्य असते आणि
असत्यामागे एक सत्य असते
हे ज़ाणून घेण्यासाठी...
सत्यातील असत्यता आणि
असत्यातील सत्यता जाणणे
आवश्यक असते कारण ...
प्रत्येक सत्याच्या मुळाशी,
असत्याची चीड असते.
तरीही शेवटी सत्य काय?
आणि असत्य काय?
सर्वच मनाचे खेळ....

विकी : ''ए बस झाले आता. तुझ्या मनाचे खेळ... थांबव आता आणि नेमके सत्य काय आहे? ते सांग आम्हांला''

विकीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत तो मिश्किलपणे हसू लागला. ''होय, मी सामान्य व्यक्ती नाही निदान आता तरी नाही.''

हे ऐकताच विकीचा चेहरा काळवंडला. आपल्या मनातील गोष्टी ह्याला कशा काय माहिती असू शकतील? या विचाराने तो अस्वस्थ झाला होता. ''बरं ठिक आहे. मग, आज तरी काही सांगणार आहेस का? त्याने न राहून त्याला प्रश्न केला.''

तो : खरच सांगू? माझ्या बोलण्यावर विश्वास बसेल तुमचा? मिश्किलपणे हसत त्याने विचारले.

विकी : का नाही? आता आम्हाला खात्री झाली आहे. तू कोणी सामान्य मनुष्य नाहीस. मग तुझ्या बरोबर घडलेल्या गोष्टीसुद्धा सामान्य नसणार. बरोबर ना?''

तो : अगदी बरोबर.... आता बरीच समज आली आहे तुम्हांला... म्हणजे आता तुम्हाला कळून चुकले आहे की. माझे म्हणणे ऐकून घेण्याशिवाय तुमच्या पुढे दुसरा मार्ग देखील उपलब्ध नाही. चला जाऊ दे यासर्व आधीच्या गोष्टी विसरुन, मी तुम्हांला अजुन एक संधी देतो.

विकी : बरं, मग आता तरी विलंब न करता आम्हांला सर्व काही सविस्तर सांग, कोण आहेस तू?

तो : ''पुन्हा तोच प्रश्न! माझ्या लहानपणापासून आजवर असा एकही दिवस असा गेला नसेल, ज्या दिवशी, 'मी कोण आहे?'' हा प्रश्न मला पडला नसेल.

विकी : ''ए बाबा उगाच वायफळ बडबड करुन आम्हांला कोड्यात पाडू नकोस. जे काही आहे ते स्पष्ट बोल. नेमकं काय सांगायचे आहे तुला.'' तो थोडासा रागाने त्याच्यावर खेकसला.

तो : ''हा..हा..हा.... बरं चल ठिक आहे. सगळं सोपं करुन सांगतो, तुम्हाला समजेल असं.

माझी ओळख बदलणारा घटनाक्रम ज्या दिवशी सुरु झाला, तेव्हापासून ते आत्तापर्यंतचा माझा संपूर्ण जीवनप्रवासच तुम्हाला ऐकवतो. पण तत्पुर्वी माझी एक अट आहे. मी माझी कहाणी सांगत असताना तुम्ही मध्ये-मध्ये एकही शब्द बोलायचा नाही. मीच माझ्या कथेचा एकमेव साक्षीदार असल्यामुळे माझी कथा सांगताना मी, मी नसेन. मी साक्षीदार म्हणूनच तुमच्यासमोर सर्व गोष्टी मांडेन. बघा, त्या तुम्हांला पटतात का? तो पुन्हा एकदा मिश्किलपणे हसला आणि त्याने त्याची कथा सांगायला सुरुवात केली.

# अपहरण

प्रकाश ऑफिसमधून नुकताच बाहेर पडला होता. आणि पावसाला सुरुवात झाली. तसा दिवसभरात अधून मधून चांगलाच पाऊस पडला होता. सकाळी घाईगडबडीत निघाल्यामुळे आज तो छत्री सोबत आणायला विसरला होता. पावसाची पर्वा न करता त्याने रेल्वे स्टेशनकडे धाव घेतली. दिवसभराच्या पावसामुळे आणि त्यामुळे झालेल्या रेल्वे गाड्यांमधील तांत्रिक बिघाडामुळे गाड्या उशीराने धावत होत्या. त्यामुळे बरेच प्रवाशी स्टेशनवर गाड्यांची वाट बघत ताटकळत उभे होते. साहजिकच स्टेशनवर माणसांची खूप गर्दी झाली होती. स्टेशनवर पोहचेपर्यंत प्रकाशचे संपूर्ण कपडे पावसामध्ये भिजले होते. पावसामुळे सर्वत्र वातावरण एकदम थंड झाले होते. प्रकाशला हवेतल्या गारव्यामुळे थोडी  थंडी जाणवू लागली होती. त्यामुळे त्याच्या मनात सिगारेट ओढण्याची इच्छा निर्माण झाली. रेल्वे स्थानकाबाहेरच एक पानवाला आहे, हे त्याला माहीत होते. आणि तसेही ट्रेन काही लवकर येत नाही या विचाराने तो सिगारेट घेण्यासाठी त्या दुकानाच्या दिशेने पावले टाकत चालू लागला.

सिगारेटचे झुरके घेत तो पुन्हा रेल्वेच्या फलाटावर पोहोचला. ट्रेन अजुनही आली नव्हती पण लोकांची गर्दी अधिकच वाढली होती. त्या स्थानकावरील तेथील चहाविक्रेत्यांकडून त्याने चहा घेतला. तितक्यात ट्रेन आली. ट्रेन मध्ये चढणाऱ्या प्रवाशांची गर्दी खूप असल्यामुळे त्याने त्या ट्रेनमध्ये न चढण्याचा निर्णय घेतला आणि तो आरामात चहा घेता घेता सिगारेट ओढत दुसरी ट्रेन येण्याची वाट बघत बसला.

बराच वेळ झाला तरी दुसरी ट्रेन अजुनही आली नव्हती. ट्रेनची वाट बघून बघून त्याला फार कंटाळा आला होता. पहिली ट्रेन न पकडण्याचा त्याला आता पश्चाताप होऊ लागला होता. थोड्या वेळाने त्याला लांबून ट्रेन येताना दिसली

तसा तो ट्रेन पकडण्यासाठी थोडा सावध झाला. 'काहीही झाले तरी ही ट्रेन सोडायची नाही' या विचाराने तो गर्दीतून मार्ग काढत पुढे पुढे चालू लागला. आणि ट्रेनच्या डब्यामध्ये आत शिरण्यात यशस्वी झाला.

पुढील मार्ग मोकळा नसल्याने ट्रेन मध्ये-मध्ये बराच वेळ थांबत होती. त्यामुळे रोज एका तासात पोहोचणाऱ्या ट्रेनला आज त्याच ठिकाणी पोहोचण्यासाठी दोन तास लागले. ट्रेनमधील कमी न होणारी गर्दी आणि सतत मध्ये मध्ये थांबणारी ट्रेन यामुळे आधीच तो खुप कंटाळला होता. त्यामुळे त्याचे स्थानक येताच, जराही वेळ वाया न घालवता तो लगबगीने ट्रेनमधुन उतरला.

स्टेशन परिसरात पावसामुळे भरपूर चिखल साचला होता. सर्वत्र पाणी तुंबले होते. पाऊस आता थोडा कमी झाला होता. पण अजुनही पूर्णपणे बंद झाला नव्हता. प्रकाशच्या अंगावरील कपडे आता सुकत आले होते. त्यामुळे त्याला परत भिजत घरी जाणे जीवावर आले होते.

रोजच्या वेळेपेक्षा आज घरी जायला त्याला थोडा जास्तच उशीर झाला होता. तसे रेल्वे स्थानकापासून त्याचे घर जवळच होते. त्यामुळे तो रोज स्थानकापासून घरापर्यंत चालतच जात असे. आजवर ऑफिसमधुन घरी परतताना, कधी रीक्षाने घरी आल्याचे त्याला आठवतही नव्हते. पण आज मात्र त्याला रस्त्यावरच्या चिखलातून चालण्याचा खूप कंटाळा आला होता. आणि तसाही दिवसभराच्या कामाने आणि मग रेल्वेच्या रेंगाळवाण्या प्रवासाने तो खूप थकला होता.

तो रिक्षात बसला, रिक्षाचालकाने रिक्षाचा मिटर फिरवला आणि रिक्षा सुरु केली. तितक्यात अचानकच रिक्षात ती आली आणि प्रकाशच्या बाजूला येऊन बसली. प्रकाशने तिचे लक्ष नसताना गुपचुप एक नजर तिच्याकडे टाकली. आज नेहमीपेक्षा जरा जास्तच सुंदर दिसत होती ती. या आधीसुद्धा कितीतरी वेळा त्याने तिला बघितलेले होते. पण ती कोण आहे? याचा पत्ता मात्र त्याला अद्याप

नव्हता बऱ्याचदा ती अशीच अचानकपणे त्याच्या समोर येत असे आणि अशीच अचानकपणे निघूनही जात असे. आज पुन्हा एकदा तीला आपल्या जवळ पाहून प्रकाश काहिसा विचारमग्न झाला होता. तितक्यात रिक्षा त्याच्या इमारतीखाली पोहोचली. प्रकाश रिक्षातून उतरला पॅन्टीच्या मागच्या खिशातील पाकिट काढण्यासाठी त्याने हात मागे केला. तसे, त्याच्या खिशात पाकिट नसल्याचे त्याला जाणवले. तरीही तो पुन्हा पुन्हा पाकिट तपासू लागला. त्याने त्याच्या बॅगेतही तपासून बघितले, पण त्यातही त्याचे पाकिट नव्हते. पाकिट चोरी झाल्याचे, त्याच्या लक्षात आले. त्याने तसे रिक्षाचालकाला सांगितले, पण रिक्षाचालकाचा त्यावर विश्वास बसेना. तो प्रकाशवर भडकला. ''इ सब बहाने हम पहले भी बोहोत बार सुन चुके है, तुम...... लोग साला कभी नही सूधरोगे.'' असे बरेच काही तो प्रकाशला बोलू लागला. '' मी दोन मिनिटात वरती घरी जाऊन पैसे आणून देतो.'' असे तो त्या रिक्षाचालकाला सांगू लागला. पण तो रिक्षाचालक काहीही ऐकू न घेण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्याने प्रकाशला शिव्या देणे सुरु केले. तसे प्रकाशचेही डोके फिरले. आतापर्यंत त्याने त्या रिक्षाचालकाची समजूत काढण्याचा भरपूर प्रयत्न केला होता. पण त्याचा काही उपयोग झाला नव्हता. तो रिक्षाचालक फारच विक्षिप्त होता. तो प्रकाशचे काहीही ऐकुन घेण्यास तयार नव्हता. '' हम भी उपर आते है'' असे म्हणून तो सुद्धा प्रकाशबरोबर गेला.

प्रकाश घरी आला. त्याने त्या रिक्षाचलकाला त्याच्या घराबाहेर थांबण्यास सांगितले आणि लगेचच घरातून पैसे आणून त्या रिक्षाचालकाला दिले. पैसे घेतल्यावरही तो काहीतरी बडबडतच होता. प्रकाशने त्याच्याकडे लक्ष न देता घराचा दरवाजा लावून घेतला. तेवढ्यातच कोणीतरी त्याच्या घराची बेल वाजविली. प्रकाश दरवाजाजवळ उभा होता. त्यामुळे त्याने लगेचच दरवाजा उघडला. समोर रिक्षाचालक होता. दरवाजा उघडताच त्याने प्रकाशला एक शिवी दिली. आता प्रकाशचे डोके फारच तापले. त्याने त्या रिक्षाचालकाच्या थोबाडीत

एक चापट मारली आणि बेल वाजवुन शिवी देण्याचे कारण विचारले. फाटलेली नोट दिल्याचा आरोप करुन, तो रिक्षाचालक प्रकाशला पुन्हा शिव्या देऊ लागला. आत्तापर्यंत त्याच्या शिव्यांचा आवाज प्रकाशच्या घरातल्यांनीसुद्धा ऐकला होता. त्यामुळे ती सर्व मंडळी घराबाहेर आली होती. तोपर्यंत या दोघांची चांगलीच मारामारी जुंपली होती. घरातली मंडळी आतल्या खोलीमध्ये असल्यामुळे त्यांना सुरुवातीला बाहेर घडणाऱ्या प्रकाराबद्दल माहित नव्हते पण बाहेरुन शिव्यांचा आवाज ऐकून, आता ते सुद्धा घराबाहेर आले होते.

प्रकाशच्या वडीलांनी त्या दोघांची भांडणे वजा मारामारी सोडवली. त्यांनी प्रकाशला आतमध्ये जाण्यास सांगितले आणि रिक्षाचालकाची कशीबशी समजूत काढून त्याला तिथून घालवले.

———x———x———

रात्रीचे नऊ दहा वाजले असतील. घरातील सर्वांनाच भुक लागली होती.कारण त्यांच्या जेवणाची वेळ झाली होती. जेवण वाढण्यास सुरवात झाली. तितक्यात प्रकाशला अचानक काहीतरी आठवले. त्यामुळे ‘‘ मी जरा खाली जाऊन येतो’’ असे म्हणून प्रकाशने आपली चप्पल घातली . तो कुठे चालला आहे? आणि कशासाठी चालला आहे? हे विचारण्याआधीच तो पटापट जीने उतरुन इमारतीच्या खाली आला होता. ‘‘ जेवणाचे ताट वाढलेले असताना, जेवायचे टाकुन हा असा अचानक घाईगडबडीमध्ये बाहेर कसा काय गेला?’’ हा प्रश्न घरातील सर्वांनाच पडला होता. पण ‘त्याला काही महत्वाचे काम आठवले असेल किंवा खाली त्याचा कोणी मित्र आला असावा. या समजुतीने घरातील मंडळींनी आपले समाधान करुन घेतले. आणि ते जेऊ लागले.

सर्वांची जेवणे आटोपली पण प्रकाश अजुनही घरी आला नव्हता. त्याकाळी मोबाईल सारखे यंत्रे अस्तित्वात नसल्याने त्यांचा प्रकाशशी संपर्क

होणे शक्य नव्हते. प्रकाशच्या अशा अचानकपणे घराबाहेर जाण्यामुळे सगळेच चिंतीत होते. सर्वांचे लक्ष आता, सतत घड्याळाकडे जात होते. घड्याळाचे काटे जस–जसे पुढे जात होते तस तसे त्यांची चिंताही अधिकच वाढत होती.

प्रकाश हा एका चांगल्या कुटुंबात वाढलेला सुसंस्कारी मुलगा. त्याचे वय जेमतेम बावीस तेवीस असेल. तो अभ्यासात फारसा हुशार नसला तरी त्याने कसे बसे आपले बारावीपर्यंतचे शिक्षण पुर्ण केले होते. हल्लीच त्याला कुठेतरी नोकरी मिळाली होती. तसा तो खुप समजदार होता; पण कधी–कधी तो विचित्रपणे वागत असे.

रात्रीचे बारा वाजून गेले होते तरी अजुन प्रकाशचा काहीच पत्ता नव्हता. त्याचे वडील वसंतराव इमारतीखाली जाऊन, प्रकाश कुठे दिसतो का? हे बघुन आले होते. दुर्दैवाने प्रकाशच्या कुठल्याही मित्राचा टेलिफोन नंबर त्यांच्याकडे नव्हता त्यामुळे प्रकाशचा शोध घेणे त्यांच्यासाठी कठीण होते.

काहीही न सांगताच घरातून बाहेर पडलेल्या प्रकाशला जाऊन आता जवळपास तीन तास झाले होते. त्यामुळे घरातील सर्व माणसे बेचैन झाली होती. त्यांनी आता पोलीस चौकीत जाण्याचा निर्णय घेतला. प्रकाशचे आई–वडील पोलीस चौकीत आले. त्यांनी घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. पण पोलिसांनी त्यांच्या बोलण्याला फारसे महत्व न देता त्यांनाच उलट सुलट प्रश्न विचारले. त्याशिवाय पोलिसांनी त्यांची तक्रार सुद्धा नोंदविण्यास नकार दिला. ''जर उद्यापर्यंत तुमचा मुलगा घरी आला नाही तर, पुढे काय करायचे ते आम्ही बघु'' असे म्हणुन पोलिसांनी आपले हात वर केले. पोलिसांच्या अशा वागण्याचा वसंतला खूप राग आला. त्यामुळे त्यांची आणि पोलिसांची शाब्दिक बाचाबाची झाली. पण पोलिसांशी भांडणे, वसंताने समजुतदरपणे टाळले. आणि मग शेवटी दोघेही नवरा–बायको कंटाळून आपल्या घरी निघून आले. रात्रभर घरातील कोणालाही नीट झोप लागली नाही. सकाळीच त्यांनी पुन्हा पोलिस

चौकीकडे धाव घेतली. तेव्हा पोलिसांनी त्यांची मदत करण्याचे मान्य करुन प्रकाशचा शोध घेण्यास सुरुवात केली.

———x———x———

प्रकाश हा वसंतचा दत्तक घेतलेला मुलगा होता. त्याच्या लहानपणीच त्याची आई वारली म्हणून त्याच्या वडीलांनी काही काळाने दुसरे लग्न केले. पण त्याची सावत्र आई त्याला, आपल्या मुलाप्रमाणे सांभाळण्यास तयार नव्हती. त्यामुळे त्याच्या वडीलांची व तिची रोज भांडणे होऊ लागली. आणि मग शेवटी प्रकाशच्या वडीलांनी नाईलाजाने त्याला कायदेशीर रित्या वसंतला दत्तक देऊन टाकले. ही सर्व माहिती वसंतने पोलिसांना दिली होती. पोलिसांनी आपल्या पद्धतीने प्रकाशची सर्व माहिती गोळा केली आणि त्या माहितीच्या आधारावर ते प्रकाशचा शोध घेऊ लागले.

प्रकाशचा शोध सुरु असतानाच, पोलिसांना खासदार मोहनरावांचा फोन आला. प्रकाश गायब झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्याच्या प्रकरणाची, खासदार साहेबांनी दखल घेतली. खासदार साहेबांनी या प्रकरणामध्ये लक्ष घालण्यामागचे कारण पोलिसांना अद्याप समजू शकले नव्हते. पण खासदारांनी या प्रकरणात लक्ष दिले म्हटल्यावर पोलिस सावध झाले होते. आणि त्यामुळे ते काळजीपूर्वक प्रकाशचा तपास करु लागले.

मोहनराव हे शहरातील प्रतिष्ठीत व्यक्तींपैकी एक होते. मोहनराव मोठे उद्योगपती होते. त्याशिवाय ते उत्तम राजकारणी सुद्धा होते. ते दोनदा आमदार म्हणून निवडून आले होते आणि आता, तर ते खासदार पदी विराजमान होते.

प्रकाशच्या अशाप्रकारच्या अचानक गायब होण्यामुळे ते अस्वस्थ होते. ह्या प्रकरणाबद्दल त्यांना कळताच क्षणी त्यांनी, पोलिसांनी प्रकाशच्या प्रकरणात

दाखवलेल्या निष्काळजीपणाबद्दल पोलिसांची चांगलीच कानउघडणी केली होती.

———x———x———

तीन दिवस उलटून गेले, तरी प्रकाशचा काही केल्या शोध लागत नव्हता. एकीकडे वसंतराव आणि त्यांचे कुटुंब तर दुसरीकडे खासदार मोहनराव, प्रकाशच्या शोधासाठी पोलिसांना वारंवार फोन करुन आणि भेटून हैराण करत होते. तसे बघायला गेलो तर त्यात वसंतरावांचे काहीच चुकत नव्हते. कारण प्रकाश त्यांचा मुलगा होता. पण खासदार मोहनरावांच्या या प्रकरणात नाक खुपसण्यामुळे पोलिस अस्वस्थ होते. आणि आश्चर्यचकीतही. पोलिसांच्या मनात विविध प्रश्नांची पाल चुकचुकत होती. पण खासदार साहेबांना त्याबद्दल विचारण्याचे धाडस मात्र त्यांच्यात नव्हते.

गेल्या तीन दिवसांपासून वसंतराव कामाला गेले नव्हते. त्यामुळे त्यांच्या ऑफिसमधून सारखे फोन येत होते. 'वसंतरावांचा मुलगा अचानक बेपत्ता झाला आणि तीन दिवस उलटूनही त्याचा अजून शोध लागलेला नाही' ही बातमी त्यांच्या ओळखीच्या जवळ-जवळ सर्वच लोकांना समजली होती. त्यामुळे त्यांचे सुद्धा वसंतरावांच्या घरी वारंवार फोन येत होते. प्रत्येकाला तेच-तेच सांगून आणि त्याच-त्याच गोष्टींची चर्चा करुन त्यांचे कुटुंब आता कंटाळले होते. त्याचप्रमाणे यासर्व गोष्टींचा वारंवार विचार करुन ते मानसिक तणावाखाली होते.

———x———x———

सकाळ झाली होती. सूर्याची किरणे आता डोळ्यावर येऊ लागली होती. रात्री उशीरा झोपलेल्या वसंतरावांना जाग आली. त्यांचे लक्ष घड्याळाकडे गेले. सकाळचे आठ वाजले होते. त्यांची पत्नी व इतर कुटुंबीय अजूनही झोपलेलेच होते. वसंतराव आता उठून बसले होते. सगळ्यांना शांतपणे झोपलेले बघून त्यांना थोडे आश्चर्य वाटले. दररोज त्यांच्या अगोदर उठून कामाला लागणारी, त्यांची पत्नी लतासुद्धा अजून झोपेतच होती. तिचा सुद्धा रात्रभर प्रकाशचा विचार करुन पहाटेच डोळा लागला असावा, असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी तिला जागे न करता, सर्वांसाठी चहा तयार केला आणि मग ते सर्वांना हाका मारुन झोपेतून उठवण्याचा प्रयत्न करु लागले.

हाका ऐकून, घरातील इतर सर्वजण झोपेतून उठले. पण त्यांची पत्नी अजुनही गाढ झोपेतच होती. म्हणून त्यांनी तिला हात लावून उठवण्याचा प्रयत्न केला तसा वसंतरावांना..... क्षणार्धात झटका बसला. पायाखालची जमीन सरकावी आणि जमीन फाटून त्यात आपण रुतत जावे, अशीच काहिशी त्यांच्या मनाची धारणा झाली. जसे कोणीतरी आपल्याला खाली खेचत आहे असे त्यांना वाटू लागले. अचानक त्यांचे डोके जड झाले. त्यांना भोवळ येऊन ते त्याच ठिकाणी बसले. आता लताला उठवण्याचा प्रयत्न करणे त्यांनी थांबवले होते. एका क्षणात त्यांच्या चेहऱ्याचा रंग बदलला होता. त्याचे कारणही तसेच होते. त्यांच्या प्रिय पत्नीचा ‘लताचा’ मृत्यु झाला होता. तीच्या शरीराला हात लावताच त्यांना ह्या गोष्टीची जाणीव झाली होती. त्यांच्या वागण्यात क्षणार्धात झालेल्या बदलाची घरातील इतरांनाही जाणीव झाली होती. वसंतरावांच्या चेहऱ्यावरील बदललेले भाव आणि त्यांचे लताच्या शेजारी असे शांतपणे बसून रहाण्यामुळे इतरांनाही सौम्य धक्का बसला होता. तितक्यात वसंतच्या वहिनीने ‘शैलाने’ लताला हात लावून पाहिले. तिचे थंड आणि स्थिर झालेले शरीर, त्यात प्राण नसल्याचे दर्शवत होते. लताचा असा अचानकपणे मृत्यु व्हावा अशी कल्पनाही

तीला सहन होणारी नव्हती. तिला रडू आले. ह्या क्षणी तिला आपल्या भावनांना आवर घालणे शक्यच झाले नसते.

वसंतरावांच्या भावाचे 'संदीपचे' शैलाशी लग्न झाले आणि तीला लताच्या रुपाने एक मैत्रीणच मिळाली. इतकी वर्ष लताने तिच्या प्रत्येक सुख-दु:खात तीची साथ दिली होती. प्रकाशच्या बेपत्ता असण्याची बातमी समजताच संदीप आणि शैला वसंतरावांच्या घरी आले होते. अशा प्रसंगी शैलाच्या तिथे येण्यामुळे लताला थोडे बरे वाटले होते. प्रकाशच्या हरवण्यामुळे लताची मानसिक स्थिती ठिक नसताना, तीला शैलामुळे थोडा आधार वाटू लागला होता. पण तरीही मनातून ती पूर्णपणे खचून गेली होती ज्याचा पत्ता तीने इतरांना लागून दिला नाही. अशा स्थितीत दोघी जावा एकमेकींना आधार देऊन आपले दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करत होत्या.

संदीप आणि शैलाचे लग्न होऊन बरीच वर्षे झाली होती. पण त्यांना अद्याप मुल झाले नव्हते. त्यामुळे प्रकाश त्यांना आपल्या मुलाप्रमाणेच होता. त्या दोघांचाही प्रकाशवर खुप जीव होता. आधीच प्रकाशच्या बेपत्ता असण्यामुळे सर्वच बेचैन होते आणि आता तर लताच्या जाण्यामुळे सर्वांनाच मोठा धक्का बसला होता. हृदयविकाराने लताचा मृत्यु झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. प्रकाशच्या हरवण्यामुळे, त्याचा विचार करुन-करुन तीच्या मनावर भरपूर मानसिक ताण निर्माण झाला होता. हा ताण तणाव तीला सहन न झाल्यामुळे त्याचे रुपांतर हृदयविकारामध्ये झाले आणि त्यातच दुर्दैवाने तीचा मृत्यु झाला.

लताच्या अंत्यसंस्काराची तयारी सुरु झाली. सगळे नातेवाईक आणि आजूबाजूची लोकं वसंतरावांच्या घरी जमा झाली होती. वसंतराव एका कोपऱ्यात उभे राहून खिन्न मनाने... लताच्या अंत्यसंस्काराची सुरु झालेली तयारी शांतपणे बघत होते. ह्या प्रसंगी कुणाशीही बोलण्याची त्यांची इच्छा नव्हती. तितक्यात तिथे जमलेल्या लोकांची अचानक कूजबूज वाढू लागली. म्हणून त्यांच्या बाजूला बसलेला त्यांचा भाऊ संदीप उठून उभा राहिला आणि

घराबाहेर कोणी आले आहे का? हे पाहू लागला. समोर पोलिस उभे असल्याचे त्याला दिसले. सर्वांना बाजुला करुन, ते थेट वसंतरावांच्या दिशेनेच चालत आले होते. घरात जमलेली गर्दी बघून घरात काहीतरी मोठी घटना घडल्याची त्यांना आधीच चाहूल लागली होती. पण तसे न दर्शवता त्यांनी त्याबद्दल विचारणा केली. वसंतरावांनी घडलेला प्रकार त्यांना सांगितला. खरेतर ते पोलिस प्रकाशच्या प्रकरणाबाबत काही चौकशी करण्यासाठी तिथे आले होते. पण तिथे घडलेल्या दु:खद घटनेमुळे आणि वसंतरावांची मानसिक स्थिती पाहून ''आम्ही उद्या परत येऊ'' असे सांगून ते निघून गेले.

घरात जमलेली गर्दी, त्यातच पोलिसांची भर, कालपासून झोपेतून न उठलेली आई ह्या सर्व गोष्टींमुळे वसंतरावांची मोठी मुलगी 'रिया' थोडी भयभीत झाली होती. पण तरीही घरी सुरु असलेल्या यासर्व गोष्टी तिला समजण्या पलिकडच्या होत्या. रिया लहानपणापासूनच मतिमंद होती. जरी तिच्या शरीराची वाढ इतर मुलींप्रमाणेच होत असली, तरी पण तिच्या बौद्धिक क्षमतेत मात्र वाढच होत नव्हती, त्यामुळे आपला भाऊ चार दिवसांपासून बेपत्ता आहे. काल हृदय विकाराने तीच्या आईचा मृत्यु झाला आहे. ह्या सर्व गोष्टी तिला न समजणाऱ्या होत्या. ती एकटीच काहीतरी बडबडत होती. घरातील सर्वांना तिच्या वागण्याची सवय असल्यामुळे तिच्या वागण्याकडे कोणी फारसे लक्ष न देता ते सर्व अत्यंसंस्काराची तयारी पुन्हा करु लागले.

———x———x———

लताचा अत्यंसंस्कार विधी झाला होता. प्रकाश हरवून पाच दिवस झाले होते. काल सांगितल्याप्रमाणे पोलिस वसंतरावांच्या घरी आले होते. प्रकाश हा खासदार मोहनरावांचा मुलगा असून त्यांनी त्याला वसंतला दत्तक दिले होते अशी खबर पोलिसांना लागली होती. वसंतने हे सत्य त्यांच्यापासून लपवून

ठेवल्यामुळे त्याचा जाब विचारण्यासाठी ते वसंतरावांच्या घरी आले होते. त्यांना हवी असलेली माहिती त्यांना मिळाल्यावर ते तिथून निघून गेले.

प्रकाशच्या बेपत्ता असल्यामुळे आणि लताच्या मृत्युमुळे वसंतरावांचे आता कशातच लक्ष लागत नव्हते. जेवण आणि झोपही ते आता जवळजवळ विसरलेच होते. कोणी आग्रह केल्याशिवाय ना ते जेवत ना झोपत. अशी त्यांची स्थिती झाली होती. आपल्या तब्येतीकडे नीट लक्ष न दिल्याने त्यांना आता अशक्तपणा जाणवू लागला होता. त्यांच्या घरी गेल्या पाच दिवसांमध्ये घडलेल्या दु:खद घटनांचा त्यांच्या मनावर इतका गंभीर परिणाम झाला होता की, त्यांना आता कशातच रस वाटत नव्हता. त्यांचा भाऊ संदीप आणि वहीनी शैला त्यांची व रियाची नीट काळजी घेत होते. गेल्या चार दिवसांपासून ते त्यांची काळजी घेण्यासाठी तेथेच थांबले होते आणि तसेही वसंतरावांना आता त्यांचाच आधार उरला होता.

संध्याकाळ झाली होती. वसंतराव एका खुर्चीत बसून झोपलेल्या रियाकडे एकटक बघत होते. कदाचित त्यांना आता तिच्या भविष्याची चिंता जास्तच सतावत होती. तितक्यात घराची बेल वाजली. शैलाने दरवाजा उघडला. घराबाहेर खासदार मोहनराव उभे होते. त्यांनी आपल्याबरोबरच्या इतर माणसांना इमारतीखाली त्यांची वाट बघत उभे रहाण्यास सांगितले आणि ते एकटेच घरात शिरले.

वसंत आणि मोहन हे लहानपणीपासूनचे मित्र होते. ते दोघेही एकाच गावातले असून, एकाच शाळेत सोबत शिकलेले होते. मोहन लहानपणापासूनच खूप हुशार होता. त्यांच्या गावातील शाळा, प्राथमिक शाळा होती. दोघांचे प्राथमिक शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर, मोहन त्याच्या पुढील शिक्षणासाठी त्याच्या काकांबरोबर शहरात आला. वसंतला पुढे शिक्षण घ्यायचे नसल्यामुळे तो मात्र गावातच राहिला. पण त्यामागचे मुख्य कारण म्हणजे वसंतचा कोणीही नातेवाईक शहरात रहात नसल्यामुळे त्याला गावातच रहावे लागणार होते. काही

वर्षे गावात काढल्यावर नंतर वसंतही शहरात आला. वसंतचे तेथे कोणीच ओळखीचे नसल्यामुळे, त्याच्याही रहाण्याची सोय मोहनच्या काकांनी, त्यांच्याकडेच केली होती.

आज मोहनची, मोठा उद्योगपती आणि खासदार म्हणून ओळख होती. वसंतही त्याच्याच एका उद्योगात त्याचा भागिदार म्हणून काम करत होता. राजकारणात आल्यापासून मोहन खूप व्यस्त झाला होता. त्यामुळे हल्ली त्याची आणि वसंतची फारशी वर्षे भेट होत नसे. पण अधून मधून त्यांची फोनवर एकमेकांशी बोलणे होत असे.

मोहनची दोन्ही मुले परदेशात शिक्षणासाठी गेली होती. दोन वर्षापूर्वी त्याच्या दुसऱ्या पत्नीचे कर्करोगामुळे निधन झाले होते. त्यामुळे तोही आता एकटा पडला होता. त्यामुळे तो आपला बराचसा वेळ राजकारणासाठी खर्च करुन स्वत:ला व्यस्त ठेवत असे. त्याची पत्नी वारल्यापासून फक्त वसंतच असा व्यक्ती होता, ज्याच्याबरोबर तो आपल्या मनातील भावना मुक्तपणे व्यक्त करु शकत होता. आजवर इतकी वर्ष त्यांनी एकमेकांच्या सहवासात घालवली होती. त्यामुळे वसंतचे त्याच्या जीवनात महत्वाचे स्थान होते. राजकारणात आल्यापासून आता जरी मोहनच्या आजूबाजूला, त्याच्याबरोबर बऱ्याच लोकांचा जमाव असला तरी पण वसंतशी त्याचे असलेले मैत्रीचे नाते... काही वेगळेच होते. ज्याची तुलना इतर लोकांशी होउच शकत नव्हती.

बराच वेळ झाला, तरी खासदार साहेब आले नाहीत म्हणून मोहन बरोबर आलेल्या माणसांपैकी एक व्यक्ती वसंतच्या घरी आली. मोहनने त्याला ‘‘दोन मिनिटात येतो.’’ असे सांगून इमारतीखाली उभे राहून त्याची वाट बघण्यास सांगितले.

प्रकाशला, वसंतकडे दत्तक दिल्यापासून, मोहनला त्याची काळजी करण्याची कधी गरजच वाटली नव्हती. वसंत त्याचा उत्तम सांभाळ करेल याची

त्याला खात्री होती. पण आता पाच दिवसापासून प्रकाश बेपत्ता असल्यामुळे त्याला आता मात्र प्रकाशची फारच चिंता वाटू लागली होती. कितीही झाले तरी तोच प्रकाशचा जन्मदाता पिता होता. त्यामुळे त्याला, प्रकाशची वाटणारी चिंता स्वाभाविकच होती. प्रकाशला शोधण्यासाठी त्याने आत्तापर्यंत आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. परंतू अद्याप प्रकाशचा ठाव-ठिकाणा पोलिसांना कळला नव्हता. त्यामुळे तो फारच अस्वस्थ झाला होता.

———X———X———

रात्रीचे दहा वाजले होते. घरातील टेलिफोनची रिंग वाजू लागली. संदीपने फोन उचलला. दोन मिनिंटे फोनवर बोलून, त्याने फोन ठेवला. त्याने लगेच शैलाला हाक मारली. ती आतल्या खोलीत रियाला जेवण भरवत होती. संदिपने तीला दरवाजा लावून घेण्यास सांगितले आणि तो, तिला काहीही न सांगताच घराबाहेर निघून गेला. त्यावेळी वसंतरावही घरी नव्हते. त्यांना सुद्धा घराबाहेर जाऊन, बराच वेळ झाला होता. लताच्या मृत्युनंतर आज वसंतराव पहिल्यांदाच घराबाहेर गेले होते. त्यामुळे ते नेमके कुठे गेले असतील या गोष्टीचा विचार शैला करु लागली.

काही वेळाने वसंतराव घरी आले. संदीप घरी नाही यागोष्टीची जाणीव होताच त्यांनी शैलाकडे त्याची विचारपूस केली. तेव्हा ''दहा मिनिटात येतो.'' असे सांगून संदीप घराबाहेर कुठेतरी गेल्याचे तीने वसंतला सांगितले. शैलाचे बोलणे ऐकुन, वसंतला प्रकाशची आठवण झाली. त्यादिवशी सुद्धा प्रकाश असाच, काहीही न सांगता रात्री घराबाहेर पडला होता.

शैलाने वसंतला जेवायला वाढू का? म्हणून विचारले. त्यावर नेहमीप्रमाणे, ''नाही नको, माझी इच्छा नाही किंवा भूक नाही.'' असे उत्तर वसंताकडून मिळेल असा तिचा अंदाज होता. पण त्या दिवशी, वसंतने 'हो'

म्हणून उत्तर दिले होते. वसंतचे वागणे. आज नक्कीच बदलले आहे हे शैलाच्या लक्षात आले होते. तिने वसंतला जेवायला वाढले. त्यादिवशी वसंत पोटभर जेवला होता आणि लगेचच झोपूनही गेला. त्याच्या अशा वागण्याचे शैलाला आश्चर्य वाटले होते.

संदीप अजुनही घरी आला नव्हता. त्यामुळे चिंतीत असलेल्या शैलाच्या मनात नको ते विचार येऊ लागले. तिने, घाबरुन वसंतरावांना हाक मारली. आत्तापर्यंत ते गाढ झोपी गेले होते. तीन-चार वेळा हाका मारल्यानंतर त्यांना कुठे जाग आली. उठताच क्षणी ते, ''काय..... फालतूऽऽऽ.... गिरी.... आहे?'' असे तुटक तुटक बोलू लागले. शेवटी शैलाचा त्यांच्यावरील संशय खरा ठरला. त्या दिवशी त्यांनी भरपूर दारु घेतली होती. त्यामुळेच त्यांचे वागणे आज थोडे विचित्र वाटत होते. तरीही शैलाने त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत, संदिप अजुनही घरी न आल्याचे वसंतला सांगितले. शैलाचे बोलणे ऐकुन वसंतराव थोडे भानावर आले होते. त्यांनी घड्याळाकडे बघितले, रात्रीचे बारा वाजले होते. संदीप न जेवताच, घराबाहेर पडला होता. त्यामुळे त्याची वाट बघत असलेली शैलाही अजून जेवलेली नव्हती. हे तिच्या बोलण्यातून वसंतरावांच्या लक्षात आले होते.

संदीपला बाहेर जाऊन बराच वेळ झाला होता. त्यामुळे वसंतला आता त्याची चिंता वाटू लागली होती. त्याला शोधण्यासाठी बाहेर जातो, असे शैलाला सांगून तो, घरातून बाहेर पडला. त्याच्या घराजवळील व्हरांड्यात तो चप्पल घालत उभा होता. तितक्यात कोणीतरी जिने चढून वर येत असल्याची, त्याला चाहूल लागली. त्याला माणसांच्या पावलांचे आवाज ऐकु येत होते. त्यामुळे कोण येत आहे? हे पहाण्यासाठी तो तिथेच थांबला. तितक्यात खालचा जिना चढून वर आलेल्या दोन व्यक्ती त्याच्यासमोर येऊन उभ्या राहिल्या. त्यातील पहिली व्यक्ती म्हणजे त्यांचा भाऊ संदीप आणि दूसरी व्यक्ती म्हणजे त्यांचा आठ दिवसांपासून बेपत्ता असलेला मुलग..... 'प्रकाश'.

———x———x———

प्रकाश सापडल्याचे, पोलिसांनी वसंतरावांच्या घरी फोन करून कळविले होते. त्यावेळी पोलिसांचा फोन आल्यावर संदीपने तो उचलला होता. प्रकाश सापडल्याचे कळताच संदीपही ताबडतोब पोलिसांनी त्याला सांगितलेल्या ठिकाणी पोहोचला. ज्यावेळी संदिप त्या ठिकाणी पोहोचला त्या वेळी पोलिस प्रकाशशी, घडलेल्या प्रकाराबद्दल चर्चा करत होते. ते प्रकाशला प्रश्न विचारत होते. आणि प्रकाशही त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे निमुटपणे देत होता.

प्रकाशने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्या दिवशी प्रकाशला त्याच्या मित्राने, इमारतीखालून आवाज देऊन, त्याला खाली बोलवले होते. त्यावेळी त्याच्या घरातील सर्व मंडळी, आतल्या खोलीत जेवणासाठी बसली होती. प्रकाशचेही ताट वाढून झाले होते. पण इमारतीखाली त्याचा मित्र आल्याने तो त्याला भेटण्याच्या उद्देशाने लगेचच इमारतीखाली आला. ज्या वेळी तो इमारतीखाली पोहोचला, त्यावेळी त्याचा मित्र त्याला, त्यांच्या इमारतीच्या समोरील रस्त्यावर उभा असलेला दिसला. प्रकाशने त्याला हाक मारली. पण त्याच्या मित्राने एकदाही त्याच्याकडे पाहिले नाही. त्यामुळे प्रकाशच त्याच्या दिशेने चालू लागला. प्रकाश त्याच्या दिशेने येत आहे; हे बघून त्याचा मित्र त्याच्यापासून दूर पळू लागला. प्रकाशला त्याच्या मित्राचे असे विचित्र वागण्याचे कारण लक्षात येत नव्हते. कारण याच्या आधी त्याचा तो मित्र त्याच्याशी इतक्या विचित्रपणे कधीच वागला नव्हता. त्यामुळे त्याचा मित्र त्याला बघून का पळत आहे? हे जाणून घेण्यासाठी प्रकाशही त्याच्यामागे धावू लागला. धावता-धावता त्याचा मित्र एका गल्लीत शिरला. पण गल्लीत त्याचा मित्र त्याला कुठेच दिसत नव्हता. त्याचा मित्र अचानक, एकाएकी तेथुन दिसेनासा झाला होता. बऱ्याच वेळेपासून प्रकाश त्याच्या मित्राला शोधत होता. पण तो त्याला अद्याप सापडला नव्हता. म्हणून अस्वस्थ होऊन प्रकाश पुन्हा आपल्या घराच्या दिशेने

चालू लागला. तितक्यात एक तीस पस्तीस वयाचा, एक माणूस त्याच्या जवळ आला. त्याच्या हातात कसला तरी कागद होता. तो कागद त्याने प्रकाशला दाखवला आणि त्यावर लिहिलेला पत्ता तो प्रकाशला विचारु लागला. प्रकाशने तो कागद हातात घेतला. आणि त्यावरील पत्ता, तो वाचू लागला. तेवढ्यात त्या व्यक्तीने प्रकाशच्या नाकासमोर एक रुमाल धरला. काही कळण्याच्या आतच प्रकाश बेशुद्ध झाला. प्रकाशला फक्त इतकेच आठवत होते.

ज्यावेळी त्याला जाग आली, त्यावेळी तो एका रुग्णालयामध्ये होता. प्रकाश शुद्धीवर आल्याचे कळताच, तिथल्या नर्सने ह्या गोष्टीची सूचना बाहेर उभ्या असलेल्या, पोलिसांना दिली. जसे पोलिस त्यांच्या समोर आले, तसा तो बिथरला. पोलिसांना आधीच प्रकाशची ओळख पटली होती. तरी त्यांनी पुन्हा प्रकाशशी विचारपूस करुन, तशी खात्री करुन घेतली आणि मग ते त्याला आपल्याबरोबर घेऊन गेले.

डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे, एक पन्नास पंचावन्न वयाची व्यक्ती प्रकाशला रुग्णालयात घेऊन आली होती. त्यावेळेस तो बेशुद्ध होता. त्या व्यक्तीच्या म्हणण्याप्रमाणे, प्रकाश त्याला तिथल्याच एका रस्त्याच्या कडेला पडलेला दिसला. म्हणून त्याने, जवळच्या दुकानदाराकडे त्याची चौकशी केली. दुकानदाराच्या म्हणण्यानुसार, तो सकाळपासून त्याच ठिकाणी पडून होता. ‘एखादा बेवडा दारु पिऊन पडला असेल’ या विचाराने कुणीही त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते. पण या अज्ञात व्यक्तीने मात्र त्याला रुग्णालयात दाखल करुन त्याच्यावर फार मोठे उपकार केले होते. प्रकाशशी कुठल्याही प्रकारची ओळख नसताना, त्याने मोठ्या मनाने प्रकाशची मदत करुन, जगात आजही माणुसकी शिल्लक आहे हे त्याने आपल्या वागण्यातून सिद्ध केले होते.

प्रकाशला परत येऊन दोन दिवस होऊन गेले होते. दोन दिवसात कित्येक लोकं त्याला भेटण्यासाठी आले होते. तर कित्येकांनी फोनवर

त्याच्याबरोबर घडलेल्या प्रकाराची चौकशी केली होती. कित्येकांनी तो सुखरुप परतल्याचे बघून समाधान व्यक्त केले.

मोहनरावही प्रकाश सापडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याला भेटण्यासाठी आले होते. तो सुखरुप असल्याचे बघुन त्यांना फार आनंद झाला होता. परंतू त्यांना समोर पहाताच प्रकाश मात्र भरपूर संतापला होता. त्याचा संताप इतका वाढला होता की, त्याचे संपूर्ण शरीर अग्नीप्रमाणे तप्त व्हावे असे वाटत होते. त्याची संतप्त नजर त्याच्या चेहऱ्यावरील संताप स्पष्ट करत होती. वसंतला त्याच्या रागाचे कारण अद्याप समजू शकले नव्हते. मोहनरावसुद्धा अजूनही शांतच होते. त्यांनी प्रकाशला काही विचारण्याआधीच ''आज कशी काय आठवण झाली तुम्हाला माझी? असा सवाल प्रकाशने त्यांना केला. तो प्रश्न कानी पडताच मोहनचा चेहरा काळवंडला. वसंतरावही, आपल्याला काहीच माहिती नसल्याचा पवित्रा घेत, आपल्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव प्रकट करत, प्रकाशला समजवण्याच्या प्रयत्नात होते. तेवढ्यातच प्रकाशने त्यांना शांत रहाण्यास सांगितले. ''खासदार साहेब मला तुमच्याकडून स्पष्टीकरण हवे आहे. हे आत्तापर्यंत तुमच्या लक्षात आलेच असेल, नाही का?'' एवढे बोलून प्रकाशची नजर मोहनवर स्थीर झाली होती. ''बाळ प्रत्येक वेळी जे दिसते ते सत्य नसते.'' मोहनराव म्हणाले. ''हेच तर म्हणायचे आहे मला, आजवर तुम्ही सर्वांनी मला अंधारात ठेवले होते. पण आता माझ्या अपहरणामुळे अशी बरीचशी सत्ये माझ्यासमोर आली आहेत. म्हणतात जे होतं ते चांगल्यासाठीच होत; आज माझ्याबाबतीतही नेमकं तेच खर ठरलं. माझ्या अपहरणामुळे मला आता खऱ्या अर्थाने माझी खरी ओळख पटली आहे.'' वसंत आणि मोहन दोघांच्याही चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव दिसत होते. प्रकाशचे अपहरण झाल्याचे प्रकाशने दोन दिवसानंतर आज पहिल्यांदाच सांगितले होते. त्यामुळे खरे सत्य काय आहे? हे प्रकाशशिवाय दुसरे कोणालाही माहित नव्हते.

‘‘माझे अपहरण कोणी केले होते? हे तुम्हाला माहित असेलच?’’ मोहनकडे बघुन तो पूटपूटला. वसंत आता थोडा भयभीत झाल्यासारखा दिसत होता. प्रकाशशी काहीही बोलण्याची त्याच्यात हिंमत उरली नव्हती. तो शांतपणे उभा होता.

‘‘म्हणजे तुझ्या जन्माचे रहस्य तुला आता कळले आहे तर?’’ मोहनने प्रश्न केला.

‘‘होय. पण मला तुमच्याकडून सर्व ऐकायचे आहे.’’ प्रकाश उद्गारला.

प्रकाशचे अपहरण कोणी केले? आणि कशासाठी केले? हे जरी वसंतला माहित नसले, तरी प्रकाश हा मोहनचा मुलगा आहे आणि प्रकाशच्या लहानपणीच त्याने त्याला वसंतला दत्तक म्हणून दिले होते. हे सत्य त्याने आजवर प्रकाशपासून लपवून ठेवले होते. त्यामुळे तो आता शांत बसला होता.

‘‘ठीक आहे.’’ मोहन बोलू लागला. आणि एक-एक करत त्याने प्रकाशला, त्याच्या जन्माचे सर्व रहस्य सांगून टाकले. त्याचे काका आणि काकी घराबाहेर कुठेतरी गेल्यामुळे, त्यावेळी तीथे फक्त प्रकाश, मोहन आणि वसंत होते. मोहनने प्रकाशला जे काही सांगितले, त्याचा त्यावर लगेच विश्वास बसला आणि त्याचा रागही शांत झाला होता. मोहनने प्रकाशला त्याच्या जन्माची रहस्ये सांगण्यास सुरुवात करण्याच्या आधी, त्याने एकटक वसंतकडे पाहिले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याची नजर वसंतवर पडताच तो एकदम स्तंभित झाला. ‘पाणी गोठून त्याचा बर्फ व्हावा!’ त्याप्रमाणे तो एकाच जागी स्थिर झाला. मोहनने, प्रकाशला ‘‘त्याची काळजी करु नको म्हणून सांगितले’’ आणि त्यानंतरच तो त्याच्याशी बोलू लागला होता.

‘‘प्रकाश काही दिवसातच मी तुला एका व्यक्तीची भेट करुन देईन, मला माहिती आहे अजुनही तुझ्या मनात बरेच प्रश्न शिल्लक असतील, ज्यांची उत्तरे तुला अद्याप मिळाली नसतील. त्या प्रश्नांची उत्तरे फक्त तीच व्यक्ती देऊ शकते.

ती व्यक्ती म्हणजे माझे वडील आणि तुझे आजोबा.'' एवढे बोलून त्याने आपले बोलणे थांबवले आणि पुन्हा एकदा वसंतकडे पाहिले. तसा वसंत पुन्हा एकदा सामान्य अवस्थेत येऊन, त्याच्या शरीराची हालचाल करु लागला. काही क्षणापूर्वी त्याच्याबरोबर काय झाले होत? हे त्याला आता आठवत नव्हते. त्याचप्रमाणे मोहनने प्रकाशला त्याच्या जन्माची काही गुप्त अशी रहस्ये सांगितली आहेत; याची त्याला जराही जाणीव झालेली नव्हती.

———x———x———

# खरी ओळख

प्रकाश ध्यानधारणेसाठी बसला होता. गेल्या दोन दिवसांपासून तो ध्यानातच होता. हल्ली त्याची ध्यानधारणा दिवसेंदिवस वाढतच चालली होती. अगदी तीन–चार दिवसही बिना अन्न–पाण्याशिवाय, एकाच ठिकाणी ध्यानाच्या अवस्थेत बसण्याचे, तंत्र त्याला फार आधीपासूनच अवगत होते. घरात कुणीही ध्यानधारणा करत नसतानाही, प्रकाशला मात्र लहानपणापासून ध्यान करण्याची सवय लागली होती.

तो ज्यावेळी तीन–चार वर्षांचा होता, तेव्हा पासूनच त्याच्या मनात ध्यानाविषयी प्रचंड आकर्षण निर्माण झाले होते. त्यासाठी निमित्त म्हणजे लहानपणी एकदा तो त्याच्या आई–वडीलांबरोबर त्यांच्या गावी गेला होता. त्यावेळी त्याने तिथल्या मंदिरात, एका व्यक्तिला ध्यानात बसलेले पाहिले. त्याचक्षणी त्याच्या मनात ध्यानाविषयी कुतुहल निर्माण झाले. तीन–चार वर्षांचा मुलगा एके दिवशी कोणालातरी ध्यानधारणा करताना बघतो आणि त्यापासून प्रेरणा घेऊन, तोच मुलगा कुणाच्याही मार्गदर्शनाशिवाय ध्यानातील समाधी अवस्थेपर्यंत पोहोचतो. हे सर्व विलक्षणच होते. वर्षानुवर्षे ध्यानधारणा करणाऱ्या साधकालाही समाधी अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी बरीच वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागतात, आणि इतके करुनही त्यापैकी कित्येकांना साधी मन:शांती देखील प्राप्त करता येत नाही. पण प्रकाश फार अल्पावधीतच म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षीच समाधी अवस्थेपर्यंत पोहोचला होता. हे कुणालाही सांगून सत्य वाटणारे नव्हते.

सुरुवातीच्या काळात वसंतराव आणि लताला त्याची फारच चिंता वाटायची. तसे लहानपणापासूनच प्रकाशचे वागणे बोलणे त्याच्या वयातील

इतर मुलांपेक्षा थोडे वेगळे होते. तो अभ्यासात हुशार असला, तरी तो सदैव त्याकडे दुर्लक्ष करत असे. इतर मुलांप्रमाणे त्याला खेळण्यातही फारसा रस नव्हता. शांतपणे बसून ध्यान करणे, एकटेच बसून तासन्‌तास कसला तरी विचार करत बसणे जणू हाच त्याचा छंद होता. त्यामुळे कित्येकदा तो आपल्यातच हरवलेला असायचा. त्यामुळे इतरांकडे त्याचे लक्ष नसायचे. थोडक्यात त्याला बाहेरच्या जगातील कुणाशीच फारसे घेणे-देणे नसायचे.

आपण कसे दिसतो? इतरांशी कसे वागतो? इतरांचे आपल्याबद्दलचे मत काय असावे? या गोष्टींचा त्याने लहानपणापासूनच कधी विचार केला नव्हता. किंबहुना इतरांचे विचारही अनेकदा त्याला न पटणारे होते. त्यामुळे तो आपल्या मनाप्रमाणेच वागत असे. जीवनातील प्रत्येक गोष्टीबाबत त्याचे स्वत:चे स्वतंत्र असे काही विचार होते आणि तत्वही ठरलेली होती. अनेकदा तो त्याचप्रमाणे वागत असे. काही वेळा त्याचे वागणे एखाद्या लहान मुलाप्रमाणे असायचे, तर काही वेळा ते एखाद्या अनुभवी प्रौढ व्यक्तीप्रमाणे असायचे.

प्रकाशला लहानपणापासूनच आपण ह्या जगातले नाही आहोत, आपण कोणीतरी वेगळेच आहोत असे वाटायचे. लहानपणापासूनच त्याला गुढ गोष्टींमध्ये प्रचंड आकर्षण वाटायचे. आपल्या विश्वाव्यतीरिक्त अजूनही अनेक गुढ विश्व अस्तित्वात आहेत आणि त्यात आपल्यापेक्षा कितीतरी वेगळ्या असलेल्या जीवांचे अस्तित्व आहे. असे त्याला सारखे वाटायचे. अशा प्रकारच्या गुढ गोष्टींमध्ये रमणारे त्याचे मन कधीही भौतिक गोष्टींमध्ये रमायला तयार नसायचे. त्याचे वागणे आणि त्यामागची त्याची भूमिका इतरांनाच काय पण वसंत आणि लतालाही समजणे अशक्य होते.

——x——x——

मोहनराव, स्वत:मध्येच हरवून ध्यान करणाऱ्या प्रकाशकडे बघत बसले होते. वसंतही तिथेच बसला होता. खरेतर त्याच्या जन्मापासूनच त्यांना तो कुणीतरी दिव्यआत्मा आहे असे वाटायचे आणि शेवटी तेच सत्य होते. प्रकाश हा कुणी सामान्य व्यक्ती नसून तो अर्धनागमनुष्य म्हणून जन्माला आला होता. त्याच्या जन्मापासून त्याच्या मस्तकावर असलेला नागमणी, ही त्याच्या नाग असल्याची खरी ओळख होती. पण ही गोष्ट त्याचे आजोबा म्हणजे मोहनचे वडील सोडले तर, कोणाच्याही लक्षात आली नव्हती. किंबहुना ही गोष्ट इतर कुणाच्याही समजण्यापलीकडचीच होती. प्रकाशच्या डोक्यावर त्याच्या टाळूच्या मध्यभागी लालसर रंगाची फोडी आली आहे; असेच त्याच्या जन्मानंतर सर्वांना वाटले होते. पण त्याच्या आजोबांना मात्र ती फोडी नसून तो प्राथमिक अवस्थेतील नागमणी असल्याचे केव्हाच लक्षात आले होते. प्रकाश एक वर्षाचा झाल्यावर त्याचे जायवळ केले गेले. त्यावेळी त्याच्या डोक्यावरील फोडीसारखा वाटणारा नागमणी आता, थोडासा स्पष्टच दिसू लागला होता. परंतू, त्यावेळी तो जागृत नसल्याने निस्तेज होता.

प्रकाशचे आजोबाही कोणी सामान्य मनुष्य नसून ते नागवंशातील एक इच्छाधारी नाग होते. जवळपास हजार वर्षापूर्वी त्यांची आणि त्यांच्या भावांची नागलोकातील राजपदासाठी भांडणे झाली होती. त्यानंतर त्यांना त्यांच्या 'नागतपस्वी' ह्या गुरुंच्या आदेशामुळे नागलोकातून पृथ्वीवर यावे लागले. अनंता एक इच्छाधारी नाग असल्यामुळे तो मनुष्याचे स्वरुप धारण करुन, इतर मनुष्यांप्रमाणे पृथ्वीवर राहू लागला. ज्यावेळी पृथ्वीवर नागांचे राज्य होते. त्यावेळचे मनुष्याचे जीवन आणि आत्ताच्या मनुष्याच्या जिवनामध्ये खुप बदल झालेला होता. त्यामुळे काळानुसार बदलेल्या मनुष्याची जीवनपद्धती शिकण्यासाठी त्याला बरीच वर्षे लागली. कालांतराने त्याला मनुष्यस्वरुपाची आणि मनुष्याच्या जीवनपद्धतीची सवय झाली. त्यानंतर त्याने एका सामान्य स्त्रीशी मनुष्याप्रमाणे विवाह केला. त्यांचा मुलगा मोहन हा एक सामान्य

इच्छाधारी नाग होता. पण त्याचा नातू प्रकाश हा दिव्य नागमणी घेऊन जन्माला आलेला, असमान्य शक्ती असलेला इच्छाधारी नाग आहे; हे जेव्हा अनंताला समजले, त्याच वेळी त्यांनी गुप्तपणे नागलोकातून नागतपस्वींना बोलावून घेतले आणि त्यांच्या सहाय्याने प्रकाशच्या शरीरातील अद्‌भूत नागशक्तींना त्याच्या शरीरातील सप्तचक्रांमध्ये आपल्या मंत्रशक्तीने कैद केले.

पृथ्वीवर नागांनी मनुष्यरुपात जन्म घेतल्याची ही पहिलीच घटना नव्हती. धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामांचे लहान बंधू लक्ष्मण आणि भगवान श्रीकृष्णाचे मोठे बंधू बलराम हे दोघेही शेषनागाचे अवतार होते. परंतू तो काळ आणि आजचा काळ यात हजारो वर्षाचा काळ लोटला गेला होता.

मनुष्यारुपात अद्‌भूत नागशक्ती आणि दिव्य नागमणी घेऊन जन्माला आलेल्या, आपल्या नातवाबद्दल आज ना उद्या नागलोकातील इतर नागांना समजेल आणि मनुष्यरुपात त्याचा जन्म झाल्याने, त्याला मनुष्याची बुद्धीमत्ता आणि नागांची अद्‌भूत शक्ती प्राप्त झालेली असल्यामुळे हा अर्धनागमनुष्य आपल्या अद्‌भूत सामर्थ्य शक्तीमुळे इतर इच्छाधारी नागांपेक्षा श्रेष्ठ ठरेल आणि मग त्याला आपला राजा बनवावे लागेल. या भितीपोटी ते प्रकाशला आपल्या दिव्य शक्तींची ओळख होण्याआधीच त्याला मारुन टाकण्याचा प्रयत्न करु शकतात. अशी शक्यता नागतपस्वींनी प्रकाशच्या जन्मानंतर वर्तविली होती. म्हणून हे सर्व टाळण्यासाठी आणि प्रकाशचा पत्ता इतर कुठल्याही नागाला लागू नये, म्हणून त्यांनी प्रकाशच्या नागशक्तींना त्याच्याच शरीरातील सप्तचक्रांमध्ये कैद केले आणि त्याची ओळख कोणालाही होऊ नये, म्हणूनच त्याच्या सुरक्षिततेसाठी, मोहन प्रकाशला वसंतकडे दत्तक देऊन टाकतो. आणि त्यासाठीच मोहनची पत्नी प्रकाशचा बरोबर सांभाळ करत नाही, असे खोटे कारण मोहनने वसंतसमोर पुढे केले होते.

———x———x———

प्रकाश ध्यानातून नुकताच बाहेर आला होता. त्याच्या समोर बसलेल्या मोहनरावांना पाहून तो आश्चर्यचकित झाला. ''तुम्ही इथे कसे?'' असा प्रश्न त्याने मोहनला केला त्यावर '' का? एक बाप आपल्या मुलाला भेटण्यासाठी येऊ शकत नाही?'' मोहनने त्याला विचारले. ''नाही, मला तसे म्हणायचे नव्हते.'' मोहनराव त्याचे खरे पिता असल्याचे त्याला हल्लीच समजले होते. इतकी वर्ष तो वसंतरावांना आणि लताला आपले माता–पिता मानत आला होता. पण आता त्याला सत्य कळले होते.

इतकी वर्षे त्याचे जीवन एका सामान्य मुलासारखेच व्यवस्थित चालल होतं . पण नागांकडून झालेल्या त्याच्या अपहरणानंतर त्याच्या समोर एक–एक करत त्याच्या जीवनाची सर्व रहस्ये उलगडत चालली होती. त्या अपहरणानंतरच त्याला स्वत:ची ओळख होऊ लागली होती. आत्तापर्यंतच्या त्याच्या जीवनात त्याला आलेल्या काही चित्र–विचित्र अनुभवांचा अर्थ आता कुठे त्याला समजू लागला होता. त्याचे गुढ गोष्टींविषयी असलेले आकर्षण, त्याला पडणारी अर्थहिन भयानक आणि विचित्र स्वप्ने. त्याच्या येण्याची चाहूल लागताच कुत्र्यांच्या, मांजरीच्या वागण्यात लगेच होणारा बदल, त्याला राग येताच त्याच्या शरीराचे वाढणारे तापमान अशा कितीतरी गोष्टींचा संमंध त्याच्या 'नाग' असण्याशीच निगडीत होता. हे त्याच्या आता लक्षात आले होते. तरीही सत्य समजल्यावर सुरुवातीला आपण कोणी सामान्य मनुष्य नसून अलौकिक शक्ती असलेला इच्छाधारी नाग आहोत, हे सत्य पचवणे त्याला खुपच जड गेले होते. इतकी वर्षे तो आपल्या मनामध्ये स्वत:ची जी ओळख बाळगून होता, ती ओळख एका घटनेनंतर त्याच्या मनातून पूसली गेली होती. आपण एक नाग आहोत, हे कळल्यानंतर त्याला फार मोठा धक्का बसला होता. पण त्या धक्क्यापेक्षा त्याच्या मनात स्वत:बद्दल अधिक कुतुहल निर्माण झाले. स्वत:बद्दल अधिक जाणून घेण्याची त्याच्या मनातील तीव्र इच्छा त्याला आता

स्वस्थ बसून देणारी नव्हती. आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला ध्यानातूनच मिळू शकतात. असे त्याला फार वाटे. एका अर्थी ते सत्यही होते. ध्यानातून त्याला होणारी दिव्य अनुभुती आणि त्यातून त्याला मिळणारे समाधान ह्या सर्व गोष्टी विलक्षणच होत्या. खरेतर प्रकाश लहान असतानाच या सर्व अद्भूत गोष्टी घडण्याची सुरुवात त्याच्या जीवनात झाली होती.

ज्यावेळी त्याने गावातील मंदिरात एका व्यक्तिला ध्यानधारणा करताना पाहिले, त्याच वेळी त्याच्या मनात ध्यानधारणेविषयी कुतहुलाबरोबरच आकर्षणही निर्माण झाले. त्यामुळेच तोसुद्धा ध्यान करण्यासाठी प्रेरित झाला होता. त्याचवेळी ध्यानाच्या माध्यमातून त्याने स्वत:चा शोध घेणे सुरु केले होते. ध्यानामुळे त्याला आजवर त्याच्या मनातील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली होती. पण तरीही त्याच्या मनात स्वत:बद्दलचे बरेचशे प्रश्न अजुनही शिल्लक होते. म्हणून तो थोडा अस्वस्थ होता.

मोहन त्याला त्याच्या आजोबांशी त्यांची भेट करुन देण्याकरता, त्याला तिथून नेण्यासाठी आला होता. आजवर मोहन आणि अनंताने त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याच्याशी कुठल्याही प्रकारचे सबंध ठेवले नव्हते. जाणीवपूर्वक ते दोघे प्रकाशपासून लांब राहिले होते. पण आता मात्र परिस्थिती बदलली होती. आता प्रकाशला त्याची खरी ओळख पटली होती. त्यामुळे त्याचे योग्य मार्गदर्शन करणे हे मोहन आणि अनंताचे कर्तव्य होते. अन्यथा त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची त्या दोघानांही जाणीव होती आणि भिती सुद्धा.

———x———x———

# शोध सुरु आहे.......

बऱ्याच वेळेपासून तो एकटाच मार्ग शोधत-शोधत चालत होता. त्याच्याबरोबर दुसरे कोणीही नव्हते. त्यामुळे तो शांतपणे एकटाच आपला मार्ग शोधत होता. तितक्यात अचानक ती त्याच्या समोर आली. त्या दिवशी देखील ती अशीच अचानक त्याच्या समोर आली होती. हे त्याला आठवले. पण त्या रिक्षाचालकाला पैसे देण्याच्या गडबडीत तिच्याकडे त्याचे दुर्लक्ष झाले आणि ती तशीच अचानक तिथुन नाहीशी झाली. त्या दिवसानंतर पुन्हा आज त्याची आणि तिची भेट झाली होती. पण ही नेमकी आहे तरी कोण? आणि ही अशी अचानकच, आपल्यासमोर कशी काय सारखी-सारखी येते? असे कितीतरी प्रश्न त्याच्या मनात रेंगाळत होते. पण तिची आणि त्याची ओळख नसताना 'याविषयावर तिच्याशी कसे काय बोलायचे? हा विचार करत असताना, त्याने गुपचुप तिच्याकडे पाहिले. खरचं खुप सुंदर होती ती! या आधी तिच्या इतकी लावण्यवती सुंदरी त्याने कधी पाहिल्याचे त्याला आठवत नव्हते. तो आपल्याकडे पाहत आहे हे लक्षात आल्यावर तिने लाजून त्याच्याकडे पाहत एक मंद हास्य केले. त्याने सुद्धा थोडेसे मंद हास्य करुन तीला प्रतिसाद दिला. तितक्यातच ती त्याच्या नजरेआड झाली. त्यामुळे तो पुन्हा एकटाच मार्ग शोधत चालू लागला. बराच वेळ चालल्यानंतर त्याला समोर माणसे दिसू लागली. तसा तो त्यांच्या दिशेने चालू लागला. तो जसा त्यांच्या जवळ पोहोचला तसा तो खूप घाबरला. त्याच्या समोर उभ्या असलेल्या त्या माणसांचे सर्व शरीर सामान्य माणसांसरखेच दिसत असले तरी त्यांचा चेहरा खूपच विचित्र आणि भयंकर दिसत होता. त्यांच्या चेहऱ्यावर ना डोळे होते, ना कान, नाक तोंड होते. पण डोक्यावर केसं मात्र होती. अशा प्रकारचे विचित्र शरीर असणारी माणसे, तो पहिल्यांदाच बघत होता. त्यांना बघुन तो खुप घाबरला होता. त्यामुळे घाबरुन तो त्यांच्यापासून दूर पळू लागला. ती माणसे त्याला आता दिसेनाशी झाली होती. तोच समोरुन त्याला रेड्यांचा मोठा ताफा त्याच्या दिशेने येताना दिसला.

हजारोंच्या संख्येने धावत येणारे रेडे बघुन तो पुन्हा दुसऱ्या दिशेला धावू लागला. ते रेडे जणू त्याचाच पाठलाग करण्याच्या दृष्टीने धावत होते असे त्याला वाटू लागले. अचानक समोर इतके रेडे बघुन तो खुपच घाबरला होता. ते रेडे धावत येऊन आपल्याला त्याच्या खुरांखाली चिरडून टाकतील असे विचार त्यांच्या मनामध्ये येऊ लागले. त्यामुळे आता तो रस्ता सोडून, रस्त्यालगतच्या घनदाट अशा जंगलाच्या आतमध्ये शिरला.

तिथली झाडे भरपूर उंच वाढलेली होती. मध्ये-मध्ये मोठ-मोठया वेली आणि जागो-जागी चित्र-विचित्र काटेरी झाडे होती. अशा घनदाट जंगलातून मार्ग काढणे जवळ-जवळ अशक्य असे काम होते. पण त्यावेळी त्यांच्याकडे त्या जंगलातून मार्ग काढण्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय नव्हता.

अजूनही सूर्य मावळायला बराच उशीर होता. अंधार पडायच्या आत त्याला त्या जंगलातून बाहेर पडायचे होते. पण ते अशक्य आहे, हे तो जाणून होता. त्यामुळे अंधार पडेपर्यंत शक्य होईल तितके अंतर त्याने त्या जंगलातून पदक्रांत केले. सकाळपासून चालून-चालून तो खूप थकला होता. त्यामुळे त्याने आरामासाठी एक जागा निवडली. त्याच्याकडील चामडी पिशवीमध्ये अजूनही बरेच पाणी शिल्लक होते. त्यामुळे त्याला पाणी शोधण्याची गरज नव्हती. विश्रामासाठी जागा निवडल्यावर, त्याने सुकलेल्या झाडांच्या फांद्या तोडून त्याच्यापासून अग्नी निर्माण केला. हा अग्नीच त्याचे जंगली प्राण्यांपासून रात्रभर संरक्षण करणार होता. चालता-चालता त्याने थोडीफार जंगली फळेही जमा केली होती. ती खाऊन तो तेथेच आडवा पडला. थकव्यामुळे त्याला गाढ झोप लागली.

———x———x———

ती एक फार मोठी प्रयोगशाळा होती. तिच्या भव्यतेमुळे त्या ठिकाणाला मानवी शरीराचा संग्रह केलेला कारखानाही म्हटले जाऊ शकले असते. मानवी शरीरातील जवळ-जवळ सर्वच भाग त्या प्रयोगशाळेत उपलब्ध होते. प्रयोगशाळेच्या सुरुवातीच्या भागात मोठ-मोठ्या भांड्यांमध्ये रक्त भरुन ते उकळण्याचे काम सुरु होते. जवळपास पंधरा फुट उंचीचे आणि तीस फुट रुंदीचे व्यास असलेले भव्य टोप भल्यामोठ्या दगडी चुलीवर ठेवले होते. त्यातील रक्त ढवळण्यासाठी दहा-बारा माणसे सतत कार्यरत होती. चुलीच्या बाजुलाच काही अंतरावर त्या टोपांच्या समांतर उंचीच्या भिंती उभारण्यात आल्या होत्या. त्या भिंतींच्या टोकावर उभे राहून, टोपामध्ये उकळणारे रक्त लांबूनच, व्यवस्थित ढवळता येईल अशी सोय करण्यात आली होती. त्या भव्य चुलींमध्ये लाकडांचे तुकडे टाकुन ती चुल पेटवण्यात आली होती. चुलीतील लाकडांनी चांगलाच पेट घेतला होता. ती लाकडे चुलीच्या तोंडापाशी पुढे सरकवण्यासाठी आणि आग नियंत्रित करण्यासाठी चुलीच्या खालच्या बाजुला काही माणसे कार्यरत होती. चुलीच्या प्रचंड मोठ्या अग्नीमुळे तेथील तापमान भरपूर वाढले होते.

त्या प्रयोगशाळेत तो पुढे-पुढे चालू लागला. तशी त्याच्या दृष्टीस रक्त उकळणाऱ्या भल्या मोठ्या चुलींची रांगच दिसू लागली. तो त्या चुलींची संख्या मोजू लागला. एका रांगेत जवळ-जवळ वीस-बावीस चुली होत्या. तशाच चुलींच्या दहा रांगा तिथे त्याच्या दृष्टीस पडल्या. चुलींच्या रांगा संपल्यावर बाजूच्या दूसऱ्या एका भव्य जागेत माणसांची हाडे जमा करण्यात आली होती. त्यात मानवी कवटी, हाता-पायांची हाडे, बरगड्या अशा प्रकारे प्रत्येक हाडे वेगळी करुन ठेवलेली होती. त्या ठिकाणी हाडांचे मोठे ढिग साचलेले होते. पुढे काही ठिकाणी यंत्राच्या सहाय्याने त्या हाडांचा चुरा केला जात होता. तर काही ठिकाणी त्यांना विशिष्ट आकार देऊन त्यापासून भांडी बनवण्याचे काम सुरु होते. त्याच ठिकाणी मानवी दातांचाही मोठा ढिग पडला होता. यंत्रामार्फत त्या

दातांनाही गोल आकार देऊन, त्यांच्या मधोमध एक लहान छिद्र पाडण्याचे काम सुरु होते.

बाहेर उकळणाऱ्या रक्ताचा वास सर्वत्र पसरलेला होता. त्यामुळे त्याला त्या ठिकाणी फार वेळ व्यतित करणे असहनीय झाले. पटापट पावले टाकत तो पुढील दुसऱ्या एका खोलीत गेला. त्या ठिकाणी हाडांचा चुरा कसल्यातरी चिकट द्रव्यपदार्थात मिसळून त्या मिश्रणातून टेबल, खुर्च्या, कपाटे बनवली जात होती. त्याच्या थोडे पुढे मानवी केसांपासून चटया तयार केल्या जात होत्या. त्याच्या पुढील खोल्यांमधील चित्र तर अजूनच भयानक होते. तिथे माणसाचे हृदय वितळवले जात होते आणि त्यापासून जॅमसारखा पदार्थ तयार केला जात होता. ते वितळविण्याकरिता भल्या मोठ्या दगडी चूलीचा वापर करण्यात आला होता. अशा प्रकारे त्या प्रयोगशाळेतील प्रत्येक ठिकाणी मानवी शरीरातील कुठल्या ना कुठल्या अवयवाच्या सहाय्याने काही ना काही बनवण्याचे काम सुरु होते.

ते ठिकाण, तसे अंधारमय होते. पण ठिकठिकाणी पेटवलेल्या मशालीमुळे समोरचे दिसण्याइतका प्रकाश तिथे निर्माण करण्यात आला होता. तेथील सर्व माणसे आपापली कामे व्यवस्थित करत होती. पण त्यांच्यामध्ये एक गोष्ट मात्र विचित्र होती. ती म्हणजे त्यांची भाषा. ते कुठल्यातरी सांकेतिक भाषेतून एकमेकांशी बोलत होते. हे त्यांना बघताच क्षणी त्याने ओळखले होते. आत्तापर्यंत त्याने तो सर्व परिसर बघितला होता. म्हणून तो आता तेथून बाहेर पडला.

बाहेर पडल्यावर त्याच्या दृष्टीस मोठ-मोठे डोंगर दिसू लागले. पण ते त्याच्यापासून थोडे दूर असल्याचे त्याच्या लक्षात आले. तरीही त्याची त्या डोंगराच्या पलिकडे जाण्याची इच्छा झाली. डोंगराच्या पलिकडे नक्कीच कोणतेतरी गाव असावे जिथे माणसांची वस्ती असेल असे त्याला वाटत होते. त्यामुळे तो त्या डोंगराच्या दिशेने चालू लागला. त्या दिशेने चालत असताना वाटेत त्याला एक मोठी नदी लागली. कसलाही विचार न करता तो त्या नदीत उतरला आणि

किनाऱ्याच्या दिशेने पोहू लागला. बऱ्याच वेळानंतर तो किनारा गाठण्यास यशस्वी झाला. किनाऱ्यावर आल्यावर त्याने आपली अंगवस्त्रे सुकण्यासाठी एका झाडाच्या फांदीवर सुकत टाकले. 'वस्त्रे सुकेपर्यंत थोडा वेळ आराम करावा,' असे त्याला वाटले म्हणून तो एका झाडाला टेकून झोपला. काही वेळाने जेव्हा त्याला जाग आली तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. ज्या भल्या मोठ्या नदीमधून तो पोहत आला होता ती नदी आता त्याच्या दृष्टीस पडत नव्हती. त्या ठिकाणावरुन अचानक नष्ट झालेल्या नदीमुळे तो विचारमग्न झाला होता. त्याने आपली सुकलेली वस्त्रे परिधान केली आणि ज्या ठिकाणी नदी होती त्या ठिकाणी त्याने जाऊन बघितले तर त्याला आश्चर्याचा धक्का बसला. नदीचे पात्र तिथेच होते पण त्यातील सर्व पाणी आटले होते. हे सर्व घडणे कसे काय शक्य आहे? याच विचारात तो पुन्हा डोंगराच्या दिशेने चालू लागला. काही वेळाने त्याला डोंगराचा पायथा दिसू लागला. त्यामुळे तो थोडा सुखावला.

डोंगराच्या पायथ्याशी एक भली मोठी गुहा होती. त्या गुहेत कोणीतरी रहात असावे असे त्याला वाटले. तो त्या गुहेत शिरल्या बरोबर त्याच्या दृष्टीस हाडांपासून बनवलेली विविध हत्यारे दिसली. त्याचप्रमाणे हाडांपासून बनवलेली विविध भांडी तिथे व्यवस्थित लावून ठेवली होती. त्या भांड्यांवर नक्षीकाम सुद्धा केलेले होते. काही भांडी झाकून ठेवलेली होती. त्यातील एक भांडे त्याने उघडून बघितले तसा त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने लगेच त्या भांड्याचे झाकण लावून टाकले. त्या भांड्यामध्ये लाल रंगाचा एक घट्ट पदार्थ ठेवलेला होता. माणसाच्या हृदयापासून बनवलेला तो एक प्रकारचा जॅम होता. ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. हा पदार्थ त्याच प्रयोगशाळेतील असावा असा त्याने अंदाज बांधला. आणि पुन्हा तो पुढे चालू लागला. तितक्यात त्याची नजर तिथल्या एका कपाटाकडे गेली. ते कपाटही हाडांचा चुरा आणि दुसऱ्या कसल्यातरी मिश्रणापासून बनविलेले होते. हे लगेच त्याच्या लक्षात आले. त्याने ते कपाट उघडून पाहिले पण ते आतून पूर्णपणे रिकामे होते. तो कपाटाच्या

दारावरील कोरलेल्या नक्षीवरुन हात फिरवत होता. तितक्यात त्याची नजर कपाटाच्या मागच्या बाजूला असलेल्या एका लहान छिद्राकडे गेली. त्या छिद्राजवळच त्यात जाईल तितक्याच आकाराची, हाडांपासून बनवलेली एक नळी ठेवलेली होती. त्याने ती नळी त्या छिद्रामध्ये टाकली तशी कपाटाच्या आतल्या बाजुची भिंत खाली सरकू लागली. क्षणार्धात त्याच्यासमोर एक गुप्त भुयार उघडे झाले. त्याने त्या भुयारात डोकावून पाहिले तिथे भरपूर अंधार होता म्हणून त्याने त्या गुहेतीलच एक मशाल आपल्या हाती घेतली. ती मशाल त्याने भुयारासमोर धरली तसे त्याला भुयारातील खाली उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्या दिसू लागल्या.

हळू-हळू एक-एक पायरी उतरल्यानंतर त्याच्या पायाला जमिनीचा स्पर्श झाला. अत्यंत विशाल जागा होती ती. हे सर्व कोणी निर्माण केले असावे? हा प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाला. मशालीच्या उजेडात हळू-हळू पावले टाकत तो पुढे-पुढे चालत होता. त्याच्या दृष्टीस सर्वत्र मोकळा परिसर दिसत होता. काही वेळाने त्याच्या दृष्टीस पुढे, एका ठिकाणी काहीतरी असल्याचे अस्पष्ट दिसू लागले. म्हणून तो त्या दिशेने चालू लागला.

त्या ठिकाणी हजारोंच्या संख्येने माणसांची प्रेतं एका रांगेत एकमेकांवर रचून ठेवलेली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकाही प्रेताच्या शरीरावर कुठल्याही प्रकारची वस्त्रे नव्हती. आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्या ठिकाणी इतकी प्रेतं असूनही त्यांचा जरासुद्धा वास येत नव्हता. माणसाच्या मृत्युनंतर काही तासांमध्येच त्याचे शरीर सडण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होते. पण तिथे मात्र असे काहीच घडत नसल्याचे त्याच्या लक्षात आले. तिथली प्रत्येक प्रेतं अगदी जशीच्या तशीच होती. ती किती काळापासून तिथे असतील? हा प्रश्न त्याच्या मनात घुटमळू लागला. ज्यावेळी तो त्या प्रेतांच्या ढिगाऱ्याजवळ गेला त्यावेळी एक गोष्ट मात्र त्याच्या लक्षात आली होती; ती म्हणजे प्रत्येक प्रेताच्या मानेवर शस्त्रापासून केलेला एक-एक वार दिसत होता. याचाच अर्थ, त्या सर्व माणसांना

मारण्यात आले होते. त्यामुळे आता त्याला त्या ठिकाणाची भिती वाटू लागली. इथे जर कोणी आपल्याला बघितले, तर ते आपल्यालाही मारतील असे त्याला वाटू लागले.

पण तरीही, त्याला ती संपूर्ण जागा बघायची होती. म्हणून तो त्या प्रेतांचे ढिग असलेल्या जागेतून मार्ग काढत पुढे-पुढे चालू लागला. पुढे गेल्यावर त्याला कसलेतरी आवाज ऐकु येऊ लागले. म्हणून तो आवाजांचा वेध घेऊन त्या दिशेला चालू लागला. त्याच्या समोर त्याला एक दरवाजा दिसत होता. त्याने आपल्या हातातील मशाल खाली जमिनीवर, भिंतीला टेकवून नीट करुन ठेवली आणि मग त्याने हळूच तो दरवाजा आतल्या दिशेला ढकलला आणि दरवाज्याच्या आतल्या खोलीत डोकावून पाहिले. खोलीच्या आतमध्ये त्याला काही माणसे दिसू लागली. ती माणसेसुद्धा प्रयोगशाळेतील माणसांप्रमाणेच दिसत होती. त्यांनी वस्त्र म्हणून शरीराभोवती जनावरांची कातडी गुंडाळलेली होती. ती माणसे देखील आपापसात सांकेतीक भाषेत बोलत होती. पण काही वेळा बोलताना त्यांच्या तोंडातून विचित्र आवाज बाहेर काढत होते. त्या ठिकाणी उजेडासाठी ठिक-ठिकाणी मशाली पेटवलेल्या होत्या. त्यामुळे आतले सर्व काही त्याला स्पष्ट दिसत होते.

तेथे आतमध्ये एका बाजूला, मारुन ठेवलेल्या माणसांच्या शरीरातून रक्त वेगळे केले जात होते. पण त्याच्या माहितीप्रमाणे असे करणे केवळ अशक्यच होते. कारण मृत्युनंतर शरीरातील रक्त गोठण्यास सुरुवात होते. पण इथले सर्व मृतदेह जणू आत्ताच त्यातील प्राण निघून गेल्यासारखे ताजे टवटवीत दिसत होते. त्या मृतदेहामधून रक्त बाहेर काढण्यासाठी यंत्राचा वापर केला जात होता. शरीरातील रक्त काढून झाल्यावर त्यातून हृदय वेगळे केले जात होते. शरीरातून हृदय काढून झाल्यावर, ते त्या शरीराला, तिथेच असलेल्या एका मोठ्या हौदात टाकत होते. एकाबाजुला मृतदेह त्या हौदात टाकण्याचे काम सुरु होते, तर त्याच्या दुसऱ्या बाजूला हौदातून मानवी हाडांचे सांगाडे वरती काढण्याचे काम

सुरु होते. 'म्हणजेच त्या हौदामध्ये मानवी शरीर वितळवून, त्यातील हाडे विलग करणारा कुठलातरी पदार्थ नक्कीच असणार.' याची त्याला आता खात्री झाली. वर काढलेल्या हाडांच्या सांगाड्यातून कवटी, दात, हाता–पायांची हाडे आणि बरगड्या हे भाग वेगवेगळे करुन ते सर्व भाग पोत्यात भरुन ठेवण्यात येत होते. त्यामुळे यासर्व गोष्टींचा संबंध त्या प्रयोगशाळेशी असून मानवी शरीराचे हे सर्व भाग तिथेच पोहोचवले जात असावेत असा अंदाज त्याने बांधला.

घामाघुम होऊन प्रकाश झोपेतून जागा झाला. इतके भयंकर विचित्र स्वप्न बघितल्याने तो भयभित झाला होता. त्याच्या उशाशी तांब्यात ठेवलेले पाणी तो गटागटा पिऊ लागला. तितक्यात मोहनराव त्या खोलीत आले आणि त्यांच्या पाठोपाठच अजून दोन व्यक्ती त्याच्या समोर आल्या. त्या दोन व्यक्ती म्हणजे..... त्याचे आजोबा..... आणि नागतपस्वी...

———x———x———

## स्वप्न की सत्य ?

मोहनने प्रकाशला त्याचे आजोबा 'अनंता' आणि नागतपस्वींची ओळख करुन दिली. अनंताला बघताच त्याच्या मनातील, त्याच्या बालपणीच्या स्मृती जागृत झाल्या. ज्या व्यक्तीला त्याने त्याच्या गावी, मंदिरात ध्यान करताना बघितले होते. आज तीच व्यक्ती पुन्हा त्याच्या डोळ्यासमोर त्याला दिसत होती. लहानपणी त्याने त्या मंदिरात ध्यान करताना, ज्या व्यक्तीला बघितले होते, तीच व्यक्ती त्याचे आजोबा असल्याचे सत्य त्याला आज समजले होते.

नागमणी घेऊन जन्माला आलेला प्रकाश हा एक दिव्य नाग होता. त्यामुळे त्याला पडलेल्या स्वप्नाचा नक्कीच काहितरी गुढ अर्थ असणार याची अनंताला खात्री पटली होती.

प्रकाशला पडलेले स्वप्न ऐकुन नागतपस्वींनी आपले डोळे विस्फूरले होते. प्रकाशला पडलेले ते भयानक स्वप्न, निव्वळ एक स्वप्न नसून ते एक सुचक स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. स्वप्नात त्याने जी आटलेली नदी बघितली. त्या नदीचा संबंध नागलोक आणि पृथ्वीलोक यांना जोडणाऱ्या गुप्तमार्गाशी असल्याचे त्यांनी सांगीतले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ती नदी आटणे ही फार मोठी चिंतेची बाब आहे. हे त्यांनी स्पष्ट केले. कारण नदी आटल्यामुळे नागलोक आणि पृथ्वीलोकाला जोडणारा गुप्त मार्ग सर्व नागांसाठी खुला होणार होता. त्यामुळे सर्व नागांचा, पृथ्वीवरील प्रवेश पुन्हा सहज शक्य होणार होता.

प्रकाशला स्वप्नात हजारोंच्या संख्येने धावणारे रेडे दिसले होते. ते मनुष्याचे नागलोकावरील आक्रमणाचे प्रतिक असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्यावेळी नागांमध्ये आपापसातील भांडणे वाढुन त्यांच्यात असंतोषाची स्थिती निर्माण होईल त्यावेळी मनुष्य त्याचा फायदा घेऊन नागलोकावर आक्रमण करेल. डोळे, कान, नाक, तोंड नसलेली ती माणसे यमदुताचे प्रतिक होते. ज्यावेळी माणसामधील मानवी गुणांचा ऱ्हास होऊ

लागेल, त्यावेळी आपोआपच त्यांच्यात राक्षसी प्रवृत्तींची वाढ होईल आणि मग मनुष्यच यमदूत बनून संपूर्ण सृष्टीच्या विनाशाचे कारण बनेल. असे होणे विधिलिखितच असल्याचे त्यांनी सांगितले पण यासर्व गोष्टी कशासाठी घडतील? त्यामागचे कारण काय? हे मात्र त्यांनी सांगितले नव्हते.

———x———x———

नागतपस्वी प्रकाशशी बोलत होते. ''बाळ प्रकाश तू कोणी सामान्य नाग नसून दिव्य नागमणी असलेला, अलौकिक नागशक्तींचा स्वामी आहेस. तुझ्यामध्ये इतर इच्छाधारी नागांपेक्षा कितीतरी पट अधिक अद्भूत अशा शक्ती आहेत. या पृथ्वीवर तुला सुरक्षितपणे वास्तव्य करता यावे यासाठीच, तुला इतकी वर्षे तुझ्या वडीलांपासून आणि आजोबांपासून दूर रहावे लागले. हे मी जाणतो. तुझ्यासारख्या शक्तीशाली सामर्थ्यवान नागाचा पृथ्वीवर मनुष्यरुपात जन्म झाला आहे, हे सत्य नागलोकातील इतर नागांपर्यंत पोहोचू नये, म्हणुनच मी तुझ्या लहानपणी तुझ्यातील नागशक्तींना तुझ्या शरीरातील सप्तचक्रांमध्ये बंदिस्त केले होते. म्हणजेच एका अर्थाने निष्क्रिय केले होते. पण आता मात्र, इतकी वर्षे तुझ्या शरीरात सुप्त अवस्थेत असलेल्या त्या शक्तींना जागृत करण्याची वेळ आलेली आहे.'' इतके बोलून त्यांनी आपले डोळे मिटले आणि आपला हात प्रकाशच्या मस्तकावर ठेवला. तोंडामध्ये कुठलातरी मंत्र बोलून झाल्यावर, त्यांच्या हातातून दिव्य स्पंदने बाहेर पडू लागली. त्यांच्या हातातून निघणाऱ्या दिव्य लहरी तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच जाणवू लागल्या. क्षणार्धातच त्यांनी प्रकाशच्या मस्तकावरील सहस्त्रार चक्रातील शक्तींना जागृत केले. आता त्यांनी आपला हात त्याच्या कपाळावर ठेवला, आणि क्षणार्धातच त्याच्या अज्ञाचक्रातील निष्क्रिय शक्तींना सक्रिय केले. अशाप्रकारे एक-एक करत त्यांनी प्रकाशच्या विशुद्ध चक्र, अनाहत चक्र, मणिपुर चक्र, स्वाधिष्ठान

चक्र आणि मुलाधार चक्र अशा सप्तचक्रांमधील बंदिस्त नागशक्तींना जागृत केले.

इतकी वर्षे प्रकाशच्या शरीरातील सप्तचक्रांमध्ये कैद असलेल्या शक्तींच्या जागृतीनंतर प्रकाशला आपल्या दिव्य शरीराची अनुभुती होऊ लागली. त्या क्षणानंतर त्याचे संपूर्ण आयुष्य बदलून जाणार होते, याची त्याला साधी कल्पनाही नव्हती. त्याचे मन, त्याचा आत्मा आणि त्याचे शरीर यासर्वच पातळीवरील त्याचे जीवन आता बदलणार होते. आता तो पूर्वीचा सर्व–सामान्य मनुष्य असणारा, प्रकाश रहाणार नव्हता. आता तो खऱ्या अर्थाने एक इच्छाधारी नाग बनला होता.

———x———x———

## अपहरणाचे रहस्य

त्या दिवशी रात्री मित्राची हाक ऐकून अचानकपणे घराबाहेर पडलेल्या प्रकाशचे, नागांनीच मानवी रुप धारण करुन अपहरण केले होते, हे आत्तापर्यंत स्पष्ट झाले होते. पण अपहरणानंतर प्रकाशबरोबर नेमके काय घडले होते? हे अजुनही प्रकाश आणि नागतपस्वी यांच्या खेरीज दुसऱ्या कोणालाही माहिती नव्हते.

हजारो वर्षापूर्वी नागलोक सोडलेल्या अनंताचा नातू मानवी रुपातील नाग असल्याचे, इच्छाधारी नागांना नुकतेच समजले होते. त्यामागचे कारणही तसेच होते. प्रकाशच्या लहानपणीच नागतपस्वींनी त्याच्या दिव्य शक्तींना त्याच्या शरीरातील सप्तचक्रांमध्ये बंदिस्त केले होते. त्यामुळे इतकी वर्षे तो एका सामान्य व्यक्तीसारखेच जीवन व्यतीत करत होता. पण आता तो जवळपास तेवीस वर्षाचा झाला होता. त्याच्या शरीरातील बंदिस्त शक्ती आता, त्याच्या सप्तचक्रांमधून बाहेर येण्याचा मार्ग शोधू लागली होती. सहाजिकच त्या अद्भूत शक्तींची स्पंदने नागलोकांपर्यंत पोहचू लागली होती. प्रकाश हा नागमणी घेऊन, मनुष्य रुपात जन्मलेला दिव्य नाग असल्याचेही, नागांच्या राजाला त्याच्या प्रधान नागऋषी कडून समजले होते. त्यासाठी त्याने प्रकाशच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी काही नागांना मनुष्यरुप धारण करुन काही काळ पृथ्वीवरच वास्तव्य करण्यास सांगितले होते. ज्यावेळी त्यांना, प्रकाशच तो नाग असल्याची खात्री पटली त्यावेळी नागांकडून त्याचे अपहरण करण्यात आले.

प्रकाशला शोधण्यासाठी नागलोकातून आलेल्या नागांनी मानवी रुपात राहून अत्यंत गुप्तपणे प्रकाशचा शोध सुरु ठेवला होता. 'प्रकाश अनंताबरोबर किंवा त्याच्या मुलाबरोबर म्हणजेच मोहनबरोबर राहत असावा' असे सुरुवातीला त्यांना वाटले होते. परंतू बराच काळ शोध घेतल्यावरही तो त्या दोघांकडेही सापडला नाही. म्हणून ते हताश झाले आणि नागलोकी परतले.काहीही झाले

तरी त्या अर्धनागमनुष्याला शोधून त्याला नागराजकडे घेऊन जायचे हे त्यांनी ठरवले होते. पण पृथ्वीवर आल्यावर मात्र त्यांना ह्या कामात अपयश आले होते. नागलोकात परतल्यावर त्यांनी नागराजच्या आदेशावरुन, प्रकाशला शोधण्यासाठी नागऋषींची मदत घेतली. नागऋषींना पृथ्वीवरील प्रकाशची स्पंदने जाणवत होती त्यामुळे त्यांनी त्या नागांना प्रकाशचा पत्ता सांगितला होता.

पृथ्वीवर परतल्यावर नागांनी बऱ्याच दिवसांपासून प्रकाशवर पाळत ठेवली होती. त्यांचे त्याच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष असायचे. पण प्रकाशच्या वागणुकिवरुन तो नाग असेल असे त्यांना वाटत नव्हते. म्हणून त्यांनी तो खरोखर नाग आहे, की नाही? या गोष्टीचे परिक्षण करण्याचे ठरविले.

अपहरणाच्या दिवशी प्रकाशला स्टेशनपासून त्याच्या घरी सोडायला आलेला रिक्षावाला मानवी रुपातील इच्छाधारी नाग होता. नागांना पटकन संताप येतो. त्यामुळे जर प्रकाश नाग असेल तर त्याच्या समोर त्याला संताप येणारे वर्तन केले, तर तो आपल्यावर संतापेल. आणि मग त्याचा, त्याच्या शक्तींवरील ताबा सुटेल आणि आपोआपच सत्य बाहेर पडेल. असे त्यांना वाटत होते. त्यामुळे तो मानवीरुपातील रिक्षावाला त्या दिवशी प्रकाशला राग येईल असे वर्तन करत होता. पण प्रकाशच्या बाबतीत मात्र तसे काहीच घडले नव्हते. त्या दिवशी त्याला रिक्षावाल्याचा राग तर आला होता. पण त्याचा त्याच्या शक्तींवरील ताबा सुटला नव्हता. या उलट तो इतर मनुष्याप्रमाणे त्याच्याशी मारामारी करु लागला. जी कुठल्याही मनुष्यासाठी स्वाभाविक प्रतिक्रिया होती. काही केल्या सत्य त्यांच्या नजरेसमोर येत नव्हते. पण नागऋषींनी मात्र तोच अर्धनागमनुष्य असल्याचे सांगितले होते. म्हणून मग त्यांनी त्याच्या अपहरणाची योजना बनवून त्याला आपल्याबरोबर नागलोकी नेले.

———X———X———

नागराज नागासनावर बसला होता. त्याच्या शेजारीच त्याच्याबरोबर नागराणी बसली होती. नागतपस्वी आणि नागऋषीही तिथेच उपस्थित होते. तितक्यात बल्ल आणि मल्ल हे दोन नाग तिथे प्रकाशला घेऊन आले. गुंगीच्या औषधाच्या प्रभावामुळे प्रकाश अजुनही मुर्छित अवस्थेत होता. त्यांनी त्याला नागराजच्या समोर आणून ठेवले. नागराजने त्याच्यावर दृष्टीक्षेप टाकला. काही क्षण त्याने प्रकाशला निरखून बघितले. आणि मिश्किलपणे स्मित हास्य केले. ''ह्याला ताबडतोब मुर्छेतून बाहेर काढा.'' त्याने आपल्या सेवकांना आज्ञा दिली. लगेचच एक नाग सेवक तिथे आला आणि त्याने कुठल्यातरी मंत्राच्या उच्चाराने प्रकाशवरील गुंगीच्या औषधाचा प्रभाव कमी केला. तसे लगेचच प्रकाशने आपले डोळे उघडले. इतका काळ औषधाच्या प्रभावाखाली असल्यामुळे आपल्या बरोबर नेमके काय घडले आहे? हे त्याच्या लक्षात येत नव्हते.

प्रकाशने डोळे उघडताच क्षणी त्याच्या दृष्टीसमोर असंख्य नाग उपस्थित होते. त्यामुळे तो फारच भयभीत झाला. आपण कुठल्यातरी भयंकर मोठया संकटात सापडल्याची त्याला जाणीव झाली. आपल्याजवळील उरले-सुरलेले धैर्य एकवटून तो कसा बसा उभा राहिला. त्याच्या समोरच एक भला मोठा नाग नागासनावर बसला होता. त्याच्या बाजुला अजुन एक नाग दुसऱ्या आसनावर बसला होता. त्याने आपली दृष्टी बाजूला वळवली, तसे त्याच्या दृष्टीस हजारो लहान मोठे नाग दिसू लागले. पण ते सर्व उभे होते. त्यांना बसण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या आसनाची सोय नव्हती. त्यामुळे समोर बसलेले ते दोन नाग यांचे राजा आणि राणी असावेत असा अंदाज त्याने बांधला.

आत्तापर्यंत तो भयभीत नजरेने त्या अंधाऱ्या आणि भयावह असणाऱ्या विचित्र ठिकाणाचे आणि तिथल्या असंख्य नागांचे निरीक्षण करत होता. तितक्यातच, ''तू कोण आहेस याची जाणीव तरी आहे का तूला?'' नागराजने प्रश्न केला. आयुष्यात प्रथमच, कोणी कल्पनाही करु शकणार नाही इतका

मोठा नाग त्याने पाहिला होता. आणि आता तर तो नाग त्याच्याशी मानवी भाषेत बोलत होता. त्यामुळे भयभीत झालेल्या प्रकाशला काही सुचेनासे झाले होते. तो एकदम स्तब्ध होऊन समोरील दृष्य शांतपणे उघड्या डोळ्यांनी बघत होता. त्याचे मौन बघून नागराज अधिकच चिडला. ''मी तुझ्याशी बोलत आहे, मूर्ख मनुष्य.'' तो मोठ्याने ओरडला. त्याचे शब्द कानावर पडताच, प्रकाशने स्वत:ला सावरले आणि तो दबक्या आवाजात त्याच्याशी बोलू लागला. ''मी.... प्रकाश... तुम्ही मला इथे कुठे आणले आहे? हे सर्व काय सुरु आहे? आणि तुम्ही सर्व कोण आहात?'' असे एक-एक करत तो त्याला प्रश्न विचारु लागला. नागराजने दिलेल्या त्याच्या प्रश्नांची उत्तरे ऐकुन तो अधिकच भयभित झाला. नागराजच्या म्हणण्यानुसार तो सुद्धा एक नाग होता. साहजिकच त्याच्या बोलण्यावर सुरुवातीला, प्रकाशचा विश्वास बसला नव्हता. एखादा मनुष्य नाग कसा काय असू शकतो याचा विचार तो करु लागला. आणि क्षणार्धातच हे सर्व खोटे असल्याच्या निष्कर्षावर तो पोहोचला. त्यानंतर नागराजने त्याला त्याच्या आजोबांची म्हणजे अनंताची कथा सांगितली. पण त्यावेळी तो अशा कुठल्याही व्यक्तीला ओळखत नसल्याने, त्याचा त्या गोष्टीवरही विश्वास बसला नव्हता. अनंताचा मुलगा मोहन हाच तुझा जन्मदाता पिता असल्याचेही त्याला सर्वप्रथम नागराजकडून समजले होते. पण त्यावेळी त्याला त्याच्या बोलण्यावर काडीचाही विश्वास नव्हता. त्यावेळी प्रथमच भेटलेल्या, त्या बोलणाऱ्या नागावर तो विश्वास ठेवूच शकला नसता. ''तुम्ही ज्या काही काल्पनिक गोष्टी मला सांगत आहात. त्यांच्याशी मला काहीही देणे-घेणे नाही. तुम्ही माझी इथुन मुक्तता करा.'' प्रकाश थोडा चिडून म्हणाला. त्यावर नागराज दृष्टतेने सैतानासारखा हसला. ''तुला आमचे बोलणे खोटे वाटते? अरे तु देखील आमच्यासारखाच एक नाग आहेस, तुझे पिता आणि आजोबाही नाग वंशातलेच आहेत.'' तो तिरस्काराने म्हणाला.

प्रकाशचा त्या अंधारमय आणि कोंदट जागेत जीव घुसमटत होता. त्याला श्वास घेणे कठीण जात होते. ''तुम्ही माझी इथुन सुटका करा. मी एक सामान्य मनुष्य आहे.'' तो विनवणी करत होता. नागराजने त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता, त्याने ''नागतपस्वी, नागऋषी....... मी या विचित्र जीवाचे काय करु?'' म्हणून विचारले. नागतपस्वी चिंतेत दिसत होते. ते काहीच बोलले नाहीत. त्यांच्यासमोर सर्वकाही विपरीत घडत होतं. म्हणून ते शांत होते. पण नागऋषी मात्र प्रकाशकडे क्रोधित नजरेने पहात होते. ''नागराज तु ह्या मनुष्याला आत्ताच संपवून टाक, नाहितर तो पुढे आपल्या मार्गातील काटा बनेल.'' आणि कदाचित आपला वंश नष्ट करण्यास कारणीभूतही ठरेल.'' नागऋषी क्रोधाने म्हणाले. ''पण हा पूर्णपणे मनुष्य नाही, तो आपल्यापैकीच एक आहे. किंबहुना तो आपल्यापेक्षाही श्रेष्ठ नाग आहे. त्यामुळे भविष्यात त्याच्याकडून आपल्या वंशाच्या हिताचेही कार्य घडू शकते. त्यामुळे त्याची हत्या करणे योग्य ठरणार नाही.'' नागतपस्वी पटकन बोलून गेले.

नागराज आता थोडा गोंधळला. 'प्रकाशचे' काय करावे, त्याला कळत नव्हते. ''नागराज तु ह्या वृद्धाचे काहीही ऐकु नकोस. वृद्धत्वामुळे त्याची बुद्धी क्षीण झाली आहे. हा जीव आपल्या वंशाचे रक्षण नाही तर भक्षण करण्यास कारणीभूत ठरेल. त्यामुळे तु आत्ताच त्याला मृत्युदंड दे.'' नागऋषी म्हणाले.

त्यांचे संभाषण ऐकून प्रकाश खुपच घाबरला. त्याच्या हदयाचे ठोके वाढले होते. आता आपला मृत्यु होऊ शकतो.' ह्या विचाराने तो बेचैन झाला. अशा स्थितीत काय करावे हे त्याला काहीच सुचत नव्हते. मृत्युच्या विचाराने त्याच्या मेंदुला बधिरता आली होती. नागराज, नागतपस्वी आणि नागऋषींचे बोलणे ऐकून, तिथे उपस्थित असलेले नाग आपापसात बारीक आवाजात कुजबुजत होते. पण त्यांची भाषा प्रकाशला समजण्यापलिकडची होती. ''शांत व्हा सर्वांनी.....'' नागराज बोलू लागला. ''माझा निर्णय झाला आहे. या विचित्र जीवाला मृत्युदंडच देण्यात येईल. भविष्यात त्याचे आपल्याला सहाय्य होईल,

अशी आशा करणे व्यर्थ आहे. तो जरी आपल्या नाग वंशातला असला, तरी तो एक मनुष्यही आहे. हे आपल्याला विसरुन चालणार नाही. स्वार्थी आणि धुर्त मनुष्यावर विश्वास ठेवण्याची जी चूक आमच्या पूर्वजांनी केली, ती मी पुन्हा करणार नाही. त्यामुळे नागप्रजातीच्या हितासाठी सर्व नागांच्या वतीने मी ह्या जीवाला मृत्युदंड देण्याचे घोषित करतो.'' आत्तापर्यंत नागराणी शांतपणे बसून सर्व पाहत होती. पण नागराजने प्रकाशला मृत्युदंड देण्याची घोषणा करताच, तिनेही नागराजच्या निर्णयाला सहमती दर्शवली. नागतपस्वी नाईलाजाने शांतपणे सर्व काही पहात होते. त्यांच्या वृद्धत्वामुळे नागराजला विरोध करण्याची ताकद त्यांच्याकडे नव्हती.

''बल्ल तु ह्या मनुष्याचे मस्तक त्याच्या धडावेगळे करावेस..... ही माझी तुला आज्ञा आहे.'' नागराज उत्स्फुर्तपने म्हणाला. तिथेच उभा असलेला 'बल्ल' क्षणांचाही विलंब न करता तत्परतेने नागराजजवळ आला. त्याने क्षणार्धात आपल्या मंत्रशक्तीने एक दिव्य तलवार निर्माण केली. आणि तो प्रकाशच्या दिशेने वळला. आता मृत्यु जवळ आला हे जाणून प्रकाश तिथून पळण्याच्या प्रयत्नात होता. तितक्यातच 'मल्ल' त्याच्या जवळ गेला आणि त्याने प्रकाशभोवती विळखा घातला. प्रकाशला आता हलता येणेही शक्य नव्हते. त्या नागाने प्रकाशला इतक्या जोराने आवळले होते की प्रकाशचा रक्त प्रवाहच जवळ जवळ थांबलाच होता. त्याला आता श्वास घेणेही फार कठिण झाले. तितक्यात बल्ल तलवार घेऊन त्याच्या जवळ आला. तसे प्रकाशने आपले डोळे भितीने मिटले. 'बल्लने' आपल्या हातातील तलवार वर उचलून तिचा एक जोरदार प्रहार प्रकाशच्या मानेवर केला. तिथे उपस्थित सर्व नाग हा सर्व प्रकार, आपला श्वास रोखून पाहत होते. कारण आत्तापर्यंत त्यांच्यातील बहुसंख्य नागांनी मनुष्याबद्दल त्यांच्या पुर्वजांकडून फक्त ऐकले होते. पण प्रत्यक्षात मात्र त्यांनी कधी मनुष्याला पाहिले नव्हते. त्यामुळे तिथे उपस्थित सर्वांचे लक्ष्य प्रकाशकडेच होते.

तेवढ्यात, दोन धातु एकमेकांवर आदळावेत अशा प्रकारचा ध्वनी सर्वांना ऐकु आला. बल्लने तलवारीचा जोरदार प्रहार प्रकाशच्या मानेवर केला तेव्हा तो ध्वनी निर्माण झाला होता. हे सर्वांसाठीच एक आश्‍चर्य होते. जसे प्रकाशच्या मानेभोवती कसलेतरी अभेद्य कवच असावे अशी बल्लला जाणीव झाली. म्हणून त्याने पुन्हा एकदा तलवारीचा प्रहार प्रकाशच्या मानेवर केला. पण पुन्हा तेच घडले..... प्रकाशला काहीही झाले नव्हते. बल्ल आता खूप चिडला होता. त्यामुळे तो प्रकाशच्या मानेवर सारखे सारखे तलवारीचे प्रहार करु लागला. पण त्याचे सर्व वार व्यर्थ ठरत होते. प्रकाशने आता आपले डोळे उघडले. तितक्यात बल्लने पुन्हा एक प्रहार प्रकाशच्या मानेवर केला. क्षणार्धातच प्रकाशने पुन्हा आपले डोळे मिटले. पण पुन्हा तेच..... तो प्रहारही व्यर्थ ठरला. तसे नागतपस्वी मोठ-मोठ्याने मिश्किलपणे हसू लागले. त्यांच्या अशाप्रकारे हसण्याचा नागराजला खूप राग आला होता. पण तो त्यांना काही बोलण्याच्या आतच नागतपस्वी बोलू लागले, ''मी तर विसरलोच होतो की, हा कोणी सामान्य मनुष्य अथवा सामान्य नाग नाही. तर हा मनुष्यरुपात दिव्य नागमणी घेऊन जन्माला आलेला एक दिव्य आत्मा आहे. त्याच्या मस्तकावर असलेल्या नागमणीमुळे त्याच्यावर कुठल्याही शस्त्राचा, विषाचा किंवा प्राणघातक मंत्राचा काहीही परिणाम होणार नाही. परमेश्‍वराने आपल्याला जवळपास दहा हजार वर्षे जगता येईल इतके आयुष्य दिले आहे तर आजच्या मनुष्याला फार फारतर फक्त शंभर वर्षांचे आयुष्य लाभले आहे. पण हा कोणी सामान्य मनुष्य अथवा सामान्य नाग नसल्यामुळे, ह्याला आपल्यापेक्षाही सहस्त्र पटींनी अधिक आयुष्य मिळाले आहे. जोपर्यंत त्याच्याजवळ नागमणी आहे, तोपर्यंत त्याचा मृत्यु होणे शक्य नाही. विधात्याने प्रत्येक जीवासाठी वेगळे कायदे केले आहेत. प्रत्येक जीवाला स्वातंत्र्यपणे जगण्याचा अधिकार आहे. तो अधिकार परमेश्‍वराने सर्वांनाच प्रधान केला आहे. त्यामुळे आपण त्यात हस्तक्षेप करु शकत नाही.''

''म्हणजे काय म्हणायचे आहे तुम्हाला?'' नागराजने विचारले.

''म्हणजेच हा नागमणी धारण केलेला दिव्य अर्धनागमनुष्य अगदी चंद्र, तारे अस्तित्वात असेपर्यंत जीवंत राहू शकतो आणि त्याच्याकडे असलेल्या अद्भूत शक्तींमुळे आपण त्याचे काहीही बिघडवू शकत नाही.'' नागतपस्वींच्या बोलण्याने सगळे नाग स्तब्ध झाले. कोणीही काहीच बोलत नव्हते. तेवढ्यात.....

''मल्ल मुक्त कर त्याला.'' नागतपस्वी म्हणाले. तसे मल्लने प्रकाशच्या शरीराभोवतीचा विळखा काढला आणि त्याला मुक्त केले.

इतका वेळ 'मल्ल' नागाने प्रकाशचे शरीर आवळले होते. त्यामुळे त्याचा जीव गुदमरल्यासारखा झाला होता. मल्लने त्याच्या शरीराभोवतीचा विळखा काढल्यावर त्याला आता कुठे नीट श्वास घेता येऊ लागला. तो जरी तलवारीच्या प्रहारापासून वाचला होता तरीही त्या भयावह आणि विचित्र वातावरणात तो फार काळ राहू शकला नसता. नागराजने त्याला सांगितलेल्या गोष्टींवर त्याचा सुरुवातीला विश्वास बसला नव्हता. तरी त्याला त्याच्या बोलण्यावरुन आपण पृथ्वीवर नसून नागलोकात असल्याचे कळले होते. पण त्याला हे ठिकाण कुठे आहे? याबद्दल काहीही माहिती नव्हती. त्याशिवाय तेथुन पृथ्वीवर स्वगृही कसे जाता येईल? हे सुद्धा त्याला माहित नसल्याने तो अस्वस्थ झाला होता. त्याला कााहीही करुन, तिथुन बाहेर पडायचे होते. त्याचा जीव त्या जागेत घुसमटत होता.

''नागतस्वी ह्या मनुष्याच्या मस्तकावर नागमणी असल्याचे तुम्हाला कसे काय माहित पडले? म्हणजे याच्या आधीसुद्धा तुम्ही याला भेटला आहात?'' असे कित्येक प्रश्न नागराजने उपस्थित केले. त्यावर नागतपस्वींनी कसला तरी विचार केला आणि मग.... ''आम्हाला दिव्यदृष्टी आहे, हे बहुतेक तु विसरला आहेस वाटते... नागराज.'' असे बोलून त्यांनी तो विषय तेथेच संपवला.

———x———x———

नागतपस्वींच्या म्हणण्यानुसार, प्रकाशजवळ जन्मत:च असलेल्या दिव्य नागमणींमुळे त्याच्यावर कुठल्याही प्रकारच्या शस्त्राचा परिणाम होऊ शकत नाही. ही गोष्ट सत्य असल्याचे आतापर्यंत नागराजच्याही चांगलेच लक्षात आले होते. त्यात नागतपस्वींनी प्रकाशला त्याच्या नागमणीमुळे प्राप्त झालेल्या दिव्य शक्तींबद्दल जी काही माहिती सांगितली होती, त्यामुळे तिथे उपस्थित असलेल्या नागांच्या चेहऱ्याचा भितीने रंग उडाल्याचेही त्याच्या लक्षात आले होते. त्यामुळे प्रकाशला पृथ्वीलोकातुन अपहरण करुन त्याला नागलोकी आणण्याचा खटाटोप फुकट जाणार की काय? आणि मग अशावेळी करायचे तरी काय... नेमके हेच त्याला सुचत नव्हते. काहीही झाले तरी त्याला प्रकाशला जीवंत ठेवता येणार नव्हते. त्यामुळे ज्याअर्थी प्रकाशसारख्या मनुष्याकडे दिव्य नागमणी असल्यामुळे त्याच्यावर इच्छाधारी नागांच्याही शक्तीचा परिणाम होत नव्हता. त्याअर्थी जर त्याचा तो नागमणी अपल्याला त्याच्यापासून वेगळा करता आला, तर आपली सर्व चिंताच मिटेल, असा विचार त्याने मनोमन केला आणि तो नागतपस्वींशी बोलू लागला.

''नागत्पस्वी तुम्हांला काय वाटले... मी ह्याच्या म्हणजेच नागमणीच्या दिव्य शक्तींबद्दल विसरुन गेलो की काय? जर तुम्हांला तसे वाटत असेल, तर तो तुमचा गैरसमज आहे. कारण मी काहीही विसरलेलो नाही. मी तर फक्त नागमणीच्या शक्तींना तपासून पाहत होतो. नागमणी ही एक अमुल्य देणगी अहे. परंतू परमेश्वराने ती आपल्या सारख्या नागांना न देता, एका तुच्छ मनुष्याला द्यावी... हे आमचे नव्हे तर संपूर्ण नागप्रजातींचे दुर्भाग्य आहे. असे म्हणायला हरकत नाही. परंतू हे सर्व घडत असताना, तुम्हांला त्याबद्दल काहीच कसे वाटत नाही. फक्त याच गोष्टीचे मला आश्चर्य वाटते.''

नागराजचे बोलणे ऐकुन नागतपस्वी नागराजशी अत्यंत नम्रपणे बोलू लागले. ''तसं नाही नागराज. मलाही नागप्रजातीची काळजी वाटते. परंतू परमेश्वर नेहमीच योग्यता असलेल्याला योग्य गोष्टी देतो. मग त्या दिव्य शक्ती असू देत किंवा इतर काही...''नागतपस्वींचे हे बोल ऐकुन नागराज त्यांच्यावर संतापून बोलू लागला.

''म्हणजे आपली नागप्रजाती नागमणी धारण करण्याच्या योग्यतेची नाही असे म्हणायचे आहे का तुम्हांला?''

''नाही. नागराज तुझा गैरसमज होतोय. संपूर्ण ब्रह्मांडात जे काही घडत असते त्याच्यामागे परमेश्वराचीच इच्छा असते. तो ज्याला त्याला त्याच्या पात्रतेप्रमाणेच देत असतो. म्हणुन आपण मिळेल त्यातच समाधान मानावे. मला फक्त एवढचं म्हणायचं आहे.''

''वा... म्हणजे जर असे असेल, तर मग कोणालाही काहीच मिळवण्याचा प्रयत्न करायला नको.''

''नाही नागरज तुला अजूनही नीट समजलेले नाही. प्रत्येकाने काहीना काही मिळवण्यासाठी प्रयत्न तर करावेच. परंतू ते दुसऱ्याचे हिरावून घेऊन स्वत: करिता मिळवण्यासाठी नाही, तर स्वबळावर प्राप्त करण्यासाठी. लक्षात ठेव काही जीवांना परमेश्वर काही गोष्टी जन्मताच प्रदान करतो, तर काही जीवांना तो त्या गोष्टी प्राप्त करण्याची क्षमता देतो.'' आणि असे असताना एखाद्या जीवाला जन्मजात असलेल्या दैवी देणगी पेक्षा एखाद्या जीवाने स्व कर्तुत्वावर निर्माण केलेल्या गोष्टींचे महत्व कैकपटींनी अधिक असते.'' नागतपस्वी म्हणाले.

''जाऊदे मला तुमच्याशी वाद घालायचा नाही. मला माहिती आहे या सर्व नशिबाच्या गोष्टी आहेत आणि मी नशिब बदलवण्यावर विश्वास ठेवणाऱ्यांपैकी आहे'' नागराज.

‘‘वा... हे फार चांगले विचार आहेत. फक्त एवढेच की, हे सर्व तु योग्य मार्गाने करावेस एवढीच आमची इच्छा आहे.’’ नागतपस्वी.

‘‘योग्य, अयोग्य हे ज्याने त्याने आपापले ठरवावे तरी नियमानुसार राजा करेल तेच योग्य. हे विसरलात वाटते तुम्ही.’’ इतके बोलून नागराजने आपली नजर बल्ल आणि मल्लकडे वळवली. आणि तो त्यांना उद्देशुन बोलू लागला.

‘‘बल्ल, मल्ल ह्या मनुष्याकडे असलेल्या नागमणीमुळे आपले प्रयत्न निष्फळ ठरले. तेव्हा तुम्ही याच्या मस्तकावरील नागमणी त्याच्यापासून वेगळा करा.’’

नागराजचे हे उद्गार ऐकुन प्रकाशला धडकी भरली. आता ह्या प्रसंगातुन स्वत:ची सुटका कशी करुन घ्यावी? याच विचारात तो होता. बल्ल आणि मल्ल नागराजच्या आज्ञेनुसार प्रकाशचा नागमणी त्याच्यापासून हिरावून घेण्यास त्याच्या जवळ जाणार तितक्यातच नागतपस्वी प्रकाशसमोर येऊन उभे राहतात.

‘‘बल्ल, मल्ल आता तुम्ही याच्या शरीराला स्पर्शही करायचा नाही आणि जर तुम्ही तसे करण्याचा प्रयत्न केलात तर त्याचे दुष्परिणाम तुम्हांला भोगावे लागतील.’’ नागतपस्वी त्या दोघांना उद्देशुन म्हणाले. नागतपस्वी प्रकाशला बल्ल आणि मल्ल पासून सुरक्षित ठेवण्याकरिता पुढे सरसावले होते, हे पाहून प्रकाशला थोडा धिर आला. नाहीतर तो अशा जीवघेण्या परिस्थितीत अडकलेला असताना, त्याला त्यांचाच काय तो थोडासा आधार!

नागतपस्वींचे हे कृत्य पाहून नागराज त्यांच्यावर अधिकच चिडला होता. परंतू तिथे असलेल्या सर्व नागांच्या उपस्थितीत तो त्यांच्या विरुद्ध काही करु शकत नव्हता. शेवटी कितीही झाले, तरी त्याच्याबद्दल नागांच्या मनात आदरभाव होता. म्हणुन त्याने नागतपस्वींना त्याच्या मार्गातून बाजूला होण्याची विनंती केली. तरीही नागतपस्वी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत प्रकाशला तसेच संरक्षण देत राहिले.

म्हणुन मग शेवटी नाईलाजाने नागराज स्वत:च नागासनावरुन खाली उतरुन प्रकाशच्या दिशेने चालत येऊ लागला. आता आपण नागराजला रोखु शकणार नाही. हे जाणून नागतपस्वींनी गुपचुप प्रकाशच्या कानात काहीतरी सांगितले. तसा प्रकाश आपल्या डोक्यावर हात लावून नागमणी चाचपून पाहत होता. आत्तापर्यंत त्याला त्याच्या डोक्यावर असलेला नागमणी म्हणजे जन्मापासून असलेली एक गाठ किंवा टेंगुळ आहे. असेच वाटत आले होते. पण त्याच्या आत काहितरी टणक गोष्ट असल्याची जाणीव मात्र त्याला नेहमीच होत असे. पण तो जन्मापासूनच त्याच्या शरीराचाच एक लहानसा भाग असल्यामुळे तो प्रकाशपासून दुर्लक्षित होता किंवा त्याने त्याबद्दल कधी नीट विचारच केला नव्हता.

जेव्हा प्रकाशने त्या दिव्य नागमणीला हात लावला, तेव्हा त्याच्या स्पर्शामुळे त्यातुन प्रकाश किरणे बाहेर पडू लागली. क्षणार्धात तो दिव्य मणी चमकू लागला. आत्तापर्यंत अगदी निस्तेज असलेला मणी बहुदा जागृत होऊ लागला होता. त्याचे तेज इतके प्रखर होते की, तेथील सर्व परिसर त्याच्या तेजाने प्रकाशमय झाला. क्षणार्धातच तिथे सर्वत्र लालसर रंगाची गडद छाया पसरली गेली आणि क्षणार्धात प्रकाशला घेऊन नष्ट झाली.

घडत असलेला सर्व प्रकार तेथील नागांसाठीही नवीनच होता. त्यांच्यापैकी कुठल्याही नागाजवळ नागमणी नव्हता तसेच त्यांच्यापैकी कोणीही नागमणी धारण केलेला दिव्य नाग आजवर बघितलाही नव्हता. नागांच्या मान्यतेनुसार नागमणी घेऊन जन्माला येणारा नाग, लाखो वर्षातून फक्त एकदाच जन्माला येतो. त्या नागमणीमुळे त्याला अशा काही दिव्य शक्ती भेटतात की, त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. मग त्याच्यासाठी अशक्य असे काहीच नसते. परंतू नागमणीच्या संदर्भातल्या ह्या सर्व गोष्टी त्यांनी आत्तापर्यंत त्यांच्या पूर्वजांकडून ऐकल्या होत्या; पण प्रत्यक्षात मात्र त्यांच्याकडे याबद्दलचा काहीच अनुभव नव्हता. त्यामुळे तिथे उपस्थित असलेल्या नागांच्या

डोळ्यादेखत घडलेला हा सर्व अद्भूत प्रकार पाहून ते सर्वजण काही क्षणांसाठी स्तब्धच झाले होते. त्यांच्या डोळ्यादेखत क्षणार्धात काय घडून गेले आहे या गोष्टीचा त्यांना साधा अंदाजही बांधता येत नसल्याने ते सर्वजण गोंधळलेल्या स्थितीत होते.

———x———x———

नागलोकात जे काही घडले होते, ते प्रकाशच्या बुद्धीपलिकडचे होते. त्यावेळी त्याला नागतपस्वींनी सांगितल्याप्रमाणे त्याने आपल्या मनात इच्छा धरुन नागमणीला स्पर्श करताच त्याच्या मनातील इच्छा नागमणीने पूर्ण केली होती. ज्यावेळी त्याने नागमणीला स्पर्श केला त्याचवेळी त्याच्या स्पर्शामुळे त्यातील दिव्य शक्ती जागृत झाली आणि त्यामुळेच प्रकाश नागलोकातून बाहेर पडू शकला होता.

जागृत नागमणीचे तेज इतके प्रखर होते की, त्याने सर्वांचे डोळे दिपले होते. त्या दिव्य प्रकाशामुळे तेथील इतर नागांबरोबरच प्रकाशचेही डोळे आपोआपच मिटले गेले. ज्यावेळी त्याने आपले डोळे उघडले त्यावेळी तो पृथ्वीवर पोहोचला होता. पण पृथ्वीवर पोहोचताच त्याच्या मस्तकावरील नागमणीचे तेज आपोआपच कमी होऊन, त्यातुन प्रकाश किरणे निघणे बंद झाले. नागमणी जागृत झाल्याने प्रकाशच्या शरीरातील सर्व उर्जा नष्ट झाली होती. याचाच अर्थ, नागमणीला सक्रीय होऊन प्रकाशच्या इच्छापूर्तीसाठी, प्रकाशच्या शरीरातील उर्जेची गरज होती. जेव्हा प्रकाश पृथ्वीवर पोहोचला तेव्हा त्याला खूप थकवा जाणवू लागला. अशक्तपणामुळे त्याला भोवळ येऊ लागली त्यामुळे आपोआपच त्याचे डोळे मिटले गेले. त्यानंतर जेव्हा त्याने पुन्हा आपले डोळे उघडले तेव्हा तो हॉस्पिटलमध्ये होता.

———x———x———

# नागांची रहस्ये

नागतपस्वी बोलू लागले.

''प्रकाश तुला आतापर्यंत नागप्रजातीबद्दल बरीच माहिती मिळाली आहे. पण काही गोष्टी तुला अद्याप माहिती नाहीत. त्या नीट लक्षपूर्वक ऐक.''

''लाखो वर्षापूर्वी पृथ्वीवर नागांचे साम्राज्य होते. त्यावेळी मनुष्याचा पुर्णपणे विकास झाला नव्हता. तेव्हा तो सतत भ्रमण करत असे. तेव्हाचा मनुष्य आपल्या अल्पबुद्धीमुळे झाडे आणि गुहा यांनाच आपल्या जीवनाचा आधार मानत असे. त्यावेळी पृथ्वीवर मनुष्याची संख्या फारच कमी होती. तर नागांसारख्या अंडज जीवांची संख्या मानवाच्या लाखो पटींनी अधिक होती, साहजिकच, शक्तिहिन आणि अल्पसंख्येमुळे मनुष्यावर सुद्धा नागांची सत्ता होती. तेव्हा मनुष्य नागांचा गुलाम होता.''

''त्या काळात पृथ्वीवर नागांबरोबरच देव, दैत्य, राक्षस, दानव, यक्ष, गंधर्व, गरुड यांसारख्या जीवांची ही उत्पत्ती झाली होती. या सर्व जीवांकडे अलौकिक शक्ती आणि सामर्थ्य होते. या सर्व जीवांच्या प्रजाती आपापसांत सत्तेसाठी आणि एकमेकांवर वर्चस्व मिळविण्यासाठी युद्धे करत असत. ज्यांचे दुष्परिणाम पृथ्वीवरील शक्तिहिन मनुष्यालाच जास्त भोगावे लागत होते. या सर्व प्रजातींमध्ये सतत युद्धे होऊन, त्यांच्या वृत्तीनुसार त्यांचे विविध गट पडू लागले. ह्या प्रजातींमधील सत्वगुन आणि तमोगुण त्यांच्यातील भिन्न प्रवृत्तींचा आधार होता. इतर प्रजातींपेक्षा देव आणि दानव आपल्यातील रजोगुणामुळे एकमेकांशी सतत युद्धे करीत होते. परंतु, देवतांच्या अंगी रजोगुणाबरोबरच सत्वगुणाची अधिकता होती. तर दैत्यांच्या अंगी तमोगुणाची अधिकता होती. काळाच्या ओघात ह्या प्रजातींच्या भिन्न प्रवृत्तींमुळे त्यांचे दोन गटात विभाजन झाले. देवांच्या बाजूने गंधर्व आणि यक्ष होते, तर दैत्यांच्या बाजुने दानव आणि

राक्षस होते. गरुड आणि नाग यांचे आपापसात मोठे वैर होते. त्यामुळे ते कधी देवांच्या तर कधी दैत्यांच्या बाजुने युद्ध करीत होते. ह्या सर्व प्रजातींमध्ये मनुष्य दिव्य शक्तीच्या अभावी एकटा पडला होता.''

''बऱ्याच काळापासून नागांच्या गुलामगिरीत असलेला त्यावेळचा मनुष्य वर्ग कधी देवांच्या तर कधी दैत्यांच्या बाजुने असे. परंतु, शक्तिहीन असलेल्या मनुष्याच्या, असल्या आणि नसल्यामुळे इतर प्रजातींवर त्याचा फारसा काही प्रभाव पडत नसे.''

''पुढे नागांची आणि गरुडांची सतत युद्धे होऊ लागली. युद्धांमध्ये गरुड नागांपेक्षा श्रेष्ठ ठरले. गरुडांनी नागांच्या अनेक प्रजाती नष्ट केल्या. त्याचप्रमाणे देवांनी यक्ष आणि गंधर्वांच्या सहाय्याने दैत्यांचा, दानवांचा आणि राक्षसांचा मोठ्या प्रमाणावर संहार घडवून आणला. त्यानंतरच्या काळात गंधर्व आणि यक्ष देवांबरोबर स्वर्गात राहू लागले. तर उरले सुरलेले दानव आणि राक्षस दैत्यांबरोबर पाताळात शांततेने राहू लागले.''

''इतर प्रजातींमधील सततची युद्धे थांबल्याने आणि पृथ्वीवरील नागांची संख्या घटल्याने मनुष्य जीवन स्थिरावले. त्याच काळात मनुष्याने आपल्या जीवनात भरपूर प्रगती केली. त्याचबरोबर पृथ्वीवरील मनुष्याची संख्याही झपाट्याने वाढु लागली. त्यामुळे आता संख्येने कमी असलेल्या नागांना मनुष्यावरची आपली सत्ता टिकवून ठेवणे फार कठीण झाले. कालांतराने मनुष्याने नागांमध्ये भिती आणि त्यांच्या नाग प्रजातीवरील सत्तेचा लोभ निर्माण करुन, आपल्या चातुर्याने नागांशी पृथ्वीवरुन निघून जाण्यासाठी करार केला.''

''मनुष्याशी झालेल्या करारानंतर, पृथ्वीवरील इच्छाधारी नागांचे अस्तित्व आता जवळ जवळ नष्टच झाले होते. हजारो वर्षापूर्वी देव आणि दानव यांनी सृष्टीच्या कल्याणाकरीता प्रथमच एकत्र मिळून केलेल्या समुद्र मंथनात नागांचा

राजा वासुकीने आणि त्याचबरोबर इतर नागांनीही महत्त्वाची भुमिका बजावली होती. जर वासुकी नसता तर समुद्रमंथन झालेच नसते. या गोष्टीचा आता सर्वांनाच विसर पडला होता. भगवान शिवाने ज्याला एखाद्या अलंकाराप्रमाणे आपल्या गळ्याभोवती गुंडाळून नाग प्रजातीला धन्य केले, त्या तक्षक नागाच्या प्रजातीचे महत्त्वही आता कमी झाले होते. समुद्र मंथनाच्यावेळी समुद्रातुन बाहेर आलेले विष भगवान शंकरांनी प्राशन केले. पण त्याचबरोबर त्या विषाचा एक अंश नागांनीही सृष्टीच्या कल्याणाकरीता स्वखुषीने प्राशन केला. ज्यांनी आपल्या शरीरात विषाला स्थान दिले आणि त्या विषाच्या दुष्परिणामामुळे जे स्वत: विषारी बनले अशा नागांचे हे थोर उपकार आता कोणाच्याच ध्यानात नव्हते. शेषनागाने सतत गतिशील असणाऱ्या पृथ्वीला स्थिर ठेवण्यासाठी, आपल्या मस्तकावर धारण केले. क्षीरसागरात भगवान विष्णू सदैव शेषनागाच्या शरीररुपी आसनावर विराजमान असतात. ह्या गोष्टी आता निव्वळ दंत कथा म्हणून शिल्लक राहिल्या होत्या. थोडक्यात काही दृष्ट नागांमुळे पराक्रमी आणि त्यागी नागांचेही, पृथ्वीवरील महत्त्व आता कमी झाले होते. त्यांचे महत्त्व आता फक्त नागपंचमी पुरतेच मर्यादित राहिले होते.''

———x———x———

''हजारो वर्षापूर्वी नागांच्या पूर्वजांमध्ये आणि मनुष्याच्या पूर्वजांमध्ये झालेल्या करारामुळे त्यांचा पृथ्वीवरील प्रवेश निषिद्ध झाला होता. त्यामुळे लाखो वर्ष पृथ्वीवर वास्तव्य करणाऱ्या नागांचा आणि पृथ्वीचा संबंध आता संपुष्टात आला होता. त्यानंतर नागांचे वास्तव्य फक्त पाताळातील नागलोकापुरतेच मर्यादित झाले.''

''नागांकडे अलौकिक शक्ती असल्यामुळे त्यांचे पृथ्वीवरील वास्तव्य मनुष्यासाठी धोक्याचे होते. गरुडांबरोबर झालेल्या युद्धांनंतर जिवीत असलेल्या

उरल्या सुरल्या नागांनाही पृथ्वीवरुन हाकलुन दिले नाही तर, भविष्यामध्ये ते आपल्याशी पुन्हा युद्धे करतील आणि पुन्हा आपल्याला त्यांचे गुलाम करतील त्यामुळे नागांसमोर आपला टिकाव लागणार नाही, हे मनुष्याने आता ओळखले होते. त्यामुळे बुद्धीमान मनुष्याने त्यांना पाताळात जाण्यास प्रवृत्त केले.''

''जर नागांनी पाताळात वास्तव्य केले, तर ते गरुडांपासून स्वत:ला सुरक्षित ठेऊ शकतील. त्याचप्रमाणे तिथे त्यांचे स्वतंत्र राज्य असेल. ज्याठिकाणी फक्त नागच इतर नागांवर सत्ता स्थापन करु शकतील हे मनुष्याने नाग प्रजातीला पटवून दिले. आणि सत्तेचे आमिष दाखवून मनुष्याने नागांच्या राजाकडून पृथ्वीवर परत कधीही न येण्याचे वचन घेतले.''

———x———x———

''नागांना पाताळातून पृथीवर येण्यापासून रोखण्याची जवाबदारी ही कराराच्या वेळी नागांचा राजा असलेल्या अनंता नागाची होती. आतापर्यंत अनंताच्या पूर्वजांपैकी अनेक नाग, नागांचे राजे होऊन गेले होते. त्यामुळे वंशपरंपरेनुसार अनंताला राजपद मिळाले होते. काही वर्षे नागांवर उत्तम राज्य केल्यानंतर अनंतामध्ये आणि त्यांच्या भावंडामध्ये राज्यपदावरुन भांडणे होऊ लागली. अनंतामुळेच पृथ्वीवरील नागांचे अस्तित्व संपुष्टात आले असे अनेक नागांचे मत होते. अनंताने कुणालाही विश्वासात न घेता मनुष्याच्या शब्दांवर भुलून सत्तेच्या लालसेपोटी मनुष्याला दिलेले वचन अनेक नागांना मान्य नव्हते. त्यामुळे अनंताने मनुष्याशी केलेला करार अवैध ठरवून अनेक नागांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले.''

''त्यावेळी नागांमधील निर्माण झालेला असंतोष, मतभेत आणि भांडणे नागतपस्वींना पहावत नव्हती. जर नाग आपापसात असेच भांडत बसले तर, पाताळलोकातील नागांचे अस्तित्व धोक्यात येईल, याची नागतपस्वींना खात्री

होती. म्हणूनच त्यांनी नागलोकांतील हा वाद मिटविण्याकरीता वादाचे मुळ कारण असलेल्या अनंताला शिक्षा म्हणून नागलोक सोडून पृथ्वीवर जाण्याचे आदेश दिले. नागतपस्वी अत्यंत विद्धान नाग असून, त्यांनी आपल्या तपस्येतून अनेक सिद्धी प्राप्त केल्या होत्या. त्यामुळे त्यांना नागतपस्वी याच नावाने ओळखले जाई. ते, सर्व नाग प्रजातींसाठी पुजनीय होते. त्यामुळे त्यांची आज्ञा अनंताला मान्य करावीच लागली. अनंताने मनुष्याशी केलेला करार त्यांच्याही बुद्धीला पटला नव्हता.  पण स्वभावाने शांतीप्रिय असलेल्या नागतपस्वींनी त्या कराराच्या वेळी,  राजाची इच्छा निमुटपणे मान्य केली होती. म्हणूनच इतकी वर्षे पृथ्वीवर न जाण्याच्या निर्णयाला सर्व नागांनी पाठिंबा दिला होता. परंतू तरीही काही नागांनी त्या कराराची पर्वा न करता पृथ्वीवर गुप्तपणे प्रवेश केला होता.''

''पाताळात राहणारे सर्वच नाग अलौकिक शक्तीचे स्वामी असल्यामुळे, त्यांच्यातील अनेकांकडे अदृष्य होणे, हवेत उडून आकाशात संचार करणे तसेच इच्छेप्रमाणे कुठलेही रुप घेणे यांसारख्या कित्येक अद्भूत शक्ती होत्या. त्यामुळे ते नाग पृथ्वीवर सहजपणे कुणालाही न दिसता गुप्तपणे वास्तव्य करु शकत होते.''

''पाताळातील नागलोक आणि पृथ्वीलोक यांच्यामधील गुप्तमार्ग काही प्रमुख नाग सोडले तर इतर कुणालाही माहित नव्हता. यागुप्तमार्गाचे वैशिष्ट्य म्हणजे पृथ्वी आणि नागलोक यांच्यामधील लाखो योजनांचे अंतर, या गुप्तमार्गामुळे काहीच योजनांचे होत असे. त्यामुळे या गुप्तमार्गामुळे पृथ्वीवर अल्पवाधीत जाणे सहज शक्य होते. पण ज्यावेळी नाग पाताळात आले त्याचवेळी तो गुप्त मार्ग अनंताने गुप्तमंत्राने बंद करुन टाकला होता. दोन लोकांना जोडणारा मार्ग दिव्य मंत्राच्या सहाय्याने बंद केल्याने, तो मंत्रशक्तीचे ज्ञान असल्याखेरीज सामान्य नागांच्या दृष्टीसही पडणार नव्हता. त्यामुळे सर्वसामान्य नागांच्या मनातुन पृथ्वीवर परत जाण्याचे विचार कायमचे नष्ट

झाले होते. आणि त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे पृथ्वीपासून शेकडो योजनांचे अंतर पार केल्यावर सप्तलोकांची सुरुवात होते ते सप्तलोक म्हणजे अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल आणि पाताळ. यातील प्रत्येक लोक दहा हजार योजनांच्या अंतरावर आहेत. म्हणजेच पृथ्वीपासून पाताळलोक लाखो योजनांच्या अंतरावर आहे. तोच हा नागलोक. सहाजिकच पृथ्वीपासून लाखो योजन दुर असलेल्या नागलोकातील सामान्य नागांचा दिव्यमंत्रशक्तींच्या अभावी पृथ्वीशी काहीच संबंध राहिला नव्हता. त्यामुळे अनेक नागांकडून पृथ्वीवर न परतण्याच्या वचनाचे आपोआपच पालन होत होते.''

''पृथ्वीलोक आणि नागलोक यांना जोडणारा तो गुप्त मार्ग म्हणजे 'तरणा' ही नदी होती. प्रचंड मोठे खोरे असलेली ही नदी पार करुन पृथ्वीवर प्रवेश करणे, हे मंत्रशक्तीच्या अभावी सर्वसामान्य नागांसाठी अशक्य होते. त्यामुळे फक्त दिव्य मंत्रशक्ती असलेल्या मोजक्याच नागांना ती नदी पार करुन पृथ्वीवर परत प्रवेश करणे शक्य होते.'

आता मी तुला नागलोकाची माहिती सांगतो.....

''नागलोक हा भरपूर मोठा लोक आहे. एक काळ असा होता, जेव्हा तिथले जीवन पृथ्वीवरील मनुष्याच्या जीवनापेक्षा लाख पटींनी चांगले होते. जिथे हजारो नगरे होती. प्रत्येक नगरांमध्ये नागांच्या वास्तव्यासाठी मोठ-मोठे महाल होते. देवी देवतांची भव्य दिव्य मंदिरे होती. कोणालाही कशाचीच कमी नव्हती. त्याकाळी प्रत्येक नाग सुखी आणि समाधानी होता. तिथली जिवनपद्धती पृथ्वीवरील मानवाच्या जीवनपद्धतीपेक्षा कैकपटींनी सुखदायक आणि आरामदायक होती. त्याकाळचे राजे अत्यंत पराक्रमी होते. जे आज आम्हांला पुजनीय आहेत. त्या काळच्या नागलोकासमोर स्वर्ग सुद्धा फिका वाटायचा. जिथे कित्येक नद्या अमृतापेक्षाही मधूर जल देणाऱ्या होत्या. जिथली झाडे अशी दिव्य फळे द्यायची की, त्यांच्या सेवनाने एक मास भुकच लागत नसे. जिथे अनेक दिव्य गाई होत्या; ज्यांच्या दुधावरच नागांची शुधा शांत होत असे.

त्यावेळी नागलोकात राहणारे नाग लाखो वर्षे निरोगी जीवन जगत होते. नागलोकी सुर्याची किरणे पोहचत नाहीत. पण तरीही नागांच्या शरीरावरील रत्नजडीत दिव्य अलंकारामुळे तिथे मंद प्रकाश असतो.''

''लाखो वर्षापूर्वी जेव्हा शेषनाग, वासुकीनाग यांसारखे नाग आपले राजे होते, तेव्हा मात्र त्यांच्या मस्तकावरील नागमणींच्या तेजाने नागलोक सदैव प्रकाशमय असे; पण आता त्या सर्व गोष्टी फक्त दंतकथा म्हणून आठवल्या जातात.'' हे ऐकताच प्रकाशला नागलोकांत घडलेल्या प्रसंगाची आठवण झाली. जेव्हा त्याने आपल्या मस्तकावरील नागमणीला स्पर्श केला, तेव्हा तिथे सर्वत्र भरपूर प्रकाश पसरल्याचे त्याला आठवले.

''.... पण आता, नागलोकाची स्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. आता नागांमध्ये आपापसात मतभेद होऊ लागले आहेत. ते सुद्धा मनुष्याप्रमाणेच स्वार्थासाठी, सत्तेसाठी, ऐश्वर्यासाठी भांडू लागले आहेत. नागांमध्ये आजवर शेष नाग, वासुकी नाग, तक्षक नाग असे कितितरी महान राजे होऊन गेले. तुझे आजोबा अनंता, सुद्धा एक कुशल राजे होते. पण कुशल राजकारणी नव्हते. त्यामुळेच कदाचित त्यांना आपले राजपद फार काळ टिकवता आले नाही. त्यावेळी नागलोकात भयंकर परिस्थिती निर्माण झाली होती. अनंता आणि त्याच्या भावंडामध्येच राजपदासाठी राजकारण सुरु झाले त्यावेळी कुटुंबातील भांडणे, संपूर्ण नागलोकातील संघर्षाचे कारण बनले असते. राजपरिवारातील भांडणे आणि मतभेदांचा प्रभाव सामान्य नाग प्रजेवर होऊ लागला होता. त्यामुळे अशाप्रकारच्या कौटुंबिक भांडणांनी संपूर्ण नाग प्रजातीमधील संघर्षाचे रुप घेऊ नये, याकरिताच मी अनंताला आपल्या राजपदाचा त्याग करुन, पृथ्वीवर जाण्याचे आदेश दिले. त्यामुळे नागलोकातील संघर्षमय परिस्थिती टळून सर्वत्र शांतता पसरली.''

''पूर्वीच्या इच्छाधारी नागांमध्ये आणि आत्ताच्या इच्छाधारी नागांमध्ये फार मोठा फरक आहे. पूर्वी इच्छाधारी या नावाप्रमाणेच नागांच्या सर्व इच्छा पूर्ण

होत होत्या. पण आता मात्र तसे घडणे शक्य नाही. पूर्वी एकाच नागाकडे असंख्य शक्ती असायच्या. पण आता मात्र नागांच्या बऱ्याचशा शक्ती क्षीण झाल्या आहेत. नागांकडील बऱ्याचशा प्राचिन विद्या लोप पावल्या आहेत. आता प्रत्येकाकडे भिन्न शक्ती आहेत. प्रत्येक नाग विविध शक्तींची उपासना करुन आपल्यातील विशिष्ट शक्तींना महत्व देऊ लागला आहे. पण पूर्वी मात्र असे नव्हते. पूर्वी सर्व नाग कमी-अधिक फरकाने समान होते. आता नागांमध्ये गट पडू लागले आहेत. समान शक्ती असलेले नाग आपापला समूह करुन राहू लागले आहेत. त्यामुळे नागांमध्ये आता हजारो जाती निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक जातीमधील नाग त्याच्या जातीचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे आपापसातील वाद अधिकच वाढतात. पूर्वी एक असणारे नाग आता एकमेकांशीच स्पर्धा करु लागले आहेत. हल्लीच्या नागांना सत्तेची आणि ऐश्वर्याची लालसा स्वस्थ बसून देत नाही. त्यामुळे आता अर्ध्याधिक नाग एकमेकांचेच शत्रु बनले आहेत. मला वाटते त्यावेळी जर मी तुझ्या आजोबांना पृथ्वीवर पाठवले नसते, तर कदाचित आजची परिस्थिती वेगळी असली असती. त्यांच्या जाण्यानंतर राजपदावर असलेल्या नागराजाने स्वत:ची सत्ता टिकविण्यासाठी जाणीवपूर्वक ह्या सर्व परिस्थिती निर्माण केल्या. आपापसात भांडणारे नाग जर एकत्र आले, तर त्याच्या हातातील सत्ता दूसऱ्या नागांच्या हातात जाईल. म्हणूनच त्याने हे सर्व घडवून आणले. त्यामुळे मी सुद्धा ह्या सर्व गोष्टींसाठी तितकाच जबाबदार आहे.''

''नाही हे सत्य नाही, त्यावेळी जे काही घडले त्यात तुमची काहीच चुक नव्हती. त्यावेळची परिस्थिती टाळण्यासाठी तेच योग्य होते.'' अनंता म्हणाला.

''हो, पण ती परिस्थिती टाळण्याच्या नादात आजची स्थिती निर्माण झाली, हे देखील एक सत्य आहे. '' नागतपस्वी म्हणाले.

''नागतपस्वी, आता नागराज काय करेल? असे वाटते तुम्हाला?'' अनंताने विचारले.

‘‘इथे असल्यामुळे त्याची सध्या मलाही कल्पना नाही. पण नागराज आता शांत बसणार नाही. तो नक्कीच काहितरी करण्याच्या तयारीत असेल. कदाचित तो नागमणी प्राप्त करण्याच्या तयारीतही असेल.

म्हणजे? मोहनने आश्चर्यचकीत होऊन विचारले ‘‘मोहन, प्रत्येक नाग, नागमणी तयार करु शकतो. कदचित हे तुला माहीत नसावे.’’ नागतपस्वी म्हणाले.

‘‘हो, पण त्यामुळे नागांचा जीवसुद्धा जाऊ शकतो.’’ अनंता म्हणाला.

आश्चर्यचकीत झालेला प्रकाश सर्व शांतपणे ऐकत होता. पण मोहन मात्र थोडा अस्वस्थ दिसत होता.

‘‘नागतपस्वी तुम्ही काय बोलत आहात हे मला समजत नाहीये, कृपा करुन मला थोडे स्पष्ट करुन सांगा.’’ मोहन म्हणाला.

‘‘जसे मनुष्याच्या शरीरात कुंडलिनी शक्ती वास करते. पण फक्त ०.१% मनुष्यांनाच ती दिव्य शक्ती जागृत करता येते. बरे जरी एखाद्या मनुष्याने अथक प्रयत्नाने जर आपली कुंडलिनी शक्ती जागृत केली, तरी त्या शक्तीला नियंत्रित करणे त्याला जमत नाही. अशा अनियंत्रित शक्तीमुळे अनेक साधकांचा मृत्यु होतो. त्यामुळे मनुष्य सहसा ती अद्भूत शक्ती जागृत करण्याच्या फंदातच पडत नाही. आणि तसे पण ह्या सर्व गोष्टींचे ज्ञान फार कमी मनुष्यांनाच असते. त्याचप्रमाणे सर्व नागांच्या अंगी नागमणी तयार करण्याची शक्ती असते. त्यासाठी त्यांना आपल्या शरीरातील सर्व विष एकाच ठिकाणी थुंकून साठवायचे असते. ज्यावेळी ते विष गोठते, त्यावेळी त्याचा नागमणी तयार होतो. पण ह्या प्रक्रियेमध्ये जर त्याच्या शरीरात थोडे जरी विष शिल्लक राहिले, तर पूर्णतेच्या अभावामुळे त्यापासून नागमणी तयार होऊ शकत नाही. परंतू एकाचवेळी इतके विष शरीराबाहेर काढल्याने नागांची शक्ती खुपच क्षिण होते. अनेकदा ह्या सर्व खटाटोपामध्येच त्यांची सर्व ऊर्जा संपून जाते आणि त्यांचा आपोआपच मृत्यू

होतो. पण जर एखाद्या नागाने आपल्या शरीरातील सर्व विष शरीराबाहेर काढण्यात यश मिळवले, तर त्याच्या साठलेल्या विषाचा नागमणी तयार होतो. आणि मग त्या नागमणीच्या दिव्य शक्तींमुळे त्या नागसाधकाने नागमणी प्राप्त करण्यासाठी गमावलेले विष आणि त्याच्या शरीरातील खर्च झालेली सर्व ऊर्जा त्याला परत मिळते. आणि त्याचबरोबर नागमणीच्या अद्भूत शक्ती सुद्धा त्याला प्राप्त होतात.''

''याचाच अर्थ नागमणी तयार करण्यासाठी शरीरातील विषाचा प्रत्येक थेंब महत्वाचा असतो.'' प्रकाश म्हणाला.

''होय, परंतू शरीरातून सर्व विष बाहेर काढणे, हे काही सोपे काम नाही. बरं, जरी एखादा नाग आपल्या शरीरातील सर्व विष बाहेर काढण्यात यशस्वी झाला, तरी ते विष लगेचच गोठवावे लागते. कारण जर ते वायूच्या संपर्कात फार काळ राहिले, तर ते निरुपयोगी ठरते.''

''मग, ते विष त्वरीत गोठविण्याचे कार्य कसे काय शक्य होते?'' मोहनने विचारले.

''त्यासाठी मंत्र सिद्धी असावी लागते. नाहीतर सर्वच व्यर्थ ठरते.'' इतके बोलून नागतपस्वी शांत झाले. नागतपस्वींचे बोलणे संपल्यावर प्रकाशने स्मित हास्य केले. त्याला एकट्यालाच असे स्मित करताना पाहून मोहन आणि अनंताला थोडे आश्चर्य वाटले होते. पण नागतपस्वींना त्यामागचे कारण माहिती होते..... जन्मत:च दिव्य नागमणी असल्यामुळे तो खुपच भाग्यवान असल्याचे त्याने आता जाणले होते.

———X———X———

# युद्धाची तयारी

प्रकाशच्या दिव्य नागमणीच्या तेजानेच, नागलोकातील सर्व नाग भयभीत झाले होते. नागराजने, त्याचे पृथ्वीवरुन अशाप्रकारे अपहरण करुन, त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कदाचित प्रकाश ह्या गोष्टीचा सूड घेऊ शकतो आणि जर त्याने मनात आणले, तर तो संपूर्ण नागलोकाचे स्मशानभुमीत रुपांतर करु शकतो. अशी अनेक नागांना भिती वाटत होती. प्रकाशच्या मस्तकी असलेल्या अद्भूत नागमणीच्या शक्तीचे सामर्थ्य पाहून, नागलोकातील कित्येक नाग भयभीत झाले होते. आणि आत्तापर्यंत तर प्रकाशची वार्ता संपूर्ण नागलोकी पसरली असणार हे नागराजला चांगलेच ठाऊक होते.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करताना, नागराजला महाभारताच्या काळातील नागांसाठी भयावह असलेली एक घटना आठवली. अभिमन्यूच्या पुत्राला, म्हणजेच परिक्षीत राजाला मिळालेल्या शापानुसार, तक्षक नागाने त्याला दंश केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. अशाप्रकारे एका नागामुळे आपल्या वडिलांचा मृत्यू झाल्याचे समजल्यावर नागांवर संतापून, ‘जन्मजय’ नामक परिक्षीत राजाच्या पुत्राने, पृथ्वीवरील नागांचा सर्वनाश करण्यासाठी सर्प यज्ञाचे आयोजन केले. त्या यज्ञामुळे पृथ्वीवरील कित्येक नाग मृत्युमूखी पडू लागले. अशा वेळी आपले प्राण संकटात असल्याचे जाणून तक्षक नागाने घाबरुन देवराज इंद्राकडे आश्रय मिळवला. त्यावेळी नाग प्रजातीचे अस्तित्व संपवायला निघालेल्या राजा जन्मजयला त्याच वेळी यज्ञ करण्यापासून थांबवणे आवश्यक होते. नाहीतर संपूर्ण नाग प्रजातीचा सर्वनाश निश्चीत होता. त्यावेळी देवगुरु बृहस्पती यांनी राजा जन्म-जयची समजूत काढून त्याला, नागांचा विनाशक ठरलेल्या त्या यज्ञाची समाप्ती करण्यास भाग पाडले. म्हणून नागांचा विनाश टळला. ह्या घटनेनंतर नागांना मनुष्याची भिती वाटू लागली. मनुष्य आपल्याजवळील गुप्त विद्येच्या आणि तंत्र-मंत्राच्या सहाय्याने, नागांना

त्यांच्यासमोर नमवू शकतो. हे त्याचे उदाहरण झाले होते. त्या घटनेनंतरच मनुष्याशी शत्रूत्व करणे, आपल्यासाठी हानिकारक ठरु शकले हे नागांचे मत तयार झाले. होते ही घटना राहून राहून नागराजला सारखी आठवू लागली.

———X———X———

प्रकाशचे अपहरण करुन त्याला संपवण्याचा प्रयत्न केल्याने, नागलोकातील अनेक नाग, नागराजवर संतापले होते. त्यामुळे भविष्यात ते प्रकाशच्या बाजूने उभे राहू शकतील, अशी भिती नागराजला वाटत होती. त्याचबरोबर प्रकाशकडील अद्‌भूत शक्तींमुळे प्रभावित किंवा भयभित झालेल्या नागांनी प्रकाशसमोर समर्पण केले, तर आपली ताकद अजुनच कमी होईल. ही भिती नागराजला सतावत होती. त्यामुळे तो आता चिंतेत दिसत होता, तितक्यात नागऋषींचे तिथे आगमन झाले.

''नागराज, जर त्या मनुष्याने नागलोकावर आक्रमण केले, तर तो आपल्यासाठी घातक ठरु शकतो. त्यामुळे आपल्याला काहीही करुन हे युद्ध टाळायचे आहे.'' नागऋषी म्हणाले.

''परंतू, नागऋषी जर त्याने आपल्यावर आक्रमणच केले नाही तर?'' नागराजने गंभीरपणे विचारले.

''मग तर...... प्रश्नच मिटला.'' नागऋषी म्हणाले. ''पण... मला असे वाटते की, त्याने आपल्यावर आक्रमण करण्याआधीच आपण त्याला यमलोकी पोहचवावे.'' (नागराज)

''पुन्हा तिच चूक! ते सध्या तरी शक्य नाही नागराज. त्याच्याजवळील नागमणी मुळे तो अवैध्य बनला आहे.'' (नागऋषी)

''परंतू त्याच्या शक्ती अजून त्याच्या नियंत्रणात नाहीत, हे आपण जाणतोच. किंबहूना त्याला त्याच्या शक्तीची अद्याप जाणीवच नाही; त्यामुळे आपल्याला क्षणाचाही विलंब न करता, त्याला संपवण्याचा मार्ग शोधला पाहिजे.'' (नागराज)

त्यावर नागऋषी मोठ्याने हसले आणि म्हणाले ''नागराज राजाने चौकस असावे. त्याचे लक्ष सर्वत्र असले पाहिजे.''

''म्हणजे काय म्हणायचे आहे तुम्हाला?'' नागराजने चिडून विचारले.

''म्हणजे..... तुझ्या विश्वसनीय प्रधान 'नागतपस्वींनी' त्या मनुष्याच्या नागशक्ती जागृत करण्यासाठी पृथ्वीवर केव्हाच प्रस्थान केले आहे.'' (नागऋषी)

''काय बोलता आहात आपण?'' नागराज आता पूर्णपणे भयभित झाला होता.

'' होय. हे सत्य आहे. इतकेच नव्हे, तर त्याच्या जन्माच्या वेळी सुद्धा त्या नागतपस्वींनी पृथ्वीलोकात जाऊन त्या अर्धनागमनुष्याच्या सर्व नागशक्तींना त्याच्या शरीरात बंदिस्त करुन ठेवले होते. त्यामुळेच आपल्याला इतकी वर्षे त्याची ऊर्जा नागलोकात जाणवली नाही. आणि म्हणूनच तो आत्तापर्यंत आपल्यापासून सुरक्षित राहू शकला.'' (नागऋषी)

''म्हणजे नागतपस्वींनी आपल्याशी घात केला आहे तर.... त्यांना या सर्व गोष्टींची किंमत मोजावी लागेल. आम्ही त्यांना मृत्युदंड देऊ.'' नागराज संतापाने उद्गारला.

———X———X———

नागतपस्वींनी प्रकाशच्या सुरक्षेसाठी, त्याला वेळोवेळी गुप्तपणे केलेल्या सहाय्याबद्दल नागराजला समजल्याने नागराज खुप संतापला होता. नागतपस्वींनी मनुष्य हितासाठी अशाप्रकारे कार्य करावे ही गोष्ट तो खपवून घेऊ शकत नव्हता. त्यामुळे नागतपस्वींना त्यांच्या ह्या कृत्याची शिक्षा म्हणून त्यांना मृत्युदंड देण्याचा विचार त्याने आपल्या मनाशी पक्का केला होता. परंतू त्याला आपल्या ह्या विचाराला सत्यात उतरवण्यासाठी नागतपस्वी पृथ्वीलोकातून नागलोकी परतण्याची वाट पहावी लागणार होती.

नागलोकात नागतपस्वी दिसताचक्षणी त्यांना बंदी बनवून माझ्यासमोर हजर करावे असा हुकूम नागराजने आपल्या सेवकांना दिला होता. त्यामुळे पृथ्वीलोकातून गाफील अवस्थेत परतलेल्या नागतपस्वींचे नागलोकी आगमन होताच बल्ल आणि मल्लने त्यांना बंदी बनवले. आणि नागराज समोर तात्काळ हजर केले. त्यावेळी नागराज आणि नागतपस्वींचे दिर्घ संभाषण झाले. नागतपस्वींनी त्याला समजवण्याचा भरपूर प्रयत्न केला. पण त्याचा नागराजवर काहीच परिणाम झाला नव्हता. नागतपस्वींनी अशाप्रकारे गुप्तपणे अनंताला आणि त्याच्या नातवाला सहाय्य करणे, हे नागराजला मान्य नव्हते. म्हणुन त्याने नागतपस्वींना डसून त्यांचा जीव घेतला. पृथ्वीवरच्या प्रदुषित वातावरणात नागतपस्वींच्या शरीरातील उर्जा असंतुलित झाल्या होत्या. त्याशिवाय नागलोक आणि पृथ्वीलोक यांच्यामधील नदी ओलांडून जाण्यासाठी केलेल्या प्रवासात, त्यांच्या अनेक शक्ती खर्ची पडल्या होत्या. वृद्धत्वामुळे त्यांच्या शरीरावर प्रवासाचा विपरित परिणाम झाला होता. त्यामुळे त्यांना त्या शक्ती परत मिळविण्यासाठी बराच काळ जावा लागणार होता. आपल्या शक्तींअभावी त्यांना आपल्या दिव्य दृष्टीचा वापर करुन नागलोकी घडलेल्या घटनांबद्दल जाणून घेणेही शक्य नव्हते. अशा अवस्थेत नागराजने त्यांना पकडले होते, तेव्हा त्यांच्याकडे त्याचा प्रतिकार करण्याचीही शक्ती उरली नव्हती. म्हणून नागराजने त्यांना डसताच क्षणी, त्यांचा मृत्यु झाला.

नागतपस्वींच्या मृत्युनंतर त्यांच्या जागी नागऋषींची मुख्य प्रधान म्हणुन नेमणुक केली गेली.

———x———x———

दोन दिवसांपासून प्रकाश ध्यानाला बसला होता. अद्याप त्याने आपले नेत्र उघडले नव्हते. काहीही झाले तरी त्याला ध्यानातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये, असे त्याने मोहनला सांगितले होते. म्हणून तो प्रकाशच्या, ध्यानातून बाहेर येण्याची वाट बघत होता. ज्यावेळी प्रकाशने आपले नेत्र उघडले, त्यावेळी तो घामाने डबडबलेला होता. अर्थातच त्याला ध्यानाच्या माध्यमातून काहीतरी महत्वाची गोष्ट समजली असणार हे अनंताने ओळखले होते. पण मोहनला मात्र याबद्दल जाणून घेण्याची घाई होती. म्हणून त्याने प्रकाशकडे त्याबद्दल विचारणा केली असता नागराजने, नागतपस्वींना मृत्युदंड दिल्याचे त्याने मोहनला सांगितले. प्रकाशचे बोलणे ऐकूनही अनंताला त्याबद्दल आश्चर्य वाटले नाही. कदाचित अनंताला ह्या गोष्टीची आधीच जाणीव झाली असावी, असा अंदाज मोहनने बांधला. प्रकाशचे बोलणे सुरु असतानाही तो शांतच होता. त्यामुळे त्याला नागतपस्वींच्या जाण्याचा धक्का बसला असावा. असे मोहनने प्रकाशला सांगितले. तितक्यातच मनाशी कसलातरी निर्धार करुन अनंता आपल्या जागेवरुन उठून उभा राहिला. ''मोहन, प्रकाश मी... नागलोकी जात आहे. आता जोपर्यंत, मी त्या नागराजला यमसदनी पोहोचवत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही. त्याकाळी नागतपस्वींच्या सांगण्यानुसार मी आपले राजपद त्यागून इथे आलो. आजवर बंधू या नात्याने मी नागराज विषयी कसलीही तक्रार केली नाही. पण त्या हरामखोराला माझ्या त्यागाची अजूनही जाण नाही. आणि आतातर त्याने पुजनीय नागतपस्वींनाच.... मी आता स्वस्थ बसू शकत नाही.'' इतके बोलून अनंताने आपले डोळे मिटले आणि तो

तोंडातल्या तोंडात कसला तरी मंत्र पुटपुटु लागला. आणि क्षणार्धातच तो तिथुन अदृश्य झाला.

———x———x———

संध्याकाळची वेळ होती. प्रकाश बंगल्याच्या खिडकीतून बाहेर बघत कसलातरी विचार करत होता. गेल्या चार दिवसांपासून तो मोहनबरोबर त्याच्या बंगल्यात राहत होता. त्याच्या अपहरणाच्या दिवसापासूनच त्याला त्याच्या आयुष्यातील रहस्ये समजू लागली होती. गेल्या दहा–बारा दिवसांमध्ये त्याच्या मनावर भरपूर आघात झाले होते. नागांनी त्याचे अपहरण करुन, त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. इतकी वर्षे त्याला आईची माया देणाऱ्या 'लता'ने त्याच्या अपहरणाचा ताण घेतल्याने, तीचा हृदयविकाराने मृत्यु झाला होता. ही गोष्ट त्याच्या मनाला सतत टोचत होती. त्यातच इतकी वर्षे सर्व–सामान्य मनुष्याप्रमाणे जीवन जगणाऱ्या प्रकाशला, आता अचानक आपण नाग असल्याचेही समजले होते. त्यामुळे हे सर्व आपल्या जीवनात नक्की काय सुरु आहे? हे त्याला समजत नव्हते. त्याच्या आयुष्यात अचानकपणे सुरु झालेल्या अशाप्रकारच्या विचित्र घटनाक्रमामुळे त्याला सुरुवातीला भयंकर मन:स्ताप झाला होता. पण आता तो त्यातून थोडा सावरला होता. त्याच्या जीवनात जो काही विचित्र घटनाक्रम सुरु झाला आहे तो बदलणे त्याच्या हातात नाही. हे सत्य त्याला ठाऊक होते.

नागतपस्वींनी त्याच्या शरीरातील सप्तचक्रांमध्ये बंदिस्त असलेल्या शक्तींना जागृत करताना, त्याच्या शरीरातील सप्तचक्रेही आपोआपच जागृत झाली होती. त्याचे सहस्त्रार चक्र जागृत झाल्यापासून त्याला अनेक दिव्य अनुभूती होऊ लागल्या होत्या. त्याच्या मनातील सर्व चिंता मिटून आपोआपच त्याला परमानंदाची प्राप्ती झाली होती. सहस्त्रार चक्र जागृत होताच, एका सामान्य मुलाचे रुपांतर एका योग्यामध्ये झाले होते. तो आता जगाच्या मोह–मायेपासून फारच दूर आला होता. आता, त्याच्या वागण्या–बोलण्यात खूपच

फरक पडला होता. त्याला, त्याच्या मनातील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे आपोआपच मिळू लागली. त्यामुळे आता कुठलीही गोष्ट त्याला समस्या वाटणार नव्हती. आता त्याला कुणाशीच फारसे काही बोलण्याची गरज नव्हती. कोणी काही बोलण्याच्या आतच तो त्यांच्या मनातील भावना, आता ओळखू शकत होता. त्यामुळे आता, तो पूर्वीपेक्षा फारच शांत

स्वभावाचा बनला होता.

———x———x———

वसंतराव प्रकाशला भेटण्यासाठी आले होते. आधी प्रकाशच्या अचानकपणे हरवण्याचे दु:ख, त्यानंतर मुलाच्या काळजीने पत्नी वारल्याचे दु:ख, त्यातच लहानपणापासून मतिमंद असलेल्या, त्यांच्या मुलीच्या भविष्याची चिंता, त्यांना लता वारल्यापासून अधिकच सतावू लागली होती आणि आतातर प्रकाश त्यांच्यापासून दुरावल्याचे दु:ख. त्यामुळे ते मनातून खुपच खचले होते. म्हणूनच न राहुन त्ते प्रकाशला भेटायला आले होते.

वसंतला बघताच प्रकाशच्या चेहऱ्यावर आनंदाची झळक दिसू लागली. जरी त्याला आपल्या जन्मदात्या पित्याबद्दल कळले असले तरीही, वसंतने इतकी वर्षे त्याला आपल्या मुलासारखे सांभाळले होते, हे तो कधीही विसरु शकणार नव्हता. प्रकाशला वसंतच्या मन:स्थितीचा अंदाज आला होता; त्यामुळे तो वसंतला धीर देण्याचा प्रयत्न करत होता. शेवटी सर्व काही चांगलेच घडेल अशी शाश्वती तो वसंतला देत होता. प्रकाशशी बोलून वसंतलाही थोडे बरे वाटले होते. काही काळ का होईना, त्याच्या चेहऱ्यावर थोडे हास्य उमटले. मुलाला भेटल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागले होते.

काहीही झाले तरी वसंत, प्रकाशला आपल्याबरोबर ''आपल्या जुन्या घरी चल.'' असे सांगण्याइतका स्वार्थी नव्हता. पण प्रकाश त्याच्यापासून दुरावल्याची खंत मात्र त्याच्या मनात होती.... जी प्रकाशलाही जाणवत होती. तसे बघायला गेलो तर त्याच्या जीवनाला आता फारसा काही अर्थच उरला नव्हता. त्यामुळे निदान प्रकाश तरी आपल्या बरोबर रहावा. ही साधी अपेक्षा त्याच्या मनात असणे स्वाभाविकच होते. पण मोहन त्याचा अत्यंत जिवलग मित्र होता. त्यामुळे ''प्रकाशला माझ्याकडे पाठव'' हे तो त्याच्याशी कधीही बोलू शकला नसता. प्रकाशला मोहनच्या मानाच्या स्थितीचा अंदाज होता. पण काहीही झाले, तरी तो एक सामान्य मनुष्य होता. त्यामुळे 'आपण एक नाग आहोत.' हे सत्य प्रकाश, त्याला सांगू शकणार नव्हता. म्हणून ''मी थोड्याच दिवसात आपल्या जुन्या घरी रहायला येईन.'' असे वचन त्याने वसंतला दिले. थोड्या वेळाने मोहन आपली कामे आटपून परतला. त्याला भेटल्यावर वसंतही आपल्या घरी परतला.

———X———X———

अनंता नागलोकात येत आहे. ही बातमी नागराजला नागऋषींकडून समजली होती. पण त्याला अनंताची फारशी भिती नव्हती. तो स्वत: आणि त्याचे सैन्य अनंतासारख्या नागांचा सामना करण्यासाठी सक्षम होते. पण त्याला मारल्यावर, त्याचा नातू प्रकाश नागलोकावर आक्रमण करेल, या गोष्टीची मात्र त्याला फार भीती वाटत होती.

आत्तापर्यंत त्याने आपल्या निवडक नागसैनिकांना नागऋषींच्या मार्गदर्शनाखाली नागमणी निर्माण करण्याचे आदेश दिले होते. बरीच वर्षे कठोर साधना करुनही नागऋषींना नागमणी निर्माण करता आला नव्हता. पण तो निर्माण करण्याचे तंत्र मात्र त्यांना ठाऊक होते. नागराज भितीपोटी, अविचाराने

मुर्खासारखे वागत आहे, याची नागऋषींना जाणीव होती. पण तरीही राजाच्या इच्छेचा मान राखून त्यांनी निवडक नागांना, नागमणी निर्माण करण्याचे तंत्र शिकवणे आरंभ केले.

नागमणी निर्माण करण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट आणि कठीण होती. त्यामुळे कोणत्याही नागाला त्याचे तंत्र शिकवले, तरी ती शक्ती त्यांच्यामध्ये निर्माण होण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी त्यांच्याही अंगी योग्यता आणि ती शक्ती धारण करण्याची क्षमता असणे आवश्यक होते. तंत्र शिकवल्याने नागांमध्ये त्या शक्तीला समजून घेण्याचे सामर्थ्य निर्माण होऊ शकते; पण नागमणी निर्माण करण्यासाठी मात्र नागसाधकाच्या अंगी ती महाशक्ती निर्माण करण्याची पात्रता असणेच सर्वात महत्वाचे होते. त्यानंतर निरंतर प्रयत्नातुन नागसाधक, नागमणी प्राप्त करण्याच्या मार्गावर पुढे पुढे अग्रेसर होऊ शकतो. हे सत्य नागराज आणि नागऋषींना चांगलेच माहित होते. त्याचप्रमाणे यासर्व दिव्य गोष्टी घडवून आणण्यासाठी सिद्ध आणि सामर्थ्यवान गुरुच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. ही गोष्ट देखील तितकीच महत्वाची होती. पण नागऋषींना स्वत:च्या सामर्थ्याचा भरपूर अहंकार होता. त्यामुळे त्यांनी कसलाही विचार न करता हे महाकठीण कार्य घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला होता.

———x———x———

नागतपस्वींची हत्या होऊन, बराच काळ उलटून गेला होता. त्यांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी अनंता नाग, नागलोकी येत असल्याचे नागराजला, नागऋषींकडून केव्हाच, समजले होते. परंतू अनंता अद्याप नागलोकी पोहोचला नव्हता. त्याला नागलोकी येण्यासाठी इतका उशीर झाल्याने, त्याला संपवण्याच्या तयारीत असलेला, नागराज अस्वस्थ झाला होता. भविष्यात

उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेऊन, त्याने नागऋषींना नागमणी निर्माण करण्याचे तंत्र, इतर नागांना शिकविण्याची आज्ञा दिली होती. नागतपस्वीनंतर सर्वात अनुभवी नाग म्हणून नागराजला त्यांच्याकडून भरपूर अपेक्षा होती. पण आत्तापर्यंत नागमणी प्राप्त करण्याच्या इच्छेने भरपूर नागांचा जीव गेला होता. तरीही नागराजने आपल्या स्वार्थासाठी हा सर्व जीवघेणा प्रकार सुरुच ठेवला होता. नागऋषींवर हे महाअवघड कार्य सोपवल्यापासून, त्यांनीही आपल्या परीने अथक परिश्रम घेतले होते. पण तरीही त्यांच्या शिष्यांनाच काय, पण त्यांना स्वत:ला देखील अद्याप नागमणी प्राप्त करता आला नव्हता. नागऋषींचे अपयश बघून नागराज त्यांच्यावर खूप संतापला होता. त्यामुळे नागतपस्वींनी आपले अध्यापनाचे कार्य सतत सुरुच ठेवले होते.

नागराजने आपला संपूर्ण महल ह्या कार्यासाठी नागऋषींकडे सोपवला होता. दररोज हजारो नाग, नागमणी निर्माण करण्याचे तंत्र शिकण्यासाठी तिथे येऊ लागले. नागतपस्वी त्यांना कसलेही प्रशिक्षण देण्याआधी त्याची योग्यता तपासण्यासाठी, त्यांची एक परिक्षा घेत होते. त्या परिक्षेमध्ये त्या हजारो नागांपैकी चार-पाच नागच यशस्वी होत असत. त्यामुळे बाकीच्या नागांना निराश होऊन स्वगृही परतावे लागायचे. साहजिकच नागमणी निर्माण करणे, हा काही खेळ नव्हता, जो कोणीही सहज निर्माण करु शकला असता. इतक्या दिवसांत नागऋषींनी लाखो नागांमधून फक्त जवळपास पाचशेच नाग, नागमणीच्या निर्माणाचे तंत्र शिकविण्यासाठी निवडले होते. त्या नागांना त्यांनी प्रशिक्षित करण्यासाठी राजमहालातच ठेवून घेतले होते. आता त्यांचा संपूर्ण वेळ ते आपल्या शिष्यांबरोबरच व्यतीत करत होते. पण अद्याप त्यांच्या पदरी निराशाच पडत आली होती. आत्तापर्यंत त्यांच्या शिष्यांपैकी अर्ध्याधीक नागांनी ती महाकठीण साधना करताना, आपला जीव गमावला होता. पण तरीही त्याची चिंता न करता त्यांनी नागराजच्या आज्ञेनुसार, आपले प्रशिक्षणाचे कार्य असेच सुरु ठेवले होते.

एखादा नाग जरी नागमणी निर्माण करण्याच्या कार्यात यशस्वी झाला, तर त्याला आपल्या दिव्य औषधींद्वारे संमोहित करुन, त्याने निर्माण केलेला नागमणी, त्याने धारण करण्याच्या आतच, त्याच्याकडून तो हिरावून घ्यायचा, त्यासाठी प्रसंगी त्या नागाची हत्या देखील करायची, पण काहीही करुन नागमणी प्राप्त करायचा. असा नागराजचा बेत होता. नागऋषी, नागराजच्या मनातील बेत ओळखुन होते. पण गेली कित्येक वर्षे ते नागराजकडे आश्रीत होते. नागराजने त्यांच्यातील सामर्थ्य व क्षमता ओळखुनच त्यांना आपल्या दरबारी ठेवून घेतले होते. त्याच्या याच उपकाराच्या दबावाखाली त्यांनी आजवर, नागराजचे सर्व आदेश मान्य केले होते. आणि पुढे ही ते, तेच करणार होते.....

———X———X———

## मोहनचे रहस्य

वसंत नुकताच मोहनच्या बंगल्यावरुन निघुन गेला होता. आता तिथे फक्त प्रकाश आणि मोहनच होते.

''प्रकाश आज मी तुला काही महत्वाच्या गोष्टी सांगणार आहे.'' असे बोलून मोहनने प्रकाशला आपल्या समोरील खुर्चीवर बसण्यास सांगितले.

''प्रकाश मला माहिती आहे, आजवर तू एका सामान्य मनुष्याचे जीवन जगत आला आहेस. तशी ती आमचीच इच्छा होती. कारण तुझी सुरक्षितता आमच्यासाठी फार महत्वाची होती. मला माहिती आहे ज्या दिवशी तुझे अपहरण झाले, त्याच दिवसापासून तुझ्या जीवनात तुला सतत अद्‌भूत गोष्टींचा अनुभव येऊ लागला आहे. ज्या कुठल्याही मनुष्यासाठी अविश्वसनीय आहेत. तू पूर्णपणे मनुष्य नाहीस आणि पूर्णपणे नागही नाहीस; तरीही मनुष्य आणि नागांचे बरेचसे गुण तुझ्यामध्ये आहेत. तुझ्याकडे मनुष्याचे शरीर आणि नागांची अद्‌भूत शक्ती आहे. हे तर तु जाणतोसच. पण त्याचबरोबर तुझ्याकडे नागवंशातील दिव्य नागमणी सुद्धा आहे. जो अत्यंत दुर्मिळ आहे. लाखो वर्षामधुन एकदा तुझ्यासारख्या नागांचा जन्म होतो. ज्याच्या शक्तींची तुलना, इतर नागांशी करता येऊच शकत नाही. तू एकटाच हजारो इच्छाधारी नागांचा सामना करु शकतोस. यागोष्टीवरुन तुला तुझ्या शक्तींचा अंदाज येईल आणि त्यापेक्षाही महत्वाची दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या अंगी नागांच्या इतक्या अद्‌भूत शक्ती असूनही, तुझा मनुष्यरुपात जन्म झाला, म्हणूनच नागलोकातील इच्छाधारी नाग तुला आपला शत्रु समजू लागले आहेत. कारण कदाचित तू

आपल्या दिव्यशक्ती सामर्थ्याच्या बळावर, नागलोकावर सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करशील आणि इतर मनुष्यांनाही आपल्याबरोबर घेऊन, नागलोकावर आक्रमण करशील आणि मग, त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील. अशी भिती नागराजच्या मनात आहे. तुझ्यामुळे त्याची सत्ता धोक्यात येईल. या भितीपोटीच त्याने तुझे अपहरण करुन तुला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर ज्या नागतपस्वींनी आम्हाला वेळो-वेळी सहाय्य केले त्यांना त्याने मृत्युदंड दिला. म्हणुनच तुझ्या आजोबांना नागलोकी जावे लागले.'' इतके बोलून तो थोडा थांबला.

''पण यासर्व गोष्टी तर मला माहितीच आहेत..... मग?'' प्रकाशने विचारले.

''हो, पण ही गोष्ट इथेच संपत नाही....'' (मोहन)

''म्हणजे अजुनही काही रहस्ये आहेत तर.....'' (प्रकाश)

''हो, आणि ती रहस्ये आज मी तुला सांगणार आहे,'' मोहन म्हणाला. तसे प्रकाशने आपले कान टवकारले. काही क्षण थांबून, मोहन पुन्हा बोलू लागला.

''लाखो वर्षापूर्वी जेव्हा या पृथ्वीवर जीवांची उत्पत्ती झाली तेव्हा मनुष्याबरोबर इतरही जीवांची उत्पत्ती झाली होती. प्रत्येक जीवाने विभिन्न योनीत जन्म घेतल्याने त्यांना फक्त आपल्याच प्रजातीचे महत्व वाटु लागले. आजवर ह्या पृथ्वीवर मनुष्य, देव, दैत्य, दानव, राक्षस, गरुड, नाग, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा, विद्याधर, भूत-प्रेत, पिशाच, वानर अशा अनेक विभिन्न योनीतील जीव निर्माण झाले. कालांतराने ते विविध लोकात विविध ठिकाणी राहू लागले. देवी-देवता स्वर्गात राहू लागले. त्यांच्या बरोबरच अप्सरा, गंधर्व आणि यक्ष यांना सुद्धा स्वर्गातच स्थान मिळाले. स्वर्गातही विविध लोक आहेत. त्यातही विविध स्थर आहेत. जिथे ह्या सर्वांना आपापल्या पात्रतेनुसार स्थान मिळाले. गरुडांनी पृथ्वीवर राहुन आकाशात आपली सत्ता स्थापन केली. दानव,

दैत्य, राक्षस यांच्याबरोबरच नागांनाही पाताळात राहण्यासाठी स्थान दिले गेले. त्याचप्रमाणे विद्याधर, भूत-पिशाच यांनी आपापल्या कर्मगतीप्रमाणे त्रैलोक्यात आपले स्थान मिळवले म्हणजेच त्यांचे पृथ्वीवरही गुप्तरुपाने वास्तव्य आहे. पण तरीही प्रत्यक्षपणे मनुष्याचेच या पृथ्वीलोकावर अधिपत्य आहे. आजवर कित्येक सजीवांच्या प्रजाती ह्या पृथ्वीवर उदयास आल्या आणि नष्टही झाल्या. परंतु मनुष्याने फार काळ. ह्या ग्रहावर आपले अस्तित्व टिकवून ठेवले. मनुष्याने पृथ्वीवरील बऱ्याचशा सजीवांवर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याने आपल्या सोईप्रमाणे एक-एक सजीव प्रजातीला आपल्या जवळ केले आणि वेळप्रसंगी दूरही केले. थोडक्यात मनुष्याने पृथ्वीवरील आपली सत्ता टिकविण्यासाठीच या सर्व गोष्टी केल्या. मनुष्याच्या मते पृथ्वीवर फक्त त्याचे आणि इतर प्राणी, पक्षी आणि किटक यांसारख्या जीवाचे अस्तित्व आहे. पण ते तितके सत्य नाही. देवता, गंधर्व, अप्सरा आणि यक्ष स्वर्गात जरी राहत असले, तरी ते सुद्धा गुप्तपणे पृथ्वीवर भ्रमण करत असतात. त्याचप्रमाणे अनेक भूत-प्रेत, पिशाच, विद्याधर मनुष्याच्या अवती-भोवती गुप्तरुपाने वास करतात. पण मनुष्याला याची जाणीव नसते त्याचप्रमाणे ह्या पृथ्वीवर अशी काही ठिकाणे आहेत, जिथे सर्व योनीतील जिव, आपल्या मुळ रुपात मुक्तपणे वास करतात.''

''जेव्हा माझा जन्म झाला. त्यावेळी मी मनुष्य म्हणुनच जन्माला आलो होतो. पण तरीही माझ्यातही नागवंशातल्या बऱ्याचशा शक्ती आल्या होत्या. पण त्या शक्ती तुझ्या शक्ती इतक्या प्रखर नव्हत्या. त्या सुप्त अवस्थेत होत्या. हे माझ्या वडीलांनी ओळखले होते. त्याच वेळी माझ्या वडीलांनी आपल्या मंत्र शक्तींनी माझ्या शरीरातील शक्तींना योग्य प्रकारे नियंत्रीत करण्याची विद्या माझ्यामध्ये प्रविष्ट केली. त्यामुळे खुप लहानपणीच मी माझ्या नागशक्ती नियंत्रीत करु शकलो. पण तुझ्याबाबतीत तसे घडणे शक्य नव्हते. तुझ्या शरीरातील प्रचंड शक्तींना नियंत्रीत करणे इतके सोपे काम नव्हते. त्यामुळे त्यावेळी त्यांना मंत्राच्या सहाय्याने तुझ्याच शरीरात कैद करुन ठेवणेच योग्य

होते. पण आता तू मोठा झाला आहेस, त्यामुळे तुला तुझ्या नागशक्तींना व्यवस्थित नियंत्रीत करता आले पाहिजे. त्यासाठी, तुला त्याचे प्रशिक्षण देण्यासाठी एका योग्य गुरुची आवश्यकता आहे. म्हणुनच तुझ्या त्या गुरुची निवड मी स्वत: केली आहे.''

''मी फार–फारतर पाच वर्षांचा असेन, तेव्हा माझे वडील मला हिमालयात घेऊन गेले. तिथे एक फार मोठी प्राचीन गुहा आहे. जिथे ह्या पृथ्वीची मर्यादा संपते आणि एका वेगळ्याच विश्वाची सुरुवात होते...... त्या गुप्त ठिकाणी मी, पृथ्वीच्या कालचक्राप्रमाणे तब्बल पन्नास वर्षे राहिलो. तिथे व्यतीत केलेला प्रत्येक दिवस अविस्मरणीय होता. तिथेच मला माझ्या जीवनाचे खरे रहस्य समजले. ज्या ठिकाणी आजही देवता, दैत्य, नाग, भूत–पिशाच, यक्ष, विद्याधर, योगी मनुष्य, ऋषी आणि न जाणो कित्येक जीव वास करतात. ते ठिकाण इतके गुप्त आहे की, मनुष्याला त्याचा कधीच पत्ता लागू शकत नाही. ते ठिकाण म्हणजे स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ यांचा संगम आहे. जिथे प्रत्येक प्रजातींमधील जीव इतर प्रजातींमधील जीवांचा आदर करतो. जिथे सर्व मिळून मिसळून राहतात. कारण त्या सर्वांचे एकच ध्येय असते. ते म्हणजे स्वत:ची ओळख करुन घेऊन, अध्यात्मिक प्रगती करणे. तिथल्या कित्येक जीवांना विविध सिद्धी प्राप्त असतात, प्रत्येकाकडे विविध शक्ती असूनही तिथल्या कोणत्याही जीवाला एकमेकांशी स्पर्धा करावीशी वाटत नाही. कारण तेथील प्रत्येक जीवाला इतर जीवांचे वेगळे असे महत्त्व जाणून, त्यांचा आदर करणे शिकवले जाते. प्रत्येक जीवाच्या शक्ती आणि उर्जा जरी भिन्न असल्या, तरी त्या सर्वांचे ध्येय मात्र एकाच असल्याने ते तिथे एकोप्याने रहातात. तिथे प्रत्येक योनीतील जीवांचा एक गुरु असतो. जो त्यांच्या प्रजातीचे नेतृत्व करतो आणि इतरही प्रजातींच्या जीवाला आपले ध्येय पूर्ण करण्यास मदत करतो. त्या ठिकाणी सिद्ध गुरुंच्या सानिध्यात प्रत्येक शिष्याला त्याच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी योग्य प्रशिक्षण दिले जाते.''

''मला जर लहानपणी तिथे नेले गेले नसते, तर कदाचित मी सुद्धा एका मतिभ्रष्ट शक्तीशाली जीवाप्रमाणेच वागलो असतो. माझ्याही मनात आपल्या शक्तींचा गर्व असला असता आणि मग मी इथे पृथ्वीवर मनुष्याबरोबर इतकी वर्षे शांततेत जगूच शकलो नसतो.''

''माझे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी मी माझ्या गुरुंच्या आज्ञेप्रमाणे पृथ्वीवर परतलो, त्यावेळी मला आश्चर्याचा मोठा धक्काच बसला. कारण माझ्या बरोबर खेळणारी, बागडणारी इथली मुले त्यावेळी वृद्ध झाली होती. त्यांची दुसरी पिढी देखील माझ्या पेक्षा प्रौढ होती. ज्यावेळी मी तिथे गेलो, त्यावेळी मी पाच वर्षाचा होतो. आणि जेव्हा मी इथे परतलो तेव्हा मी दहा वर्षाचा झालो होतो. पण त्या दरम्यान इथे पृथ्वीवर पन्नास वर्षे उलटून गेली होती. कारण ते गुप्त ठिकाण ह्या त्रिमितीच्या पलिकडचे असल्याने तिथे काळाचा परिणाम अत्यंत संथ गतीने होतो. म्हणून पन्नास वर्षात माझे वय फक्त पाचच वर्षांनी वाढले होते.''

''इथे परतल्यानंतर माझ्या वडीलांनी मला आमची खरी ओळख लपवण्यासाठी दुसऱ्या एका गावात नेले. मग आम्ही तिथेच वास्तव्य करु लागलो. त्याच गावात माझी आणि वसंतची ओळख झाली आणि वसंतच्या रुपात मला माझा जिवलग मनुष्य मित्र भेटला. बराच काळ आम्ही एकत्र व्यतीत केला. त्यामुळेच तर मी मनुष्यांना नीट समजुन घेऊ शकलो. त्याने नंतर तुला इतकी वर्षे स्वत:च्या मुलाप्रमाणेच नीट सांभाळले ज्यामुळे तू आज माझ्यासमोर जिवंत आहेस.....''अशाप्रकारे मोहनने आपल्या जीवनातील बरीचशी रहस्ये प्रकाशला सांगितली होती. त्यामुळे प्रकाश आश्चर्यचकित होईल किंवा त्याबद्दल अजुन काही प्रश्न विचारेल असे मोहनला वाटत होते. पण तिथे तसे काहीच घडले नव्हते. सहस्त्रार चक्र जागृत झाल्याचेच हे सर्व परिणाम असावेत, हे आता मोहनच्या लक्षात आले होते.

———x———x———

## हिमालयात आगमन....

मोहन आणि प्रकाश हिमालयाच्या पायथ्याशी पोहोचले होते. तिथले वातावरण प्रचंड थंड असल्याने तिथल्या माणसांनी उबदार वस्त्रे परिधान केली होती. परंतु प्रकाश आणि मोहनवर तिथल्या वातावरणाचा काहीच परिणाम होताना दिसत नव्हता.

बऱ्याच वेळेपासून, मोहन एकाच ठिकाणी थांबून, कोणाची तरी वाट बघत, ताटकळत उभा होता. थोड्या वेळाने एक तरुण मुलगा, मोहनला शोधत त्या ठिकाणी येऊन पोहोचला. तो जवळपास प्रकाशच्याच वयाचा असेल, असे त्याला पाहताच लक्षात येत होते. त्याला लांबूनच येताना पाहून मोहनच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला होता. याचाच अर्थ त्यांची प्रतिक्षा आता संपली होती. हे आतापर्यंत प्रकाशच्या लक्षात आले होते. मोहनला बघताच क्षणी तो तरुणही खुष झाला होता. तो मोहनच्या जवळ येताच, दोघांनीही एकमेकांना गाढ अलिंगन दिले. त्यामागचे कारणही तसेच होते. ते दोघेही एकमेकांना जवळपास पन्नास वर्षानंतर भेटत होते.

मोहनने त्या तरुणाला प्रकाशची ओळख करुन दिली. जेव्हा प्रकाशकडे त्याची नजर गेली तेव्हा तो थोडासा भय-भीत दिसू लागला. काही क्षण प्रकाशकडे एक टक बघुन झाल्यावर, त्याने मोहनकडे बघून आपली मान होकारार्थी डोलवली. बहुदा मोहनने मनोमन त्याच्याशी काही संवाद साधला असावा. तसे त्या तरुणाने आपली मान खाली झुकवून, प्रकाशच्या प्रति आपला आदर-भाव दर्शवला. त्यानंतर ते लगेचच पर्वताच्या दिशेने अग्रेसर झाले.

काही तासांच्या पायी प्रवासानंतर तिघांनी आपले इच्छित अंतर गाठले. त्यानंतर तो तरुण एका गुहेत शिरला. त्याच्या पाठोपाठच मोहन आणि प्रकाशही गुहेच्या आत शिरले. ती भरपूर अंधारमय गुहा होती. कोणी आपल्याला बघत तर नाही ना? याची खात्री करुन, त्या तरुणाने आपले डोळे मिटले. आणि

तोंडातल्या तोंडात तो काहीतरी पुटपुटु लागला. तसे अचानकच तिथे भरपूर तेज निर्माण झाले. एका दिव्य प्रकाशाने त्या तिघांनाही व्यापून टाकले आणि क्षणार्धातच ते तिघेही त्या गुहेच्या पलिकडे असणाऱ्या गुप्त ठिकाणी येऊन पोहोचलो. त्या तरुणाने मंत्र पुटपुटताच निर्माण झालेला तो दिव्य प्रकाश म्हणजेच एका जगातून, दुसऱ्या अद्‌भूत अशा विश्वास नेणारे गुप्त द्धार असल्याचे प्रकाशच्या लक्षात आले होते. तरीही त्याच्या चेहऱ्यावर आता थोडेसे आश्चर्याचे भाव दिसू लागले होते. हिमालयातील त्या गुप्त रहस्यमयी विश्वात, त्याच्या पहिल्यांदाच प्रवेश होत होता.

त्या ठिकाणी डोळे दिपवून टाकणारा प्रकाश सर्वत्र पसरला होता. इतका उजेड प्रकाशने आजवर कधीही अनुभवला नव्हता. म्हणुन त्याने आकाशात पाहिले, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याला आकाशात कुठेही सुर्य दिसत नव्हता. आणि त्यापेक्षाही आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्यावेळी त्या तिघांचा त्या अद्‌भूत ठिकाणी प्रवेश झाला. त्याच वेळी मोहनचे शरीर हळू-हळू बदलू लागले. पूर्वी एखाद्या मध्यमवयीन पौढ मनुष्यासारखा दिसणारा मोहन आता पंधरा-वीस वर्षाचा तरुण असल्यासारखा दिसू  लागला होता. पण खरेतर तेच त्याचे खरे वय होते. त्या ठिकाणी पृथ्वीच्या सर्व मर्यादा संपल्यामुळे, मोहनने पृथ्वीवर सामान्य मनुष्याप्रमाणे जगण्यासाठी धारण केलेले शरीर बदलून तो त्याच्या खऱ्या रुपात आला होता. प्रकाशच्या चेहऱ्यावरील आश्चर्याचे भाव बघून मोहन त्याच्याशी बोलू लागला. ‘‘मला माहिती आहे की, तु माझाच विचार करत आहेस. इथे येताच, माझे रुपांतर एका तरुणामध्ये कसे काय झाले? याचेच तुला आश्चर्य वाटत आहे ना? पूर्वी ज्यावेळी मला माझ्या गुरुंनी ह्या ठिकाणावरुन पृथ्वीवर परतण्याचा आदेश दिला होता त्याच वेळी माझी  खरी ओळख गुप्त रहावी म्हणून त्यांनी माझ्या शरीरातील दिव्य नागशक्तींना पृथ्वीलोकासाठी निष्क्रिय केले. म्हणजेच त्यांनी माझ्या शक्तींना बंदिस्त करुन ठेवले होते. त्यामुळे पृथ्वीवरील काळाचा परिणाम माझ्यावर होऊ लागला आणि

माझे वयसुद्धा एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणेच वेगाने वाढू लागले. परंतु सत्यस्थितीत मी सुद्धा एक नागच असल्याने मला सुद्धा हजारो वर्षांचे आयुष्य लाभले आहे. त्यामुळे इथे परतल्यावर मी पुन्हा माझ्या खऱ्या रुपात येऊ शकलो. जेव्हा मी हे ठिकाण सोडले होते. त्यावेळी मी दहा वर्षांचा होतो. मी पृथ्वीवर व्यतीत केलेली पन्नास वर्षे म्हणजे इथली जवळपास पाच वर्षे असतात. त्यामुळे इथे परतताच क्षणी माझे वय पुन्हा जवळपास पंधरा वर्षे झाले आहे. जे माझे खरे वय आहे. तु इथे आजवर कधीही आला नाहीस म्हणून तुझ्या बाबतीत असे घडले नाही. त्याचप्रमाणे आजवर तुझ्या शरीरातील नागशक्ती जागृत नव्हत्या. म्हणून तुझे वयसुद्धा सामान्य मनुष्याप्रमाणेच वेगाने वाढत गेले पण तरीही तुझे वय जरी वाढत गेले तरीही तुझे शरीर मात्र तुझ्यातील तुझ्यातील नागशक्तींमुळे अत्यंत संथ गतीने वाढत आहे. ही गोष्ट आतापर्यंत तुझ्याही लक्षात आलीच असेल.'' मोहनने अशाप्रकारे सर्व गोष्टी स्पष्ट केल्याने आता, सर्व गोष्टी प्रकाशच्या लक्षात आल्या होत्या. त्यामुळे त्याच्या मनातील प्रश्न संपले होते....

त्या गुप्त ठिकाणी, प्रकाशने आजवर कधीही न पाहिलेले, अनेक चित्र विचित्र जीव त्याच्या नजरेस पडत होते. ज्यावेळी ते तिथे पोहोचले त्यावेळी ते सर्व जीव समूहाने एकत्र बसून त्यांच्या समोर बसलेल्या एका वृद्ध मनुष्याचे बोलणे ऐकत होते. बहुदा तो मनुष्य त्यांना कसलेतरी ज्ञान देत असावा. पण तो मनुष्य त्यांच्याशी नेमका कोणत्या भाषेत बोलत होता? हे मात्र प्रकाशला काहीच समजत नव्हते. ज्या वेळी त्या वृद्ध मनुष्याची नजर त्यांच्याकडे गेली, त्यावेळी त्याने मोहनला त्याच्या जवळ येण्याची सुचना केली. ती सुचना एक सांकेतीक भाषेतील असून, ती मोहनला आणि त्यांच्याबरोबर असलेल्या तरुणालाही बरोबर कळली होती.

मोहन आणि प्रकाश त्या वृद्ध मनुष्याच्या दिशेने पावले टाकत चालू लागले. तसे करत असताना तिथे उपस्थित असलेले जीव त्या दोघांकडे पाहत

होते. चालता–चालता मोहन त्यांच्याकडे बघून मंद स्मीत हास्य करत होता. त्यामुळे तिथे उपस्थित जीवांपैकी बरेचसे जीव मोहनला आधीपासूनच ओळखत असल्याचे प्रकाशच्या लक्षात आले. जेव्हा ते दोघे त्या वृद्धाच्या जवळ पोहोचले, तसे त्याने आपले बोलणे थांबवले आणि तो आपल्या जागेवर उठुन उभा राहिला. मोहनला पाहताच तो आनंदित झाला होता. पण जेव्हा त्याची नजर प्रकाशकडे गेली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील भाव बदलल्याचे त्या पिता, पुत्रांच्या लक्षात आले. मोहनने त्या वृद्धाच्या पायावर आपले मस्तक ठेवून त्याला नमस्कार केला. मोहन काही बोलण्याच्या आतच तो वृद्ध त्या दोघांना उद्देशुन बोलू लागला. ''मला माहित होते की, हा क्षण येणार आहे..... पण.... (त्याची नजर प्रकाशकडे होती.) त्याने आपले बोलणे अचानक थांबवले.

तो वृद्ध प्रकाशच्या जवळ आला, त्याने प्रकाशच्या डोक्यावर हात ठेवून, प्रकाशचा नागमणी आपल्या हाताने चाचपून पाहिला. आणि पून्हा बोलू लागला. ''तुला माहिती आहे का?, तु कोण आहेस? आणि तुझ्या जीवनाचे ध्येय काय आहे? त्यावर प्रकाशने 'हो' म्हणून उत्तर दिले. आत्तापर्यंत प्रकाशला त्यांचा चेहरा स्पष्ट दिसला नव्हता पण आता तो त्यांच्या अगदीच जवळ असल्याने तो त्यांना निरखुन पाहु लागला. त्यांना पाहून त्याचे मन थोडे विचलित झाले होते. ''ह्या आधी सुद्धा मी यांना अनेकदा पाहिले आहे... पण कुठे?'' असा विचार तो आपल्या मनात करु लागला. तितक्यातच त्या वृद्धाने त्याच्या मनातील प्रश्न ओळखुन त्याला उत्तर दिले... ''कुठे म्हणजे काय? आपण कित्येकदा तुझ्या स्वप्नात भेटलो होतो.'' त्यांनी अचानक दिलेले उत्तर ऐकुन प्रकाश आता अधिकच विचलित झाल्यासारखा दिसू लागला. आता तो वृद्ध प्रकाशशी आणखी काही बोलणार इतक्यातच, मोहनने, प्रकाशला त्याची ओळख करुन दिली.

''प्रकाश हे 'प्रत्युष स्वामी' इथल्या सर्व गुरुंचेही गुरु. ज्यांनी त्रैलोक्यातील विविध प्रजातींच्या जीवांना इथे आश्रय दिला आहे. हे संपूर्ण स्थान

त्यांच्याच नियंत्रणात असून, त्यांच्या इच्छेशिवाय इथे एक पानही हलू शकत नाही. पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळातील जीवांनी आपापल्या लोकातच शांतीपूर्ण पद्धतीने वास्तव्य करावे. यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात. त्याचप्रमाणे पृथ्वीवरील, स्वर्ग किंवा पाताळ लोकातील जीवांचे, गुप्तपणे असणारे वास्तव्य सुद्धा इथुनच, प्रत्युष स्वामींद्धारेच नियंत्रीत केले जाते. थोडक्यात प्रत्युष स्वामींच्या नियंत्रणात असलेला हा गुप्त लोक स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ यांच्यातील दुवा आहे.'' इतके बोलून मोहनने आपले बोलणे थांबवले. मोहनचे बोलणे ऐकुन प्रकाशला धक्काच बसला होता. तीनही लोकांमधील दुवा म्हणून ओळखला जाणाऱ्या त्या गुप्त लोकाचा 'स्वामी' एक मनुष्य असावा, अशी त्याने कधी कल्पनाही केली नव्हती. 'त्यामुळे ह्या गुप्त लोकांत अजुनही बरीचशी रहस्ये दडलेली असतील.' असा विचार तो करु लागला. तितक्यात प्रत्युष स्वामी बोलू लागले.

''प्रकाश तुझा जन्म एका विशिष्ट उद्देशासाठी झाला आहे. तुला मनुष्य आणि नाग प्रजातीच्या हितासाठी कार्य करावे लागणार आहे. भविष्यात अशा काही गोष्टी घडणार आहेत ज्यामुळे ह्या दोन्ही प्रजाती एकमेकांचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी आपापसात युद्धे करतील. परंतु तुला ते टाळायचे आहे. मला माहिती आहे, अनंता नागलोकी गेला आहे. त्यामुळे त्याचे तिथून पृथ्वीवर सुखरुप परतणे फारच अवघड कार्य आहे. त्याचे आता पृथ्वीवर परतणे आपण दैवावर सोडू. सुदैवाने जर तो नागराजला संपवण्यात यशस्वी झाला. तर नागलोकी अधिकच अराजकता वाढेल. त्यामुळे नागलोकातील नागांना नियंत्रीत करण्यासाठी तिथे योग्य राजाची आवश्यकता भासेल. परंतू जर असे झाले नाही, तर मात्र राजाच्या अभावी, तिथल्या नागांवर कोणत्याही प्रकारचे बंधन राहणार नाही. आणि मग कदाचित ते पृथ्वीवरही येऊ लागतील. त्यामुळे पृथ्वीवरील मनुष्याचे जीवन धोक्यात येईल. प्रकाश... ना तू पूर्णपणे मनुष्य आहेस, ना नाग. त्यामुळे भविष्यात तुलाच ह्या दोन्ही प्रजातींमधील मतभेद

मिटवून त्यांचे एकमेकांपासून संरक्षण करायचे आहे. त्यामुळे कधी तुला मनुष्याचे तर कधी नागाचे नेतृत्व करावे लागणार आहे. प्रत्येक जीवाला आपल्या लोकात स्वतंत्रपणे जगता यावे यासाठी तुला नीच प्रवृतींचा अंत करावाच लागेल. पृथ्वी असो किंवा पाताळ, सर्व जीवांचे वेगळे असे स्वतंत्र अस्तित्व आहे. जे टिकविण्यासाठी प्रत्येक जीव प्रयत्नशील असतो. पण इथे प्रश्न कुठल्याही जीवाचा किंवा त्याच्या प्रजातीचा नसून.... तो त्यांच्या प्रवृत्तींचा आहे. युद्ध कधीही दोन समुहांचे, जातीचे किंवा जीवांचे नसते, तर ते दोन प्रवृत्तींमध्ये होत असते. त्यामुळे तुला निपक्षपाताने चांगल्या प्रवृत्तींचे रक्षण करण्यासाठी वाईट प्रवृत्तींचे भक्षण करावे लागेल. मग ती प्रवृत्ती मनुष्यांमध्ये असो किंवा नागांमध्ये दृष्ट प्रवृत्तींचा विनाश करणे हेच आता तुझ्या जीवनाचे ध्येय असणार आहे. पण त्यासाठी सर्वप्रथम तुला तुझ्या नागशक्तींना नियंत्रित करता येणे आवश्यक आहे. त्याचे प्रशिक्षण तुला इथे मिळणार आहे म्हणुनच मी मोहनला गुप्त संदेशाव्दारे, तुला इथे घेऊन येण्यास सांगितले होते.''

———x———x———

मोहन प्रकाशला हिमालयातील त्या गुप्त ठिकाणी सोडून पून्हा आपल्या विश्वात परतला. त्या ठिकाणी काही काळ वास्तव्य केल्यानंतर प्रकाशला आपल्या शक्ती नियंत्रीत करता येऊ लागल्या होत्या. तो जेव्हा पृथ्वीवर परतला तेव्हा तिथली चार वर्षे उलटून गेली होती. प्रकाशला उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवले आहे असे चार वर्षापूर्वी मोहनने, वसंतला संमोहनावस्थेत नेऊन सांगितले होते. त्यामुळे तो आत्तापर्यंत त्याच्यापासून सत्य लपवून ठेवू शकला होता. परंतू इतकी वर्षे प्रकाशशी काहीही संपर्क नसल्याने त्याच्या मनात या गोष्टी अनेक प्रश्न निर्माण झाले होते. पण प्रत्येक वेळी मोहन काही ना काही

कारण सांगून वसंतपासून सत्य लपवीत असे. त्यानंतर चार वर्षांनी जेव्हा प्रकाश आपल्या घरी परतला तेव्हा मोहन आणि वसंत या दोघांच्याही आनंदाची काही सीमा उरली नव्हती. या चार वर्षात त्या दोघांच्याही जीवनात बराच फरक पडला होता. मोहन आता खासदार राहिला नव्हता. त्याच्या पदाचा कालावधी संपताच त्याने राजकारणातून संन्यास घेतला होता. वर्षभरापूर्वी वसंतची मुलगी 'रिया'चे एका जीवघेण्या आजाराने निधन झाले होते. त्यानंतर एकट्या पडलेल्या वसंतला मोहननेच आधार दिला होता. ते दोघेही आता मोहनच्याच घरी एकत्र राहू लागले होते.

चार वर्षामध्ये नागलोकातही बऱ्याचशा घटना घडल्या होत्या. नागमणी प्राप्त करण्याच्या लालसेने नागराज, नागऋषी आणि इतर शक्तीशाली, सामर्थ्यवान नागांची बरीचशी शक्ती शीण झाली होती. याच संधीचा फायदा घेऊन अनंताने त्याच्या जुन्या नाग मित्रांच्या मदतीने, आणि नागराजच्या जुलुमांना कंटाळलेल्या इतर नागांना संघटीत करुन, नागराजचा आणि त्याच्या बाजुने लढणाऱ्या तेथील इतर नागांचा वध केला होता. त्यानंतर अनंताने त्याच्या साथीदार नागांच्या आणि त्याच्या बाजुने असणाऱ्या नाग प्रजेच्या इच्छेनुसार 'नागराज' पदाचा स्वीकार केला. त्यानंतर तो तिथेच वास्तव्य करणार असल्याचे त्याने एका गुप्त संदेशाद्वारे मोहनला कळविले होते.

———x———x———

# प्रकाशची गोष्ट

वसंत, मोहन आणि प्रकाश आता मोहनच्या बंगल्यावर एकत्र राहू लागले होते. राजकारण सोडल्यापासून मोहन पुन्हा वसंतबरोबर आपल्या व्यापारात लक्ष देऊ लागला होता. त्या दोघांनी आपले लक्ष व्यापारात गुंतवल्याने कामाच्या गडबडीत त्यांचा दिवस कधी संपून जायचा? हे त्यांचे त्यांनाच समजेनासे झाले होते. कित्येक वर्षांनी ते दोघे, आता पुन्हा असे एकत्र काम करु लागले होते. त्यामुळे ते दोघेही आता पूर्वीपेक्षा जास्त उत्साही वाटत होते. आणि तसेही प्रकाश आणि मोहनशिवाय, वसंतला आता कोणाचीच साथ उरली नव्हती. त्याच्या भावाची, संदीपचीही काही वर्षापूर्वीच दुसऱ्या राज्यात बदली झाली होती. त्यामुळे तो सुद्धा आता वर्षातून केव्हातरी त्याला भेटायला येत असे.

मोहनची दोन मुले (दुसऱ्या पत्नीची) आता परदेशातील नागरिकत्व मिळवून तिथेच स्थायीक झाली होती. त्यामुळे ते आता, पुन्हा भारतात परतणे मोहनला शक्य वाटत नव्हते. तशीही ती फक्त नावापुरतीच त्याची मुले होती. प्रकाशची आई वारल्यावर, त्याने ज्या स्त्रीशी विवाह केला तीची, तीच्या पतिपासून झालेली ती मुले होती. त्यांची आई वारल्यापासून त्यांनी मोहनशी फारसे संबंध ठेवले नव्हते. तसेही त्यांची आई जिवंत असतानाच ते जेव्हा परदेशात शिक्षणासाठी गेले, त्यावेळेपासूनच त्यांचा आणि मोहनचा संबंध संपुष्टात आला होता. आणि आता तर त्यांची आईच जिवंत नसल्याने त्यांचे भारतात परतणे जवळ-जवळ अशक्यच होते.

वसंतला आणि मोहनला मित्र म्हणून एकमेकांचा आधार तर होताच, पण मुलगा म्हणून त्या दोघांनाही प्रकाशचा आधार होता. प्रकाशच्या सानिध्यात ते

दोघेही समाधानाने आपले जीवन कंठत होते. वसंत एक सामान्य मनुष्य असल्याने मोहनने आणि प्रकाशने त्यांच्या जीवनाची रहस्ये त्याच्यापासून आजवर लपवून ठेवली होती आणि पूढेही लपवूनच ठेवणार होते....

प्रकाश आता पूर्वीप्रमाणेच एखाद्या सर्व सामान्य मनुष्याप्रमाणे नोकरी करु लागला होता. त्यानिमित्ताने तरी त्याची दिवसभर मोठी करमणूक होत असे. आताचा प्रकाश, पूर्वीचा सामान्य मनूष्य राहिला नव्हता. तो आता अंतर्बाह्य संपूर्ण बदलून गेला होता. तो वावरणाऱ्या, मनुष्यांचे जग जरी पूर्वीसारखेच असले, तरी त्याला आता त्या जगाचेही विविध अनुभव येऊ लागले होते. पूर्वी तो छोट्या–छोट्या कारणांसाठीही, सामान्य मनुष्यासारखा दु:खी होत असे, तसेच शुल्लकश्या कारणावरुन क्रोधीत होत असे; पण आता मात्र त्याच्याबाबतीत तसे काहीच घडत नव्हते. त्याच्या शरीरातील सप्तचक्रांमधील शक्ती जागृत झाल्यापासून, तो आता प्रत्येक परिस्थितीत आनंदात राहू लागला होता. त्यामुळे आता, त्याच्या चेहऱ्यावर नेहमीच एक प्रकारचे विलक्षण समाधान सदैव झळकत असे. कुठल्याही स्थितीत त्याची आता पूर्वीप्रमाणे चिडचिड होत नसे. किंवा त्याला आता पटकन रागच येत नसे. जणू त्याला आता, जीवनातील प्रत्येक परिस्थितीतून योग्य मार्ग काढण्याची कला अवगत झाली होती. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे आता, त्याला दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली होती. त्याचप्रमाणे त्याला आता, भविष्याची सुद्धा चाहूल लागत असे. सप्तचक्रे जागृत झाल्यापासून त्याने त्याच्या प्रत्येक इंद्रियांवर विजय मिळविला होता. त्याने जर ठरवले, तर आता तो कित्येक दिवस बिना अन्नपाणी आणि निद्रेशिवाय ध्यानात बसू शकत होता. त्याशिवाय त्याने आता पंचतत्वावरही विजय मिळवला होता. पृथ्वी तत्वावर विजय मिळवल्यामुळे, पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध कार्य करणे, अग्नितत्वावर विजय मिळविल्याने अग्नीचा त्याच्या शरीरावर कोणताही परिणाम न होणे, जलतत्वावर विजय मिळविल्याने पाण्यावरही चालणे, त्याचप्रमाणे आकाश तत्वावर विजय मिळविल्याने अवकाश भ्रमण करणे

यासारख्या कितीतरी सिद्धी त्याला अवगत झाल्या होत्या. हिमालयात असताना त्याला त्याच्या शक्तींच्या बळावर, पृथ्वीवर गुप्तपणे वास करणाऱ्या अदृश्य शक्तींना बघण्याचे, त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रशिक्षण मिळाले होते.

प्रकाशला इतरांच्या मनातील भाव सहज ओळखता येत असल्याने, कित्येकदा त्याला माणसाची किव येत असे. ही माणसे मनात एक आणि मुखात एक असे का वागतात? हा प्रश्न त्याला नेहमीच चिंतीत करुन सोडी. माणसे मनातून वेगळी आणि बाह्य जगात वेगळी असतात. पण ती खरोखरच जशी असतात तशी मात्र कधीच नसतात. आपल्या विचारांना आपल्या मनात बंदिस्त करुन, ही माणसे एकमेकांशी नेहमीच लपंडाव खेळत असतात. अनेकदा, असे खेळ खेळताना ते स्वत:च्या खऱ्या भावनाच हरवून बसतात. कदाचित माणसे एकमेकांच्या मनातील भाव सहजरीत्या जाणून घेण्यास असमर्थ असतात. म्हणूनच ते आपल्या चेहऱ्यावर विशिष्ट वृत्तीचे खोटे मुखवटे लावून जगत असतात. ह्या माणसांनी स्वत:चे ठरावीक असे कायदे, नियम आणि विचार निर्माण केलेले असतात. त्यामुळे त्यांच्या चौकटीतच ते वागू लागतात. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या चौकटीच्या बाहेर दुसरे विश्व असू शकते. याची त्यांना जाणीवच नसते. जगातील बहुतेक माणसे आत्मकेंद्री असतात. सर्वप्रथम त्यांना स्वत:ची चिंता असते आणि मग इतरांची. त्यातील बहुतेकांचे आयुष्य एकमेकांना फसवण्यामध्येच निघून जाते. आणि या फसवा-फसवी मध्ये त्यांचे खरे जीवन जगायचेच राहून जाते. त्यामुळे किती कृत्रिम प्रकारचे आयुष्य जगत असतात ही माणसे? देव, दैत्य, नाग, भूत-पिशाच यांच्यासारख्या जीवांच्या प्रवृत्ती नैसर्गिक असल्याने त्या सहज आणि स्पष्ट असतात. त्यामुळे त्या लपून राहू शकत नाहीत पण मनुष्याचे मात्र तसे नसते. जन्माला आल्यापासून, त्याच्या मृत्युपर्यंत कित्येक गोष्टी त्याने आपल्या मनात लपून ठेवलेल्या असतात. ज्या फक्त त्यालाच ठाऊक असतात. पण हे सर्व करुन तो आपल्या जीवनात काय मिळवतो? आपली एक खोटी ओळख? खोटा आनंद? असे कितीतरी प्रश्न

आणि विचार आता प्रकाशच्या मनात दररोज थैमान घालू लागले होते. कारण त्याला आता कोणाच्या मनात काय दडलेले आहे? कोणाची खरी ओळख काय आहे? हे त्यांना बघताच क्षणी त्याच्या लक्षात येत असे. त्यामुळे, कुठल्याही मनुष्याच्याच काय, पण प्राण्याच्याही मनातील गोष्टी तो आता अगदी सहज जाणू शकत होता.

———x———x———

रविवारचा दिवस होता. नेहमी प्रमाणेच प्रकाश रात्री थोडीशी विश्रांती घेऊन, भल्या पहाटेच उठला होता. त्याला आता पूर्वीसारखी जास्त झोप लागत नसे. त्याचे मुलाधारचक्र त्याच्या नियंत्रणात असल्याचेच ते परिणाम होते. झोपेतही तो कित्येक विषयांचे मनन चिंतन करीत असे. ज्याची त्यालाही कल्पना नसे. त्याचे मस्तक म्हणजे दिवस-रात्र सतत कार्यरत असलेली यंत्रणाच बनली होती. कधी त्याच्या मनात मानवी जीवनाचे तत्वज्ञान, तर कधी नागलोकातले जीवन, तर कधी आत्म्याची रहस्ये, जीवनाचा खरा अर्थ, मृत्युनंतरचे जीवन, ब्रम्हांडाची रहस्ये असे कितीतरी विचार हल्ली त्याच्या मनामध्ये निर्माण होत होते. त्यामुळे कित्येकदा तो तासंतास, शांतपणे कुठेतरी बसून असाच कसलातरी विचार करत असे. त्याच्या अशा वागण्याची आता, वसंतला आणि मोहनला सवय झाली होती.

त्यादिवशी मात्र त्याच्या मनात वेगळेच विचार सुरु होते. ते विचार होते... त्याच्या स्वत:च्या जीवनाचे. कसे होते त्याचे आत्तापर्यंतचे जीवन? काय-काय घडले होते त्याच्या आयुष्यात? हे सर्व त्याला अचानक आठवू लागले. एरवी ब्रम्हांडाचा विचार करणारा नागमनुष्य आज स्वत:च्या जीवनाचा विचार करु लागला होता. खरच! किती रहस्यपूर्ण होते त्याचे आयुष्य? त्याच्या

आयुष्यातील ती सगळी रहस्ये तो स्वत:च एक-एक करुन आपल्या मन:चक्षुंपुढे उलगडत होता.

त्याला आपले शाळेत असतानाचे दिवस आठवू लागले, लहानपणी कसा तो?, शाळेत जायला घाबरायचा, रडायचा शाळेत न जाण्यासाठी विविध कारणे शोधुन काढायचा. हे सर्व चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले. जसे काही त्या सर्व गोष्टी काल-परवाच घडल्या होत्या. त्याच्या लहानपणी घडलेली एक विचित्र घटना त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागली.

त्यावेळी तो दोन-तीन वर्षाचा होता. नुकतेच त्याला शाळेत टाकले होते. त्याच्या आईने (लताने) त्याला नुकतेच शाळेत नेऊन सोडले होते. त्याच्या आधी त्याने कितीतरी वेळ, शाळेत न जाण्यासाठी रडून वाया घालवला होता. त्याच्या आईने त्याला शाळेतल्या बाईंच्या ताब्यात सोपवले आणि ती घरी निघून आली. प्रकाशचे मन शाळेत रमत नसे. तो हिरमुसलेल्या चेहऱ्याने आपल्या जागेवर शांतपणे बसून होता. त्यावेळी त्याला बाईंच्या समोर पुढच्या रांगेतील मुलांबरोबर बसायला भिती वाटत असे. त्यामुळे नेहमीच तो मागच्या बाकावर बसायचा. त्याची शाळा दुपारची असे. त्यामुळे शाळेत जाण्यापूर्वी त्याला लहानपणापासून, लागलेली दुपारी झोपण्याची सवय आता मोडली जाणार होती. दुपारचे जेवण झाले की, त्याला दुपारी दोन-तीन तास झोपण्याची सवय होती पण शाळेमुळे त्याला आता झोपता येत नसे. त्यामुळे बऱ्याचदा त्याला आपल्या झोपण्याच्या सवयीमुळे, शाळेत झोप येत असे. मग तो समोर शिकविणाऱ्या बाईंकडे लक्ष न देता शेवटच्या बाकावर बसून खुशाल डुलक्या घेत असे.

त्या दिवशी वर्गात शिकविताना, बाईंचे लक्ष डुलक्या घेणाऱ्या प्रकाशकडे गेले. त्यांनी त्याला आवाज देऊन जागे केले आणि पुढे बोलवले. बाई खुर्चीत बसल्या होत्या. त्यांनी प्रकाशचे हात पकडले आणि त्या प्रकाशला प्रश्न विचारु लागल्या. ज्यांची उत्तरे त्याच्याकडे नव्हती. जोपर्यंत तो त्यांच्या प्रश्नांची उत्तरे

देणार नाही तोपर्यंत त्या बाई त्याला सोडणार नव्हत्या. असे त्यांनी प्रकाशला सांगितले होते. बाईंनी प्रकाशचे हात घट्ट पकडले होते. त्यामुळे बरेच प्रयत्न करुनही प्रकाशला आपले हात, त्यांच्या हातातून सोडवता आले नव्हते म्हणून तो त्यांना चावला आणि त्याने स्वत:ची सुटका करुन घेतली. त्यानंतर तो थेट घरी पळून आला. अशाप्रकारे शाळेतून घरी पळून आल्याने, त्याच्या आईने पुन्हा त्याला शाळेत नेले आणि त्याच बाईंसमोर उभे केले. शाळेत आल्यावर, प्रकाश बाईंना चावून, घरी पळाला होता आणि त्याच्या चावण्यामुळे त्यांच्या बोटावर त्याच्या दातांचे निषाणही उमटले होते, त्याचप्रमाणे चावण्यामुळे त्यांचे थोडेसे रक्त सुद्धा वाहू लागल्याचे, लताला समजले. म्हणून ती प्रकाशवर खुप चिडली होती. पण त्या बाई प्रेमळ आणि समजूतदार असल्याने त्यांनीच लताची समजूत काढून तीला शांत केले आणि प्रकाशच्या अज्ञानीपणामूळे झालेली चूक आपल्या पदरात घेतली.

दोन दिवसानंतर त्या बाईंचा मृत्यु झाला. पण त्यांच्या मृत्युचे कारण कोणालाही समजले नाही. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या शरीरात विषाचे काही अंश सापडले होते. पण त्यांच्या शरीरात ते विष कसे गेले? हे मात्र कोणालाही माहिती नव्हते. प्रकाशने त्या बाईंना चावल्यामुळेच त्यांचा मृत्यु झाला होता ही गोष्ट त्यावेळी कोणाच्याही लक्षात आली नव्हती. पण आता इतक्या वर्षांनी त्याला आपण नाग असल्याची ओळख पटल्यावर, त्याला लहानपणी त्याच्याकडून अज्ञानीपणे घडलेल्या कृत्याची जाणीव झाली होती.

नंतर हळू-हळू तो शाळेत रमू लागला. त्याला शाळेची सवय झाली. त्यामुळे त्याचे, घरी रहाण्यासाठीचे हट्ट करणे बंद झाले. पण तरीही आतून तो कुठेना कुठे असमाधानीच असायचा. शाळेत जाणे म्हणजे त्याला एखादी शिक्षाच वाटायची. एरवी अभ्यासात त्याचे लक्ष लागत नसे. पण परिक्षेच्या वेळी मात्र तो थोडा फार अभ्यास करुन परिक्षेत बरे गुण मिळवत असे. लहानपणापासूनच तो नवीन मुलांमध्ये, माणसांमध्ये पटकन मिसळत नसे.

काही माणसांशी तर तो कुठल्याही प्रकारचे संबंध ठेवणेच टाळत असे. पण ठरावीक व्यक्तींशी मात्र तो अगदी तासं-तास गप्पा मारत असे. त्यांच्याशी बोलण्यात तो इतका मग्न होई की, मग त्याला कसलेच भान राहत नसे. त्याच्या अशा विचित्र वागण्याचे अनेकांना आश्चर्य वाटत असे. कोणाशी बोलावे? कोणाशी संबंध ठेवावेत आणि कुणाशी ठेवू नयेत? हे त्याने त्या माणसांचा, त्यांच्या स्वभावाचा अभ्यास करुनच ठरवलेले असायचे.

शाळेमध्ये असताना आपल्या विशिष्ट मित्रांबरोबर तो भरपूर दंगा मस्ती करत असे. पण शिक्षकांसमोर मात्र तो शांत असल्याचा दिखावा करत असे. त्यामुळे त्याच्या वर्तणुकीवरुन तो असे काही करु शकतो, यावर कुठल्याही शिक्षकाचा पटकन विश्वासच बसत नसे. म्हणून कित्येकदा त्याच्या चुकीची शिक्षा त्याच्या मित्रांना भोगावी लागत असे.

ज्यावेळी प्रकाश कॉलेजमध्ये जाऊ लागला त्याकाळात त्याच्या स्वभावात परिवर्तने येऊ लागली. त्याचा स्वभाव आता थोडासा तापट बनू लागला होता. त्याच्याबरोबर घडणाऱ्या, त्याला अनपेक्षित असणाऱ्या गोष्टींची त्याला भयंकर चिड येऊ लागली होती. त्यावेळी तो शरीरयष्टीने खुप दुबळा होता. आणि उंचीनेही मध्यम होता. त्याच्याबरोबरच्या इतर मुलांच्या तुलनेत तो नेहमीच वयाने लहान वाटायचा. पण त्याच्या चेहऱ्यावर नेहमीच एक अभुतपूर्व तेज असायचे. जे त्याच्या अवती-भोवती असणाऱ्या कोणाच्याही चेहऱ्यावर नसे. त्यामुळे त्याला बघताच क्षणी त्याच्यातील वेगळेपण लगेचच जाणवत असे. मित्रांमध्ये असल्यावर प्रसन्न आणि एकटा असल्यावरची त्याची गंभीर मुद्रा इतरांपेक्षा काही विलक्षणच असायची. अनेकदा त्याचे वागणे-बोलणे असे असायचे की, जे त्याच्याबरोबर असणाऱ्या त्याच्या मित्रांच्या समजवण्याच्या पलिकडचे होते. जगाच्या विचारांची त्याला फारशी कदर नव्हती हे त्याच्या वागण्या-बोलण्यातून जाणवत असे. जीवनातील प्रत्येक गोष्टींबाबत, त्याची स्वत:ची भिन्न अशी मते होती. म्हणुनच सुरुवातीच्या काळात त्याच्या भिन्न

विचार प्रवृत्तींमुळे त्याची आणि इतरांची जेव्हा कुठल्याही विषयावर चर्चा होत असे तेव्हा त्या चर्चेला भांडणाचे स्वरुप प्राप्त होत असे. त्यानंतरच्या काळात, त्याने आपले वागणे–बोलणे पूर्णपणे बदलले. प्रत्येक माणसाच्या स्वभावानुसार तो त्याच्याशी वागू–बोलू लागला. नवीन माणसांना भेटल्यावर सुरुवातीलाच तो त्यांचा स्वभाव समजून घेऊ लागला. आणि त्यानुसारच त्यांच्याशी आपले वागणे–बोलणे कसे असावे? हे ठरवू लागला. प्रत्येक माणसाशी त्याचे वागणे–बोलणे वेगळे असल्याने, तो नेमका कसा आहे? हे कोणालाच माहिती नव्हते. अनेकदा इतरांशी बोलताना त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळेच हास्य असायचे. समोरच्या व्यक्तीच्या मनातले सर्व विचारही त्याला आधीच समजलेले असायचे. अनेकदा, समोरची व्यक्ती आपल्याशी काय बोलणार आहे? हे त्याने आधीच जाणल्यामुळे आपोआपच त्याच्या चेहऱ्यावर किंचीत हास्य उमटत असे. परंतू हे सर्व कसे काय घडत असावे या गोष्टीचे उत्तर मात्र त्यावेळी त्याच्याकडे नव्हते.

कॉलेजमध्ये असतानाची एक घटना प्रकाशला आठवू लागली. त्याच्या मागच्या बाकावरील मुलगा त्याला मागून गुपचूप मारत होता. सुरुवातीला त्याने मस्करी म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष केले. पण जेव्हा सांगून सुद्धा त्या मुलाने प्रकाशच्या डोक्यात मागून मारण्याचे थांबवले नाही, तेव्हा तो त्या मुलावर क्रोधीत झाला आणि त्याने त्या मुलाच्या थोबाडीत एक सणसणीत चापट मारली. ती चापट त्याला इतकी जोरात लागली की, त्याचे गाल त्याच्याच दातावर वेगाने आदळल्याने त्याच्या तोंडाच्या आत त्याला जखमा होऊन, त्याच्या तोंडातून रक्त येऊ लागले. असे घडल्यानंतर तो मागच्या बाकावरील मुलगाही प्रकाशला मारण्यासाठी त्यावर हात उगारणार तेवढ्यातच प्रकाशने आणखीन एक चापट त्याच्या थोबाडीत मारली. त्यामुळे तो सहा–साडेसहा फुट चंचीचा आणि जवळपास शंभर किलो वजनाचा, धडधाकट शरीरयष्टीचा मुलगाही चकरावला. प्रकाशच्या माराने त्याच्या तोंडातून रक्तस्त्राव होऊन त्याला भोवळ येऊ लागली. पण तरीही अजुन प्रकाशचा राग शांत झाला

नव्हता. म्हणून तो त्याला शिव्या देऊन बडबडू लागला. त्यावेळी त्याचा आवाज इतका वाढला होता की, संपूर्ण वर्गाल तो स्पष्टपणे ऐकु गेला होता. पण रागाच्या भरात बेभान झालेल्या प्रकाशला कसलेच भान उरले नव्हते. प्रकाशला इतके क्रोधित झालेले पाहून त्या प्रचंड शरीरयष्टीच्या मुलाला घाम सुटू लागला. त्याने प्रकाशसमोर माघार घेतली आणि त्याला शांत करण्यासाठी तो त्याची माफी मागू लागला. त्या दिवशी अनपेक्षितपणे प्रकाशने त्या मुलाशी केलेला प्रतिकार आणि त्यानंतर घडलेल्या प्रसंगाची त्या मुलाने इतकी धास्ती घेतली की, तो पुन्हा कधीही प्रकाशच्या वाटेला गेला नाही.

त्यावेळी घडलेल्या प्रकारामुळे प्रकाश इतका क्रोधीत झाला होता की, त्याचा क्रोध त्याच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होता. त्याच्या श्वासाची गती अचानकच वाढली होती, त्याचबरोबर त्याच्या शरीराचे तापमानही वाढू लागले होते. एखाद्या शांत असलेल्या पर्वतामधून, ज्वालामुखीचा उद्रेक होऊन, त्यातून लावा बाहेर पडावा. अशाप्रकारचे त्याचे स्वरुप झाले होते. त्या प्रसंगामुळे प्रकाशला पहिल्यांदाच त्याच्या क्रोधाची जाणीव झाली होती. त्यानंतरच्या त्याच्या आयुष्यात जेव्हा जेव्हा त्याचा क्रोध जागृत झाला, तेव्हा तेव्हा त्याला आपल्यातील सामर्थ्याची जाणीव होऊ लागली.

शाळेत असताना एक मुलगा असाच प्रकाशला फार त्रास देत असे. त्याची आणि प्रकाशची नेहमीच भांडणे होत असत. शाळेत असताना तो मुलगा तसा हुशार होता. त्याची, त्याच्या भविष्याबद्दलची स्वप्ने ही फार मोठी होती. त्यासाठी तो फार मेहनतही घेत असे. पण त्याची वृत्ती मात्र चांगली नव्हती. आपल्यापेक्षा हुशार मुला-मुलींचा त्याला राग येत असे त्यांनी त्याच्या पुढे गेलेले त्याला पहावत नसे. तसा प्रकाशही बऱ्यापैकी हुशार असल्याने तो प्रकाशचे लक्ष त्याच्या अभ्यासातून विचलीत करण्यासाठी त्याला त्रास देत असे. त्यामुळे त्याची आणि प्रकाशची भांडणे होऊन, प्रकाशचा वेळ त्यात वाया जात असे. पण कालांतराने त्याची आणि प्रकाशची तुकडी बदलली गेली. त्यामुळे

त्याचा आणि प्रकाशचा संबंध आपोआपच तुटला. दुसऱ्या तुकडीमध्ये गेल्यावर त्या मुलाची त्याच्या घाणेरड्या वृत्तीमुळे, इतरांशी भांडणे होऊ लागली.

प्रकाशची शाळा संपल्यावर काही वर्षांनी प्रकाशला त्या मुलाबद्दल जे काही समजले ते फारच विचित्र आणि भयंकर होते. कशामुळे ते माहित नाही पण दुसऱ्या तुकडीत गेल्यापासून त्याचे अभ्यासातील लक्ष पूर्णपणे उडाले. एके काळी वर्गात नंबर काढणारा, तो मुलगा दहावीत कसा–बसा पास झाला होता. त्यानंतर शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने तो बारावीला नापास झाला. त्याच काळात तो सुरुवातीला दारु, सिगारेट आणि नंतर ड्रग्ज चे व्यसन तो करु लागला. त्यामुळे त्याच्या घरात सतत भांडणे होऊ लागली. असाच एक दिवस तो नशेमध्ये असताना, त्याची त्याच्या घरातल्यांशी भांडणे झाली आणि रागाच्या भरात त्याने आपल्या आई–बापाला मारुन टाकले. त्या घटनेनंतर तो पूर्णपणे वेडा झाला होता.

शाळेत असताना आपल्या भविष्याची मोठ्–मोठी स्वप्ने रंगवणाऱ्या त्या मुलाच्या आयुष्यात दोन–चार वर्षात इतके बदल झाले की, त्याचे संपूर्ण आयुष्यच उद्ध्वस्थ झाले. त्या मुलाबरोबर जे काही घडले होते. त्यासाठी प्रकाश कुठेना–कुठे स्वत:लाच जबाबदार मानत होता. कारण त्याच्या आजवरच्या आयुष्यात त्याला ज्याने विनाकारण त्रास देण्याचा प्रयत्न केला किंवा त्याला ज्यांचा ज्यांचा राग आला, त्यासर्वांबरोबर अशाच भयंकर विचित्र घटना घडल्या होत्या. एक दिवस प्रकाश एका किराणा मालाच्या दुकानात गेला होता. त्यावेळी प्रकाशकडे पुरेसे पैसे नसल्याने त्या दुकानदाराने प्रकाशला हवी असलेली वस्तू देण्यास नकार दिला. तो दुकानवाला त्याच्या घराच्या जवळच राहणारा होता आणि तो प्रकाशला बऱ्यापैकी ओळखतही होता. तरीही त्याने असे केल्याने प्रकाशला त्याचा खुप राग आला. त्यानंतर प्रकाशने त्याच्या दूकानातून सामान घेणेच बंद केले. त्या घटनेनंतर महिन्याभरातच त्या दुकानदाराला कोणत्यातरी गंभीर कारणामुळे आपले दुकान बंद करुन, त्याच्या गावी जावे लागले.

कॉलेजमध्ये असताना, एका लफंगी व्यक्तीने प्रकाशला काहितरी खोटे-नाटे सांगून आपल्याबरोबर नेले आणि त्याच्या गळ्यातील सोन्याची साखळी चोरण्याचा प्रयत्न केला होता. त्या दिवशी प्रकाश कसा-बसा त्या चोराच्या तावडीतून निसटला. पण काही दिवसांनी तो चोर ट्रेनखाली चिरडून मेल्याची बातमी वर्तमानपत्रात छापून आली.

अशा प्रकारे एक-दोन नाही तर बऱ्याच विचित्र आणि भयंकर घटना, त्याचे वाईट चितणाऱ्या किंवा त्याच्याशी शत्रुत्व ओढावून घेणाऱ्या माणसांबरोबर घडल्याचे, त्याला अनुभव येऊ लागले. यासर्व गोष्टी कशा होतात? का, होतात? ह्या गोष्टीची जाणीव त्याला सुरुवातीला नव्हती. ज्याचे कारण त्याचा रक्षक आणि त्याचे कवच असलेला, त्याच्या जवळील दिव्य नागमणी असल्याचे आता त्याच्या लक्षात आले होते. त्यामुळे जेव्हा-जेव्हा त्याचा क्रोध जागृत होत असे तेव्हा-तेव्हा त्याच्या नागमणीच्या शक्ती जागृत होऊन, अशा भयंकर विचित्र आणि अद्‌भूत घटनांचा अनुभव त्याला येऊ लागला.

———x———x———

लहानपणापासून प्रकाश तसा, मोह मायेपासून विरक्तच होता. चैनीच्या वस्तू, ऐश्वर्य, पैसा, प्रसिद्धी यासर्व गोष्टींचा त्याला कधीच मोह नव्हता. धन-संपत्ती मिळवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा तो ज्ञानाला अधिक महत्व देणारा होता. पोटा-पाण्यासाठी धडपड करायला शिकविणारी, सतत एकमेकांक्षी स्पर्धा करायला शिकविणारी आणि फक्त पैसा मिळविण्याचे माध्यम असलेली शिक्षणपद्धती, त्याच्या मनाला न पटणारी होती. अशा प्रकारचे शिक्षण त्याच्यासाठी जणू एक खेळच होता. त्यामुळे त्याने कधी मन लावून शिक्षण घेतलेच नाही. परिक्षा तोंडावर आल्या की, जेमतेम अभ्यास करुन साठ-सत्तर

गुण मिळवायचे..... त्याला फक्त एवढेच माहिती होते. म्हणून भरपूर गुण मिळवून शाळेत किंवा कॉलेजमध्ये नंबर वगैरे काढण्याच्या, तो कधी भानगडीतच पडला नाही. शिक्षणातील यशाच्या साहाय्याने माणसाची बुद्धीमत्ता मोजली जावी, हे त्याला न पटणारे होते. त्यामुळे शैक्षणिक पुस्तके वाचणे सोडून, तो त्याव्यतिरीक्त ज्ञान देणारी, इतर पुस्तके वाचण्यात आपला बराचसा वेळ घालवत असे. लहानपणी त्याला चित्रकला, हस्तकला, शिल्पकला आणि नृत्याची आवड होती. पण शालेय शिक्षण संपताच त्याच्या ह्या कलेच्या आवडी मागे पडू लागल्या. त्यानंतर मित्रांबरोबर फिरणे, मौज-मजा करणे, चित्रपट बघणे, संगीत ऐकणे, पुस्तके वाचणे आणि ध्यान धारणा करणे, या गोष्टींमध्येच त्याचा बराचसा वेळ जाऊ लागला.

वसंतला, प्रकाशच्या अशा वागण्याची चिंता वाटत असे. त्याची मोठी मुलगी रिया ही लहानपणापासूनच मतिमंद असल्याने तिच्याकडून तो काहीच अपेक्षा ठेवू शकत नव्हता. पण निदान प्रकाशने तरी जीवनाकडे गांभिर्याने पहावे. उच्च शिक्षण घेऊन, आपले चांगले भविष्य निर्माण करावे, असे त्याला नेहमीच वाटत असे. प्रकाशच्या अशा मुक्तपणे वागण्यामुळे, त्याला आपल्या भवितव्याची काहीच पर्वा नाही, असे वसंतला वाटत असे. त्यामुळे त्याच्यात आणि वसंतमध्ये सतत लहान-सहान वाद होत असत.

कॉलेजमध्ये असताना, प्रकाश नेहमीच त्याच्या मित्रांबरोबर वेळ घालवत असे. एरवी फारशी कोणाचीही पर्वा न करता, आपल्याच विश्वात सदैव विचार मग्न असणारा प्रकाश त्याच्या मित्रांच्या सानिध्यात मात्र दिलखुलासपणे वागे. त्याची विनोदी वृत्ती, त्याचा हजर-जवाबीपणा आणि त्याचे सर्वांपेक्षा वेगळे असे व्यक्तीमत्व यासर्व गोष्टींमुळे तो ज्यावेळी त्या मुलांमध्ये नसे. त्यावेळी त्याची कमतरता त्यांना नेहमीच जाणवत असे. पण ह्या सर्व गोष्टी करत असताना, त्याच्या वयातील इतर मुला-मुलींप्रमाणे त्याचे प्रेम प्रकरण मात्र अद्याप झाले नव्हते. आयुष्यातील इतर कोणत्याही गोष्टींमध्ये मागे न राहणारा आणि

आपल्या अनुभवाच्या जोरावर प्रत्येक गोष्टींवर भाष्य करणारा, प्रकाश प्रेम-प्रकरणाच्या बाबतीत, अनुभवाच्या अभावाने मात्र, अज्ञानीच ठरला होता. त्याच्या मते ह्या जगात प्रेम वगैरे असे काहीच नसते, जे काही असते, त्यात प्रत्येकाचा काही ना काही स्वार्थ दडलेला असतो. लहानपणापासून त्याला आपल्या भावना योग्य प्रकारे नियंत्रित करता येत असल्याने, तो सहजा-सहजी भावनांबरोबर वाहणारा नव्हता. बाह्य जगात इतरांसमोर अविचारी प्रकारचे वर्तन करणारा, प्रकाश त्याच्या जीवनाच्या बाबतीत फारच गंभीर होता. कुठल्या वयात, कोणत्यावेळी, काय करायचे? हे त्याने आधीच आपल्या मनात ठरवलेले असायचे, जणू प्रत्येक गोष्टींचा आद्यक्रम त्याच्या मनात ठरलेला असायचा. त्यामुळे भावनांच्या ओघात वाहून न जाता, तो त्याच्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या गोष्टींनाच आद्यक्रम देत असे. त्याच्या आयुष्याच्या बाबतची त्याची गणिते सर्व सामान्य मुलांपेक्षा फारच वेगळी होती.

आजवर कितीतरी मुलींनी त्याच्याशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याने सदैव त्यांच्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे प्रेमाची लफडी करणे तर दूरच राहिले पण मुलींशी साधी मैत्रीसुद्धा त्याने कधी केली नव्हती. ज्यावेळी तो एखाद्या मुलीला आवडू लागला आहे आणि ती त्याच्याशी मैत्री करण्याच्या प्रयत्नात आहे, असे त्याला जाणवताच, तो त्या मुलींसमोर विचित्र प्रकारचे वर्तन करत असे. अनेकदा तो त्यांच्याकडे इतके दुर्लक्ष करी की, समोरच्या व्यक्तीला त्याच्यामध्ये गर्व आणि अहंकार दिसू लागे. तर कधी तो त्यांच्याकडे क्रोधाने बघे, तर कधी-कधी तो जाणून बुजुन त्यांच्यासमोर मुर्खासारखे वर्तन करीत असे. त्याचे असे विक्षिप्तपणे वागणे, त्यामागची कारणे कोणालाही न समजणारी होती. त्याच्या अशा प्रकारच्या वागण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याला कुठल्याही नवीन नात्यांच्या बंधनात लवकर अडकायचे नव्हते. आणि दुसरे कारण म्हणजे, खरेतर त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्याच्या मनाला भावणारी मुलगी त्याच्या आयुष्यात अद्याप आली नव्हती. ज्या आल्या त्यांना त्याचे फक्त आकर्षण होते. पण त्या

खऱ्या प्रकाशला मात्र ओळखतच नव्हत्या. त्याला इतरांची मने सहजरित्या वाचता येत असल्याने, त्याला त्यांच्या मनातील खऱ्या प्रेमाचा अभाव जाणवत असे. म्हणूनच हा विक्षिप्त जीव आजवर एकट्यानेच जीवन जगत आला होता, आणि कदाचित त्याच्या पुढील आयुष्यातही त्याला एकटेच रहावे लागणार होते.

———X———X———

## संकटाची चाहुल

प्रकाश हिमालयातून परतून आता, जवळपास वीस वर्षे झाली होती. ह्या वीस वर्षामध्ये प्रकाशचे आयुष्य पुर्वीपेक्षा भरपूर बदलले होते. प्रकाश आता जवळपास पंचेचाळीस वर्षाचा झाला होता पण अजुनही तो वीस-पंचवीस वर्षाचाच वाटत होता. आता पृथ्वीवरील कालचक्राचा त्याच्या शरीरावर कोणताही परिणाम होत नव्हता. पण मोहन मात्र पूर्वीपेक्षा थोडा प्रौढ दिसू लागला होता. अर्थातच ते त्याचे खरे रुप नव्हते, तो सुद्धा आतून, आजही खुप तरुण होता. पाच वर्षापूर्वीच वसंतचा एका जीवघेण्या आजाराने मृत्यु झाला होता. प्रकाश आणि आणि मोहनने त्याचा जीव वाचवण्यासाठी सामान्य मनुष्याप्रमाणे बरेच प्रयत्न केले पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. ते आपल्या दिव्य शक्तींनी त्याचा मृत्यु पूढे ढकलू शकले असते, पण मृत्युला टाळता येणे मात्र त्यांनाही शक्य नव्हते. पण असे करणेही निसर्ग नियमांच्या विरुद्ध झाले असते. म्हणुन त्यांनी तसे केले नाही.

प्रकाश आणि मोहनला, वसंतचा मृत्यु तात्पुरता टाळता आला असता पण कालांतराने ती वेळ पुन्हा आली असती. त्यामुळे त्यांनी जर आपल्या दिव्य शक्तींचा वापर करुन वसंतचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न केला असता तर त्याचे परिणाम वसंतच्या आत्म्याच्या पुढील गतीवर झाला असता. ज्याचा दोष प्रकाश आणि मोहनच्याही आत्म्याला लागला असता. शेवटी त्याची वेळ आली होती हेच खरे.

वसंतच्या जाण्यामुळे दोघांनाही फार दु:ख झाले होते, पण त्यांनी ते दु:ख धैर्याने पचवले होते. प्रकाशने आपली नोकरी सोडली होती. कारण फार काळ त्याला त्याच-त्याच माणसांच्या सहवासात राहणे शक्य नव्हते. अशाने त्याची खरी ओळख लपवून ठेवणे त्याला अवघड झाले असते. त्यामुळे आता प्रकाश आणि मोहन एकत्रपणे, त्यांचा व्यवसाय सांभाळू लागले. तसे बघायला गेलो, तर त्या इच्छाधारी नागांना असे सामान्य मनुष्याप्रमाणे जीवन जगण्याची गरज

नव्हती आणि तसेही मोहनने आजवर बराच पैसा कमवून ठेवला होता. त्यामुळे पैशांकरिता त्यांना हे सर्व करण्याची काहीही गरज नव्हती. ते फक्त एक विरंगुळा म्हणून हे सर्व करत होते. त्याचबरोबर व्यवसायाच्या माध्यमातून समाजसेवेची आवड असणाऱ्या प्रकाश आणि मोहनने कित्येक गरजवंतांना मदत करून, आजवर फार मोठे समाजकार्य केले होते. त्यांनी व्यवसाय करणे हा त्यांचा... समाजसेवा करण्यासाठीचा एक बहाणाच होता.

प्रकाशची सप्तचक्रे जागृत झाल्यापासून, त्याने आपल्या भूक–तहान, झोप यासारख्या गरजांवर नियंत्रण मिळवले होते. त्यामुळे सकाळी मोहनबरोबर सामान्य माणसासारखे काम करणे आणि रात्री ध्यानधारणा करणे असा त्याचा हल्लीचा दिनक्रम चालत असे. पण मोहन मात्र सामान्य माणसासारखाच निद्रेच्या अधीन होत असे.

———x———x———

वीस वर्षांमध्ये नागलोकातील स्थिती पूर्णपणे बदलली होती. नागराजच्या मृत्युनंतर, अनंता कुशलतापूर्वक आपले राजाचे दायित्व सांभाळत होता. त्याच्या शासन काळात, नाग प्रजा अत्यंत सुखी होती. नागलोकातील बहुसंख्य नागांना अनंताच्या सामर्थ्यावर आणि योग्यतेवर विश्वास होता. नागराजच्या मृत्युनंतर त्याच्या मित्र नागांची अवस्था दयनीय झाली होती. नागराजच्या काळात त्यांना, राजदरबारात आश्रय होता, जो अनंताने त्यांच्याकडून हिरावून घेतला आणि त्यांच्यावर नागलोकातील इतर कामे सोपवून त्यांच्या जागी दुसऱ्या नागांची राजदरबारातील विविध पदांवर नेमणूक केली. त्यामुळे ते दुखावले गेले होते. नागराजचा मृत्यु झाला तेव्हा त्याच्या बाजुने लढणारे इतर इच्छाधारी नागही मारले गेले होते. पण त्यांचे वंशज अजुनही जिवंत होते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे नागराजचा पुत्र धनंजय आता मोठा झाला होता.

ज्यावेळी अनंताने त्याच्या पित्याची हत्या केली, त्यावेळी तो लहान होता. अनंताने राज्यकारभार आपल्या हाती घेतल्यावर, त्याने नागराजच्या पत्नीला आणि तीच्या शंभर नागमुलांना राज्यातून निष्कासित केले होते. कारण नागराणीनेही नागराजच्या दुष्कृत्यात अप्रत्यक्षपणे त्याची साथ दिली होती.

अनंताने नागराणीला तिच्या मुलांसोबत राज्यातून निष्कासित केल्याचा अपमान ती अद्याप आपल्या मनात साठवून होती. तो अपमान सहजा–सहजी पचवणे तिच्यासाठी शक्य नव्हते. ह्या अपमानाचा आणि आपल्या पतिच्या मृत्युचा सुड घेण्याची, ती वाट बघत होती. 'अनंताला मारुन नागराजपदी आपल्या जेष्ठ पुत्राची नेमणूक व्हावी' असा तिचा मानस होता. त्यासाठी तीने नागराजच्या जवळच्या मित्रांना, अनंताशी झालेल्या युद्धामध्ये मारल्या गेलेल्या नागांच्या वंशजांना एकत्र केले होते.

नागराणीने पंचवीस वर्षापूर्वी शंभर अंडी दिली होती. त्यातील ऐंशी अंड्यांमधून नागांचा, सतरा अंड्यांमधून नागिणींचा आणि तीन अंड्यांमधून नपूंसक नागांचा जन्म झाला होता. 'धनंजय' हा तीचा ज्येष्ठ नागपुत्र होता. 'आपला हा पुत्र आपल्या पित्याच्या हत्येचा आणि मातेच्या अपमानाचा सूड नक्कीच घेईल' याची तीला खात्री होती. आत्तापर्यंत नागराणीने जवळपास पाच हजार नागांना आपल्या बाजूने लढण्यासाठी संघटित केले होते. तिच्या नियंत्रणाखाली असलेल्या मोठ्या सामर्थ्यवान इच्छाधारी नागांच्या विशेष प्रशिक्षणाव्दारे तिने त्या नागांना युद्धासाठी तयार केले होते. हे सर्व काम तिने इतक्या गुप्तपणे केले होते की, अनंताला त्याची कल्पनाही नव्हती.

नागराजचा ज्येष्ठ पुत्र धनंजय महाविद्वान आणि अतुल पराक्रमी होता. त्याच्याकडे दिव्य शस्त्रांचेही ज्ञान होते. लहानपणापासूनच त्याला मायावी युद्धे खेळण्याचे प्रशिक्षण मिळाले होते. आपल्या वडिलांच्या हत्येचा सूड घेण्याची त्याच्या मनातील भावना दिवसेंदिवस अधिकच प्रबळ होत होती. काहीही करुन त्याला, अनंताला संपवायचे होते. अनंता नागलोकाचा राजा असल्याने, त्याच्या

सेवेत भरपूर सैन्य होते. त्यामुळे त्याला मारणे सोपे काम नव्हते. भविष्यात आपल्याला अनंताशी युद्ध करावे लागेल, याच उद्देशाने धनंजयने, कठोर परिश्रम घेऊन दिव्य शस्त्रांचे ज्ञान आत्मसात केले होते.

नागलोकात लवकरच युद्धाला सुरुवात होण्याची चिन्हे दिसत होती. अनंताच्या राजदरबारात घडणाऱ्या प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींवर नागराणी आत्तापर्यंत लक्ष ठेवून होती. त्यासाठी तीने आपल्या विश्वासातील काही चतूर नागांना राजदरबारात, सेवक म्हणून पाठवले होते. हे नाग राजदरबारात सेवक म्हणून विविध कामे करीत होते. त्यामुळे तीथे घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर त्यांचे लक्ष असायचे. नागराणीने राजदरबारी पेरलेले हे नाग म्हणजे तीचे दुसरे डोळेच होते. नागराणीने त्या नागांच्या सहाय्याने राजदरबारातील बऱ्याचशा इतर नागांनाही आपल्या बाजुने लढण्यासाठी, त्यांची मने वळवली होती. त्यासाठी तीने ''धनंजय राजा झाल्यानंतर, तुम्हाला राजदरबारातील प्रमुख पदे दिली जातील.'' असे अमीष त्यांना दाखवले होते. उच्चपदाच्या लालसेपोटी दरबारातील आणि नागसैन्यातील जवळ-जवळ पंधरा हजार नागसेवक आणि नागसैनिक त्यांच्या बाजूने झाले होते. तरीही अनंताच्या बाजूने अजुन जवळपास पंचवीस-तीस हजार नाग होते; जे अनंताच्या बाजुने लढण्यासाठी सदैव तत्पर होते आणि त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे लाखोंच्या संख्येने असलेल्या, नागप्रजेचा 'अनंताला' पाठिंबा होता. त्यामुळे युद्धाची नीट पुर्वतयारी न करता, जर नागराणीने नागराज अनंता विरुद्ध बंड पुकारुन त्याच्याशी युद्ध केले असते, तर त्याच्याजवळील सैन्यापुढे आणि नागप्रजेपुढे आपला जास्तकाळ टिकाव लागणार नाही, हे नागराणी ओळखून होती. म्हणूनच ती आत्तापर्यंत शांत बसली होती.

———x———x———

त्या दिवशी धनंजयने एका मोठ्या सभेचे आयोजन केले होते. त्याच्या बाजुने असलेल्या सर्व नागांची त्या सभेमध्ये उपस्थिती होती. त्यात मोठ–मोठ्या पराक्रमी नाग योध्याची प्रमुख उपस्थिती होती. त्याच बरोबर इतर सामान्य नागप्रजाही त्या सभेसाठी तिथे उपस्थित होती. सभेसाठी भव्य मंडप उभारण्यात आले होते. धनंजयला खात्री होती की या सभेसाठी हजारोंच्या संख्येने नाग उपस्थित राहतील. त्यासाठी त्याने आपल्या विश्वासातील नागांमार्फत या सभेची वार्ता गुप्तपणे नागलोकात सर्वत्र  पसरवली होती. सभा मंडपाच्या मध्यभागी मोठ्या मंचाची उभारणी करण्यात आलेली होती. जिथे धनंजय सहित इतर प्रमुख नाग आपापल्या आसनावर बसले होते. सभेसाठी जमलेले इतर नाग मंचावरील दृष्ये सहजरित्या पाहू शकतील अशा ठिकाणी तो मंच उभारण्यात आला होता.

धनंजय आणि मंचावर उपस्थित असलेल्या नागांची बऱ्याच वेळेपासून चर्चा सुरु होती. तितक्यात नागराणीचे तिथे आगमन झाले. नागराणी येताच मंचावरील सर्व नाग शांत झाले.

‘‘आम्ही सर्वजण तुमचीच वाट बघत होतो.’’ धनंजय म्हणाला. त्यानंतर धनंजयने तिला इशाऱ्याने आपल्या आसनावर स्थानापन्न होण्यास सांगितले. त्यानंतर धनंजय त्या मंचाच्या मध्यभागी जाऊन उभा राहिला. त्याला पहाताच हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या, नागांची कुजबुज थोडीशी कमी झाली. त्याने सर्वांना शांत बसण्याची विनंती केली आणि मग तो, त्या मंचावरुन बोलू लागला.

‘‘माझ्या समस्त नाग बांधवांनो, आपण आज इथे हजारोंच्या संख्येने आपली उपस्थिती दर्शवून माझ्यावर खुप मोठे उपकार केलेले आहेत. ज्याची परत फेड, मी तुम्हाला लवकरच करेन. आपण आज इथे आलात, याचा अर्थ तुमचा माझ्यावर विश्वास आहे. तुम्ही दाखवलेल्या, माझ्यावरच्या ह्या विश्वासासाठी मी तुमचा सदैव ऋणी रहाणार आहे. तुम्हाला इथे बोलवण्यामागे

एक फार महत्वाचे कारण आहे.....'' आत्तापर्यंत सर्वत्र शांतता पसरली होती. आता सर्वांचे लक्ष धनंजयच्या बोलण्यावर केंद्रित झाले होते.

''मी जेष्ठ, नागराज पुत्र धनंजय, आज अशी घोषणा करतो की, आजपासून तुम्हाला अनंताच्या नियंत्रणात राहण्याची आणि त्याने बनवलेले कायदे पाळण्याची काहीच आवश्यकता नाही. कारण लवकरच मी अनंताचे राज्य संपवणार आहे. त्यानंतर तुमच्यापैकी कोणालाही कधीच श्रम करण्याची आवश्यकता भासणार नाही. कारण यानंतर तुमच्या सेवेसाठी मी मनुष्यांना पाचारण करणार आहे. ज्यावेळी मी तुमचा राजा होईल, त्याचवेळी मी आपल्या प्रचंड सैन्यासोबत पृथ्वीवर पदार्पण करणार आहे. त्यानंतर मनुष्याशी युद्ध करुन, मी त्याला आपला गुलाम करणार आहे. मी ऐकले आहे की, अनंताचा नातु एक अर्धनागमनुष्य असून त्याच्याकडे अलौकिक नागशक्ती आहेत. ज्याच्या बळामुळे, तो तुच्छ मनुष्य नागलोकी आक्रमण करेल, आणि नागलोकात अराजकता पसरवेल; ह्याच भितीपोटी आपले अनेक नागबंधू त्या अनंताची साथ देत आहेत. पण माझ्यावर विश्वास ठेवा, एकदा अनंता संपला की, ते सुद्धा आपल्या बाजुने लढण्यास तयार होतील. त्यांना आपल्या बाजुने लढण्यास कसे प्रवृत्त करायचे हे मी चांगलेच जाणतो.''

''तुम्ही सगळे माझे सहकारी आहात, माझे बंधू आहात. त्यामुळे जे नाग माझ्या बरोबर, पृथ्वीवर येण्यास तयार होतील आणि युद्धात सहभागी होतील, त्यांना प्रत्येकी शंभर मनुष्य त्यांच्या सेवेसाठी दिले जातील. मी ऐकले आहे की, पृथ्वीवरील मनुष्याची संख्या खुप वाढली आहे म्हणुन..... मनुष्य आपल्या स्वार्थासाठी पृथ्वीवरील इतर सजीवांचा हवा तसा वापर करुन घेत आहे. संपूर्ण पृथ्वीवर त्याचीच सत्ता असल्यासारखे त्याला वाटू लागले आहे. पण तो एक गोष्ट विसरला आहे की, हजारो वर्षांपूर्वी जेव्हा आपल्या पूर्वजांनी पृथ्वीवरची आपली सत्ता सोडली, तेव्हाच तो, आता पृथ्वीवर राज्य करु लागला आहे. आणि त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या पूर्वजांनी पृथ्वी तर सोडली, पण

आपली एक प्रजाती त्यांनी पृथ्वीवरच मागे सोडली होती. माझ्या माहितीनुसार, ते नाग आता विविध प्रजातींमध्ये विकसित झालेले आहेत. मनुष्य आपल्या स्वार्थासाठी पृथ्वीवरील जंगले नष्ट करु लागला आहे. त्यामुळे त्यांचे आणि पृथ्वीवरील इतर सजीवांचे, तेथील जगणे पापी मनुष्याने मुश्किल करुन ठेवले आहे. मला माहिती आहे की, ते मनुष्याशी लढू शकत नाहीत. कारण मनुष्याच्या सानिध्यात राहून, ते आपला मुळ स्वभावच विसरले आहेत. पण मला विश्वास आहे की, ज्यावेळी आपण पृथ्वीवर प्रस्थान करु, त्यावेळी मनुष्याशी होणाऱ्या युद्धामध्ये पृथ्वीवरील ते नाग सुद्धा आपल्याला साथ देतील. आणि मग पुन्हा एकदा पृथ्वीवर आपल्या नागप्रजातींची सत्ता असेल.''

धनंजयचे शब्द तिक्ष्ण बाणाप्रमाणे नागांच्या मनात शिरुन, त्यांचे मतपरिवर्तन करण्याचे कार्य करत होते. त्याच्या भाषणामुळे त्यांना स्फुरण चढू लागले. तो जे काही बोलत होता, ते त्यांना पटू लागले होते. तिथे उपस्थित असलेल्या नागांनी धनंजयला उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याने, त्याला आता अधिकच चेव चढला.

''माझ्या बांधवांनो, मी नागराज झाल्यावर पृथ्वी आणि नागलोकातील लाखो वर्षांपासून गुप्त असलेला मार्ग सर्वांसाठी कायमचा खुला करणार आहे. आजवरच्या सर्व राजांनी, पृथ्वीवर जाण्यासाठी प्रवेशद्वार असलेला गुप्तमार्ग कसा खुलतो, हे तुमच्या पासून सदैव लपवून ठेवले होते. ते रहस्य सुद्धा मी तुम्हा सर्वांना सांगणार आहे. नागांचे पृथ्वीवर पूर्वीसारखेच राज्य असावे आणि तिथला मनुष्य आपला गुलाम असावा, हे माझ्या वडीलांचे स्वप्न होते. पण त्या दृष्ट नागतपस्वींनी त्यांना सदैव आपल्या शब्दांच्या जाळ्यात अडकवून, मनुष्याचे पृथ्वीवरील स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्या नागतपस्वींनी नागप्रजातींच्या हिताचा विचार कधीच केला नाही. याऊलट त्यांनी गुप्तपणे पृथ्वीवर जाऊन अनंताच्या 'नागमनुष्य' नातवाच्या नागशक्ती जागृत केल्या. त्यांचा मित्र असलेल्या अनंताने माझ्या वडीलांची हत्या केली. आणि तो स्वत:

नागराज झाला. खरेतर हे फार मोठे षडयंत्र होते. जे तुम्हाला अद्याप कळू शकले नाही. अनंताला नागप्रजातीच्या हिताची काहीही पर्वा नाही, त्याला पर्वा आहे ती फक्त त्याच्या अर्धमनुष्य नातवाची आणि मनुष्य प्रजातीची. इतकी वर्षे पृथ्वीवर मनुष्याप्रमाणे जीवन व्यतीत केल्याने, त्याची मती भ्रष्ट झाली आहे.''

''हजारो वर्षापूर्वी, मनुष्याने आपले पृथ्वीवरील साम्राज्य संपूष्टात आणले. पण खरेतर पृथ्वीवर आपली सत्ता असणे, हा आपला अधिकारच आहे. मनुष्य आपल्यासमोर एक तुच्छ जीव आहे. जो पूर्वी आपल्या पूर्वजांचा गुलाम होता. मनुष्याच्या बाबतीमधील आणखीन एक फार महत्वाची गोष्ट आजवर तुमच्या पासून लपवून ठेवली गेली होती, ती गोष्ट तुम्ही ऐकल्यावर, तुमचा तुमच्या कानावरही विश्वास रहाणार नाही.'' इतके बोलून तो काही क्षण नागांची उत्सुकता ताणण्यासाठी थांबला आणि पून्हा बोलू लागला. ''खरेतर मनुष्य या जीवाची उत्पत्ती आपल्या कल्याणासाठीच झाली होती. मनुष्य शरीर त्यातील कितीतरी गोष्टींमुळे आपल्यासाठी उपयुक्त ठरु शकते. मनुष्याचे रक्त हेच आपल्या पूर्वजांचे प्रमुख अन्न होते. कालांतराने आपल्या प्रजातीची जसजशी प्रगती होत गेली, तसतशी आपल्या पूर्वजांची मूळ नाग संस्कृती आपण पूर्णपणे विसरून गेलो आहोत. मी ऐकले आहे की, आपले पूर्वज लाखो वर्षापर्यंत स्वास्थपूर्ण जीवन जगू शकत होते. पण आपले सध्याचे आयुर्मान फक्त जवळपास दहा हजार वर्षाचेच झाले आहे आणि या पुढील काळात ते असेच कमी-कमी होत जाणार आहे. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे ........... अमृताचा अभाव. मानवी रक्त आपल्या नागप्रजातीसाठी अमृताप्रमाणे कार्य करते. ते आपल्या शरीरासाठी खूपच लाभदायक आहे. त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे मानवी हृदय. आपले पूर्वज सदैव निरोगी जीवन जगत होते. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे, ते मनुष्याच्या हृदयापासून विविध प्रकारची स्वादिष्ट व्यंजने तयार करत असून त्यांचे सेवन करीत होते.''

‘‘आपल्या पूर्वजांचे राहणीमान अत्यंत साधे होते. ते आपल्याप्रमाणे महालामध्ये राहत नव्हते. पृथ्वीवर असताना गुहेमध्ये, जंगलामध्ये वास्तव्य करणारे, आपले पूर्वज मानवी हाडांपासून बनवलेली भांडी वापरत होते. त्याचप्रमाणे मानवी हस्ती आणि दंतापासून बनवलेल्या अलंकारांचा वापर ते आपले शरीर सौंदर्य खुलवण्यासाठी करत होते. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे, मानवी हस्तींपासून बनवलेले अलंकार नागांच्या शरीराचे तापमान संतूलित करण्यात, महत्वाची भूमिका बजावतात. आपले पूर्वज मानवी केसांपासून बनवलेल्या मुलायम चटयांचा वापर करत होते. अशा आरामदायक चटयांचा वापर झोपण्यासाठी केल्याने शांत निद्रेचा ते सदैव अनुभव घेत होते.’’

’’यासर्व गोष्टी आजवर तुमच्यापासून लपवून ठेवण्यात आल्या होत्या. आपण जर मानवी शरीराचा उपयोग आपले जीवन सुखकारक बनवण्यासाठी आणि आपले आयुर्मान वाढवण्यासाठी करु लागलो, तर आपल्यातील नागशक्ती झपाट्याने विकसीत होतील, आणि मग आपणही आपल्या पूर्वजांप्रमाणे दिर्घ आयुष्य व्यतीत करु शकू.’’

‘‘मनुष्य, हा जरी आपल्या तुलनेत तुच्छ जीव असला, तरी तो आपल्यापेक्षा थोडा अधिक बुद्धीमान आहे. त्यामुळे त्याने हजारो वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांना फसवून, त्यांना पृथ्वीवरुन हाकलून दिले. त्यांना भिती दाखवून आणि मोहात पाडून, नागलोकात राहण्यासाठी भाग पाडले.’’

‘‘त्यानंतर अनंतासारख्या नागांनी मनुष्याच्या संरक्षणासाठी कायदे केले. मनुष्य हत्या करणे पाप आहे, असे विचार सर्वत्र पसरवले गेले आणि मग नागलोकात वास्तव्य करणे नागांसाठी कसे योग्य आहे? हे नागांच्या मनावर बिंबवले गेले. त्याचाच परिणामस्वरुप आज आपल्याला मनुष्य शरीर दुर्लभ झाले आहे. त्यामुळेच आपले आयुर्मान घटु लागले, याचाच अर्थ धुर्त मनुष्याच्या नादाला लागून अनंतासारख्या नागांनी, मनुष्य प्रजातीच्या हितासाठी आपल्यावर अन्याय केला. जो मला मान्य नाही.’’

‘‘आता यापेक्षा अधिक काही बोलण्याची माझी इच्छा नाही. तर मग............. बोला! नागप्रजातीच्या हितासाठी आणि संरक्षणासाठी कोण–कोण माझ्यावरोबर युद्धात सहभागी होण्यास

तयार आहे?’’ धनंजयच्या प्रश्नाबरोबरच तिथे उपस्थित असलेल्या सर्व नागांनी जोरात ओरडून त्याला आपली सहमती दर्शवली आणि त्याबरोबरच धनंजयच्या नावाचा जयजयकार सुरु केला.

———x———x———

धनंजयने घेतलेल्या सभेमुळे अनेक नागांचे मतपरिवर्तन झाले होते. इतकी वर्ष अनंताला साथ देणारे बरेचशे नाग धनंजयच्या बोलण्यावर विश्वास ठेवून, त्याच्या बाजुने झाले होते. धनंजयने त्या सभेत मांडलेले विचार, त्याची मते वाऱ्याच्या वेगाने नागलोकात सर्वत्र पसरले. धनंजयने त्यांना दाखवलेल्या स्वप्नाला सत्यात उतरवण्यासाठी बऱ्याच नागांनी कसलाही विचार न करता धनंजयला साथ देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे धनंजयची बाजू आता मजबूत झाली होती.

हे सर्व घडून गेल्यावर अनंताला ह्या गोष्टीची खुप उशीरा खबर मिळाली. आतापर्यंत धनंजयने नागलोकातील अर्ध्यापेक्षा जास्त नागांना गुप्तपणे आपल्या बाजुने वळवले होते. धनंजयला जेव्हा आपल्या वाढलेल्या सामर्थ्याची जाणीव झाली, तेव्हा त्याने अनंताला युद्धासाठी आवाहन दिले. अनंताने ते आवाहन स्विकारले. पण त्याच्या आधी त्याने धनंजयला एक संदेश पाठवला होता. त्या संदेशाचा आशय असा होता. ‘जर नागलोकातील नाग आपापसातील मतभेदामुळे, आपापसात सत्तेसाठी किंवा इतर कोणत्याही स्वार्थासाठी लढू लागले. तर ते स्वत:च आपल्या विनाशाचे कारण बनतील. आपल्या दोघांच्याही बाजुने युद्ध करणाऱ्या नागांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे

आपले युद्ध झाले तर, मोठ्या प्रमाणावर जिवीत हानी होईल. त्यामुळे तुला जर आपल्या पित्याच्या मृत्युचा, माझ्याशी सुड घ्यायचा असेल, तर आपण व्दंव्द युद्ध करुया. ज्याने इतर निरपराध नागांचा मृत्यु टाळता येईल.'

धनंजयने अनंताचे व्दंव्द युद्धाचे आवाहन स्विकारले. दोघांमध्ये युद्ध सुरु झाले. अनंताने युद्धात धनंजय बरोबर निकराचा लढा दिला. पण तो त्याच्या समोर फार काळ टिकू शकला नाही. धनंजयने अनंताचे मस्तक धडावेगळे केले आणि स्वत:ला नागांचा नवीन राजा म्हणून घोषीत केले आणि ज्यांना हे मान्य नसेल, त्यांनी त्याच्याशी युद्ध करावे. असे आवाहनही केले परंतू त्याच्या शक्ती सामर्थ्याला घाबरुन कोणीही त्याचा सामना करण्यासाठी पुढे आले नाही. धनंजयने राजदरबारातील अनंताच्या मित्र नागांना बंदिवान केले आणि कारागृहात टाकले. कारण अनंताची साथ देणारे हे नाग कधीही आपल्या विरोधात जाऊ शकतील. जी गोष्ट आपल्यासाठी घातक ठरु शकते हे त्याला चांगलेच ठाऊक होते. त्यानंतर त्याने आपल्या विश्वासातील नागांना राजदरबारात महत्वाच्या पदांवर नियुक्त केले. त्यामुळे राजदरबारात आता जल्लोषाचे वातावरण झाले होते.

———x———x———

त्या अंधाऱ्या जागेतून फिरताना त्याच्या व्यतिरीक्त अजून कोणीतरी तिथे असण्याचा त्याला आभास झाला. म्हणून त्याने आपल्या दिव्य दृष्टीच्या सहाय्याने, तिथे त्याच्या व्यतीरिक्त खरोखरच कोणी असण्याची शक्यता पडताळून पाहिली. आणि खरोखरच त्याची शंका खरी ठरली. त्याला झालेला आभास खरा होता. त्याच्यासमोर ती उभी होती. परंतू आत्म्याच्या स्वरुपात. तिचे शरीर कुठे आहे? काय, ते नाश पावले असावे? म्हणजे हिचा मृत्यु झाला आहे तर... परंतू जर असे असेल तर मग हिला अजुनही मुक्ती का मिळत नाही?

असे कितीतरी प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाले. क्षणार्धात ती त्याच्या अगदी जवळ येऊन उभी राहिली.

‘‘बरं झालं आज पुन्हा भेटलीस. तु आहेस तरी कोण? आणि अशी सारखी सारखी माझ्याच समोर का येतेस.’’ प्रकाश उदगारला.

‘‘मला ओळखलं नाहीस तू.’’ ती म्हणाली.

‘‘नाही, म्हणुनच तर विचारतोय ना?’’

‘‘म्हणजे तुला काहीच आठवत नाहिये तर’’

‘‘नाही. मला तुझ्याबद्दल तरी काहीच आठवत नाहीए. आणि आठवायला तुझा आणि माझा संबंध तरी काय?’’

‘‘वा... ही तर कमालच झाली.’’

‘‘म्हणजे काय बोलायचे आहे तुला? तु आहेस तरी कोण?’’

‘‘तू मला विसरला असशील पण मी नाही ना विसरु शकत.’’

‘‘अगं हे काय बोलतं आहेस तू. मला काहीच कळत नाहीए.’’

‘‘कळेल मग, कधीतरी... मी स्वत:हून तुला काहीच सांगणार नाहीये.’’

‘‘अगं पण...’’ तितक्यात ती तिथुन दिसेनाशी झाली.

‘‘पुन्हा काहीही न सांगताच, अशीच निघुन गेली.’’ तो स्वत:शीच म्हणाला. तितक्यातच ती पुन्हा त्याच्या समोर आली. परंतू आता ती खूपच भयावह दिसत होती. तिचे संपूर्ण शरीर रक्ताने माखलेले होते. आणि चेहऱ्यावर जागोजागी जखमा दिसत होत्या. तो तिच्याशी काही बोलणार तितक्यातच ती पून्हा तिथुन नाहीशी झाली. तसा तो घामाघूम होऊन खडकन बिछान्यावर उठून

बसला. फूऽऽऽ... स्वप्न होते ते! ह्या विचित्र स्वप्नाचा काय अर्थ असावा? याच विचारात तो पुन्हा हरवला.

———X———X———

# भविष्य धोक्यात आहे!

तीन दिवसांपासून प्रकाशने स्वत:ला एका खोलीत बंद करुन घेतले होते. तसा तो रोज रात्री ध्यान-धारणा करत असे. पण हल्ली बरीच वर्षे त्याने अशाप्रकारची इतके दिवस चालणारी ध्यान साधना केली नव्हती. 'सलग तीन दिवसांपासून प्रकाश ध्यान-धारणा करत आहे, म्हणजे त्यामागे नक्कीच काहितरी महत्त्वाचे कारण असणार'. हे मोहनला माहीत होते. त्यामुळे त्याने अद्याप प्रकाशला ध्यानातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला नव्हता. चौथ्या दिवशी, सकाळी प्रकाश ध्यानातून बाहेर आला तेव्हा त्याचा चेहरा खूप गंभिर दिसत होता. मोहनला त्यामागचे कारण माहीत नसल्यामुळे, त्याने प्रकाशला त्याबद्दल विचारणा केली त्यावर...

''नागराजच्या पुत्राने अजोबांशी युद्ध करुन, त्यांना यमलोकी पोहोचवले आहे आणि आता, तो इतर नागांसह पृथ्वीवर येण्याची तयारी करत आहे. त्याने नागलोकातील बऱ्याचशा नागांना आपल्या बाजूने वळविले आहे. त्यांच्यासह पृथ्वीवर येऊन मनुष्य प्रजातींचा संहार घडवून आणण्याची, त्या सर्वांची इच्छा आहे.'' अशाप्रकारे प्रकाशने ध्यानाच्या माध्यमातून बघितलेल्या म्हणजेच नागलोकी घडलेल्या सर्व घटनांचे वर्णन मोहनसमोर केले.

बऱ्याच वर्षापूर्वी त्याला पडलेल्या भयंकर स्वप्नाचा खरा अर्थ त्यादिवशी प्रकाशच्या लक्षात आला होता. नागतपस्वींचे, त्यावेळचे म्हणणे खरे ठरले होते. ते एक सूचक स्वप्न होते. कदाचित म्हणूनच बऱ्याचदा त्याला, ते एकच स्वप्न सारखे सारखे पडत होते.

''जर नागांनी पृथ्वीवर आक्रमण केले, तर कदाचित मनुष्य प्रजातीचे अस्तित्व धोक्यात येईल. नाहीतर मनुष्य सदैव नागांचा गुलाम म्हणुन ओळखला जाईल... पण मी तसे होऊन देणार नाही. मला त्या धनंजयला पृथ्वीवर येण्यापासून रोखले पाहिजे.'' प्रकाश गंभिरपणे बोलला.

''परंतू प्रकाश तुला भविष्यात घडणाऱ्या घटनांची फार पूर्वीच चाहूल लागली होती आणि आतातर नागलोकी तशी तयारी सुद्धा सुरु झालेली आहे. म्हणजेच भविष्यात काय घडणार हे आधीच ठरलेले आहे, मग... तू भविष्य कसे, काय बदलवू शकणार आहेस? मला तर आता हे सर्व घडण्यापासून रोखणे अशक्य वाटत आहे.'' मोहन उदासपणे म्हणाला.

''नाही... जोपर्यंत एखादी घटना घडत नाही तोपर्यंत तिचे घडणे, किंवा न घडणे तीच्या वर्तमानातील स्थितीवर अवलंबून असते. सुदैवाने आपल्याला भविष्यातील घटनांची आधीच चाहुल लागली आहे. त्यामुळे वर्तमानात जर आपण त्या घटनांमागचे मुळ कारण नष्ट करु शकलो, तर भविष्यात घडणाऱ्या सर्व घटनाही आपोआपच रोखल्या जातील. त्यासाठी मला नागलोकांत जाऊन धनंजयला अणि त्याच्या बरोबरच्या इतर नागांना पृथ्वीवर येण्यापासून रोखावे लागेल.''

''प्रकाश तु अद्भुत शक्तींचा स्वामी असलेला सामर्थ्यवान नाग आहेस. परंतू तु एकटा त्या सर्वांचा सामना करु शकणार नाहीस.'' मोहन म्हणाला. त्यावर प्रकाशने किंचित स्मित केले. आणि तो बोलू लागला.'' मला त्यांचा सामना करावाच लागणार नाही. मला फक्त त्यांचे मतपरिवर्तन करायचे आहे, नागलोकातून, पृथ्वीवर येण्यासाठी एकच गुप्त मार्ग आहे. जो फार कमी नागांना माहिती आहे. आजवर ही रहस्ये फक्त ठरावीक नागांना आणि राजांनाच माहिती होती. धनंजयचा पिता नागराज असल्याने त्यांच्या कुटुंबियांना ही रहस्ये समजू शकली; पण जर ही रहस्ये सर्वांना समजली, तर त्याचे दुष्परिणाम धनंजयलाच भोगावे लागतील. हे जर मी त्याला पटवून देऊ शकलो, तर आपले काम आपोआपच सोपे होईल.'' ''परंतू ते कसे काय शक्य आहे?'' मोहनने विचारले.

''सोपे आहे. जर सर्व नागांना गुप्त मार्गाची रहस्ये समजली आणि ते पृथ्वीवर आले तर... धनंजयच्या म्हणण्याप्रमाणे ते मनुष्यांची कत्तल सुरु करतील आणि आपल्या स्वार्थासाठी त्यांच्या शरीराचा वापर करु लागतील.

आणि जर धनंजयचे बोलणे सत्य असेल, तर असे केल्याने त्यांच्या नागशक्ती झपाट्याने विकसीत होतील. नागांचे सामर्थ्य कैक पटींनी वाढल्यामुळे, त्यांच्यात अहंकारही झपाट्याने वाढेल त्यामुळे ते अविचारी बनतील. मग कुठलाच नाग कुठल्याच नागाच्या नियंत्रणात रहाणे पसंत करणार नाही. ज्याला त्याला मीच श्रेष्ठ असे वाटू लागेल. त्यामुळे ते धनंजयचे आदेश सुद्धा मानणार नाहीत. त्यांच्या वाढलेल्या शक्तीसामर्थ्यामुळे ज्याला त्याला नागराज व्हावेसे वाटेल. अशाने धनंजयची सत्ता धोक्यात येईल आणि मग त्यांची आपापसात युद्धे होऊन, त्यांचा सर्वनाश होईल. या सर्व गोष्टी आता फक्त धनंजयच्या लक्षात आणून द्याव्या लागतील. गुप्त मार्गाची रहस्ये इतर नागांच्या जरी हिताचे असले तरी ते धनंजयच्या अहिताचे ठरणार आहे आणि मला वाटत नाही की नागप्रजातीच्या हितासाठी धनंजयला आपली सत्ता आपल्या हातातून घालवणे आवडेल आणि जरी त्याने नागप्रजातीच्या हितासाठी गुप्त मार्गाची रहस्ये सर्व नागांसाठी खुली केली, तरी मनुष्याशी युद्ध करणे इतके सोपे नाही. आज वैज्ञानिक प्रगतीमुळे मनुष्याकडे अनेक प्रभावी शस्त्रे आहेत. ज्यांचा वापर, ते नागांच्या विरोधात करु शकतील. याच मनुष्याने अणुबाँब, हायड्रोजन बाँब यासारखी विनाशक शस्त्रे बनवली आहेत. हे कदाचित त्या नागांना ठाऊक नसावे.'' ''काहीही झाले, तरी युद्धामुळे नागांची आणि मनुष्यांची जिवितहानी होणार आहे. जे मला मान्य नाही, म्हणुनच मला आता त्वरीत नागलोकी जावे लागेल.'' इतके बोलून प्रकाश शांत झाला.

मोहन अजुनही थोडा अस्वस्थच दिसत होता. अशा परिस्थितीत काय करावे? हे त्याला सूचत नव्हते. आजवर तो मनुष्याप्रमाणे जीवन जगत आला होता. पण तरीही तो सुद्धा एक नागच होता. म्हणुन त्याच्या मनात दोन्ही प्रजातींविषयी सारखीच सहानभुती होती. नाग काय आणि मनुष्य काय, दोन्ही स्वार्थीच. मग अशावेळी साथ कोणाची द्यावी? असा प्रश्न त्याच्या मनात होता. काहीवेळ कसला तरी विचार करुन, तो प्रकाशला म्हणाला, ''प्रकाश मला

वाटते अशा वेळी आपण हिमालयात गुप्तपणे वास्तव्य करणाऱ्या 'प्रत्युष स्वामींचे' सहाय्य घेतले पाहिजे. कारण आता ही गोष्ट दोन प्रजातींमधील स्वातंत्र्याचा प्रश्न बनली आहे.'' ''नाही पिताजी, मला तसे वाटत नाही. प्रत्युष स्वामीच्या म्हणण्यानुसार, हा प्रश्न दोन प्रजातींचा किंवा दोन लोकांमधील जीवांचा नसून, हा प्रश्न दोन वृत्तींचा आहे. मला आठवते. प्रत्युष स्वामींनी सांगितले होते की, हे युद्ध दोन प्रवृत्तींमधील युद्ध आहे. यामध्ये स्वार्थी जीव आपल्या स्वार्थासाठी इतर निरपराध जिवांचा बळी घेतील. मग तो जीव मनूष्य असू शकतो किंवा नागही असू शकतो. त्यामुळे बाह्य जगात हे युद्ध निर्माण होण्याआधीच त्याची सुरुवात प्रत्येक जीवांच्या मनात होते. जे युद्ध चांगल्या आणि वाईट प्रवृत्तींमधील युद्ध असते. मनातील याच सुक्ष्म युद्धाचे परिणाम नंतर बाह्य जगात होणाऱ्या विध्वंसक युद्धाच्या स्वरुपात दिसू लागतात.'' प्रकाशला प्रत्युष स्वामींनी सांगितलेल्या गोष्टी आजही लक्षात होत्या. म्हणून मोहनला बरे वाटले. आता त्याला त्याच्या या कार्यात यश मिळावे अशी मनोकामना तो करु लागला.

''तुम्हाला माझी चिंता करण्याची सध्यातरी गरज नाही. हां, पण जर नाग पृथ्वीवर येण्यात यशस्वी झाले, तर मात्र मला प्रत्युष स्वामींच्या सहाय्याची आवश्यकता भासू शकते. मला आता निघायला हवे.'' इतके बोलून त्याने आपले डोळे मिटले. तो तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटला आणि क्षणार्धातच तिथुन अदृश्य झाला.

———x———x———

प्रकाशचे नागलोकी आगमन झाले होते. आपल्या उपस्थितीची चाहूल कोणालाही लागू नये म्हणून तो अदृष्य होऊनच तिथे वावरणार होता. बऱ्याच वर्षापूर्वी नागराजने त्याचे अपहरण करुन त्याला नागलोकी आणल्यानंतर

इतक्या वर्षांनी तो आज तिथे आला होता. आधीच्यावेळी त्याला तिथे त्याच्या इच्छेविरुद्ध आणले गेले होते. परंतू आज तोच प्रकाश तिथे स्व:इच्छेने आला होता. आधीच्यावेळी त्याचे बल्ल आणि मल्लने अपहरण करून, त्याला तिथे बंदी बनवून आणले होते. सहाजिकच त्यावेळी त्याला नागलोक पूर्णपणे बघता आला नव्हता. म्हणुनच आज तो नागलोकाचे शक्य तितके चांगले निरीक्षण करणार होता. नागलोकी सर्वत्र गडद अंधाराचे साम्राज्य पसरलेले होते. हे बघुन ह्या ठिकाणी खरोखरच सूर्याची किरणे पोहोचू शकत नसल्याचे त्याच्या लक्षात आले. तरीही त्याला आपल्या नागशक्तींमुळे संपूर्ण नागलोक स्पष्टपणे दिसू शकत होता.

त्या ठिकाणी त्याला जागोजागी एकाच विशिष्ट पद्धतीची कलाकुसर असलेल्या लहान मोठ्या आकाराच्या वास्तू दिसत होत्या. त्या वास्तू म्हणजे नागांचे निवासस्थान असणार हे त्याने लगेचच ओळखले. त्या वास्तूंचा आकार लहान मोठा असल्याने मनुष्याप्रमाणेच नागांमध्येही समानता नाही. ही गोष्ट स्पष्ट होती. नागांची ती निवासस्थाने पृथ्वीवरील मनुष्यांच्या घरापेक्षा कितीतरी पटींनी भव्य असूनही  सुटसुटीत जागा सोडून निर्माण केलेली होती. प्रत्येक वास्तू भोवती पृथ्वीवरील खेड्या-पाड्यात दिसतात त्याप्रमाणे विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली होती. ती झाडे सुद्धा पृथ्वीवरील झाडांच्या तुलनेत कैक पटींनी मोठी असून त्याच्यात पृथ्वीवरील झाडांच्या तुलनेत काहीसे वेगळेपण होते. नागलोकाचे निरीक्षण करत असताना, प्रकाशला जागोजागी सर्वत्र अशाच प्रकारची रचना असलेली नागांची निवासस्थाने दिसत होती. तिथे असाच गुप्तपणे फिरता फिरता तो एका भव्य वास्तूजवळ येऊन थांबला. त्या वास्तूच्या भव्य-दिव्य आकारावरुन नक्कीच तो राजमहाल असणार ही गोष्ट प्रकाशच्या लक्षात आली होती. किती सूंदर वास्तु होती ती! त्या वास्तूमध्ये प्रवेश करण्यासाठी चारही दिशांना भव्य प्रवेशद्वार होते. त्या प्रवेशद्वारावर जागोजागी नक्षीकाम तर होतेच. परंतू त्यावर चमकणारी रत्नेही बसवण्यात आलेली होती.

राजमहालात हवा खेळती रहाण्यासाठी जागोजागी मोठमोठ्या खिडक्याही होत्या. त्या खिडक्यांचाच आकार जवळपास शंभर फूट असावा आणि दरवाजे तर त्यांच्यापेक्षाही जवळपास तीन पट मोठे होते. प्रत्येक प्रवेशद्वारासमोर पहारा देण्यासाठी काही नागसैनिक उभे होते. त्या महालाच्याही आजूबाजूला हजारोंच्या संख्येने वृक्ष लावण्यात आले होते. यावरुन नागांचे वृक्षप्रेम स्पष्ट होत होते. त्या भव्य दिव्य महालाचे अप्रतिम कलाकुसर असणारे सौंदर्य पहाता तो आतून कसा दिसत असेल. त्याची आतील रचना कशी असेल या गोष्टीचा

विचार करत प्रकाश आपल्या मार्गाने पुढे-पुढे चालत होता.

———x———x———

नागलोकात, धनंजयने पृथ्वीवर प्रस्थान करण्याची तयारी सुरु केली होती. पृथ्वीवर मोठ्या संख्येने नागांना नेण्याचा त्याचा बेत होता. त्याने घेतलेल्या आधीच्या सभेमुळे नागलोकातील बऱ्याच नागांचे मतपरिवर्तन झाले होते. तरीही सर्व नाग अद्याप त्याच्या बाजुने झाले नव्हते. म्हणुन जास्तीत जास्त नागाचे मतपरिवर्तन करुन त्यांचे 'मन' आपल्या बाजुने वळवण्यासाठी त्याने पुन्हा एका भव्य नागसभेचे आयोजन केले होते.

त्यादिवशीही सभेला मोठ्या संख्येने नागांची उपस्थिती होती. 'आपला नवीन राजा आपल्या नागप्रजातींच्या वृद्धीसाठी आपल्या हिताचे फार मोठे कार्य करणार आहे' अशी चर्चा नागलोकात सर्वत्र पसरली होती. त्यामुळे सत्य परिस्थिती जाणुन घेण्यासाठी नागांची उत्सुकता ताणली गेली होती.

सभेसाठी धनंजयने एका भव्य सभामंडपाची निर्मिती केली होती. तिथे लाखोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या नागांमुळे संपूर्ण सभामंडप भरुन गेले

होते. धनंजयने नागलोकातील प्रत्येक जातीच्या नागप्रतिनिधींना राजदरबारात महत्वाची पदे देऊन, त्यांना आपल्या बाजुने वळवले होते. त्याचाच परिणाम म्हणुन त्या दिवशी कित्येक नाग आपापसातील मतभेद विसरुन मोठ्या संख्येने सभेसाठी उपस्थित होते. अनंताच्या मृत्युनंतर नागलोकात धनंजयने नागांच्या मनात त्याचे वेगळेच चित्र निर्माण केले होते. तसा अनंताही नागांचा प्रिय राजा होता. पण त्याने पृथ्वीवर जाणाऱ्या गुप्तमार्गाची रहस्ये नाग–प्रजेपासून लपवून ठेवली होती. त्यामुळे जरी तो उत्तम शासनकर्ता असला, तरी त्याने मनुष्यप्रजातीच्या हितासाठी नागप्रजातीवर अन्याय केला होता. अनंताची अशाप्रकारची ओळख धनंजयने नागप्रजेमध्ये निर्माण केल्याने, आता नागांच्या हृदयामध्ये त्याच्या जागी धनंजयचे नाव आपोआपच कोरले गेले. त्याने दाखवलेल्या स्वप्नांच्या मोहाला बळी पडून, ते अनंताला अगदी सहजपणे विसरुन गेले. आपला नवीन, तरुण–तडफदार, साहसी आणि सामर्थ्यवान राजा धनंजयच आता आपल्या हितासाठी कार्य करुन, आपला उद्धार करेल असा त्यांना विश्वास वाटू लागला होता.

———x———x———

सभामंडपात धनंजयचे आगमन झाले. त्याचबरोबर धनंजयच्या नावाचा जयघोष सुरु झाला. धनंजय येण्याआधीच इतर प्रमुख नाग तिथे उपस्थित होते. मंचावर आल्यावर, धनंजयने सर्वांना, अभिवादन केले आणि मग, त्याने सर्वांना नम्रपणे शांत केले. त्यानंतर त्याने मंचावरुन बोलण्यास सुरुवात केली.

‘‘माझ्या प्रिय नाग बांधवांनो, आज मी तुमच्यासमोर एक राजा म्हणून नाही, तर एक बंधू म्हणुन बोलणार आहे. राजाला ईश्वर स्वरुप समजण्याचा काळ आता निघून गेला आहे. त्यामुळे तुम्ही मला तुमच्यापैकीच एक समजा. मला राजा म्हणून मिरवायची हौस कधीच नव्हती आणि भविष्यातही नसेल.

पूर्वकाळात अनंताने माझ्या पित्याची हत्या करुन, त्याच्याकडून हे पद हिरावून घेतले, माझ्या मातेला आणि आम्हा शंभर भावंडांना राज्याबाहेर काढून आम्हांला आमच्या हक्कांपासून वंचित ठेवले. जे योग्य नसून, माफीच्या तत्वात बसण्यासारखे नव्हते. म्हणूनच मला अनंताला मारुन ह्या पदाचा स्वीकार करावा लागला.''

''म्हणतात जे होत ते चांगल्यासाठीच होतं. कदाचित आम्हांला राज्याबाहेर काढले जाणे हे जरी आमच्या हिताचे नसले, तरी त्यामुळे नागप्रजातीचे हित मात्र नक्कीच होणार आहे. आम्ही जर राजमहालात वाढलो असतो, तर कदाचित आम्हांला सामान्य नागप्रजेच्या स्थितीची, त्यांच्या संघर्षमय जीवनाची, दु:खाची-कष्टांची कधी जाणीवच झाली नसती. फक्त नागासनावर बसून, सामान्य प्रजेच्या व्यथा समजत नसतात. त्यासाठी सामान्य नागांसारखे जीवन जगावे लागते. जे आम्ही आजवर जगलो आणि त्यामुळेच मी तुमची स्थिती समजू शकतो. पण माझ्यावर विश्वास ठेवा. मी लवकरच तुमची ह्या स्थितीतून मुक्तता करणार आहे.''

''आपली संस्कृती ही नागसंस्कृती आहे आणि आपली फक्त एकच जात असू शकते. ती म्हणजे... नाग. पण इतक्या वर्षात आपण काय केले? एकेकाळी पृथ्वीवर आपले वास्तव्य असताना, मनुष्य आपला गुलाम होता. पण नकळतपणे आपल्या पूर्वजांनी त्याचीच संस्कृती आत्मसात केली. पूर्वी आपण, फक्त नाग म्हणून ओळखले जात होतो. पण आज आपणही मनुष्याप्रमाणेच आपल्या जातीच्या आधारे ओळखले जाऊ लागलो. खरेतर जाती बनण्यामागे एकच उद्देश असू शकतो, तो म्हणजे कामांची विभागणी. ज्याला जे कार्य करता येते त्याला त्या कार्यात अधिक प्रगती करता यावी आणि त्याने त्याच्यासारख्या इतरांनाही ते कार्य करण्यासाठी प्रेरीत करावे, त्याने त्यांचे मार्गदर्शन करावे. जेणेकरुन आपला समाज पुढे जावा. फक्त यासाठीच जातींची निर्मीती झाली होती. पण आज हे चित्र खुप बदललेले आहे. आपल्या कार्यावरुन आपली

ओळख होऊ लागली आहे. त्याआधारेच आपल्या जातीची तुलना इतर जातीच्या नागांशी होऊ लागली आहे. जी आपल्यासाठी दुर्भाग्याची गोष्ट आहे.''

''पूर्वी आपण फक्त नाग म्हणुन ओळखले जायचो. त्यानंतर आपल्यातल्या शक्तींवरुन, गुणांवरुन आणि कौशल्याच्या आधारे आपण विभागले गेलो. ज्याला आपण आपली जात म्हणू लागलो. त्यानंतरच्या काळात आपण आपल्या कार्यावरुन एकमेकांशी तुलना करु लागलो. ज्यामुळे पुढे जाऊन आपण आपल्यातील, शक्ती, गुण आणि कौशल्य कशाप्रकारे उच्च किंवा निच दर्जाचे आहेत; हे ठरवू लागलो. ज्यामुळे आपण एकमेकांपासून दुरावलो गेलो. ज्याचा परिणाम आपल्या मनावर झाला आणि पर्यायाने आपल्या समाजावरही झाला. नेमका याच गोष्टींचा फायदा घेऊन, मनुष्याने आपल्याला नमवले. जो तुच्छ मनुष्य आपला गुलाम होता, त्याच्याशीच आपण करार करुन बसलो. ही फार मोठी शोकांतीका आहे. म्हणजे आपले आपापसातील मतभेद आपल्याला इतके मोठे वाटू लागले की, आपण आपल्या हिताकरिता सुद्धा एकत्र येऊ शकलो नाही. तुमच्याच जातींच्या प्रतिनिधी नागांनी, मनुष्याशी करार करण्यास गुप्तपणे सहमती दिली, जी पर्यायाने तुमची सहमती ठरली. आणि मग आपल्याला नागलोकी येऊन रहावे लागले. परंतू एक गोष्ट नेहमीच तुमच्या लक्षात ठेवा, तुमच्या जातीच्या प्रतिनिधींना तुमच्या हिताशी काहीही घेने देणे नाही. त्यांच्यामुळे पृथ्वीवर न जाण्याचा करार झाला खरा पण तो पाळला गेला फक्त सामान्य प्रजेकडून. तुमच्या पूर्वज प्रतिनिधींनी तुम्हाला इथे टाकले पण; ते स्वत: मात्र अधून मधून गुप्तपणे पृथ्वीवर वास्तव्यास जात होते. आणि मनसोक्त मनुष्य रक्त पिऊन, त्यांच्या स्वादिष्ट हृदयाचे सेवन करुन इथे परतत होते.''

''मला माहिती आहे, गुप्त मार्गाची रहस्ये आजवर फक्त काहीच ठरावीक नागांपूरतीच मर्यादित ठेवली गेली होती. जी आजपासून सर्वांना माहीत होणार आहेत. पण त्याआधी मला मनुष्याकडून आलेली आपली, समाजव्यवस्था नष्ट करायची आहे. पूर्वीचा काळ वेगळा होता. जो आता राहिलेला नाही. म्हणुन

आता, आपल्यालाही काळानुसार बदलले पाहिजे. माझ्या मते सर्व नाग समान आहेत. ज्याला जे कार्य करणे जमते, त्याने ते करावे. आणि ज्याला ते करता येणे शक्य नाही, त्याला त्यासाठी सहाय्य करावे.''

''इतकी वर्षे सामान्य प्रजेमध्ये राहिल्याने, माझ्या असे लक्षात आले आहे की, आपल्या समाजात दोन प्रकारचे नाग आहेत. त्यातील काही बौद्धिक दृष्ट्या सक्षम आहेत, तर काही शारिरीक दृष्ट्या. त्यामुळे कधी बुद्धीजीवी नाग इतर नागांच्या अल्पबुद्धीचा लाभ घेऊन त्यांच्यावर अत्याचार करतात. तर कधी शारिरीक दृष्ट्या सक्षम असलेले नाग आपल्या शारिरीक बळाचा वापर करुन, इतरांवर अत्याचार करतात. ज्यांच्याकडे बळ आणि बुद्धी दोन्ही नाही त्यांचा ह्या समाजात टिकाव लागूच शकत नाही.''

''आपल्या नागप्रजातीच्या हितासाठी आपण बळ आणि बुद्धी या दोन्ही गुणांची उपासना केली पाहिजे. बुद्धीशिवाय आपला विकास होऊ शकत नाही. तर बळाशिवाय आपले संरक्षण होऊ शकत नाही. त्यामुळे आपण सर्वांनी मिळून मिसळून राहिलो पाहिजे. ज्यांच्याकडे बौद्धिक क्षमता आहेत त्यांनी अज्ञानी नागांना सहाय्य करावे आणि ज्यांच्याकडे शारीरिक बळ आहे, अशा नागांनी शक्तिहीन नागांना सहाय्य करावे. यातच आपले हित सामावलेले आहे.''

''यापुढे नागलोकात दोन गोष्टी होतील. त्यातील प्रथम गोष्ट म्हणजे आजपासून सर्व नाग समान असतील. मग ते कोणत्याही जातीचे असोत. यापुढे कोणालाही विशेष प्रकारची वागणुक दिली जाणार नाही. प्रत्येकाला आपल्या सामर्थ्याच्या बळावरच सन्मान प्राप्त करता येईल; पण कोणालाही आपल्या शक्तींच्या बळावर इतर शक्तीहीन नागांवर अन्याय करता येणार नाही. आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे यापुढे मनुष्य आपला गुलाम असणार आहे. प्रत्येक नागाला आपल्या गुलामीसाठी आणि भक्षणासाठी वर्षाला शंभर मनुष्यांवर अधिकार गाजवता येईल. जेणेकरुन नागांचे जीवन सुखकारक

होईल. आता मी पृथ्वीकडे जाणाऱ्या त्या गुप्त मार्गाची रहस्ये तुम्हाला सांगणार आहे.''

तेवढ्यात तिथे उपस्थित नागांच्या समुहातून कोणीतरी धनंजयला आवाज दिला. त्या आवाजाने धनंजयचे लक्ष त्वरीत वेधले गेले. तो आवाज एका तरुण नागाचा होता. बहुतेक त्या नागाला धनंजयशी काहीतरी बोलायचे होते. पण तो बोलत असताना, अचानक त्या नागाने धनंजयला आवाज देऊन त्याचे बोलणे खंडीत केले. या गोष्टीचा मात्र धनंजयला फार राग आला होता. पण तरीही त्याने तसे न दर्शवता त्या तरुण नागाला पुढे मंचावर येण्याचे आवाहन केले. तसा तो नाग गर्दीतून मार्ग काढत पुढे येऊ लागला. आता तो धनंजयपासून काहीच अंतरावर उभा होता. परंतू धनंजय मंचावर होता आणि तो मंचाखाली. त्याच्याकडे बघुन तो एक सामान्य नाग होता हे स्पष्ट झाले होते. पण त्याच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज होते. जे सर्वांनाच जाणवत होते. मंचाजवळ येताच तो धनंजयच्या डोळ्यात डोळे टाकून एकटक बघू लागला. धनंजयने त्याला मंचावर येण्याचे आवाहन केले, तसा तो हलक्या पावलांनी मंचाच्या पायऱ्या चढू लागला. मंचावर येताच, त्याने धनंजयला मिठी मारली. आणि तो त्याच्या कानात काहितरी कुजबुजला. तो येताच धनंजयच्या वागण्यामध्ये आणि त्याच्या देहबोलीमध्ये काहीतरी बदल नक्कीच झाला होता. हे मंचावरील इतर नागांना प्रकर्षाने जाणवू लागले. धनंजयच्या चेहऱ्यावरील भाव आता थोडेसे बदलले होते. तो आता पूर्वीपेक्षाही अधिकच नम्र दिसू लागला होता. ''आता माझे हे मित्र तुमचे मार्गदर्शन करतील.'' असे धनंजयने मंचावरुन घोषित केले आणि त्या नागाला मंचावरुन बोलण्याची संधी दिली. हे सर्व काय सुरु आहे? तो नवीन नाग कोण आहे? आणि आता धनंजय गुप्त मार्गाची रहस्ये सांगणार असताना, या तरुण नागाला मध्येच काय बोलायचे आहे? त्यापेक्षाही मोठे आश्चर्य म्हणजे धनंजयने आपले भाषण बाजुला ठेवून, या सामान्य नागाला मध्येच बोलण्याची संधी कशी काय दिली? असे कितीतरी प्रश्न सर्व नागांच्या मनात त्यावेळी

उपस्थित झाले होते. त्यामुळे आता ते सर्व आपापसात कुजबुज करु लागले होते. तितक्यात तो नाग बोलू लागला.

''सर्वप्रथम... महाराजांनी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी कोण आहे? आणि मला तुम्हाला काय सांगायचे आहे? हे जाणून घेण्यासाठी तुम्ही सर्व उत्सुक असाल. पण त्यापेक्षा मी तुम्हाला काय सांगणार आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. त्यामुळे काही वेळ तुम्ही आपल्या मनातील विचार बाजुला ठेवून, माझे बोलणे शांत चित्ताने ऐकुन घ्या. अशी माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे.''

''नागराज धनंजयचे बोलणे थांबवून, मी मध्येच आपल्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, तरी आपण माझा विरोध केला नाही हे पाहून मला खुप आनंद झाला आहे. याचाच अर्थ नागांमध्ये आजही शिस्त टिकून आहे. परंतू हीच गोष्ट जर पृथ्वीवरील मनुष्याच्या बाबतीत घडली असती तर तेथील राजाने अशाप्रकारे स्वत:चे बोलणे बाजुला ठेऊन, एखाद्या सर्वसामान्य मनुष्याला बोलण्याची संधीच दिली नसती आणि राजाचे बोलणे मध्येच थांबवले म्हणुन त्याला शासनही केले असते आणि दुसरी गोष्ट म्हणजे तिथे उपस्थित असलेल्या सर्वसामान्य जनतेलाही आपल्यातीलच एक सर्वसामान्य मनुष्याचे असे वागणे सहन झाले नसते. त्यामुळे अशाप्रसंगी त्यांनी आरडा-ओरडा, गडबड गोंधळ करुन ती सभा तिथेच संपवली असती. थोडक्यात या गोष्टीवरुन, नागांकडे आजही शिस्त आणि इतर सर्वसामान्य नागांविषयी आपुलकीची भावना शिल्लक आहे. जी मनुष्याकडे नाही ही गोष्ट स्पष्टपणे जाणवते.''

हे ऐकल्याबरोबरच तिथे उपस्थित असलेल्या नागांनी आपल्या तोंडातुन एका विशिष्ट पद्धतीचा आवाज काढुन ''आम्ही याच्याशी सहमत आहोत'' हे दर्शवणारी प्रतिक्रिया व्यक्त केली. नागांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद पाहून त्या नागाने पुन्हा बोलायला सुरुवात केली.

''माझ्या मित्राचे, धनंजयचे काही विचार नागप्रजातीच्या उद्धारासाठी खरोखरच आवश्यक आहेत. त्याच्या विचारांचा मी आदर करतो. राजपरिवारातील असूनही इतकी वर्षे त्याने त्याच्या मातेने आणि त्याच्या भावंडांनी सामान्य नागाप्रमाणे जीवन व्यतीत केले. त्यामुळे त्याला वाटणारी सामान्य नागांची चिंता स्वाभाविकच आहे.''

''त्याच्या समानतेच्या प्रस्तावाचे मी स्वागत करतो. पण त्याचा दुसरा प्रस्ताव मला मान्य नाही.'' (हे ऐकताच सर्व नागांचे कान टवकारले गेले) हा नाग काय बोलत आहे? धनंजयच्या बाजुने इतकी मोठी नागशक्ती असताना, अशा सामान्य नागाने त्याचा विरोध करावा? हे सर्वांसाठीच मोठे आश्चर्यकारक होते. धनंजय अजुनही शांतच होता. पण नागराणी आणि मंचावरील इतर नाग मात्र क्रोधीत दिसत होते.

''धनंजयच्या म्हणण्याप्रमाणे आपले पुर्वज पुर्वी लाखो वर्षे जगत होते. पण आज आपले आयुर्मान कमी होऊन जवळपास फक्त दहा हजार वर्षांचेच झाले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पूर्वी मनुष्याचेही आयुर्मान हजारो वर्षांचे होते. पण आज त्याचेसुद्धा आयुर्मान कमी होऊन, तो फार-फारतर शंभर वर्षे जगू शकतो. याचाच अर्थ असा आहे की, पृथ्वीलोक असो किंवा नागलोक असो, काळाचा परिणाम सर्वत्र होत असतो. अर्थातच तो पृथ्वीवर वेगळा परिणाम करतो आणि नागलोकी वेगळा. नागलोकातील काळ हा पृथ्वीवरील काळाच्या तुलनेत फारच संथ गतीने पुढे जातो. तरीही नागांचे आयुर्मान मनुष्याच्या आयुर्मानाच्या तुलनेत पूर्वीपासूनच जास्त आहे हे मात्र नक्की. पण जर आपण पृथ्वीलोकात जाऊन राहू लागलो, तर मात्र आपल्यावरही पृथ्वीवरील काळाचा परिणाम होऊन आपले आयुर्मान ह्यापेक्षाही कमी होईल. याउलट जर मनुष्य नागलोकी येऊन राहू लागला, तर त्याचेही आयुर्मान कितीतरी पटींनी वाढेल.''

''काळाचा परिणाम गुरुत्वाकर्षणावर अवलंबून असतो. सहाजिकच पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण नागलोकातील गुरुत्वाकर्षणापेक्षा जास्त असल्याने तिथे काळ जलद गतीने पुढे जातो. राहिला प्रश्न आपले आयुर्मान वाढविण्याचा त्याबद्दल मी आधीच सांगीतले आहे की, ज्याप्रमाणे आपले आयुर्मान कमी झाले आहे. त्याप्रमाणे मनुष्याचेही आयुर्मान कमी झाले आहे. आपले पूर्वज त्यावेळी आपल्यापेक्षा जास्त जगायचे कारण तो काळ वेगळा होता. जो दुर्दैवाने पुन्हा परत कधीही येणार नाही. आपल्या आयुर्मानाचा आणि मनुष्य रक्ताचा काहीही संबंध नाही. त्यामुळे मनुष्य रक्त प्राशन केल्याने आपले आयुर्मान वाढेल, त्याच्या हृदयाचे सेवन केल्याने आपण निरोगी आयुष्य जगू, या सर्व भ्रामक कल्पना आहेत. आपले पूर्वज जरी तसे काही करत असले, तरी त्यामुळे आपले आयुर्मान वाढेल हे सिद्ध होत नाही. पुर्वीचा काळ वेगळा होता. त्याकाळी जरी आपल्या पूर्वजांना असे करणे शक्य असले, तरी  आज आपल्याला तसे करता येणार नाही. पुर्वीचा मनुष्य विकसित नव्हता. त्याची बुद्धीही मर्यादित होती. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी त्याच्यावर अगदि सहजरित्या विजय मिळवून, त्याला आपले गुलाम केले होते. पण आजचा मनुष्य काळानुसार विकसित झाला आहे. जरी त्याच्याकडे आपल्याप्रमाणे अद्भूत शक्ती नसल्या, तरी त्याने आपल्या बुद्धीच्या बळावर, त्याच्या शरीरक्षमतेसाठी अशक्य असणाऱ्या गोष्टीही शक्य करुन दाखविल्या आहेत. त्याला आता पृथ्वी, अग्नी, वायु, जल ही तत्वे नियंत्रित करता येतात. आकाश तत्वावर विजय मिळवून तो आता यंत्राच्या सहाय्याने अवकाश प्रवासही करु लागला आहे. आपण विचारही करु शकणार नाही अशी यंत्रे बनवून त्याने आपले जीवन सुखकारक केले आहे. त्याचप्रमाणे मनुष्याने आपल्या संरक्षणासाठी विविध प्रकारची शस्त्रे निर्माण केलेली आहेत. त्यात अणुबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब यांसारख्या विध्वंसक शस्त्राचाही समावेश होतो. ज्यांच्या वापराने आपला संपूर्ण नागलोकही क्षणार्धात नष्ट होऊ शकतो. त्यामुळे आपण विचारही करु शकणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणावर जिवितहानी होऊ शकते.''

‘‘माझ्या माहितीप्रमाणे आज पृथ्वीवरील मनुष्यांची संख्या नागलोकातील नागांच्या संख्येच्या हजारो पटींनी अधिक आहे. त्याशिवाय आजही पृथ्वीवर, मंत्रशक्तीव्दारे नागांना नियंत्रित करण्याची सिद्धी हस्तगत असलेले, मनुष्य अस्तित्वात आहेत. आपल्या सुदैवाने मनुष्याचे आयुर्मान अल्प असल्याने त्यांच्या जवळील ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला प्राप्त होते. त्यामुळे काळाच्या ओघात त्यांच्या जवळील अनेक रहस्ये नष्ट होतात. आपल्यासारख्या नागांच्या जीवनकालात मनुष्यांच्या शेकडो पिढ्या जन्म घेतात आणि मरुन जातात. त्यामुळे आजच्या काळातील मनुष्याला नागलोकाबद्दल किंवा आपल्या सारख्या इच्छाधारी नागांबद्दल काहीही माहिती नाही. काळाच्या ओघामुळे आपले अस्तित्व आता मनुष्यासाठी एक रहस्य बनले आहे. ज्या मोजक्या मनुष्यांना ही रहस्ये माहिती आहेत त्यांच्यावर इतर बहुसंख्य मनुष्याचा विश्वास नाही. त्यामुळे मनुष्य आपल्याबद्दल कुठलीही गोष्ट ठामपणे सांगू शकत नाही. पण आपल्याला, आपल्या दिर्घ आयुर्मानामुळे मनुष्याची बरीचशी माहिती आहे. पृथ्वीवर गुप्तपणे वास्तव्य करणारे नाग हे आपल्याला मनुष्याची रहस्ये माहिती असण्यामागचे मुख्य कारण आहे. पण तरीही मनुष्याशी झालेल्या करारानंतर आजवर कोणताही नाग सामान्य मनुष्यासमोर अद्याप प्रकट झालेला नाही. आणि भविष्यातही होऊ नये, अशी माझी इच्छा आहे. अन्यथा आपल्यावरच अनर्थ ओढावेल.’’ इतके बोलून तो नाग काही क्षण गप्प झाला. तसे तिथे उपस्थित सर्व नाग आपापसात, सौम्य आवाजात कुजबुजु लागले. म्हणुन त्याने पुन्हा बोलण्यास सुरुवात केली.

# उत्पत्तीची रहस्ये

‘‘आता मी तुम्हांला जे काही सांगणार आहे. कदाचित त्याने तुम्हांला मोठा धक्काच बसेल. पण मी तेच सांगेन, जे सत्य आहे. मनुष्याशी शत्रुत्व न करण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे... मनुष्य हा आपलाच भाऊ आहे.’’ हे ऐकल्यावर सर्व नागांना आश्चर्याचा एक झटकाच बसला. आत्तापर्यंत धनंजयने आणि त्यानंतर ह्या नवीन अनोळखी नागाने मनुष्याबद्दल जे काही सांगितले होते, ते सर्व नागलोकातील नागांसाठी रहस्यमय असल्याने कशावर विश्वास ठेवावा? आणि कशावर ठेवू नये? हेच अनेकांना कळत नव्हते. पण ह्या सर्व रहस्यमयी गोष्टी ऐकल्यामुळे तिथे जन्मलेल्या नागांच्या, पृथ्वीलोकातील मनुष्याबाबतच्या ज्ञानात भर मात्र नक्कीच पडत होती.’’

‘‘होय, हेच सत्य आहे. पूर्वकाळात परमपिता ब्रम्हाने सृष्टीची निर्मिती केल्यानंतर, ब्रम्हाचे मानसपुत्र प्रजापती दक्ष यांच्या तेरा कन्यांचा विवाह ऋषी कश्यप यांच्याशी झाला. जे मारिची मुनींचे पुत्र आणि ब्रह्म देवाचे पौत्र होते. ते थोर विद्वान असल्याने ते सप्तऋषींचेही प्रमुख होते. ज्यांचे आपण सर्व वंशज आहोत. त्यांच्या आदिती नामक पत्नीपासून देवतांची, दिती पासून दैत्यांची, दनू पासून दानवांची, कद्रु पासून नागांची, अरिष्ठा पासून गंधर्वांची, सुरसापासून राक्षसांची, सुरभीपासून गायी, म्हैशींची, विनितापासून गरुडांची, ताम्रापासून गिधाडांची, क्रोधवशापासून विंचू सारख्या विषारी जीवांची, इडा पासून वृक्ष-वेलिंची, काष्टा पासून अश्वांची आणि मुनी पासून अप्सरांची उत्पत्ती झाली. त्यानंतर मनुष्याची उत्पत्ती करण्याकरिता ब्रम्हाने स्वतःच्या शरीराचे दोन भागात विभाजन केले. त्यातुन पुरुष आणि प्रकृतीची निर्मिती झाली. तो आद्य पुरुष ‘मनु’ होता तर प्रकृती ही ‘शतरुपा’ होती. ‘मनुच्या’ नावावरुन त्याच्यापासून निर्मित प्रजातीला ‘मानव’ हे नाव दिले गेले. ह्या सृष्टीतील प्रत्येक जीवाची उत्पत्ती करण्यासाठी ब्रम्हाने ज्या जीवांची निर्मिती केली त्यांना ऋषीमुनी म्हटले गेले. म्हणजेच आपण सर्व जीव ऋषी पुत्र असून, आपण सर्वच ब्रम्हाचे वंशज

आहोत. आपल्या पित्यांचा पिता एकच असूनही मातृसत्ताक पद्धतीच्या प्रभावामुळे, आपण एकमेकांपासून परिचित नव्हतो. या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी आपण मनुष्याचे उदाहरण पाहू. मनुष्याचा विचार केला, तर पूर्व काळात कुटुंबव्यवस्था आणि विवाह संस्था अस्तित्वात नव्हती. त्यावेळी मनुष्यामध्ये माता-पिता, भाऊ-बहिण अशा कुठल्याही प्रकारची नाती अस्तित्वात नव्हती. त्यावेळी मनुष्यांमध्ये फक्त स्त्री आणि पुरुष असे दोनच भेद होते. त्याकाळी आतासारखी समाजव्यवस्था अस्तित्वात नसल्याने, कुठलाही स्त्री-पुरुष कुठल्याही आणि कितीही स्त्री-पुरुषांबरोबर यौन संबंध प्रस्थापित करु शकत होता. स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट जोड्यांचे बंधन नसल्याने त्यांच्यापासून जन्माला येणाऱ्या अपत्याचा पिता कोण? हे निच्छित सांगता येत नव्हते. परंतू त्यांची माता कोण? हे निच्छित असल्याने, त्याकाळी मातेच्या नावाने वंश चालत असे. कालांतराने विवाह संस्था अस्तित्वात आल्याने, कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतरच्या काळात, माता-पिता, बंधू-भगिनी, मामा-मामी अशाप्रकारच्या कित्येक नात्यांचे नामकरण झाले. त्यामुळे मनुष्य प्रजातीमधील स्वच्छंद यौन संबंधावर मर्यादा आली''

''त्यानंतरच्या काळात मानवी समाजात, पितृसत्ता अस्तित्वात आली. त्यामुळे त्यानंतरच्या पुढील काळात गोत्र व्यवस्था निर्माण झाली. समान गोत्र असणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या विवाहावर बंधने आली. कालांतराने मनुष्याच्या कर्मानुसार त्याची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा वर्णात विभागणी झाली. ज्याला जे कार्य करणे जमते, तीच त्याची जात झाली. म्हणजेच तोच त्याचा वर्ण झाला. त्यामुळे एकाच कुटुंबातील सदस्यांचे त्यांच्या कर्मानुसार विभाजन झाले. एका कुटुंबातील स्त्री-पुरुष दुसऱ्या कुटुंबातील स्त्री-पुरुषाशी विवाह करु लागले. त्याकाळी विभिन्न वर्णाचे मनुष्य भिन्न गोत्र बघून एकमेकांशी विवाह करत होते. परंतू समान गोत्र असणाऱ्या स्त्री-पुरुषांचा विवाह होत नसे. त्याकाळात देवतांनी मनुष्याच्या विविध कुळांचा उद्धार

केल्याने, विविध कुळातील मनुष्य विविध देवतांना आपले कुळ दैवत मानू लागली होती. चार वर्णामध्ये विभाजन झालेला मनुष्य पुढे जाती आणि उपजातींमध्ये विभागला गेला. तरी समान कुळ दैवतामुळे (म्हणजेच अप्रत्यक्षपणे आपल्या कुळामुळे) एकत्र येऊ लागला. तरीही कर्मावर आधारीत असलेली वर्णव्यवस्था मनुष्याच्या आपापसातील वैमनस्याचे कारण बनली. दुर्दैवाने त्याकाळी आपणही मनुष्याच्या संगतीत राहून, मनुष्याची हिंच संस्कृती आत्मसात केली. त्यामुळेच आज मनुष्याप्रमाणेच नागांमध्ये असमानता दिसत आहे.''

''स्वत:ला सर्व जीवांपेक्षा बुद्धीमान समजणारा मनुष्य, जर कर्मावर आधारीत आणि श्रमविभाजनाचे माध्यम असलेल्या वर्णव्यवस्थेला (जातींना) समजून घेण्यास असमर्थ ठरत असेल, तर आपल्या सारख्या नागांचे त्याबाबतीत अज्ञानी असणे सहाजिकच शक्य आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, आपल्या मुळ पूर्वजांनी आपल्या विभिन्न शरीरक्षमतेमुळे आणि विभिन्न प्रवृत्तींमुळे एकमेकांपासून वेगळे राहणे पसंत केले. त्यामुळेच आपल्यासारख्या जीवांचे मनुष्य, नाग, गरुड, राक्षस इ. अशाप्रकारे विभिन्न प्रजातींमध्ये विभाजन झाले. कालांतराने आपण सर्व जीव वेगवेगळे राहून, फक्त आपल्याच प्रजातीचा विचार करु लागलो. त्यामुळे विभिन्न प्रजातींमधील एकमेकांतील मत-भेद वाढुन, त्यांच्यात शत्रुत्वाची भावना निर्माण होऊ लागली. काळाच्या प्रभावाने आपणही सर्व एकाच पूर्वजापासून निर्माण झालेले विविध जीव आहेत. हेच आपण विसरुन गेलो. त्यानंतरचे आपले पूर्वज एकमेकातील शत्रुत्वामुळे युद्धे करु लागली. युद्धात विजयी झालेली प्रजाती, इतर प्रजातींना आपला गुलाम बनवून त्यांच्यावर सत्ता गाजवू लागली आणि आपल्या सुखासाठी त्यांच्यावर अत्याचार करु लागली. आपण नागांनीही हेच केले. म्हणुनच आपल्या अत्याचाराला कंटाळलेल्या मनुष्याने नागांमधील सत्तेची लालसा असणाऱ्या दृष्ट प्रवृत्तीचा फायदा घेऊन, आपल्या पूर्वजांना नागलोकी पाठवले. त्यामुळे त्यांनी त्यांच्या

सुरक्षिततेसाठी, त्यावेळी जे काही केले ते योग्यच होते. त्यात त्यांचे काही चुकले असावे, असे मला वाटत नाही. सत्तेच्या आणि सुखाच्या उपभोगासाठी आपण विभिन्न जीव असलो, तरी एकाच पूर्वजापासून निर्माण झालेली भावंडे आहोत; हे आपण सोईस्करपणे विसरुन गेलो. याची मला खंत वाटत आहे. ज्या चुका आपल्या पुर्वजांनी केल्या, त्याच चुका आपण आपल्या शुल्लक स्वार्थासाठी करु नये अशी माझी इच्छा आहे. मनुष्य रक्तामुळे किंवा त्याच्या शरीरातील इतर अवयवांमुळे आपला काही फायदा होईल हे आज ठामपणे कोणीच सांगू शकत नाही. त्यामुळे आपण आपल्या स्वार्थासाठी त्याचा जीव घेऊन त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणे कधीही योग्य ठरणार नाही. मनुष्य काय?... आणि इतर जीव काय? आपण सर्व एकाच पूर्वजांची अपत्ये आहोत. त्यामुळे आपल्याला अशा प्रकारची हिंसा सोडून आपापसातील बंधू-भावाचा विकास केला पाहिजे. आणि प्रत्येक जीवाला, त्याच्या लोकात सुखी राहता येईल, असे वागले पाहिजे. मला खात्री आहे, सत्य समजल्यामुळे तुमच्यापैकी कोणीही नाग आता पृथ्वीवर जाऊन विनाकारण मनुष्याशी युद्ध करणार नाही.''

इतके बोलून तो नाग शांत झाला. त्याच्या शांततेबरोबरच सर्वत्र शांततेची लाट पसरली. कोणीही कोणाशीच काहीच बोलत नव्हते. सर्वजण विचारमग्न झाले होते. तो नाग मंचावरुन सर्वांना पहात होता, अधून-मधून त्याची नजर स्तब्ध झालेल्या नागांवरुन फिरत होती. सर्वांना आपल्या उत्पत्तीची रहस्ये समजल्याने आजवर त्यांनी, त्यांच्या जीवनाबद्दल जे काही विचार केले होते, ज्या कल्पना केल्या होत्या त्या सर्व एका क्षणात खोट्या ठरल्या होत्या. त्या नागाने आता, सर्व नागांना एक प्रश्न केला. ''तर मग बोला, कोण? कोण? सहमत आहे माझ्या विचारांशी? त्याप्रश्नावर बहुसंख्य नागांनी होकारार्थी उत्तर देऊन आपली सहमती दर्शवली. नागांच्या आवाजामुळे धनंजय आपल्या विचार प्रक्रियेतून बाहेर आला होता. आता त्याच्या मुखावर कसलेतरी समाधान दिसत होते. त्याने त्या तरुण नागाकडे भावविवश होऊन पाहिले आणि आपोआपच

त्याच्या डोळ्यात अश्रु जमा होउ लागले. न राहवून त्याने, त्या नागाला मिठी मारली आणि काही क्षण तो त्याच्या कानात काहितरी कुजबुजला. त्यानंतर धनंजयने आपला पृथ्वीप्रस्थानाचा निर्णय चुकीचा असल्याचे, घोषित केले. आणि त्या रहस्यमयी नागाचा सर्वांसमक्ष यथोच्छित सत्कार करुन, आपल्या सभेची समाप्ती केली.

———X———X———

# ''स्वरुप बदलते !''

सामान्य नागाचे रुप घेऊन, कधी नागांच्या तर कधी मनुष्याच्या हिताच्या गोष्टी करणारा, तो रहस्यमयी नाग प्रकाश असल्याचे धनंजयला स्वत: प्रकाशकडूनच समजले होते. ज्यावेळी तो बोलण्यासाठी मंचाजवळ आला त्याचवेळी त्याने धनंजयला संमोहित केले होते. ज्यामुळे धनंजय कुठलीही प्रतिक्रिया न देता शांतपणे त्याचे बोलणे ऐकू लागला. त्यानंतर आपले बोलणे संपेपर्यंत प्रकाशने आपल्या भाषणातून धनंजय सहित अनेक नागांचे मतपरिवर्तन करण्यात यश मिळवले. भाषण संपल्यावर प्रकाशने स्वत:च धनंजयला तो अनंताचा नातू असलेला, अर्धनागमनुष्य असल्याची कबूली दिली.

पण खरेतर प्रकाशने आपल्या भाषणामार्फत धनंजयसहित तेथे उपस्थित असलेल्या नागांना आपल्या दिव्य शक्तींद्वारे वशीभूत करुन टाकले होते. त्यामुळे सत्य समजल्यावरही धनंजयने प्रकाशचा विरोध केला नाही. याउलट त्यानेच प्रकाशला पृथ्वीवर न येण्याचे वचन दिले.

———x———x———

पृथ्वीवर परतल्यावर प्रकाशने नागलोकात घडलेली सर्व हकीकत मोहनला सांगितली. मनुष्य प्रजातीवरील फार मोठे संकट प्रकाशने आपल्या बुद्धीचातुर्याने रोखल्याने, मोहनला फारच आनंद झाला होता. काही वर्षापूर्वी प्रकाशला जे भयानक स्वप्न पडले होते, ते विधिलिखित असल्याचे

नागतपस्वींनी त्यावेळी सांगितले होते, त्यामुळे प्रकाशने खरोखरच भविष्यात घटीत होणाऱ्या घटना रोखल्या आहेत. यावर मोहनचा चटकन विश्वासच बसत नव्हता. त्यावेळी प्रकाशने ज्या भयानक स्वप्नाचे वर्णन केले होते, ते स्वप्न मोहनला आता आठवू लागले. आणि तो आपल्या मनातच त्याचा अर्थ लावू लागला. पृथ्वीलोक आणि नागलोक यांना जोडणाऱ्या मार्गातील नदी आटणे, म्हणजेच गुप्तमार्ग सर्वांसाठी खुला होऊन सर्वच नागांचा पृथ्वीवरील प्रवेश शक्य झाला असता. प्रकाशच्या स्वप्नातील ती भयानक प्रयोगशाळा कदाचित पृथ्वीवरच कुठेतरी उभारण्यात आली असती. आणि माणसांच्या शरीराचे विविध भाग वेगळे करुन, त्यांना नागांसाठी उपयोगी बनवण्याचे कामही गुलाम बनवलेल्या, मनुष्यावर सोपवण्यात आले असते. त्याचप्रमाणे प्रकाशला जी डोळे, कान, नाक, तोंड नसलेली विचित्र माणसे दिसली होती, ते यमदुतांचे प्रतिक असल्याचे त्यावेळी नागतपस्वींनी सांगितले होते. हे सुद्धा त्याला आठवत होते. त्याचबरोबर प्रकाशला स्वप्नात यमाचे वाहन असलेले, हजारोंच्या संख्येने धावणारे रेडे सुद्धा दिसले होते. त्यावरुन भविष्यात नागांच्या अत्याचाराला कंटाळून, मनुष्यातील हिंसक प्रवृत्तीची वाढ होऊन, मनुष्यानेच यमदूत बनून, प्रचंड सैन्यासह नागलोकावर आक्रमण केले असते. या तर्कालाही पुष्टी मिळाली.

सुदैवाने प्रकाशने हा सर्व घटना क्रम सुरु होण्याआधीच त्यामागचे मुळ कारण नष्ट केले होते. तरीही विधीलिखित असलेली घटना बदलता येते, यावर मोहनचा अजुनही पुर्णपणे विश्वास बसला नव्हता. म्हणून त्याने या सर्व गोष्टींमागचे रहस्य प्रकाशला विचारले असता प्रकाशने काही गोष्टी त्याच्यासमोर स्पष्ट केल्या.

‘‘मी कधीच भविष्य बदलण्याचा प्रयत्न केला नाही. कारण ते अशक्य आहे. मी तर फक्त मानसिकता बदलली आहे. प्रत्येक क्रियेचा परिणाम प्रतिक्रियेच्या स्वरुपात बघायला मिळतो. त्यामुळे क्रिया बदलली की,

प्रतिक्रिया आपोआपच बदलते. मी नागांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणले त्यामुळे त्यांच्याकडून आता, मानवाला कुठल्याही प्रकारचा धोका नाही. त्याचा अर्थ असा नाही की, मी भविष्य बदलले आहे, मी तर फक्त त्याचे स्वरुप बदलले आहे.'' प्रकाशचे बोलणे ऐकुन मोहनला आश्चर्य वाटले आणि भयसुद्धा. पण प्रकाशच्या बोलण्याचा रोख त्याच्या अद्याप लक्षात आला नव्हता. ''म्हणजे, नेमके सत्य काय आहे?'' मोहनने गांभिर्याने विचारले.

'' पिंडी ते ब्रह्मांडी, या संस्कृत वचनानुसार पिंडात बदल केल्याने, ब्रह्मांडात आपोआपच बदल घडून येतात. त्यामुळे मी नागांच्या विचारात आपल्या वशीकरण शक्तीने परिवर्तन घडवून आणल्याने त्याचे परिणाम आपोआपच ब्रह्मांडातील शक्तींवर झाले. त्यामुळे मला जरी भविष्य बदलता आले नसले तरी त्याचे स्वरुप मात्र मला नक्कीच बदलता आले आहे. अर्थात मनुष्याचा काय.... आणि नागांचा काय... सर्वनाश हा अटळच आहे. परंतू विचारप्रवृत्ती बदलल्याने त्याचे स्वरुप मात्र बदलणार आहे. शेवटी परिवर्तन हेच जीवनाचे रहस्य आहे...''

———x———x———

# पुर्नजन्म

प्रकाश नागलोकातून परतल्यानंतर जवळपास वीस वर्षानंतरची ही गोष्ट आहे. मध्यरात्र झाली होती. त्यामुळे सर्वत्र शांतता पसरली होती. याच शांततेचा भंग करणारा, कुत्र्यांच्या रडण्याचा आणि भुंकण्याचा आवाज सर्वत्र घुमत होता. त्यातच कुठुन तरी ढोल, ताशे आणि घुंगरांचा आवाज मध्ये-मध्ये ऐकु येत होता. कुत्र्यांच्या अशा विचित्रपणे रडण्यामागे नक्कीच काहीतरी गंभीर कारण असणार ही गोष्ट प्रकाशच्या लक्षात आली होती.

सर्व सामान्य मनुष्याप्रमाणे रात्री निद्राधीन होण्याची प्रकाशची सवयच आता मोडली होती. तो फक्त अंथरुणावर पडून होता आणि तसेही कुत्र्यांच्या अशा विचित्र आवाजामुळे रात्रीची शांतता भंग झाली होती आणि त्याच्या मनाचीही. न रहावून तो ताडकन उठला आणि त्याच्या घराच्या खिडकीतुन बाहेर पाहु लागला. इमारतीखाली कुत्रे सोडून बाकी कोणीही नव्हते. परंतू हे दृष्य तर सर्वसामान्य मनुष्यासाठी होते. प्रकाशला तर इमारतीपासून काही अंतरावर भलतेच दृष्य दिसत होते. जे एखाद्या सर्वसामान्य मनुष्याच्या दृष्टीस पडणे शक्यच नव्हते.

काही क्षणातच वेताळाचे आगमन होणार होते. आपल्या सक्षम ज्ञानेंद्रियांमुळे या गोष्टीची चाहुल कुत्र्यांना आधीच लागली होती आणि शेवटी तसेच झाले. क्षणार्धात वेताळाचे आगमन झाले. भुत-प्रेत आणि पिशाच्च यांचा राजा असलेला वेताळ आपल्या सोबत आपली प्रचंड फौज घेऊन आला होता. वेताळाच्या मागून चालणारी ती सर्व भुते एखाद्या मिरवणुकीप्रमाणे चित्र-विचित्र आवाज उत्पन्न करणारी वाद्ये वाजवत, नाचत चालली होती. त्यांचे नृत्य जितके विचित्र होते, त्यापेक्षा त्या वाद्यांचा आवाज खुपच भयावह होता. जस-जशी वेताळाची स्वारी पुढे-पुढे येत होती तस-तसे कुत्र्यांचे भुंकणे अधिकच वाढु लागले. जणु काही ते एकमेकांना वेताळाच्या आगमनाची सुचनाच देत होते.

हा सर्व प्रकार प्रकाशच्या घरापासून खुप दूरवर घडत होता. तरीही प्रकाश तो आपल्या दिव्य दृष्टीने स्पष्टपणे पाहु शकत होता. वेताळ इथे का आला असावा? हे जाणुन घेण्यासाठी प्रकाशही आता खुप उत्सुक झाला होता. घरात

असलेला त्याचा पुत्र 'विक्षर' अगदी गाढ झोपी गेल्याचे पाहून तो हळूच घराबाहेर पडला. आणि त्याने घराचा दरवाजा बाहेरच्या दिशेला खेचुन घेऊन, नीट बंद केला. दरवाजा आतुन नीट बंद झाला आहे की नाही? हे तपासून झाल्यावर तो इमारती खाली आला.

वेताळाची स्वारी आता, बरीच पुढे निघून गेली होती. त्यामुळे तो झपाझप पावले टाकत तिथपर्यंत पोहोचला आणि गुपचुपपणे त्याचा पिच्छा करु लागला. काही वेळाने ती स्वारी एके ठिकाणी थांबली. ते ठिकाण स्मशान होते. वेताळाने आपल्या सैन्यापैकी काही निवडक पिशाच्चांसह आपले काही सैन्य त्या स्मशानाबाहेर ठेऊन निवडक भुत पिशाच्चांबरोबर स्मशानात प्रवेश केला.

स्मशानात काळ्या रंगाचे वस्त्र परिधान केलेली व्यक्ती काळ्या रंगाचे आसन करुन तोंडातल्या तोंडात काही मंत्र पुटपुटत होता. त्याच्या बाजूला दुसऱ्या एका पात्रात काळे उडीद ठेवले होते. त्या उडीदांवर त्याने एक पणती ठेवलेली होती. त्या पणतीच्याच उजेडामुळे तिथे काहीसा अंधुक प्रकाश निर्माण झाला होता. त्याने आपल्या अवती-भोवती बरीचशी सुगंधित फुले पसरवून ठेवलेली होती. त्यांचा सुगंध तिथे सर्वत्र दरवळत होता. तोंडातल्या तोंडात मंत्र उच्चारण करुन आपल्या साधनेत मग्न असलेल्या त्या व्यक्तीने अशा प्रकारची वातावरण निर्मिती वेताळाला प्रसन्न करण्यासाठी केली होती ही गोष्ट प्रकाशच्या केव्हाच लक्षात आली होती. तरीही हा सर्व काय प्रकार सुरु आहे? हे जाणुन घेण्याची त्याला फार उत्सुकता लागलेली होती. म्हणुन तो यासर्व प्रकारामध्ये हस्तक्षेप करणार नव्हता.

———x———x———

आत्तापर्यंत आपले नेत्र बंद करुन साधनेत मग्न असलेल्या त्या व्यक्तीने, वेताळाचा स्मशानात प्रवेश होताच आपले नेत्र उघडले. कदाचित त्याला वेताळाच्या आगमनाची चाहुल लागली असावी. त्यावरुन ही व्यक्ती एक सिद्ध तांत्रिक असावी. असा प्रकाशचा अंदाज होता. वेताळ त्याच्या जवळ जाताच तो वेताळासमोर नतमस्तक झाला. वेताळाने त्याला वर बघण्यास सांगितले.

म्हणून आता तो तांत्रिक उघड्या नेत्रांनी वेताळाकडे आणि त्याच्या अवती-भोवती असलेल्या सर्व शक्तींकडे जरासुद्धा भयभित न होता एक-एक करत दृष्टीक्षेप टाकू लागला. त्यानंतर तांत्रिकाने वेताळाला प्रसन्न करण्यासाठी आपल्याजवळील मिठाई आणि फळे अर्पण केली. त्याने तसे करताच वेताळ त्याच्याशी बोलू लागला. ''मला प्रसन्न करण्यासाठी तु कित्येक दिवस, सातत्याने चालणारी ही महाकठीण साधना केलेली आहेस. तुझ्या सामर्थ्याची परिक्षा घेण्यासाठी मी बऱ्याचदा तुझ्या साधनेत व्यतय आणण्याचा प्रयत्न केला पण तु त्या सर्व अडचणींवर मात करुन शेवटी आजच्या अमावस्येच्या रात्री तुझी साधना यशस्वीपणे पूर्ण केलीस. फार मोठ्या तपानंतर मला प्रसन्न करणारा, तु एक अत्यंत सामर्थ्यवान मनुष्य आहेस. अर्थातच त्यामागे तुझ्या पुर्वजन्माची महत्वाची भुमिका आहे. बोल काय इच्छा आहे तुझी? मी तुझ्या साधनेवर अत्यंत प्रसन्न आहे.''

''तु माझ्या आज्ञेप्रमाणे माझे सर्व आदेश मान्य करुन, मला माझे इच्छित कार्य पुर्ण करण्यासाठी सहाय्य करावेस अशी माझी इच्छा आहे.'' तो तांत्रिक लगेचच उद्गारला.

''ठिक आहे, कुठल्या प्रकारचे सहाय्य हवे आहे तुला?'' वेताळाने विचारले. त्यावर तो तांत्रिक मोठ-मोठ्याने भेसुरपणे हसू लागला आणि काही क्षणातच त्याने आपले हसणे थांबवून स्मशानाबाहेर उभ्या असलेल्या प्रकाशकडे अंगुलीनिर्देश करुन, ''मला ह्या जीवाला आणि त्याच्या कुटुंबाला संपवून त्याच्याजवळील नागमणी प्राप्त करायचा आहे.'' ही इच्छा वेताळासमोर व्यक्त केली. वेताळाचा पाठलाग करुन बऱ्याच वेळेपासून वेताळाचे आणि तांत्रिकाचे बोलणे लपून ऐकणाऱ्या प्रकाशला काही कळण्याच्या आतच, त्याला वेताळाने आणि त्याच्या बरोबरच्या भुत-पिशच्चांनी लगेचच घेरले. ह्या तांत्रिकाला आपण इथे उपस्थित असल्याचे कसे काय समजले? आणि याला आपल्या कुटुंबाचा सर्वनाश कशासाठी करायचा आहे? याचा आणि आपला काय संबंध? या सर्व गोष्टींचा प्रकाश विचार करत असतानाच, ''तु मला अजुन नीट ओळखले नाहीस वाटते?'' तांत्रिक तावातावातच म्हणाला. तसे प्रकाशने आपले नेत्र मिटले तशी क्षणार्धातच त्याला आपल्या अंतर्ज्ञानाने त्या तांत्रिकाची मुळ ओळख पटली.

‘‘म्हणजे... तू...’’ प्रकाश उद्‌गारला.

‘‘होय मीच, तू इतका बेसावध असशील असे वाटत नव्हते मला.’’ तांत्रिक म्हणाला.

‘‘इतकी वर्षे मी गाफील राहिलो, त्याचेच हे परिणाम आहेत नाहीतर मी असे घडूच दिले नसते.’’ प्रकाश म्हणाला. तितक्यातच ‘‘आपण इथे काय करत आहात? आणि कोणाशी बोलत आहात? हे शब्द प्रकाशच्या कानावर पडले. तसे त्याने मागे वळून पाहिले. तसा त्याला आश्चर्याचा झटकाच बसला. तो आवाज विक्षरचा होता. त्याला पाहताच ‘‘पण... तु इथे कसा? असा प्रश्न त्याने विक्षरला केला. ‘‘ते मलाही पूर्णपणे माहिती नाही. कशी ते माहित नाही. पण मला अगदी अचानक जाग आली मला आपल्या घराचा दरवाजा उघडा दिसला म्हणून मी तो बंद करण्यासाठी उठलो, तर तुम्ही घरात नसल्याचे मला जाणवले. म्हणून तुम्ही बाहेर आहात का? हे बघण्यासाठी मी आपल्या घराबाहेर पडलो. पण त्यानंतर मी इथंपर्यंत कसा पोहोचलो? हे माझे मलाच कळले नाही, परंतु आपण इथे आणि ते पण यावेळी काय करत आहात? असे बोलता-बोलता त्याने थोडेसे स्मशानाच्या आत डोकावून पाहिले तसा त्याच्या शरीराला कंप फुटला. भितीने त्याचे हात-पाय थर-थर कापू लागले आणि तोंडातून एक शब्दही बाहेर येईनासा झाला. आपल्या आजवरच्या आयुष्यात त्याने कधी कल्पनाही केली नसावी इतके भयंकर दृष्य त्याच्या डोळ्यासमोर तो पाहत होता. त्या ठिकाणी कित्येक भूतं, प्रेतं पिशाच्च आक्राळ-विक्राळ रुप धारण केलेला वेताळ आणि आपल्या साधनेने या सर्व शक्तींना तिथे बोलावणारा विचित्र वेशातील तांत्रिक त्याच्या दृष्टीस पडला. काही क्षण त्या तांत्रिकाची आणि विक्षरची नजरा-नजर झाली. त्या तांत्रिकाने विक्षरला आपल्या जवळ येण्यास सांगितले. तसा प्रकाश त्याला आपल्याजवळ बोलावू लागला. ‘‘विक्षर त्याच्याजवळ जाऊ नको.’’ म्हणून ओरडू लागला. परंतू विक्षरची आणि त्या तांत्रिकाची नजरा-नजर होताच त्याने विक्षरला वशिभुत केले होते; त्यामुळे त्याच्यावर प्रकाशच्या बोलण्याचा काहीच परिणाम होणारा नव्हता. तो थेट, त्या तांत्रिकाजवळ चालत गेला. आपल्या मुलाचे प्राण संकटात आहेत हे जाणून प्रकाशने आपले डोळे मिटले आणि तो तोंडातल्या-तोंडात मंत्र पुटपुटु लागला,

क्षणार्धातच त्याने त्याच्या अवती-भोवती जमा झालेल्या भुत-प्रेत आणि पिशाच्चांवर दृष्टीक्षेप टाकला तसे ते सर्वजण बर्फ गोठावा तसे आपल्या जागी स्थीर झाले. प्रकाशने आपल्या स्तंभन शक्तीने त्या सर्वांना स्तंभित केले आणि त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता त्याने विक्षरला तांत्रिकाच्या तावडीतून सोडवले. प्रकाशने त्याचा हात घट्ट धरुन ठेवला होता. त्याच्या हाताच्या स्पर्शाने विक्षर थोडा भानावर आला आता प्रकाश विक्षरला तेथुन घेऊन जाण्याच्या तयारीतच असताना वेताळाने त्या दोघांना अडवले. हे बघुन प्रकाशला आश्चर्य वाटले. त्याच्या स्तंभन शक्तीचा परिणाम वेताळावर झालेला नव्हता.

प्रकाशने विक्षरला आपल्या तावडीतुन सोडवल्यामुळे तांत्रिक आधिच खुप चिडला होता. त्यामुळे त्याने संधीचा फायदा घेऊन वेताळाला आव्हान केले. ''तु जर माझ्यावर खरोखरच प्रसन्न असशील. तर याच क्षणी या मनुष्याचा वध करुन त्याच्याजवळील नागमणी त्याच्या शरीरापासून विलग करुन माझ्या ताब्यात दे आणि तत्पुर्वी त्याच्या मुलाला इथे माझ्याजवळ घेऊन ये.'' तांत्रिकाने असे आव्हान करताच वेताळाने प्रकाशला आपल्या बाहुपाशात गुंडाळले. तेवढ्यातच त्या तांत्रिकाने विक्षरला आपल्या ताब्यात घेतले आणि तो प्रकाशचे शरीर आपल्या दोन्ही हातांनी आवळू लागला. तो प्रकाशच्या शरीरावरची आपली पकड अधिकच घट्ट करत त्याच्या शरीराची सर्व हाडे मोडून टाकण्याच्या प्रयत्नात होता. तितक्यातच वेताळाच्या बाहूपाशात अडकून पडलेला प्रकाश त्याच्या तावडीतून सुटून अदृष्य झाला. आणि क्षणार्धातच त्याने विक्षरची तांत्रिकाच्या ताब्यातुन मुक्तता केली. तांत्रिक प्रकाशच्या शक्तींसमोर हतबल होता. त्यामुळे तो वेताळावर चिडला, ''वेताळ मी तुझ्यावर इतके साधे काम सोपवले होते. पण तू ते सुद्धा करु शकणार नसशील तर धिक्कार असो तुझा.'' तांत्रिकाच्या बोलण्याने वेताळाचाही राग आता अनावर झाला होता. तो पुन्हा प्रकाशच्या अंगावर धावून गेला. परंतू प्रकाशने त्याला आपल्या दिव्य शक्तीने तिथेच रोखले. ''कदाचित तु मला पुर्णपणे ओळखु शकलेला नाहीस... वेताळ.'' प्रकाश म्हणाला. त्यावर वेताळ विचित्रपणे मोठमोठ्याने हसू लागला. ''अरे सर्पा मी तुला केव्हाच ओळखले आहे पण तु माझ्या समोर एखाद्या गांडुळाप्रमाणे आहेस. त्यामुळे निमुटपणे माझ्या मार्गातुन बाजुला हो.'' वेताळ संतापाने उद्गारला. ठिक आहे ते कळेलच आता तुला असे बोलुन, वेताळाला काही कळण्याच्या

आत प्रकाश वेताळाच्या जवळ गेला आणि त्याने त्याच्या थोबडीत एक सणसणीत लाथ मारली. त्या लाथेचा प्रहार इतका जोरदार होता की, वेताळ जमीनीवर कोसळला. त्याच्या दुसऱ्याच क्षणी प्रकाश वेताळाच्या शरीरावर बसुन तो आपल्या दोन्ही हातानी त्याचा गळा दाबू लागला. प्रकाशच्या सामर्थ्याची तांत्रिकाला आधीपासूनच कल्पना होती. तरी वेताळ त्याचा सामना सहजतेने करु शकतो असे त्याला वाटत होते. पण आता त्याचा हा समज त्याला खोटा ठरताना दिसत होता.

प्रकाशने वेताळाची मान आवळताच तो एखाद्या मनुष्याप्रमाणेच विव्हळू लागला. हा सर्व प्रकार बघुन स्मशानभुमीच्या बाहेर उभे असलेले सर्व भुत-पिशाच्चही भयभीत झाले. तांत्रिक आता खुपच भयभीत झाला होता. त्यामुळे तो तिथुन पळ काढण्याच्या तयारीत होता.

''वेताळ मी जर मनात आणले तर तुझा याच क्षणी सर्वनाश करु शकतो. बोल तुझी काय इच्छा आहे? प्रकाशने वेताळाला विचारले. तसा वेताळ आपली हार पत्करुन आपली सुटका व्हावी म्हणून प्रकाशची माफी मागु लागला. प्रकाशने वेताळाला आपल्या तावडीतून मुक्त केले तसा वेताळाने क्षणाचाही विलंब न करता आपल्या सैन्यासकट तिथुन पळ काढला. वेताळ निघुन गेल्याचे बघुन तांत्रिक अधिकच भयभित झाला. ''आता जरी मला जावे लागले तरी जी गोष्ट मी मागच्या जन्मी करु शकलो नव्हतो ती मी ह्या जन्मी शक्य करुन दाखवणार आहे. ज्याप्रमाणे माझा ह्या पृथ्वीवर मनुष्य स्वरुपात जन्म झाला आहे. त्याचप्रमाणे 'नागराजचाही' झाला आहे. आणि त्याने आता कुठल्यारुपात जन्म घेतला आहे. हे देखील तुला ठाऊक असेलच.'' इतके बोलून तो अदृष्य झाला.

प्रकाशला त्याच्यावर येणाऱ्या संकटाची पूर्व सुचना देणारा हा तांत्रिक म्हणजे त्याच्या पूर्व जन्मातील नागऋषी होता. ही गोष्ट प्रकाशने आपले नेत्र मिटताचक्षणी जाणली होती. पण त्याला त्याच्या पूर्वजन्माचा बोध कसा काय झाला असावा? त्याच्या पूर्वजन्माच्या सर्व स्मृती जागृत कशा झाल्या? अशाप्रकारे कित्येक प्रश्नांनी प्रकाशच्या मनात जन्म घेतला होता.

———x———x———

रात्री घडलेल्या प्रसंगानंतर, आपला पिता ‘प्रकाश’ हा कोणी सर्वसामान्य मनुष्य नाही. ही गोष्ट विक्षरच्या लक्षात आली होती. स्माशानातील तांत्रिकाला तो आधीपासून ओळखत होता. इतकेच नव्हे तर आपल्या पित्याचा आणि त्याचा पूर्वजन्मापासून काहीतरी संबंध होता. हे त्या दोघांच्या संभाषणावरुन अगदी स्पष्ट झाले होते. प्रकाशने भुत-प्रेत आणि त्यांचा अधिपती असलेल्या वेताळालाही आपल्या समोर अगदी सहज नमवले होते. यासर्व गोष्टी त्याला घरी आल्यावरही सारख्या-सारख्या आठवत होत्या. त्यामुळे त्या घटनेचा विचार करुन-करुन जणू आता त्याचे मस्तक फुटायचीच वेळ आली होती. आपला पिता नक्की कोण असावा? हाच प्रश्न सतत त्याच्या मनामध्ये घर करत होता. शेवटी न राहून त्याने सकाळी प्रकाशकडे त्याबद्दल विचारणा केली. प्रकाशला त्याला सत्य सांगायचे नव्हते. पण विक्षर जणु हट्टालाच पेटला होता. काल रात्री घडलेल्या प्रकाराबद्दल तुझ्या आईला काही सांगायचे नाही.’’ असे त्याने विक्षरला बजावून सांगितले होते. विक्षरनेही अद्याप प्रकाशला दिलेला शब्द पाळला होता. पण तरीही कालच्या रात्री घडलेला सर्व प्रकार त्याच्यासाठी चिंतेची बाब असल्यामुळे, तो भरपूर अस्वस्थ झाला होता. आता काहीही झाले तरी सत्य काय? ते जाणून घ्यायचेच हे त्याने आपल्या मनाशी ठरवलेले होते. त्याच्या मनाची झालेली अवस्था विक्षरला पहावत नव्हती. म्हणून नाईलाजाने प्रकाशने त्याला हे रहस्य सांगण्याचे मान्य केले.

‘‘विक्षर तुला काय आणि इतर सामान्य मनुष्याला काय... या विश्वाविषयीच्या बऱ्याचशा रहस्यमय गोष्टी माहित नसतात... त्या माहिती असूच शकत नाहीत. अशीच स्थिती इथे कायम निर्माण झालेली असते. आणि या पुढेही ती कायम रहाणार आहे. ह्या मनुष्याच्या जगात अशी कितीतरी रहस्ये आहेत जी त्याला कधीच कळु शकणार नाहीत. त्यातील काही रहस्ये तर सामान्य मनुष्याच्या आकलनक्षमतेच्या बाहेरची आहेत. त्यामुळे सामान्य मनुष्याला ही रहस्ये समजून घेताच येत नाहीत. मनुष्याचे हे दुर्दैव आहे की ह्या जगात तो जन्माला येतो आणि उघड्या डोळ्यांना जे जग दिसते फक्त त्यावरच

विश्वास ठेवतो आणि एक दिवस ह्याच अर्धवट ज्ञानासोबत हे जग सोडूनही जातो. त्यामुळे ह्या जगातील बऱ्याचशा रहस्यमय गोष्टींचे त्याला ज्ञान नसते.''

प्रकाशला नेमके काय बोलायचे आहे हे विक्षरच्या लक्षात येत नव्हते. परंतू आपल्या पित्याला ह्या विश्वातील बरीचशी अद्‌भूत अशी रहस्ये माहिती असणार या गोष्टीवर आता विक्षरचा पूर्णपणे विश्वास बसला होता.

''विक्षर आता मी तुला ज्या काही गोष्टी सांगणार आहे. त्यावर तुझा किती विश्वास बसेल हे मला माहित नाही. पण मी जे काही सांगेन ते सत्यच असणार

आहे यात शंका नाही...'' एवढे बोलून त्याने विक्षर समोर ह्या जगातील रहस्यांचा उलगडा केला.

———x———x———

# विकासाची रहस्ये

सर्वप्रथम प्रकाशने विक्षरला मानवाच्या आणि पृथ्वीवरील इतर जीवांच्या उत्पत्तीची रहस्ये सांगितली. परंतु विक्षरने प्रकाशकडून जे काही ऐकले होते ते त्याला चक्रावून टाकणारं होतं. प्रकाशने त्याला आत्तापर्यंत जे काही सांगितले त्यावर विक्षरने विश्वास जरी ठेवला असला तरी त्याच्या मनात अजुनही असे बरेचसे प्रश्न शिल्लक होते ज्यांची उत्तरे फक्त 'प्रकाशच' देऊ शकत होता.

''जर हे सर्व सत्य मानले, तर मग मनुष्य ह्या सर्व अद्भुत रहस्यांपासून अजुनही अपरिचीत कसा?'' असा प्रश्न विक्षरने विचारताच प्रकाशने त्यालाच काही प्रतिप्रश्न विचारले... आज मनुष्याची वैज्ञानिक क्षेत्रात इतकी प्रगती होऊनही त्याला आपल्या उत्पत्तीबद्दल आणि सुरुवातीच्या काळातील मनुष्याच्या विकासाबद्दल अजुनही ठामपणे काहीच कसे सांगता येत नाही? मनुष्याच्या उत्पत्तीनंतरच्या काळातील मनुष्याची ह्या पृथ्वीवरील स्थिती कशी होती? मनुष्याचा विकास कसा काय होऊ शकला? आजच्या शास्त्रज्ञांच्या आणि वैज्ञानिकांच्या मते आजच्या काळातील सर्वात बुद्धीमान जीव म्हणुन ओळखला जाणाऱ्या मनुष्याचे पूर्वज वानर होते. तर मग मनुष्याचा आनुवंशिक विकास कसा काय होऊ शकला? त्याच्या डी.एन.ए. च्या संरचनेमध्ये बदल कसे काय झाले? असे एक-एक करत बरेचशे प्रश्न त्याने विक्षरला विचारले. ज्यांची उत्तरे सहाजिकच त्याच्याकडे नव्हती.

प्रकाशने सांगितलेल्या गोष्टीवरुन सर्व जीवांची उत्पत्ती एकाच जीवापासून झाली होती आणि त्या सर्व जीवांचा पूर्वजही एकच असल्याचे त्याचे म्हणणे होते. परंतू विज्ञानानुसार या गोष्टीमध्ये काहीही तथ्य नव्हते. मग नेमके सत्य काय? मानवाचा विकास कसा झाला असावा? असे कितीतरी निरुत्तरीत प्रश्न आता पुन्हा विक्षरच्या मनात पिंगा घालत होते. ज्यांची उत्तरे आता प्रकाशलाच द्यावी लागणार होती. विक्षरच्या मनाची अवस्था ओळखून प्रकाशने पुन्हा त्याला काही रहस्यमय गोष्टी सांगण्यास सुरुवात केली.

''आपल्या पृथ्वीवरील सर्वच जीवांची उत्पत्ती एकाच पूर्वजापासून (ब्रम्हापासून) झाल्यामुळे एक काळ असा होता की, पृथ्वीवरील सर्व

प्रजातींमधील जीवांचे शरीर मनुष्याप्रमाणेच होते. हा काळ वानरापासून मनुष्याचा विकास होण्याच्या आधीचा काळ होता. त्या काळी कोणत्याही जीवाचा पूर्णपणे विकास झाला नव्हता. ज्याप्रमाणे वानरापासून हळू-हळू विकसीत होऊन आजच्या काळातील मानव अस्तित्वात आला; त्याचप्रमाणे पूर्वी मानवी गुणांचा काही अंश असणाऱ्या देव-दैत्य, गरुड, नाग, यक्ष, गंधर्व यांच्यातील मानवी गुणांचा काळानुसार हळू-हळू क्षय होत जाऊन, ते सुद्धा आपल्या शरीराच्या पूर्णत्वाला पोहोचले. या गोष्टीचे उदाहरण द्यायचे झाले तर देवतांमधील मनुष्य गुणांचा ऱ्हास होऊन त्यांना दिव्य शरीराची प्राप्ती होऊन ते त्यांच्या शरीराच्या पूर्णत्वाला पोहोचले. गरुडासारख्या जीवामध्ये काळानुसार झालेल्या बदलामुळे त्याच्यातील मानवी गुणांचा ऱ्हास होऊन त्याचे पूर्ण पक्षात रुपांतर होऊन त्यानंतरच्या काळात ते भुमिवर न राहता आकाशात राहू लागले. अशाप्रकारे विकासाच्या अवस्थेमध्ये असताना प्रत्येक प्रजातींमधील मानवी गुणांचा ऱ्हास होऊन सर्व प्रजातींमधील जीव आपल्या शरीराच्या पूर्णत्वाला पोहोचले. म्हणजेच एकेकाळी मनुष्याप्रमाणेच शरीर असणाऱ्या जीवांमधील मनुष्य गुणांचा काळानुसार ऱ्हास होऊन, त्या जीवांमधील असलेल्या विभिन्न गुणांच्या आधारे त्यांचे विविध प्रजातींमध्ये रुपांतर झाले. ज्या जीवाकडे त्या गुणांची अधिकता होती. त्याच मुख्य गुणाच्या आधारे ते जीव विकसित होत गेले. याच कारणामुळे फक्त काहीच वानरांना आपल्यातील मनुष्य गुणांच्या अधिकतेमुळे मनुष्य स्वरूप प्राप्त करता आले; तर काही वानरे आपल्यातील मनुष्य गुणांच्या अभावामुळे, पूर्णपणे मनुष्यासारखे विकसित होऊ शकले नाहीत. आणि जर ते तेव्हा विकसित होऊ शकले असते, तर आज वानर नावाची प्रजातीच शिल्लक राहिली नसती.''

''मी तुला हे जे काही सांगितले आहे हे सत्य असण्यामागचा मुख्य पुरावा म्हणजे पुरातन काळातील मानवी सभ्यतेचे शोधकर्त्यांना आजवर जे काही अवशेष सापडले त्यात त्यांना घोड्याचे धड असलेले मनुष्य, नागाचे धड असलेले मनुष्य, गरुडाचे धड असलेले मनुष्य अशा प्रकारे अर्धे मनुष्याचे तर अर्धे इतर जीवांचे शरीर असलेली बरीचशी चित्रे पुरातन काळातील वास्तुंवर कोरलेली आढळली. जी आजही आपल्याला इजिप्त सारख्या प्राचीन संस्कृतीचे पुरावे असलेल्या पिरॅमिडवरही बघायला मिळतील. संशोधकांना आजही ह्या

चित्रांमागचा खरा अर्थ लक्षात आलेला नाही. मनुष्यासारखे हात-पाय असलेला गरुड किंवा नाग, त्याचप्रमाणे शिंगे असलेले मनुष्य, पक्ष्यांप्रमाणे पंख असलेले घोडे आणि मनुष्य अशाप्रकारची सर्व रहस्यमय चित्रे हजारो वर्षांपासून याच सत्याकडे संकेत करत असल्याची जाणीव मनुष्याला आजही झालेली.''

''त्यानंतरचा सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे आताच्या मनुष्याला देव, दैत्य, गरुड, नाग, यक्ष, गंधर्व, भुत-पिशाच्च यांच्यासारख्या जीवांच्या अस्तित्वाबद्दल सदैव शंका का असते? या जीवांच्या अस्तित्वावर मनुष्याचा चटकन विश्वास का बसत नाही? कारण...या सर्व जीवांची ओळख पटवू देणाऱ्या अद्‌भूत गोष्टी पुरातन काळातील मनुष्यासाठी देखील त्या गोष्टी अविश्वसनीय होत्या. त्या सर्व गोष्टी शक्य करुन दाखवणे त्याच्या आकलन शक्तीच्या पलिकडचे होते. त्यामुळे त्याला सुद्धा या गोष्टी चमत्कारीक वाटत होत्या. अदृष्य होणे, अवकाशात भ्रमण करणे, आपले रुप बदलणे, शरीराचा आकार बदलणे, भविष्य कथन करणे यासारख्या कितीतरी गोष्टी त्यावेळी मनुष्याबरोबर रहाणाऱ्या देव, दैत्य, गरुड, नाग यांसारख्या प्रजाती अगदी सहजतेने शक्य करु शकत होत्या. परंतू या सर्व गोष्टी शक्य करुन दाखवणे मनुष्य शरीर क्षमतेच्या पलिकडचे होते म्हणून तो या गोष्टींना चमत्काराची उपमा देत असे.''

''पण... मनुष्यासाठी अभिप्रेत असणारा हा चमत्कार म्हणजे नेमके काय?... तर ज्या गोष्टींवर त्याचा विश्वास नसतो किंवा ज्या गोष्टी मनुष्याला शक्य करता येत नाहीत. त्या गोष्टी त्याला चमत्कार वाटू लागतात. पण मग अशाप्रकारे विचार केला तर मग, आजच्या विज्ञान युगातील मानवाने विकसित केलेले तंत्रज्ञान हे हजारो वर्षापूर्वीच्या मनुष्याला एक प्रकारचा चमत्कारच वाटला असता. कारण भविष्यातील मनुष्य असे काही करु शकतो हे त्यावेळच्या मनुष्यांच्या विचारांच्या पलिकडचे होते. त्याचप्रमाणे त्या काळात देव, दैत्य किंवा नागांसारखे जीव अस्तित्वात होते. यागोष्टीवरही मनुष्याचा चटकन विश्वास बसत नाही.''

''एके काळी देव, दैत्य, गरुड, नाग यांसारख्या जीवांबरोबर पृथ्वीवर वास्तव्य करणारा मनुष्य अलौकिक शक्तींच्या अभावामुळे या सर्व इतर

प्रजातींपेक्षा खुपच मागासलेला होता. इतर जीवांकडे अलौकिक शक्ती असल्यामुळे तो त्यांना आपल्यापेक्षा वरचा दर्जा देत असे आणि तसेही मनुष्यातील अलौकिक शक्तींच्या अभावामुळे इतर प्रजाती त्याला अगदी सहज आपला गुलाम बनवू शकत होत्या. एके काळी याच पृथ्वीवर जन्माला येऊन विकसित झालेल्या या सर्व प्रजातींमधील जीवांसारख्या अलौकिक शक्तींच्या अभावामुळे इतर प्रजातींमध्ये विकसित न होऊ शकणारा जीव नंतर मनुष्य म्हणुन ओळखला जाऊ लागला. म्हणूनच त्याकाळचा अविकसित मनुष्य नागांचा गुलाम होता. पण नागांमुळेच या मनुष्याला प्रगतीची दिशा मिळाली. हे देखिल एक सत्यच आहे. नाहीतर आपल्यातील अलौकिक गुणांच्या अभावामुळे त्यावेळी मनुष्य म्हणून अस्तित्वात येणारा जीव राना-वनात, कडे-कपारीत रहाणारा, शरीराभोवती वस्त्र म्हणून पाला-पाचोळा गुंडाळणारा होता. त्याकाळच्या अविकसित मनुष्याने स्वबळावर त्याच्या जीवनात इतक्या झपाट्याने प्रगती करणे शक्यच नव्हते. काही गोष्टी तो देवांकडून शिकला, काही नागांकडून, तर काही दैत्यांकडून. अशाप्रकारे प्रत्येक प्रजातीकडून मनुष्याला काहीना काही शिकता आले. ज्या-ज्या त्याला गोष्टी इतरांकडून आत्मसात करता आल्या त्या त्याने केल्या. त्यानंतरच्या काळातील मनुष्याला हा सर्व प्रजातींच्या सानिध्यात राहिल्याने, त्याला देवतांनी किंवा नागांनी निर्माण केलेली विविध तंत्र आत्मसात करता आली. जी आजच्या काळातील मनुष्याला अशक्य वाटू शकतात. त्यात भविष्य कथन करणे, अवकाश भ्रमण करणे, अदृष्य होणे यासारख्या कित्येक तंत्रांचा समावेश होतो. त्याकाळी वैज्ञानिक प्रगती झालेली नसतानाही त्या काळातील मनुष्याला ग्रहांची गती, त्यांचे आकाशगंगेतील स्थान यासर्व गोष्टींच्या आधारे खगोल शास्त्राचा आणि त्याद्धारे ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करता येणे शक्य होते. त्या काळात आजच्या इतकी वैज्ञानिक प्रगती झालेली नसतानाही त्या काळातील मनुष्याला हृदय प्रत्यारोपण, मेंदुच्या शस्त्रक्रिया, त्वचारोपण यासारख्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रियेचे ज्ञान होते. त्याकाळी जी चिकित्सा पद्धत अस्तित्वात होती. ती चिकित्सापद्धत आजच्या काळातील चिकित्सा पद्धतीपेक्षाही कितीतरी पटींनी अधिक प्रगतशील होती. या तंत्राचे ज्ञान मनुष्याने धन्वंतरी आणि अश्विनीकुमार यांसारख्या देवतांकडून आत्मसात केले. वैदयशास्त्रामध्ये नागांचे आणि गरुडाचेही योगदान महत्वपूर्ण होते. म्हणुनच त्याकाळातील

मनुष्य नागांनी विळखा घातलेल्या आणि आणि दोन्ही बाजुंनी गरुडाचे पंख असलेल्या आणि मनुष्याचे मुख असलेल्या चिन्हालाच वैदयशास्त्राचे प्रतिक मानत असे. त्यातील मनुष्याप्रमाणे असलेले मुख हे देवांचे, गरुडाचे पंख हे गरुडाचे तर विळखा घातलेले नाग हे नागांचे प्रतिक मानले जाते. यासर्व गोष्टींवरुन, त्या काळी मनुष्याचा या सर्व जीवांशी संबंध होता हे स्पष्ट होते. परंतू दुर्दैवाने त्या काळातील मनुष्याने ह्या सर्व जीवांकडून आत्मसात केलेली विविध तंत्रे अत्यंत गुप्त ठेवल्याने त्यांचा वारसा त्याच्या पुढील पिढिला मिळाला नाही.''

''गंधर्वांकडून मनुष्याला कलेचा वारसा मिळाला, देवतांकडून अध्यात्मिकतेचा तर दैत्यांकडून गुप्त तंत्र मंत्राचा मनुष्याला वारसा मिळाला. अशाप्रकारे मनुष्याने ह्या सर्व जीवांच्या सानिध्यात राहून काही ना काही आत्मसात केले आणि आपली वेगळी अशी मानवी सभ्यता निर्माण केली. थोडक्यात इतर जीवांनी निर्माण केलेल्या संस्कृतीच्या मिश्रणाने मानवी सभ्यतेचा आणि संस्कृतीचा पाया रचला गेला.'' इतके बोलून प्रकाशने आपले बोलणे थांबवले.

आत्तापर्यंत प्रकाशचे बोलणे ऐकुन विक्षरची त्याकाळातील मनुष्याच्या विकासाची रहस्यमय कहाणी ऐकण्याची उत्सुकता अधिकच ताणली गेली होती. आत्तापर्यंत 'प्रकाशने' त्याला ज्या काही गोष्टी सांगितल्या होत्या त्या सर्व गोष्टी त्याला फारच अद्भूत आणि रहस्यमय वाटत होत्या. त्यामुळे यासर्व गोष्टी सत्य आहेत की असत्य? याचा विचार करणे सोडून, तो प्रकाशचे बोलणे शांतपणे लक्ष देऊन ऐकत होता. पण प्रकाशने आपले बोलणे थांबवताच त्याला या सर्व गोष्टींचा विचार आणि तर्क-वितर्क करण्यासाठी वेळ मिळाला. त्यामुळे त्याने लगेचच ''ह्या सर्व गोष्टी सत्य असण्यामागचे अजुन काही पुरावे आहेत का? असा प्रश्न प्रकाशला विचारला. त्याचा प्रश्न ऐकताच प्रकाश एक मिश्किल हास्य करत, पुन्हा बोलू लागला.

''एके काळी इतर प्रजातींचे पृथ्वीवर अस्तित्व असण्यामागचा सर्वात महत्वाचा पुरावा म्हणजे आफ्रिका खंडातील इजिप्तचे पिरॅमिड. हे पिरॅमिड आजपासून जवळपास पाच हजार वर्षांपूर्वी निर्माण केलेले आहेत. यात चारशे-

साडेचारशे फुट उंचीचे पिरॅमिडही आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे पिरॅमिड बनवण्यासाठी वापरलेले प्रचंड वजनाचे दगड कित्येक मैलाच्या अंतराहुन आणले गेलेले आहेत. त्या काळात अशाप्रकारच्या भव्य वास्तुचे निर्माण करण्यासाठी आजच्या काळासारखी यंत्रे अस्तित्वात नसूनही त्या काळातील मनुष्याने इतक्या लांब अंतराहून, इतके मोठे दगड उचलुन कसे काय आणले असतील? त्याचप्रमाणे ते दगड एकावर एक रचून इतके भव्य पिरॅमिड कसे काय निर्माण केले असतील? त्यांनी इतके वजनदार दगड इतक्या उंचीवर कसे काय नेले असतील? अशा प्रकारच्या कितीतरी प्रश्नांची उत्तरे आजच्या काळातील संशोधकांकडे नाहीत. इतक्या प्रचंड वजनी दगडांची कौशल्यपूर्ण पद्धतीने रचना करुन, निर्माण केलेली पिरॅमिड सारख्या वास्तूची पुन्हा निर्मिती करणे आजच्या काळातील वास्तू तज्ज्ञांनाही अशक्यच वाटते.''

''पिरॅमिडच्या आतमध्ये एका विशिष्ट प्रकारची उर्जा तरंग सतत प्रवाहित होत असतात. जी सजीव आणि निर्जिव अशा दोन्ही गोष्टींवर आपला प्रभाव टाकत असतात. हे वैज्ञानिक प्रयोगांनी सिद्ध झाले आहे. पिरॅमिड मानवी शरीरावरही विशिष्ट प्रकारचा प्रभाव टाकतात. त्यामुळे आजही पिरॅमिडच्या प्रतिकृतींचा उपयोग रोग निवारण करण्यासाठी केला जातो. पिरॅमिडच्या आतमध्ये ठेवलेली कोणतीही गोष्ट बराच काळ जशीच्या तशी रहाते. म्हणुनच त्या काळी पिरॅमिड मध्ये ठेवलेली प्रेते अजूनही टिकून आहेत. त्या काळी आपल्या राजांची प्रेते सुरक्षित ठेवण्याकरिता पिरॅमिडची निर्मिती करण्यात आली होती. कारण एक दिवस आपल्या राजाचा आत्मा पृथ्वीवर परत येईल या गोष्टीवर इजिप्तवासियांचा विश्वास होता. त्यामुळे जर त्यांचे शरीर सुरक्षित ठेवले गेले; तर ते पुन्हा जिवंत होऊ शकतील अशी त्यांची धारणा होती. यातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्या काळातील इजिप्तवासीयांचे ते राजे म्हणजे मनुष्य शरीर धारण केलेले इच्छाधारी नाग होते. त्यांनीच आपल्या दिव्य शक्तींनी मनुष्याला ह्या सर्व गोष्टींची निर्मिती करण्याचे तंत्र शिकवले होते. त्यांच्याजवळील अद्‌भूत शक्तींमुळे ते सामान्य मनुष्यासाठी अशक्य असणाऱ्या कितीतरी गोष्टी अगदी सहज शक्य करु शकत होते. त्यांच्या याच अद्‌भूत

शक्तीसामर्थ्यांमुळे मनुष्याला त्यांचा फार आदर वाटत असे. आणि भितीही. नागांनी कित्येक वर्षे मनुष्य प्रजातीवर राज्य करण्यामागचे हे एक महत्वाचे कारण होते. नागांच्या सानिध्यात राहिल्याने त्या काळचा अविकसित मनुष्य आपल्या जीवनात बरीच प्रगती करु शकला. बरीच वर्षे मनुष्याच्या सानिध्यात राहिल्याने नागांनाही मनुष्याबद्दल प्रेम आणि आपुलकी वाटु लागली. त्यामुळे त्या काळातील नाग राजे आपल्या शक्तींचा उपयोग मनुष्याच्या कल्याणाकरीता करीत होते. पण असे करण्यामुळे त्यांच्या शक्तींचा व्यय होत असे ज्यामुळे त्यांचे आयुर्मान घटून त्यांचा अकाली मृत्यु होत असे. आपल्या राजाचा आपल्या कल्याणाकरीता अशाप्रकारे मृत्यु व्हावा हे मनुष्यालाही मान्य नव्हते. त्याकाळी नागांनी मनुष्याला दिलेल्या वचनानुसार 'एक दिवस ते पुन्हा पृथ्वीवर परत येणार आहेत.' पण त्यासाठी त्यांचे शरीर किंवा शरीराचा एखादा तरी भाग सुरक्षित असणे आवश्यक असल्याचे नागांनी मनुष्याला सांगितले होते आणि म्हणुनच मनुष्यरुपातील आपल्या राजाच्या पुर्नजन्मासाठी मनुष्याने त्यांचे प्रेत सुरक्षित ठेवण्याकरीता, नागांनीच विकसित केलेल्या तंत्राचा वापर करुन नागांच्याच मार्गदर्शनाखाली मनुष्याला पिरॅमिडची निर्मिती करता येणे शक्य झाले. यासर्व गोष्टींचा संबंध पृथ्वीवर मनुष्याव्यतिरीक्त भुत-प्रेत आणि नागांसारख्या इतर प्रजातींचे अस्तित्व असण्याशीच आहे आणि त्यांचे जीवंत उदाहरण म्हणजे तुझ्यासमोर असलेला तुझा पिता...

———x———x———

भद्रने विक्षरला वशिभुत करुन जणु प्रकाशच त्याला उत्पत्तीची रहस्ये, नागांची रहस्ये आणि विकासाची रहस्ये सांगत असल्याचे भासवले आणि मग प्रकाश स्वत:च्याच तोंडाने तो स्वत: देखील एक इच्छाधारी नाग असल्याचे कबूल केले. त्यामुळे विक्षरला आता त्याच्या पित्याबद्दल बऱ्याचशा अविश्वसनीय आणि रहस्यमयी गोष्टी समजल्या होत्या. ह्या सर्व रहस्यमयी

गोष्टी विक्षरला संगितल्याने त्याच्या पूर्वजन्माच्या स्मृती जागृत व्हायला मदत मिळेल असा भद्रचा समज होता. परंतू त्याचा तो समज खोटा ठरला. त्याने प्रकाशचे रुप धारण करुन विक्षरला ज्या काही गोष्टी सांगितल्या होत्या. त्यांच्यावर विक्षरचा सुरवातीला विश्वासच बसत नव्हता. त्यामुळे तो त्याला सांगत असलेल्या गोष्टी कशा प्रकारे सत्य आहेत हे विक्षरला पटवून देण्याकरीता त्याने त्याच्यासमोर बरीच उदाहरणे देऊन त्याचे भले मोठे स्पष्टीकरणही दिले. तेव्हा कुठे त्याने सांगितलेल्या गोष्टी सत्यही असू शकतात अशाप्रकारचे विचार त्याच्या मनात निर्माण झाले. त्याच्या मनातील हे विचार ओळखून संधीचे सोने करण्याच्या उद्देशाने त्याने त्याचा पिता म्हणजे प्रकाशही एक इच्छाधारी नाग असल्याचे सत्य सर्वात शेवटी त्याच्या समोर आणले. ते ऐकुन विक्षरला फार मोठा धक्काच बसला. ही गोष्ट कशी काय सत्य असू शकते याच विचारात तो हरवून गेला असताना भद्रला तिथे प्रकाशच्या येण्याची चाहूल लागली तसा त्याने तिथुन पळ काढला.

———x———x———

आपल्या कामासाठी घराबाहेर गेलेला प्रकाश घरी आला तेव्हा त्याला विक्षर स्वत: मध्येच हरवून कसला तरी विचार करताना दिसला. त्यावेळी तो इतका विचारमग्न झाला होता की, त्याला प्रकाशच्या येण्याचीही चाहूल लागली नव्हती. आणि लागली तरी कशी असती? कारण आतापर्यंत तर प्रकाशच्या रुपातील भद्र त्याच्याबरोबरच होता. स्वत:मध्येच हरवून विचारमग्न झालेला विक्षर त्याला अस्वस्थ झाल्यासारखा वाटत होता. त्यामुळे न रहावून त्याने विक्षरला त्यामागचे कारण विचारले. त्यावेळी त्याला विक्षरने ''तुम्ही सांगितलेल्या गोष्टींचाच विचार करत आहे. म्हणून सांगितले. तसा प्रकाश थोडासा गोंधळला.

''अरे पण मी कधी तुला काय सांगितले? मी तर आताच घरी आलो आहे.'' प्रकाश म्हणाला.

‘‘मी इतकाही लहान नाही बाबा. की आता तुम्ही अशाप्रकारे माझी मस्करी कराल.’’

‘‘अरे मी कशाला मस्करी करेन. मी खरच आताच इथे आलोय.’’

‘‘हो का मग मगासपासून इतका वेळ मला त्या रहस्यमयी गोष्टी कोण सांगत होत?’’

‘‘कुठल्या रहस्यमयी गोष्टी?’’ प्रकाशने आश्चर्याने विचारले.

‘‘त्याच... नागांच्या, देवतांच्या, भूतांच्या....’’

विक्षरचे बोलणे ऐकुन प्रकाशने त्याच्या अनुपस्थितीत घडलेल्या प्रकाराचा आपल्या अंतर्ज्ञानाच्या दिव्य दृष्टीने आढावा घेतला. तेव्हा त्याला सर्व प्रकार माहीत पडला. भद्रने त्याच्या अनुपस्थितीत केलेल्या कृत्यामुळे तो थोडासा सतर्क मात्र नक्कीच झाला होता. काहीही झाले तरी त्याला विक्षरपासून सत्य लपवायचे होते. म्हणुन त्याने ‘‘मी मघाशी पण मस्करीच करत होतो तुझ्याशी. मी तुला मगाशी जे काही सांगितले ते सर्व खोटे होते.’’ असे म्हणून तो मोठ-मोठ्याने हसू लागला. त्याचे असे हसणे पाहून विक्षर पूर्णपणे गोंधळून गेला. प्रकाशचे कुठले बोलणे खरे हेच त्याला समजत नव्हते. परंतू प्रकाशच्या अशा बोलण्यामुळे भद्रने प्रकाशच्या रुपात येऊन विक्षरला ज्या काही गोष्टी सांगितल्या होत्या त्या खोट्याही असाव्यात. असे त्याला वाटू लागले. तरीही भद्रने केलेल्या या कृत्यामुळे प्रकाश आता चांगलाच सावध झाला होता. म्हणून त्याला आता भद्र आणि विक्षरवरही नीट लक्ष ठेवावे लागणार होते. विक्षर आणि भद्रची कुठल्याही परिस्थितीत भेट होणे त्याला टाळायचे होते.

———x———x———

# भुतकाळातील घटनाक्रम

नागऋषींचा पृथ्वीवर मनुष्यरुपात जन्म झाला होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचा मनुष्यरुपात जन्म होऊनही त्यांच्या पूर्वजन्माच्या स्मृतींनी त्यांचा ह्या जन्मातही पिछा सोडला नव्हता. मनुष्य जन्मातील त्यांचे नाव 'भद्र' असे होते. भद्र लहानपणापासूनच खुप बुद्धीमान होता आणि तितकाच हट्टी सुद्धा जस-जसा तो मोठा होऊ लागला तस-तशा त्याच्या पूर्वजन्मातील स्मृती हळू-हळू जागृत लागल्या. जणु त्या त्याच्या आत्म्यालाच चिकटलेल्या होत्या. ज्यावेळी त्याच्या पूर्वजन्मातील ह्या सर्व स्मृती जागृत होऊ लागल्या, त्यावेळी तो खुप बेचैन झाला होता. त्याने कित्येकदा यासर्व गोष्टी त्याच्या आई-वडीलांना आणि मित्र-मंडळींना सांगितल्या होत्या. पण कोणाचाही त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला नव्हता. त्यानंतरच्या काळात त्याने ह्यासर्व गोष्टी इतरांना सांगणे सोडून देऊन, आपल्या पूर्वजन्माचे रहस्य शोधुन काढण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यावेळी त्याला स्वत:च्या पूर्वजन्माचा आणि पर्यायाने नागांसारख्या जीवांच्या अस्तित्वाचा बोध झाला.

मनुष्यरुपात जन्म झाल्याने 'भद्र' जवळ आता कोणत्याही अलौकिक शक्ती नव्हत्या. पण तरीही मनुष्यरुपातही त्याला त्याच्या पूर्वजन्मातील स्मृतींच्या आधारे बरेच काही करता येऊ शकते. ह्या गोष्टींवर त्यांचा ठाम विश्वास होता. त्याचा हाच विश्वास त्याच्यात अंतर्ज्ञानाची शक्ती जागृत करण्यास कारणीभुत ठरला. या अंतर्ज्ञानाने त्याला स्वत:च्या पूर्वजन्माचा बोध झाल्यावर भद्रने त्याच्या पूर्वजन्मातील मृत्युसाठी कारणीभूत असलेल्या 'अनंताला' आणि त्यांच्या नातवाला म्हणजे प्रकाशला शासन करायचे मनोमन ठरवले होते.

भद्रला म्हणजेच पूर्वजन्मातील नागऋषींना मनुष्यरुपातही त्यांच्या जवळ पूर्वजन्मात असणारे दिव्य ज्ञान त्याच्या स्मृतींच्या आधारे प्राप्त झाल्याने भद्र ह्या जन्मात सुद्धा आपल्या मंत्रशक्तीच्या सामर्थ्यावर नागलोकापर्यंत अगदी सहज पोहोचू शकत होता. नागराजच्या पुत्राने म्हणजे धनंजयने आपल्या पित्याच्या हत्येचा सूड घेण्यासाठी अनंताची हत्या केल्याचे त्यांना समजले होते. पण

पूर्वजन्मात आपण एक सामर्थ्यवान नाग असूनही आपल्याला ‘नागमणी’ प्राप्त करता आला नव्हता. ही गोष्ट ‘भद्र’ला ह्या जन्मातही अस्वस्थ करीत होती. त्यामुळे कुठल्याही पद्धतीने प्रकाशकडून त्याचा दिव्य नागमणी हिरावून, निदान ह्या जन्मात तरी आपण आपली पूर्व जन्मातील अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याच्या उद्देशाने ‘भद्र’ ने त्यासाठी धनंजयकडे सहाय्य मागितले. पण धनंजय मात्र त्याला सहाय्य करण्यास तयार नव्हता. अशाप्रकारे पदरी निराशा आल्याने ‘भद्र’ हताश होऊन नागलोकातून पृथ्वीवर पून्हा परतला. पण ‘धनंजयने आपल्याला सहाय्य करण्यासाठी नकार देण्यामागचे नेमके कारण काय असावे?’ या गोष्टीचा शोध घेणे त्याच्यासाठी फार महत्वाचे होते. आपल्या पित्याच्या हत्येचा सूड पूर्ण करण्यासाठी अनंताला संपवून स्वत: राजपद स्विकारल्यावर संपूर्ण नाग प्रजातीच्या उद्धाराकरिता. याकरिता पृथ्वीवर येऊन, तेथील मनुष्याला आपला गुलाम बनवण्याचे स्वप्न बघणाऱ्या महत्वकांक्षी धनंजयचे प्रकाशच्या एखाद्या प्रवर्चनामुळे इतके मतपरिवर्तन होऊ शकते. ही गोष्ट जरी इतर नागांसाठी सामान्य असली तरी भद्रचा मात्र या गोष्टीवर विश्वास नव्हता. म्हणुनच त्याने भूतकाळात नागलोकी घडलेल्या प्रत्येक गोष्टींचा आपल्या अंतर्ज्ञानाच्या दिव्य दृष्टीने शोध घेणे सुरु केले.

धनंजयसहित इतर नागांना पृथ्वीवर येण्यापासून रोखण्याकरिता प्रकाश नागलोकी आला होता. तिथे आल्यावर धनंजयने नागलोकातील अधिकाधीक नागांना आपल्या बाजुने वळवण्यासाठी एका भव्य सभेचे आयोजन केल्याचे त्याला समजले. नागांना भ्रमित करुन त्यांचा वापर आपल्या स्वार्थासाठी करायचा हाच धनंजयचा सभा घेण्यामागचा मुळ उद्देश होता. हे प्रकाशच्या लक्षात आले होते. त्यामुळे आता त्याला काहीही करुन धनंजयला तसे करण्यापासून रोखायचे होते. त्यासाठी तो एका सामान्य इच्छाधारी नागाचे रुप धारण करुन त्या सभेत सामिल झाला. आपल्या सभेमार्फत धनंजयने तिथे उपस्थित असलेल्या नागांचे मतपरिवर्तन करण्यात यशस्वी होत आहे ही गोष्ट लक्षात येताच त्याने त्या सभेमध्ये हस्तक्षेप करुन त्या सभेचे संपूर्ण स्वरुपच बदलून टाकले, हे सर्व घडवून आणण्यासाठी त्यावेळी त्याने प्रथमच आपल्या नागशक्तीचा प्रयोग केला होता. त्यावेळी त्याने धनंजयसहित तिथे उपस्थित असलेल्या सर्व नागांना वशिभुत करुन आपल्या संभाषण चातुर्याने त्यांच्यावर

आपल्या विचारांची छाप सोडली. पण ही गोष्ट इथेच संपली नव्हती. इतक्या सहजतेने धनंजयचे मतपरिवर्तन होणे शक्य नव्हते. प्रकाशने त्याला वशिभुत केल्यामुळे त्याचे बरेचशे विचार जरी  त्याला पटले असले तरी तो इतक्या सहजतेने आपले उद्दीष्ट विसरणारा नव्हता. त्यामुळे त्याने जरी प्रकाशला पृथ्वीवर आक्रमण न करण्याचे वचन दिले असले तरी त्याबद्दल त्याने देखील प्रकाशकडून एक वचन घेतले होते. ते वचन म्हणजे त्याने प्रकाशकडून दर दिवशी एका मनुष्याचा बळी मागितला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रकाशनेही धनंजयची ही अपेक्षा पुर्ण करण्याचे त्याला वचन दिले होते.

प्रकाशने धनंजयला दिलेल्या वचनानुसार, प्रकाश दररोज अगदी न चुकता, नागलोकात धनंजयकडे एका मनुष्याचा मृतदेह बळी म्हणुन पाठवत असे. नागलोकासाठी असणारा एक दिवस म्हणजे पृथ्वीलोकातील जवळपास एक आठवडा इतका कालावधी होता. यासर्व गोष्टी भद्र ने आपल्या दिव्यदृष्टी व्दारे जाणुन घेतल्या होत्या. परंतू मनुष्यरुपात जन्म झाल्याने भद्रकडे त्यांच्या पूर्वजन्मातील कठोर साधनेने प्राप्त झालेले दिव्य ज्ञान सोडले तर फारशा अलौकिक शक्ती नव्हत्या. म्हणुनच त्यांनी तंत्र विद्येच्या सहाय्याने भूत-पिशाच्चांचा राजा असलेल्या वेताळाला, आपल्या साधनेव्दारे प्रसन्न करुन आपल्या इच्छित कार्यपूर्तिसाठी त्याचे सहाय्य घेण्याचे ठरवले. परंतू त्यांच्या दुर्दैवाने ज्या दिवशी वेताळाचे आगमन झाले. त्याच दिवशी प्रकाशला तांत्रिक रुपातील 'भद्र' म्हणजेच पूर्वजन्मातील नागऋषींबद्दल आणि त्यांच्या दृष्ट हेतू बद्दल समजले. त्याचवेळी त्याने भद्रची साधना भंग करुन आपल्या शक्ती सामर्थ्याच्या बळावर, वेताळालाही तिथुन निघून जाण्यास भाग पाडले. त्यामुळे भद्रची योजना अयशस्वी ठरली होती.

———x———x———

धनंजय आपल्या बाजुने प्रकाशविरुद्ध लढण्यास का तयार नाही? यामागचे खरे कारण तांत्रिक भद्रला कळल्यापासून तो फारच अस्वस्थ झाला होता. प्रकाश पृथ्वीवरच्या काळानुसार दर आठवड्याला, एका मनुष्याचा बळी

देण्यास इतक्या सहजतेने कसा काय तयार झाला असावा? 'ते सुद्धा फक्त धनंजयला पृथ्वीवर येण्यापासून रोखण्याकरिता!' त्याने जर मनात आणले असते तर त्याच क्षणी धनंजयलाही यमसदनी पोहोचवू शकला असता, मग त्याने ही तडजोड कशासाठी केली असावी? त्यामागे अजुन काही कारण असावे का? अशाप्रकारचे कित्येक प्रश्न भद्रच्या अस्वस्थतेमागचे कारण होते.

प्रकाशच्या या निर्णयामागे नक्कीच काहीतरी दुसरे महत्वाचे कारण असणार यावर भद्रचा ठाम विश्वास होता. म्हणुनच त्याने पुन्हा एकदा या गोष्टीच्या मुळाशी जाऊन शोध घेण्याचे ठरवले. कित्येक दिवसांच्या प्रयत्नानंतर त्यांच्यासमोर त्यावेळी नागलोकात घडलेल्या प्रसंगाचे चित्र स्पष्ट होऊ शकले होते...

ज्यावेळी धनंजयने प्रकाशकडे अशा प्रकारचे विचित्र वचन मागितले, त्या वेळी त्याच्या मनात धनंजयला नकार देण्याचा किंवा वेळप्रसंगी धनंजयशी युद्ध करून, त्याला संपवण्याचा विचार सुरु झाला होता. पण त्याचवेळी हिमालयातील गुप्त ठिकाणी विविध लोकातील जिवांबरोबर वास्तव्य करणाऱ्या प्रत्युष स्वामींनी प्रकाशचे मार्गदर्शन करण्याकरिता मनोमन त्याच्याशी संपर्क साधला.

''प्रकाश धनंजयचे वचन मान्य कर. लक्षात ठेव, तुझा मुळ उद्देश वाईट प्रवृत्तींचा अंत करणे हाच असला पाहिजे. आज खऱ्या अर्थाने ती वेळ आली आहे. ज्याची आम्ही तुला प्रशिक्षण देताना पुर्व कल्पना दिली होती. आता तुला पृथ्वीलोक आणि नागलोक यांच्यामधील दुवा म्हणुन कार्य करायचे आहे. कारण तू मनुष्य आणि नाग या दोघांचेही मिश्र रुप आहेस. तेव्हा आम्ही काय सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐक.''

''पृथ्वीवरील मनुष्याची स्थिती दिवसेंदिवस अधिकच खालावत चालली आहे. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे वाईट प्रवृत्तींची दिवसेंदिवस वाढ होत असून चांगली प्रवृत्ती नष्ट होत आहे. त्यामुळे मनुष्य एकमेकांवर व त्याचप्रमाणे पृथ्वीवरील इतर जीवांवरही अन्याय अत्याचार करु लागला आहे. आपल्या शुल्लक स्वार्थी प्रवृत्तीपुढे आंधळा झालेल्या मनुष्याला सत्कर्माची जाण आणि

आपल्या दुष्कर्माचे भान राहिलेले नाही. यामागे मुख्य कारण म्हणजे देवतांनी, मनुष्याच्या जीवनात हस्तक्षेप करणे पूर्णपणे थांबवले आहे. आणि असे घडावे ही देखील कधी–काळी मनुष्याचीच इच्छा होती. म्हणुनच आता देवतांनी, पृथ्वीवर जन्म घेतलेल्या मनुष्याचा मृत्यु होईपर्यंत त्याचे संपूर्ण जीवन त्याच्याच हाती सोपवले. परंतू त्याच्या मृत्युनंतर त्याच्या कर्मानुसार त्याच्या आत्म्याची पुढील गती निच्छित करण्याचे कार्य मात्र आपल्याच हाती ठेवले आहे. अशाप्रकारे मनुष्याच्या पृथ्वीवरील जीवनातून देवतांनी आपले अंग काढुन घेतल्याने कलियुगातील मनुष्याची स्थिती दिवसेंदिवस अधिकच चिंताजनक होत चालली आहे. म्हणुनच आता देवतांनी पुन्हा मनुष्याच्या जीवनात लक्ष घालुन वेळप्रसंगी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करुन मनुष्याची स्थिती सुधारण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यात तुझा देखील सहभाग असणार आहे. होय... देवतांनी तुझ्याकडे न्यायदानाचे कार्य सोपवले आहे. जो नीच प्रवृत्तीचा मनुष्य वारंवार संधी मिळून सुद्धा सुधारत नाही अशा मनुष्याला मृत्युदंड देण्याचा तुला अधिकार असणार आहे. त्यामुळे धनंजयला दररोज एका मनुष्याचा बळी कसा द्यायचा? ह्या गोष्टीची चिंता करणे तु आता सोडून दे आणि निंश्चिंत होऊन धनंजयला दर दिवशी एका मनुष्याचा बळी देण्याचे वचन दे.''

प्रत्युष स्वामींनी अशा प्रकारे प्रकाशशी साधलेल्या संवादानंतरच, प्रकाश धनंजयला हवे असलेले वचन देण्यास तयार झाल्याचे आता तांत्रिक भद्रच्या लक्षात आले होते.

———x———x———

# तिच्या स्मृती

पितृपक्ष सुरु होते. दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा प्रकाशने स्वर्गिय ‘किरण’ साठी वाडी ठेवली होती. ती गेल्यापासून त्याला तीची आठवण झाली नाही, असा एकही दिवस अद्याप झाला नव्हता. तिचा मृत्यु होऊन इतकी वर्षे लोटली होती तरीही त्याच्या मनातील तिच्याविषयीचे प्रेम अजूनही तसेच होते. अगदी चिरतरुण!

काही क्षणांच्या प्रतिक्षेनंतर त्याने ठेवलेल्या वाडीला कावळ्याचा स्पर्श झाला. आपल्या चोचीत वाडी म्हणुन ठेवलेल्या अन्नाचा काही भाग घेऊन तो कावळा भुर्रकन उडाला. त्यामुळे विक्षर आनंदी झाला होता पण प्रकाश मात्र अजुनही असमाधानीच दिसत होता. तितक्यातच अजुन एक कावळा तिथे ठेवलेल्या अन्नाचे भक्षण करु लागला. क्षणार्धातच प्रकाशच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. त्यावेळी त्याची प्रसन्न मुद्रा पाहुन अन्न भक्षण करणारा कावळा म्हणजेच त्याची पत्नी ‘किरण’ होती. हे विक्षरच काय पण इतर कोणीही सांगू शकला असता.

ते दोघे जराही आवाज न करता, कावळ्याकडे पहात होते. ती बेफिकिर होऊन मुक्तपणे अन्नाचे भक्षण करीत होती. जणु त्या अन्नामध्ये प्रकाशचे इतक्या वर्षाचे प्रेमच मिसळलेले होते. वर्षभरानंतर पुन्हा एकदा आज त्यांची भेट झाली होती. मनसोक्त अन्न भक्षण करुन झाल्यावर ती समाधानाने काव-काव करत होती. जणू ती प्रकाशशी संवादच साधत होती. कावळ्याच्या रुपातील किरणला पाहून कधीही भाऊक न होणारा प्रकाश आज थोडासा भाऊक झाला होता. त्याच्या मनातील ‘किरणच्या’ आठवणी आज पुन्हा एकदा जशाच्या तशा त्याच्या मनचक्षुसमोर तरळू लागल्या. सर्वप्रथम किरणच्या मृत्युचा दिवस, त्याने तिच्याबरोबर व्यतीत केलेले क्षण, असे एक-एक करत क्षणार्धात त्याला त्याची आणि तीची पहिली भेट आठवली.

———x———x———

त्यादिवशी त्याने बनवलेल्या यादीनुसार त्याला एका मंत्र्याचा, जीव घेऊन त्याला नागलोकी धनंजयकडे पोहोचवायचे होते. ज्यावेळी प्रकाश त्याच्या निवासस्थानी पोहोचला तेव्हा त्याला, तो मंत्री काही दिवसांपासून आजारी असून अंथरुणाला खिळल्याचे समजले. त्याच्या सेवेसाठी चोविस तास एक डॉक्टर आणि दोन परिचारीका तिथेच रहातील अशाप्रकारची व्यवस्था करण्यात आली होती. तो आजाराने इतका कमजोर झाला होता की, त्याच्या शरीरात आता हालचाल करण्याचेही त्राण उरले नव्हते. तसेही त्याने वयाची जवळपास सत्तरी गाठली होती. पण भ्रष्ट राजकारण अजूनही त्याच्या रक्तात तसेच शिल्लक होते. आजवर त्याने आपल्या पद, प्रतिष्ठेचा गैरवापर करुन कित्येकांवर अन्याय अत्याचार करुन त्यांच्या तोंडातील घास हिरावून घेऊन स्वत:साठी अब्जावधीची मालमत्ता गोळा केली होती. त्यामुळे आज प्रकाशच्या हातून त्याचा मृत्यु होणे निश्चित होते. पण त्यादिवशी त्याच्या आजूबाजुला बरीच माणसे असताना त्याला तेथुन घेऊन जाणे सोपे काम नव्हते. म्हणुन प्रकाशने तेथील सर्व माणसांना आपल्या स्तंभन शक्तीने स्तंभित करुन मंत्र्याला तिथुन घेऊन जाण्याचा विचार केला. पण तितक्यातच आपला चेहरा झाकलेल्या दोन व्यक्ती आपल्यासोबत बंदुकी घेऊन मंत्री असलेल्या रुममध्ये शिरले. त्यांनी बंदुकीचा धाक दाखवून तेथील डॉक्टर्स, परिचारिका आणि मंत्र्याच्या कुटुंबियांना तेथुन बाहेर जाण्यास सांगितले. प्रकाश मंत्र्याच्या घरात अदृष्य होऊन वावरत असल्यामुळे त्याची तेथिल उपस्थिती कोणालाही जाणवणारी नव्हती. तो शांतपणे हा सर्व प्रकार बघत होता आणि तसाही तो सुद्धा त्या मंत्र्याला मृत्युदंड देण्यासाठीच तिथे आला होता.

क्षणार्धात त्यांच्यापैकी एका व्यक्तीने त्या रुमचा दरवाजा आतुन बंद केला आणि दुसऱ्याने मंत्र्याच्या कपाळावर बंदुक ठेवली, ‘‘तु आत्तापर्यंत

आमच्यासारख्या कित्येक सामान्य माणसांवर अत्याचार केलेले आहेस. पण आता तुझे दिवस भरले आहेत. त्यामुळे यापुढे तु कोणावरही अन्याय अत्याचार करु शकणार नाहीस. आत्तापर्यंत आमच्या हाती तुझ्याविरुद्ध बरेच पुरावे लागले आहेत. त्यामुळे आम्ही तुला आता जरी मारले तरी तु एक नीच व्यक्ती होतास हे आम्हांला अगदी सहज सिद्ध करता येईल. पण तरीही आम्ही तुला एक शेवटची संधी देऊ इच्छितो. तेव्हा आता तरी आपले सर्व गुन्हे कबूल कर. ''

इतके बोलून त्या व्यक्तीने आपल्या चेहऱ्यावरील कपडा हटवला, आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती एक स्त्री होती. प्रकाशने एक क्षण तिच्या डोळ्यात पाहिले आणि तिचा भुतकाळ जाणून घेतला.

———x———x———

ती स्त्री एक पोलिस अधिकारी असून एका तरुणीच्या खुनाच्या प्रकरणासंदर्भात तपास कार्य सुरु असताना ह्या मंत्र्याचा त्यात सहभाग असल्याचे तीच्या लक्षात आले होते. ज्यावेळी तीने त्या मंत्र्याच्या सर्व हालचालींवर बारीक लक्ष ठेवले त्याचवेळी तीला मंत्र्याच्या सर्व भ्रष्ट कारस्थानांचा अंदाज आल्यामुळे तीने त्या संदर्भातील पुरावे गोळा करुन त्या मंत्र्याविरुद्ध कारवाई केली. परंतू त्या मंत्र्याने आपल्या पद आणि प्रतिष्ठेचा वापर करुन पोलिस यंत्रणाच आपल्या बाजुने वळवून घेतली. आणि त्या स्त्री पोलिस अधिकारीवरच भलते-सलते आरोप करुन तिला, तिच्या नोकरीवरुन बडतर्फ करण्यात येईल अशी व्यवस्था केली. इतके करुनही तो शांत बसला नाही. तिची प्रसार माध्यमांवर बदनामी करुन त्याने तिची अत्यंत दयनीय अवस्था केली होती.

आपल्यावर तसेच इतरांवर झालेल्या अन्यायाचा प्रतिशोध म्हणुन तिने त्या मंत्र्याचा खरा चेहरा समाजासमोर आणण्यासाठी तब्बल दोन वर्षे प्रयत्न

करुन, मंत्र्याविरुद्धचे सर्व पुरावे एकत्र केले. पण तरीही तिला ह्या सर्व गोष्टी मंत्र्याच्या तोंडून ऐकायच्या होत्या. तिच्याबरोबर बंदूक घेऊन असलेला दुसरा व्यक्ती त्या पिडीत तरुणीचा पिता होता जिच्यावर मंत्र्यानी अत्याचार करुन तिचा खुन घडवून आणला होता. खरेतर तो याआधीच त्या मंत्र्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करणार होता; पण ह्या पूर्व पोलिस अधिकारी तरुणीने त्यावेळची परिस्थिती बघुन त्याला तसे करण्यापासून कसे बसे रोखले होते. कारण मंत्र्याच्या तोंडून त्याने केलेल्या गुन्ह्यांचे सत्य तिला जगासमोर आणायचे होते. बंदुकिचा धाक दाखवताच तो मंत्री पोपटासारखा बोलू लागला आणि बघता–बघता त्याने एक–एक करत आपले सर्व गुन्हे कबूल केले. मंत्र्यांच्या मुखातुन निघालेल्या या सर्व गोष्टी तिने आपल्या जवळील टेप रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करुन ठेवल्या होत्या. कायद्याची पर्वा न करता प्रसंगी चुकिच्या मार्गाने का होईना पण आज मंत्र्यांच्या तोंडून त्याच्या सर्व गुन्ह्यांची कबूली घेऊन, तीने खुन झालेल्या पिडीत तरुणीलाच नव्हे तर तिच्यासारख्या असंख्य पिडीतांना न्याय मिळवून दिला होता. तिच्या या कार्यात तिला पोलिस खात्यातील काही व्यक्तींनी गुप्तपणे सहाय्य पुरवले होते. म्हणुनच ती सुरक्षितपणे हे कार्य सिद्धीस नेऊ शकली होती. मंत्र्यांच्या तोंडून सत्य बाहेर पडल्यावर तिच्याबरोबर असलेल्या पिडीत मुलीच्या पित्याने मंत्र्याची गोळी मारुन हत्या केली आणि नंतर पोलिसांना आपल्या गुन्ह्याची कबूली सुद्धा दिली.

प्रकाशच्या डोळ्यासमोर मंत्र्याचा खुन झाला होता. त्यामुळे त्याला आता नागराजसाठी दुसरा मनुष्य पकडावा लागणार होता. आपल्या हाती घेतलेले कार्य विसरुन प्रकाश त्या तरुण पोलिस अधिकारीचा विचार करु लागला होता. त्याच्या इतक्या वर्षाच्या आयुष्यात असे पहिल्यांदाच घडले होते. ज्यावेळी त्याने तिच्या डोळ्यात बघुन तिचा जिवनपट पाहिला त्याच वेळी तिने प्रकाशच्या मनावर आपली छाप सोडली होती. त्याच क्षणी तो तिच्या प्रेमात पडला होता.

माता–पित्याचा पत्ता नसलेली, अनाथ आश्रमात लहानाची मोठी झालेली, जीचे बालपण दिवसभर काबाड–कष्ट करण्यामध्ये व्यतीत झाले. मिळेल ते काम कसलीही तक्रार न करता मुकाट्याने करुन, स्वबळावर शिक्षण आणि नोकरी मिळवून आपल्या कमाईचा अर्धा हिस्सा अनाथांसाठी खर्च करणारी. नेहमीच माणसांच्या मायेपासून दुरावलेली तरीही प्रत्येकाबद्दल मनात प्रेम असणारी ती तरुणी म्हणजेच 'किरण'. प्रकाशच्या आजवरच्या आयुष्यात त्याला इतके प्रभावित कोणीही केले नव्हते. तिच्या शारिरीक सुंदरतेपेक्षा तिच्या मनाच्या सुंदरतेनेच प्रकाशला अधिक मोहित सुंदरतेनेच प्रकाशला अधिक मोहित केले होते. त्याने तिला पाहिल्यानंतर त्याच्या मनात सतत तिचेच विचार येऊ लागले होते. गेली कित्येक वर्षे ध्यानधारणा करुन ज्याने आपल्या मनावर विजय मिळवला होता; आज त्याच प्रकाशचे मन किरणच्या विचाराने भरकटले होते. त्या घटनेनंतर जवळपास वर्ष भराने किरण पुन्हा त्याच्या समोर आली. ती घटना त्याला आठवू लागली.

———X———X———

प्रकाश रात्रीपासूनच ध्यान धारणेसाठी बसला होता. सकाळचे नऊ वाजले होते, तरी तो अजुन ध्यानातून बाहेर आला नव्हता. तितक्यातच घराची बेल वाजली. मोहनने दरवाजा उघडला. दरवाजाच्या बाहेर दोन पोलिस अधिकारी उभे होते. मोहनने त्यांना आत बोलवले तसे ते दोघे घराच्या आत येऊन बसले. ध्यानधारणा करणाऱ्या प्रकाशचे नेत्र आपोआपच उघडले गेले. जणु त्याला कसलीतरी चाहुल लागली असावी. तो आपल्या खोलीतुन बाहेर आला. त्या दोन पोलिस अधिकाऱ्यांपैकी एक किरण होती. ती नुकतीच पुन्हा आपल्या पदावर रुजु झाली होती. ज्यावेळी मोहनराव खासदार होते. त्यावेळी घडलेल्या एका प्रकरणाचा शोध घेण्याचे कार्य तिच्यावर सोपवण्यात आले होते. त्याच संदर्भात मोहनरावांची चौकशी करण्यासाठी ती आपल्या सहकाऱ्यांसोबत

त्यांच्या घरी आली होती. तिला पहाताच क्षणी प्रकाशच्या मनातील तिच्या स्मृती जागृत झाल्या. त्या दिवसानंतर चौकशी निमित्त ती बऱ्याचदा त्यांच्या घरी येऊन गेली होती. त्यामुळे तिची आणि प्रकाशची चांगली ओळख झाली. दोन-तीन महिन्यानंतर तिचे शोध कार्य संपले आणि तिचे मोहनच्या घरी येणे-जाणेही थांबले. तेव्हा, न रहावून प्रकाशने एके दिवशी तिची भेट घेतली आणि आपल्या मनातील तिच्याविषयीचे प्रेम तिच्यासमोर व्यक्त केले. काही दिवस विचार करून तिनेही प्रकाशला आपला होकार कळवला. मोहनरावांनाही किरण सुन म्हणुन पसंत होती. त्यानंतर काही महिन्यातच प्रकाश आणि किरणचा विवाह झाला. विवाह झाल्यानंतर प्रकाश आणि किरणचा सुखाचा संसार सुरु झाला. प्रकाशने किरणसाठी आपली दिनचर्या बदलली होती. आता तो एखाद्या सामान्य व्यक्तीसारखे जीवन जगू लागला होता. सकाळी तो मोहन बरोबर कामात व्यस्त असे आणि सुट्टीच्या दिवशी वेळात-वेळ काढुन तो धनंजयला दिलेले वचन पुर्ण करण्यासाठी पापी मनुष्यांना पकडून त्यांना धनंजयच्या स्वाधीन करत असे. आपली ओळख किरणपासून लपवण्याकरीता हल्ली तो रात्री-अपरात्रीध्यान-धारणाही करत नसे.

———X———X———

प्रकाश आणि किरणचा विवाह होऊन जवळपास दोन वर्षे झाली असावीत. विक्षरचा जन्म झाला होता. त्याला सांभाळण्यासाठी किरणने आपली नोकरी सोडली होती. तिच्या घरी राहण्यामुळे आता तिचे प्रकाशवर चांगले लक्ष असे. तीच्या आतापर्यंतच्या अनुभवावरुन प्रकाशमध्ये नक्कीच काहीतरी वेगळेपण होते. पण ते काय आहे? ही गोष्ट अजून तिच्या लक्षात आली नव्हती.

किरण अधुन-मधुन मोहनरावांच्या ऑफीसमध्ये येत जात असे. त्यामुळे अधुन-मधुन प्रकाश तिथुन गायब असतो ही गोष्ट तिच्या चांगलीच लक्षात

आली होती. त्याबद्दल तिने प्रकाश आणि मोहनला विचारले असता, त्या दोघांनीही तिला कामाचे निमित्त सांगितले. सुरुवातीला किरणनेही या गोष्टीकडे दुर्लक्ष केले होते. पण ज्यावेळी हा सर्व प्रकार वारंवार तिच्या निदर्शनास येऊ लागला. त्यावेळी मात्र तीने सत्य जाणुन घेण्यासाठी प्रकाशवर गुप्तपणे लक्ष ठेवणे सुरु केले. प्रकाशचे 'किरणवर' जीवापाड प्रेम होते. स्वत:पेक्षाही अधिक त्याचा तिच्यावर विश्वास होता. त्यामुळे विवाहपश्चात त्याने आपल्या शक्तींचा उपयोग तिच्या मनातील भावना जाणुन घेण्यासाठी कधीही केला नव्हता. म्हणुनच किरण आपल्यावर लक्ष ठेऊन आहे या गोष्टीपासून तो गाफील राहिला होता. किरणच्या मनातील शंका तिला स्वस्थ बसून देत नव्हती. म्हणुन एके दिवशी तिने प्रकाशचा पिछा करुन यासर्व रहस्यांचा शोध घ्यायचे ठरवले.

त्या दिवशी प्रकाश आणि मोहन, दोघेही नेहमी प्रमाणेच ऑफीसला जाण्यासाठी घराबाहेर पडले. प्रकाशने मोहनला ऑफीसपर्यंत सोडले आणि तो आपले इच्छित कार्य करण्यासाठी तिथुन निघाला. ते दोघेही घराबाहेर पडताच किरण गुप्तपने त्यांचा पाठलाग करत होती. प्रकाश कुठे जातो हे पहाण्यासाठी ती त्याच्यापासून काही अंतर ठेवून त्याच्या मागे-मागे जात होती.

चालता-चालता प्रकाश एका गल्लीत शिरला, त्याच्या आजुबाजुला त्याला कोणी बघत तर नाही ना? या गोष्टीची खात्री करुन, तो क्षणार्धात तिथुन अदृष्य झाला. हा सर्व प्रकार किरण ने आपल्या डोळ्यांनी बघितल्यामुळे तिला फार मोठा धक्का बसला होता. क्षणार्धात प्रकाश तिच्या डोळ्यांसमोरुन अदृष्य झाल्याची घटना तिच्यासाठी असामान्य आणि अविश्वसनिय होती. आजवर ती ज्याला सर्वसामान्य मनुष्य समजत होती, तो 'प्रकाश' नेमका कोण होता? तो असा अचानक कुठे जात असावा? यासारख्या असंख्य प्रश्नांचा मनात विचार करत ती आपल्या घराच्या दिशेने येत असतानाच रस्त्यावरील एका वाहनाने तिला जोराची टक्कर दिली. असे म्हणण्यापेक्षा आपल्याच विचारांच्या तंद्रीत चाललेली किरण अचानक त्या वेगवान वाहनांच्या समोर आली होती. ऐन

वेळेला तीला आपल्या वाहनाच्या समोर पाहून तो वाहनचालकही खुप घाबरला. त्याने आपल्या वाहनाची गती कमी करण्याचा आपल्या परीने खुप प्रयत्न केला पण; तरीही तो हा अपघात रोखु शकला नाही. क्षणार्धात किरणचा त्या वाहनाखाली चिरडून मृत्यु झाला. अशाप्रकारे किरणचा दुर्दैवी मृत्यु झाल्याने तिच्या मृत्युसाठी प्रकाश आजवर स्वत:लाच दोषी ठरवत होता. किरणने भौतिक जग जरी सोडले असले, तरी प्रकाशच्या मनातील जगात ती आपले अढळ स्थान निर्माण करुन गेली होती. ज्याची जागा इतर कोणालाही घेता आली नसती.

———x———x———

# सत्यातील असत्यता

फोनची रिंग वाजत होती. घरात प्रकाशशिवाय दुसरे कोणीही नव्हते. लगेचच त्याने फोन उचलला. त्याच्या शैला काकीचा फोन होता. त्याला तसा महिन्या सहा महिन्यातून त्यांचा फोन येत असे. पण आज त्यांचा फोन येण्यामागचे कारण थोडे गंभीर होते. फोनवरुन, प्रकाशचे संदिप काका खुप आजारी असून ते आता शेवटच्या घटका मोजत असल्याचे त्याला कळले. ते ऐकुन प्रकाश थोडासा चिंतीत झाला. त्याच्या मनात साठवलेल्या त्याच्या काकांच्या स्मृती त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागल्या. त्याचे संपूर्ण जीवन बदलवून टाकणारी त्याच्या अपहरणाची रात्र त्याला आठवली. पोलिसांनी तो सापडल्याची माहिती कळवताच तो क्षणाचाही विलंब न करता त्याला तिथुन घरी घेऊन जायला आला होता. किती जीव होता त्यांचा प्रकाशवर. हे सगळं चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले.

मनात आणले असते तर प्रकाश त्यांचा जीव वाचवू शकत होता. पण वसंतच्या वेळी सुद्धा त्याने तसे केले नव्हते. स्वत:च्या स्वार्थाकरिता निसर्ग नियमांच्या विरुद्ध कार्य करणे त्याला आजही मान्य नव्हते. तरीही, सुख–दु:ख मोह माया यांच्या पलिकडे गेलेला प्रकाश नाही म्हटले तरी आज थोडासा अस्वस्थ मग नक्कीच झाला होता. तो फोन आल्यापासून त्याच्याच विचारात तो हरवून गेला होता. बऱ्याच वेळाने तो त्याच्या विचारांच्या तंद्रीतून बाहेर आला. त्याने घड्याळाकडे बघितले. संध्याकाळचे सहा वाजुन गेले होते. अचानक आलेल्या फोनमुळे आणि त्यामुळे त्याच्या मनावर झालेल्या परिणामामुळे, त्याला विक्षरला शाळेतून आणायला खुप उशीर झाला आहे. हे त्याच्या लक्षात येताच तो विक्षरला शाळेतून घरी आणण्याकरीता ताडकन घराबाहेर पडला.

———x———x———

प्रकाशची वाट बघुन कंटाळलेला विक्षर शाळेतून एकटाच घरी येत होता. प्रकाशने त्याला ह्या जगातील रहस्यमयी गोष्टी सांगितल्यापासून त्याच्या मनात आपल्या पित्यासारख्या शक्ती प्राप्त करण्याची इच्छा निर्माण झाली होती. परंतू अशा अद्भूत शक्ती आपल्याला कशाप्रकारे प्राप्त करता येतील? ह्या गोष्टीचे त्याच्याकडे ज्ञान नव्हते. तो प्रकाशला घाबरत असल्यामुळे तो ह्या विषयी प्रकाशशी बोलू शकत नव्हता. आपल्यालाही आपल्या पित्यासारख्या शक्ती मिळाल्या तर किती मजा येईल? याच गोष्टीचा तो विचार करत असताना, अचानक भद्र त्याच्यासमोर आला. त्याला समोर पाहून विक्षर थोडासा भयभित झाला होता. परंतू आज त्याने सर्व सामान्य माणसांप्रमाणे व्यवस्थित पोशाख परिधान केला होता. त्यामुळे आज तो तितकासा विचित्र दिसत नव्हता.

''मला पाहून घाबरु नकोस बाळा. तु समजतोस तितका वाईट नाही मी.'' भद्र अत्यंत नम्रतेने म्हणाला.

''मला तुमचे काहीही ऐकायचे नाही. मला माझ्या घरी जाउ दे. नाहीतर मी आरडा ओरडा करेन.'' विक्षर रागाने म्हणाला.

''नको तुला असे काहीही करण्याची गरज नाही. फक्त एकदाच मी काय सांगतो ते ऐक, मग मी इथून निघून जाईन.'' (भद्र)

'' मला तुमचे काहीही ऐकायचे नाही.'' तो पुन्हा चिडून म्हणाला.

'' बरं ठिक आहे. मग निदान माझ्या एका प्रश्नाचे उत्तर तरी दे. तु कोण आहेस? तुझा पिता कोण आहे हे तुला माहिती आहे का? (भद्रने)

''हो, माझे पिता एक अशी शक्ती आहे की, ज्याचा सामना तु कधीही करु शकत नाहीस. पण मी कोण आहे? हे मला अजूनही ठाऊक नाही'' (विक्षरने) उत्तर दिले.

‘‘अगदी बरोबर तुझे पिता खुप सामर्थ्यवान आहेत, अगदी तुझ्यासारखेच.’’भद्र उद्‌गारला. ‘‘काय? म्हणजे मी देखील त्यांच्या इतकाच सामर्थ्यवान आहे? नाही... हे सत्य असू शकत नाही. निदान मला तरी तसे काही वाटत नाही आणि आजवर मला तसा काही अनुभवही आलेला नाही. विक्षर उत्सुकतेने म्हणाला.

‘‘येणारही नाही... तुझ्या पित्याला तसे होऊ द्यायचे नाही. कारण त्याला स्वत:लाच सर्व सुत्रे आपल्या हाती ठेवायची आहेत.’’ (भद्र)

‘‘हे तुम्ही काय बोलत आहात? मी आता तुमचे काहीही ऐकुन घेणार नाही.’’ विक्षर रागाने म्हणाला. आपल्या पित्याबद्दल असे काहीही ऐकुन घेण्यास तो तयार नव्हता.

‘‘बरं ठिक आहे. तुझा माझ्यावर विश्वास नसेल, तर हरकत नाही पण मला फक्त एक गोष्ट सांग. त्या दिवशी तू तुझ्या घरापासून त्या स्मशानापर्यंत कसा काय पोहोचलास? त्याने विक्षरला प्रश्न केला.

‘‘ ते मला देखील माहिती नाही.’’ (विक्षर)

‘‘हम्म. त्याचे उत्तर मी सांगतो. तुला तिथे प्रकाशच घेऊन आला होता. त्याने त्या दिवशी सुद्धा तुझ्यावर आपल्या शक्तीचा प्रयोग करुन तुला भ्रमित केले असणार.’’ (भद्र)

त्या दिवशी पण... म्हणजे काय? (विक्षर)

म्हणजे तो आजवर तुला भ्रमितच करत आला आहे. ज्या दिवशी तुला तुझी ओळख पटेल . तो दिवस तुझा शेवटचा दिवस असेल.’’ तितक्यातच प्रकाश तिथे आला. त्याला बघताच भद्रने तेथुन पळ काढला.

———x———x———

विक्षरला शाळेतून घरी आणल्यावर, प्रकाशने विक्षरसोबत, त्याच्या काकांच्या घरी त्यांना पहाण्याकरीता जाण्याची तयारी सुरु केली. विविध शारीरिक व्याधींनी ग्रस्त झालेल्या संदिपची शेवटची भेट घेऊन प्रकाश आपल्या घरी परतला. परंतू संदिपच्या घरी गेल्यावर प्रकाशने एका गोष्टीची आवर्जुन दक्षता घेतली होती. ती म्हणजे त्याने त्यावेळी संदीप, शैला आणि त्यांच्या मुलांना संमोहित करुन, तो स्वत:ही सर्वसामान्य मनुष्याप्रमाणे थोडासा वयोवृद्ध झाल्याचे भासवले. प्रत्यक्षपणे संदिपची भेट घेण्याकरिता त्याला असे करणे भागच होते. कारण काळाच्या परिणामाप्रमाणे संदिपची मुलेही प्रकाशपेक्षा वयाने मोठी दिसू लागली होती. परंतू प्रकाशवर काळाचा परिणाम अत्यंत संथ गतीने होत असल्यामुळे तो त्याच्या खऱ्या रुपात त्यांच्यासमोर जाऊच शकत नव्हता. प्रकाशने त्यांना संमोहित केल्यामुळे प्रकाश त्यांना जवळपास पन्नाशी ओलांडलेल्या माणसासारखा दिसत होता. त्याने विक्षरला संमोहित न केल्यामुळे त्याला तो त्याला मात्र नेहमीप्रमाणे तीस-पस्तीस वयाचाच दिसत होता. परंतू संदिपच्या घरी संदिपच्या, शैलाच्या आणि प्रकाशच्या चाललेल्या गप्पांवरुन विक्षरला प्रकाशच्या आणि त्याच्या काकांच्या आणि त्याचबरोबर त्यांच्या मुलांच्याही वयातील फरक लक्षात आला. ज्यावेळी प्रकाश वीस बावीस वर्षाचा होता. तेव्हा संदिप आणि शैलाला एकही अपत्य नव्हते. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी त्यांना मुले होऊनही ती सुद्धा प्रकाशपेक्षा वयाने खुपच मोठी दिसत होती. ही गोष्ट विक्षरला विचार करायला प्रवृत्त करणारी होती. त्यामुळे त्याला आपला पिता खरोखरच अद्‌भूत शक्ती सामर्थ्य असलेला इच्छाधारी नाग असावा या गोष्टीची खात्री पटत चालली होती.

———x———x———

विक्षरला संदिपच्या घरी आलेल्या अनुभवानंतर त्याचा प्रकाशकडे बघण्यचा दृष्टीकोन बदलत चालला होता. काही दिवसापूर्वी रात्री स्मशानात घडलेला प्रकार त्यानंतर तांत्रिक भद्रची आणि त्याची भेट आणि त्यानंतर त्याला प्रकाशचा आलेला हा आश्चर्यकारक अनुभव. यासर्व गोष्टींचा तो सतत आपल्या मनात विचार करु लागला होता. त्यामुळे हल्ली त्याचे त्याच्या वयातील इतर मुलांप्रमाणे खेळण्या बागडण्यात मन न रमता दुसऱ्याच कुठल्यातरी विचारांमध्ये अडकून पडले होते. अचानकपणे त्याच्या आयुष्यात एका पाठोपाठ एक अशा विचित्र घटना घडल्याने त्याचे असे वागणे स्वाभाविकच होते. भद्रने प्रकाशचे रुप धारण करुन त्याला सांगितलेल्या गोष्टींमुळे त्याच्या ज्ञानात बरीच भर पडली होती. तरी त्याला यातच समाधान मानायचे नव्हते. आता त्याच्या मनात आपल्या पित्यासारख्या दिव्य शक्ती असलेल्या इतर जीवांबद्दल अधिकाधीक माहिती जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली होती. त्याच्या मनातील हीच इच्छा त्याला आता स्वस्थ बसून देत नव्हती. म्हणून हल्ली तो प्रकाशला अधून-मधून या गुढ गोष्टींविषयी विविध प्रश्न विचारुन आपल्या मनाचे समाधान करण्याचा प्रयत्न करु लागला होता. प्रकाशलाही विक्षरच्या वागण्यातील झालेला हा बदल आता जाणवू लागला होता. त्यामुळे तो चतुराईने त्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्याला टाळण्याचा प्रयत्न करु लागला. परंतू विक्षर काही माघार घेणाऱ्यातला नव्हता. तो त्याच्या मनाचे समाधान होत नाही तोपर्यंत प्रकाशला विविध प्रश्न विचारुन हैराण करु लागला. त्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊन देऊन कंटाळलेला प्रकाश, विक्षरच्या अशा वागण्याने काही अंशी चिंतीत झाला होता. काहीही झाले तरी तो विक्षरवर आपल्या शक्तींचा वापर करणार नव्हता. म्हणून विक्षरच्या मनातून ह्या सर्व गोष्टींना हद्दपार कसे करावे ही त्याच्या समोरील सर्वात मोठी समस्या होऊन बसली होती. कारण विक्षरचे असे वागणे भविष्यात घडणाऱ्या कुठल्या घटनांचे संकेत देत होते, हे प्रकाशला चांगलेच ठाऊक होते.

———x———x———

''भद्रचे बोलणे खरे ठरले. एके दिवशी माझ्याकडूनच विक्षर मारला गेला. त्या दिवसापर्यंत मी त्याच्यापासून त्याची स्वत:ची ओळख लपवत आलो होतो. तो कोण होता? याची कोणी कल्पनाही करु शकणार नाही, इतका मोठा घात झाला होता माझ्याबरोबर.''

''त्या दिवसापर्यंत मला देखील सत्य माहित नव्हते. मी समजत होतो की, नागराज संपला आहे. पण ते पूर्ण सत्य नव्हते. त्याच्या मृत्युपश्चात आपल्या कर्मगती नुसार भोग भोगुन झाल्यावर, त्याने स्वेच्छेने आपल्या मागील जन्मातील अपूर्ण राहिलेल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी पृथ्वीवर जन्म घेतला होता. तोच हा... माझा मुलगा विक्षर. ही गोष्ट मला त्याच्या जन्मापासूनच माहित होती. परंतू हा नागराजचा पूनर्जन्म असल्याने त्याला ह्या जन्मात आपल्या पूर्वजन्माबद्दल काहीच माहित नव्हते. आणि ते त्याला कधीही माहिती पडूच शकले नसते. परंतू ज्याप्रमाणे ही गोष्ट मला माहिती होती, त्याचप्रमाणे ती भद्रला म्हणजेच पूर्वजन्मातील नागऋषींना देखील माहिती पडली होती. परंतू ह्या जन्मात त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारच्या अलौकिक शक्ती नसल्यामुळे ते कुठल्याही परिस्थितीत माझा सामना करुच शकले नसते. म्हणुनच त्यांनी तंत्र विद्येच्या आणि वेताळाच्या सहाय्याने मला आणि विक्षरला त्या रात्री स्मशानात आणले जेणेकरुन विक्षरला माझी आणि कदाचित पर्यायाने स्वत:ची देखील ओळख पटली असती. परंतू त्यावेळी तसे काहीही घडले नसले, तरी माझ्या अलौकिक शक्ती पाहिल्यानंतर विक्षरच्या मनातही अशाप्रकारच्या शक्ती प्राप्त करण्याची लालसा निर्माण झाली होती. नव्हे ती त्या भद्रने निर्माण केली होती. त्या दिवशी मला अचानक माझ्या काकींचा फोन आला आणि त्यांच्याकडून संदिपकाका शेवटच्या घटका मोजत असल्याचे कळल्याने मी काही वेळेसाठी का होईना चिंतीत झालो. स्वत:च्याच विचारांमध्ये हरवून गेलो. त्यामुळे माझे विक्षर आणि भद्रच्या भेटीकडे दुर्लक्ष झाले. ज्याप्रमाणे मी विक्षर आणि भद्रवर

लक्ष ठेऊन त्यांची भेट होण्याचे टाळत होतो. त्याचप्रमाणे भद्र माझी नजर चुकवून विक्षरची भेट घेण्याच्या प्रयत्नात होता. आणि दुर्दैवाने त्याला तशी संधीही मिळाली. त्या दिवशीच्या भेटीत, भद्रने विक्षरला आपल्या पूर्व जन्माची कथा ऐकवली होती. तेव्हापासूनच तो मला आपला शत्रु समजू लागला होता. त्या दिवसापासूनच त्याच्या मनातील आपल्या विक्षर रुपाची जागा नागराजने घेतली. हा नागराजचा दुसरा जन्म होता. म्हणजेच त्या दिवसापासून नागराजने विक्षरच्या मनात आपले अस्तित्व निर्माण केले. त्याच्या मनातील हा नागराज दिवसेंदिवस अधिकच महत्वकांक्षी होऊ लागला होता. आणि एक दिवस तो इतका महत्त्वकांक्षी झाला की त्याला मला संपवून माझीच जागा घ्याविशी वाटली. तेच त्याच्या मृत्युचे कारण होते.''

''विक्षरचा अशाप्रकारे दुर्दैवी मृत्यु व्हावा अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती. त्या दिवशी मी ध्यानधारणा करत होतो. ध्यानधारणा करत असताना मी त्यात इतका बुडालो होतो की, मला माझीच शुद्ध राहिली नव्हती. मी अशा अवस्थेत असताना, विक्षरने एका धारधार शस्त्राने माझ्या मस्तकावर वार केला. सहाजिकच त्याला माझा 'नागमणी' प्राप्त करायचा होता. दुर्दैवाने ते शक्य नव्हते. त्याने त्या शस्त्राने माझ्यावर वार करताच, मी जरी ध्यानात लीन असलो तरी माझा नागमणी जागृत झाला. त्याचाच परिणाम स्वरुप जागृत नागमणीच्या शक्तीने विक्षरने माझ्यावर केलेला वार त्याच्यावरच परावर्तित झाला. परिणामस्वरुप त्याच्या मेंदुला मोठी जखम होऊन त्याचा मृत्यु झाला.''

———x———x———

संपूर्ण कथा ऐकुन झाल्यावर विकीने कथेतील सत्यता पडताळून पाहण्यासाठी आपल्या परिने शक्य तितका तपास केला. त्या तपासात त्याला असे आढळून आले की, पोलिस खात्याच्या जून्या कागदपत्रांनूसार 'प्रकाश' नावाचा मुलगा खरोखरच हरवला होता. या घटनेची त्यांना नोंद सापडली होती.

पण त्या जून्या कागदपत्रावरील शाई एकदमच अस्पष्ट झाल्याने, ह्या घटनेला किती वर्षे झाली असावी? हे निश्चित सांगता येणे पोलिस खात्यातील कुठल्याच पोलिस अधिकाऱ्याला शक्य वाटत नव्हते. कदाचित, या व्यक्तीचे अपहरण झाल्यामुळे त्याच्या मनावर ह्या घटनेचा फार गंभीर परिणाम झाला असावा. ज्यामुळे त्याने आपल्या खऱ्या आयुष्यातील ह्या घटनेला आपल्या कल्पनांची जोड देऊन, ही कथा रचली असावी असा विकीचा अंदाज होता. त्यामुळे विकी आणि जय हे पोलिस अधिकारी आज पुन्हा एकदा त्याची चौकशी करणार होते.

विकी : मला याची संपूर्ण कथा काल्पनिक वाटते कारण कथा सांगताना त्याने कथेतील काही गोष्टी खूप विस्तृतपणे मांडल्या; पण त्यात बऱ्याचशा गोष्टी अशाही होत्या की, ज्या त्याने खुपच संक्षिप्तपणे सांगितल्या कारण या सर्व त्याच्याच मनाच्या गोष्टी असल्याने, त्या घटनांना तो स्वत:ला हवे तसे हाताळू शकत होता त्याचा पुरावा म्हणजे... खऱ्या आयुष्यात त्याचे अपहरण झाल्यानंतर, त्यापुढील काही काळातच याची आई आणि त्यानंतर बहीण वारली. (आता तो प्रकाशकडे तोंड करुन त्याच्याशी बोलू लागला.)

''अपहरणाच्या वेळी तू गुंगीच्या आणि औषधाच्या प्रभावाखाली होतास. त्यामुळे तुझे अपहरण का झाले? आणि ते कोणी केले या प्रश्नाचे उत्तर निश्चितच तूझ्याकडे नव्हते. म्हणून तू ही काल्पनिक कथा रचलीस.''

''कथा सांगताना काही ठिकाणी तू 'मोहन' या नावाचा उल्लेख केलास तर 'मोहनराव'. त्यामागचे कारण म्हणजे, हे तूच निर्माण केलेले पात्र असल्याने, तू कधी त्याच्याकडे एक पिता म्हणून बघितलेस. तर कधी तुझ्या कथेतील पात्र म्हणून... त्यामुळे कथा सांगताना तू या एकाच व्यक्तीचा दोन वेगवेगळ्या प्रकारे उल्लेख केलास. जी तुझ्या नकळत घडलेली सर्वात मोठी चुक होती.''

जय : विकी, तुझे म्हणणे अगदी योग्य आहे. याच्या कथेवरुन एक गोष्ट माझ्या लक्षात आली, ती म्हणजे हा स्वत: एक अंतरमुख स्वभावाचा व्यक्ती असून याला बाह्य जगातील खऱ्या जीवनापेक्षा याने स्वत:च्याच

मनात निर्माण केलेले काल्पनिक जग याला अधिक जवळचे वाटत असावे. त्याचप्रमाणे याला तासं–तास अशा काल्पनिक विश्वात रमण्याची इतकी सवय झाली असावी की, त्याने त्याच्या मनात निर्माण केलेल्या प्रत्येक पात्राचे जीवन तो जगू लागला म्हणून ज्यावेळी कथेतील पात्रांचा मृत्यु झाला. तेव्हा तो फार कष्टदायक न होता अगदी सहजरित्या झाला.''

विकी : अगदी बरोबर बोललास. (आता तो सुद्धा प्रकाशकडे पाहून बोलू लागला.) तु स्वत: भित्र्या स्वभावाचा व्यक्ती असल्यामुळे जेव्हा कथेत युद्ध होण्याची चिन्हे दिसू लागली तेव्हा तू चातुर्याने कथेची संपूर्ण दिशाच बदललीस कारण जर मोठे युद्ध झाले असते तर त्यात तुला कथेतील बऱ्याचशा पात्रांचा अमानुषपणे मृत्यु घडवून आणावा लागला असता. जे तूझ्या मनाला पटणारे नव्हते.

''कथेत तु सांगितलेल्या काही गोष्टींमध्ये तर काहीच तथ्य नव्हते. जसे वैद्यकिय शास्त्राचे प्रतिनिधित्व करणारे चिन्ह आणि त्याचा नागांच्या अस्तित्वाशी तु जोडलेला संबंध अशा कितीतरी अर्थहिन गोष्टी सांगता येतील.''

तो कुठलीही प्रतिक्रिया न देता त्या दोघांचेही बोलणे शांतपणे ऐकत होता.

जय : कथेत अचानकपणे मध्ये–मध्ये येऊन, अचानकच नाहिंशी होणारी स्त्री दुसरी तिसरी कोणी नसून, ती एका अपघातात मृत्यु झालेली तुझीच पत्नी होती. जी तूझ्या मनामध्ये आठवणींच्या स्वरुपात आजही जिवंतच आहे. ही कथा तू तुझ्या मनातच रचल्यामुळे आठवणींच्या स्वरुपातील तुझी पत्नी कधीही कथेमध्ये ये–जा करु शकत होती.

विकी : अशाप्रकारे तुझ्या कथेतील बऱ्याचशा गोष्टींचा नीट विचार केल्यावर, ''तु एक मनोरुग्ण असून तुझी ही कथा खोटी आहे या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे. त्यामुळे तुला यासर्व काल्पनिक जगातून बाहेर काढण्यासाठी तुझ्यावर योग्य उपचार होणे मला फार गरजेचे वाटले.

विकीचे बोलणे संपताच तो मिश्किलपणे हसू लागला.

तो :	बरं, माझी कथा खोटी, माझे जग काल्पनिक. मग तुमच्या दोघांची स्वत:ची काय कथा आहे? तुमच्या तरी जगाचे खरे अस्तित्व आणि तुमच्या स्वत:चा तरी आपला असा भूतकाळ आहे का?

जय :	(काहीसा विचार करत) याच्या बोलण्यात काहीतरी तथ्य नक्कीच आहे. याचे रहस्य उ लगडण्याच्या नादात एक गोष्ट माझ्यादेखील लक्षात आली नाही ती म्हणजे... तु कोण आहेस? आणि या रहस्याचा आणि तुझा काय संबंध? (त्याने विकीला विचारले)

विकी :	हाच प्रश्न मीदेखील विचारु शकतो. तू हे प्रकरण का हाताळत आहेस? तू या रहस्याचा उलगडा व्हावा म्हणून माझे सहाय्य का करत आहेस?

जय :	आपला उद्देश एकच असल्यामुळे मी देखील तुझ्याकडे फारसे लक्ष न देता या गोष्टीचा विचार केला नाही.

विकी :	माझं देखील नेमक हेचं झालं. पण आपण याआधी देखील बऱ्याचदा कुठे ना कुठे भेटलो आहोत... पण कुठे? हे मला आता सांगता येत नाहीये. खरं तर मी देखील संभ्रमातच आहे.

जय :	आणि मी देखील (तो गंभीरपणे म्हणाला)

तो :	(हसून) मी तुमचा संभ्रम दूर करु शकतो. तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत.

विकी :	पण त्याआधी तुझ्या या काल्पनिक कथेतील एका रहस्याचा उलगडा होणे माझ्यासाठी फार महत्त्वाचे झाले आहे. तू सांगितलेल्या सर्व गोष्टी जरी सत्य मानल्या तरी पण एक प्रश्न मात्र अजूनही माझ्या मनात शिल्लक आहे. तो म्हणजे तू ज्याला नागराज म्हणून संबोधतोस त्याच्या खऱ्या मुळ नावाचा तू अद्याप उल्लेख सुद्धा केलेला नाहीस.''

हे ऐकल्यावर तो मिश्किलपणे हसू लागला. ''हं... म्हणजे तुम्ही आतापर्यंतची सर्व कथा लक्ष देऊन ऐकली आहे. छान! बरे वाटले मला.

चांगला प्रश्न उपस्थित केलात आपण. नागराजचे मूळ नाव इतक्या सहजतेने तुम्हांला समजले असते तर ही कथाच तुम्हांला ऐकुन घ्यावी लागली नसती.''

जय : म्हणजे ?''

विकी : ''ए, बाबा आत्तापर्यंत तू तुझी कथा ऐकवून आम्हांला भांबावून सोडले आहेस. तु सांगितलेल्या गूढ गोष्टींचा विचार करुन-करुन आमच्या डोक्याचा भुगा होण्याची वेळ आज पहिल्यांदाच आमच्यावर आली आहे. तेव्हा आम्हांला अजुन कोड्यात पाडून आमच्या डोक्याचा ताप वाढवू नकोस. आतातरी स्पष्ट बोल काय ते ?''

तो : ''नीट ऐक, सैतानाचे नाव कधीच घ्यायचे नसते. नाहीतर त्याच्या शक्ती जागृत होऊन, त्याला अधिक बळ प्राप्त होते. त्यामुळे तुमच्या समोर त्याचे नाव उच्चारणेही तुमच्यासाठी धोक्याचे ठरेल. हा सैतान म्हणजे अशी शक्ती आहे जी सतत कार्यरत असते. जीचा पुर्णत: विनाश केवळ अशक्यच... गुप्त रुपाने आपल्या सभोवताली असणाऱ्या चांगल्या, वाईट शक्ती आपल्यावर त्यांचा प्रभाव पाडतात. त्यानुसारच माणसाचे चांगले किंवा वाईट वागणे ठरते. जो मनुष्य बऱ्याचदा चांगल्या शक्तींकडून प्रभावीत होते. त्याला कालांतराने, चांगल्या गोष्टीची सवय होऊन,

तो स्वत:ही चांगल्या प्रवृत्तीचा होतो तर जो व्यक्ती बऱ्याचदा वाईट शक्तींकडून प्रभावीत होतो त्याच्या मनात दृष्ट प्रवृत्तींची वाढ होते. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही शक्ती मनुष्यावर आपला प्रभाव टाकत असतात. ज्या शक्तींचा मनुष्याच्या मनावर जास्त परिणाम होतो. तिच शक्ती त्याच्या प्रवृत्तीच्या रुपाने त्याच्या बाह्य जीवनावर परिणाम करते. त्यामुळे पर्यायाने चांगल्या किंवा वाईट प्रवृत्तीची जोपासना करण्यासाठी मनुष्याला स्वत:लाच स्वत:शी संघर्ष करावा लागतो.''

''म्हणुन या सैतानाशी संघर्ष करताना, आपण स्वत:ही सैतान होणार नाही. या गोष्टीचे सुद्धा भान असणे आवश्यक असते. माझे दुर्दैव म्हणजे चांगल्या आणि वाईट प्रवृत्तींचे हे युद्ध सुरु असताना मीच

कधी सैतान बनलो याचे मलाच भान राहिले नाही. होय मीच तो सैतान आहे. मीच तो नागराज. मीच प्रकाश आणि मीच विक्षर आहे. माझ्या पोटी जन्माला आलेला सैतान म्हणजे माझा पुत्र विक्षर हा त्याच्या पुर्व जन्मात दृष्ट नागराज होता. विक्षर आणि नागराज हे दोन्ही जरी एकच आत्मा असले, तरी ते एक नाहीत कारण, हे दोघे तिसऱ्याच एका मुळ रुपाची विभिन्न रुपे आहेत. त्यांचे मुळ रुप म्हणजे खरा सैतान जो मीच आहे... प्रकाश. म्हणजेच खरा सैतान एकच आहे फक्त त्याची रुपे भिन्न आहेत. आता या सर्व गोष्टी तुम्हांला फार किचकट आणि गुंतागुंतीच्या वाटू शकतील. पण तरीही पुन्हा एकदा माझ्या कथेचा विचार करा. त्यातील प्रत्येक टप्प्यावर मी जीवनातील गूढ रहस्यांचा खुलासा केलेला आहे. त्या रहस्यांचा तुमच्या अस्तित्वाशी संबंध आहे. शेवटी आपले जीवन म्हणजे एक युद्धच असते. स्वत:चे अस्तित्व शोधण्याचे युद्ध. बाह्य जगातील युद्धापेक्षा आपल्या मनाचे आपल्याच मनाशी असलेले हे युद्ध कैक पटींनी मोठे असते. या युद्धात जो विजयी होतो त्याला स्वत:च्या अस्तित्वाचा शोध लागतो. आपल्या अस्तित्वाचा शोध लागणे म्हणजेच स्वत:वर विजय मिळवण्यासारखे असते. त्यामुळे जो स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेऊन स्वत:वर विजय मिळवतो. तो संपूर्ण ब्रह्मांडावरही विजय मिळवू शकतो. हे सत्य ज्यावेळी मला समजले त्याचवेळी आपल्यातल्या सैतानाचा अंत करण्यासाठी मी माझ्यातील वाईट प्रवृत्तींना माझ्यापासून वेगळे केले. त्याचवेळी नागराजचा जन्म झाला.''

''थोडक्यात नागराज हे माझेच दुसरे रुप आहे. बाह्य जगात जरी मी प्रकाश म्हणून वावरत असलो तरी माझ्या मनातील जगात माझी नागराज, नागऋषी, नागतपस्वी अशी कितीतरी रुपे आहेत. नागराजने माझ्या मनात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी माझ्या मनाचा ताबा घेऊन स्वत:चा वेगळाच भूतकाळ तयार करुन त्याला माझ्या समोर आणले. आणि आपण तयार केलेला भूतकाळ खरा आहे हे मला सहजरित्या पटवून देण्यासाठी त्यानेच अनंता, नागऋषी, नागतपस्वी आणि नागलोक ही सर्व माया त्याने निर्माण केली. पण ते सर्व खोटे आहे याची मला आता प्रचिती आली आहे. नागराजचे स्वत:चे असे अस्तित्वच नाही. त्याला मीच

निर्माण केले आहे. मी माझी कथा सांगत असताना नागराजने बऱ्याचदा माझ्या मनाचा ताबा घेतला होता. त्याने कथेच्या मधे-मधे हस्तक्षेप करुन कथेला वेगळेच वळण दिले त्यावेळी माझे मन त्याच्या ताब्यात असल्यामुळे त्याने मीच कथा सांगत आहे असे भासवले. पण ते सत्य नाही. नागराजने माझ्या मनावर ताबा मिळवून त्याची कथा माझ्या मनावर कोरली आणि मीच संपूर्ण कथा सांगत आहे असे चित्र निर्माण केले. त्यामुळे कथेची दिशा वेळोवेळी बदलत गेली. आणि जोपर्यंत मी स्वत:वर पूर्णपणे नियंत्रण मिळवणार नाही. तोपर्यंत ती अशीच बदलत जाणार. सुदैवाने मी काही काळापुरता तरी माझ्या मनावर ताबा मिळवू शकलो म्हणूनच हे सत्य मी तुमच्यापर्यंत पोहोचवू शकलो. मी निर्माण केलेले हे सर्व काल्पनिक भावविश्व माझ्याच जीवनाचा अविभाज्य भाग बनेल अशी साधी कल्पनाही मी कधी केली नव्हती. हे सर्व मी तुम्हांला सांगतोय कारण तुम्ही सुद्धा या कथेचाच एक भाग आहात. हे सत्य पचवणे तुमच्यासाठी फार अवघड असले तरी जे सत्य आहे त्याची तूम्हांला जाणीव करुन देण्याची आता वेळ आली आहे.''

त्याने जयकडे बघितले आणि तो बोलू लागला, ''जय तुला तुझे खरे नाव माहित आहे का? नाही ना. तर ऐक तूच धनंजय आहेस. नागराजचा पुत्र धनंजय!'' हे ऐकुनही जय अजुनही स्तब्धच होता. त्याचा त्याच्या बोलण्यावर विश्वास नव्हता. त्यानंतर त्याने विकी कडे पाहिले आणि तो बोलू लागला ''विकी, तुला सर्वजण विकी म्हणुन हाक मारतात. या विकी नावाची तुला इतकी सवय झाली आहे की तु स्वत:चे मुळ नाव देखील विसरलास. माझ्या बाळा, मी तुला मारलेल नाही. चल उठ, आता झोपेतुन. तुच माझा पुत्र 'विक्षर' आहेस.'' हे ऐकताच तो खडकन जागा झाला. त्याच्या डोक्याला एक पट्टी बांधलेली होती. त्याच्या समोरच एक व्यक्ती बसलेली होती. ती व्यक्ती म्हणजे... प्रकाश. आता तो ज्या खोलीमध्ये होता ही तीच खोली होती जिथुन ही कथा सुरु झाली होती. प्रकाशच्या हाताचा एक बोट अजुनही रक्ताने माखलेलाच होता.

तो : ‘‘विक्षर कथा सांगताना एक गोष्ट मी तुझ्यापासून लपवून ठेवली होती. ती म्हणजे त्या दिवशी स्मशानामध्ये माझे आणि वेताळाचे युद्ध झाले होते. नागऋषीने वेताळाच्या मदतीने तुला वशीभुत करुन तुझ्या मनामध्ये न जाणो काय-काय भरले असावे? पण आता ते सर्व तू विसरुन जा आणि फक्त एकच गोष्ट लक्षात ठेव तू पुर्वजन्मात माझा शत्रु नागराज होतास. मला त्रास देता यावा या हेतुने तुझ्या मृत्यूनंतर तु स्वैछेने या पृथ्वीवर पुन्हा माझ्या मुलाच्या रुपात जन्म घेतलास. परंतू, सत्य तर हे आहे की, नागराज काय आणि विक्षर काय तुम्ही दोन्ही माझेच अंश आहात.’’

‘‘यावरुन एक गोष्ट आता एकदम स्पष्ट झाली आहे. ती म्हणजे मनातील काल्पनिक विचारांची दुनिया आपल्या खऱ्या आयुष्यावर आपली छाप सोडत असते. म्हणजेच आपण माणूस म्हणून जगत असलेले जीवनही आपल्याच मनातील जगाचे प्रतिबिंब असते. आता सत्य काय? आणि असत्य काय? याचा विचार करत बसलास तर तू संपूर्ण आयुष्यभर याच संभ्रमात अडकुन रहाशील या सर्वातून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे आपल्या मनावर विजय मिळविणे. विक्षर हा तूझा पुर्नजन्म आहे. त्यामुळे तुला पुन्हा नागराज बनायचे आहे की ‘प्रकाश’ ही निवड तुलाच करायची आहे. शेवटी तूच आमच्या दोन्ही रुपांच्या मधील एकमेव दुवा आहेस. तुझ्या मनातील या कथेचा तु एक अविभाज्य भाग आहेस. त्यामुळे तुला या कथेतील नायक बनायचे आहे की खलनायक ही निवड सुद्धा तुझीच असणार आहे. लक्षात ठेव, या दोघांपैकी विजय कोणाचाही होऊ दे, पण त्याचे परिणाम तुझ्याच जीवनावर होणार आहेत म्हणून तुझ्या मनातील या गुंतागुंतीच्या जगातून बाहेर पडण्यासाठी मी तुला योग्य मार्ग दाखवत आहे.’’

विक्षर : नाही. हे सत्य नाही. या कथेची सुरुवात तर तुच केली होतीस पण त्यात नागराजने ढवळाढवळ करायला सुरुवात केली. खरेतर प्रकाश नागराजचे अपहरण करुच शकत नाही. कारण नागराजचा जन्म तर फार नंतर झाला; पण त्याने आपल्या जन्माचे खरे रहस्य तुझ्यापासून लपवून ठेवून तुझ्या मनाला पटेल अशी एक कथा तुझ्या मनामध्ये निर्माण केली.

ज्यामुळे तु सत्यापासून दूर जाऊन अधिकच संभ्रमात पडलास. नव्हे त्याने तुला संभ्रमात पडायला लावले. विचार कर तुझ्या मनात नागराजच्या रुपाने जन्माला आलेला एक नकारात्मक विचार इतका शक्तिशाली होता की, त्याचा जन्म होताच, त्याने तुझ्या मनाचा ताबा मिळवून त्यावर सत्ता गाजवण्यास सुरुवात केली. (हे कोण बोलतयं? पण...)

''हे मी बोलत नाहीये. हे सर्व खोटे आहे. त्याने पुन्हा तुझ्या मनाचा ताबा घेतला होता. तु अजुनही पुर्ण जागृत नाहीस. 'प्रकाश' नागराज अजुनही तुझ्याच मनात जीवंत आहे. होय तुच प्रकाश आहेस आणि दुसरी गोष्ट म्हणजे ही कथा तू सांगत नसून या सर्व गोष्टी मीच तुझ्या स्मृतीपटलावर कोरलेल्या आहेत. जे तुझे भविष्य असणार आहे. आणि पर्यायाने माझे सुद्धा. कारण मीच विक्षर आहे. तुझा पुत्र मनामध्ये खोट्या कल्पना निर्माण करुन स्वत:ची फसवणुक करणे आता तरी थांबव. ही कथा माझी नव्हती. ती तुझीच आहे. ती तुझ्यापासूनच सुरु झाली होती आणि तूच तिला संपवू शकतोस. तु तिला इतकी गुंतागुंतीची बनवलीस की तू स्वत:च सुरु केलेल्या खेळात तु स्वत:च अडकुन पडलास. ही कथा अशी घडायला नको होती. कारण काहीही असो. पण तुझ्या मनात नागराजचा जन्मच व्हायला नको. त्या सैतानाशी युद्ध करण्याची तुझी तयारी नाही. पण तरीही ही कथा तुला तुझ्या पद्धतीने पुढे न्यायची होती. म्हणून तुच तीला आपल्या इच्छेप्रमाणे रंगवलीस. त्यासाठी तुझ्या कथेतील एका पात्राच्या रुपात तुच त्या नागराजला जन्म दिलास. आणि या काल्पनिक कथेला सत्य मानून जगू लागलास. त्यासाठी किती खटाटोप केलेस तु! या सर्व काल्पनिक गोष्टी स्वत:लाच पटवून देण्यासाठी तु कथेच्या सुरुवातीलाच 'विक्षरला' म्हणजे मला मारलेस आणि त्याला का मारले? याचे कारण शोधण्यासाठी स्वत:लाच स्वत:ची कथा ऐकवून स्वत:चीच फसवणूक केलीस. त्यामुळे आता हे सर्व घडण्यापासून रोखण्यासाठी तुझ्याच विचारांप्रमाणे, आपल्याला त्यामगचे मुळ कारण नष्ट करावे लागेल. म्हणूनच हा सर्व घटनाक्रम सुरु होण्याआधीच त्यामगचे कारण नष्ट करण्यासाठी तुझे मार्गदर्शन करणे हाच माझा मुळ हेतू आहे.''

''प्रकाश आपले डोळे उघड तू अजुनही ट्रेन मध्येच आहेस. आजच तुझे अपहरण होणार आहे. तेव्हा सावध हो. घरी जाताना चूकूनही त्या रिक्षात बसू नकोस आणि तु घरी गेल्यावरही आजची रात्र घराबाहेर पडूच नकोस. कारण एकदा का हा घटनाक्रम सुरु झाला की, त्याला रोखणे कोणालाही शक्य होणार नाही.''

प्रकाश : बरं ठीक आहे. पण आता तु सुद्धा इथुन निघून जा.... विक्षर. तुला काय वाटले? असे काहीही सांगून तु मला पुन्हा संभ्रमात टाकण्यात यशस्वी होशील? आणि मी तुझ्यावर विश्वास ठेवून हा सर्व घटनाक्रम पुन्हा नव्याने सुरु करेन? आणि मग पुन्हा एका नवीन घटनाक्रमाची नवीन कथा सुरु होऊन त्या कथेमार्फत तुझे अस्तित्व टिकून राहिल? आत्तापर्यंत मी नागराज, धनंजय, नागतपस्वी, असे करता-करता कथेतील सर्वच पात्रांना आपल्या मनात जागा दिली. तुम्ही सर्वांनी माझ्या मनातील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आपापली बाजू मांडून मलाच संभ्रमात टाकलेत. त्यासाठी तुम्ही माझ्याच मनातील कल्पनांशी आणि विचारांशी खेळू लागलात. माझ्या मनातील कल्पना सत्य भासवण्यासाठी, माणसाचा आणि नागांसारख्या जीवांचा संबंध पटवून देण्यासाठी, उत्पत्तीची रहस्ये... आणि नागांचे अस्तित्व सत्य भासवण्यासाठी इजिप्तची सफर घडवून, प्रसंगी पुराण कथांचे दाखले देऊन तुम्ही ही कथा पुढे नेलीत. पण आता मी पुन्हा फसणार नाही. आता सत्य माझ्यासमोर अगदी स्पष्ट झाले आहे. तुम्ही सर्वजण मी माझ्याच मनात निर्माण केलेली पात्र आहात. त्यापेक्षा अधिक वेगळी अशी, तुमची स्वत:ची स्वतंत्र अशी काहीच ओळख नाही. आत्तापर्यंत तुम्ही माझ्या मनात बराच कल्लोळ माजवलात, जेणेकरुन मी तुमचा अधिकाधीक विचार करेन. ज्यामुळे तुम्हांला, माझ्या मनातील स्वत:चे अस्तित्व जास्त काळ टिकवता आले असते. आत्तापर्यंत तुम्ही सर्वांनी आपापल्या परिने सर्व प्रयत्न करुन मला भांबावून सोडलेत. पण हे सर्व करत असताना तुम्ही एक गोष्ट मात्र अगदी सहज विसरलात. या कथेचा आणि पर्यायाने तुमच्यासारख्या सर्व पात्रांचा जन्मदाता आणि मृत्युदाता देखील मीच आहे. त्यामुळे तुम्हां सर्वांना संपवण्यापूर्वी याकथेतील एक रहस्य तुमच्यासमोर स्पष्ट करतो.

प्रकाश, विक्षर आणि नागराज म्हणजे देव, मनुष्य आणि सैतान यांच्या प्रवृत्तींचे प्रतिनिधित्व करणारे जीव होते. त्यातील प्रकाश हे मनूष्यापासून देवपदाला पोहोचल्याचे, विक्षर हे मनुष्यापासून सैतानाचे, तर नागराज हे फक्त सैतानाचे उदाहरण आहे. तरीही या तीन्ही प्रवृत्ती एकाच व्यक्तीमध्ये सामावलेल्या असून परिस्थितीनुसार त्या अस्तित्वात आल्या.

ज्यावेळी प्रकाशने निसर्गाविरुद्ध जाऊन आपल्या शक्तींचा वापर करुन भविष्याचे स्वरुप बदलण्यासाठी प्रयत्न केले. त्यावेळी निसर्गाने आपला मार्ग शोधून काढुन प्रकाशलाच विनाश घडवून आणण्याचे माध्यम बनवून त्याच्याच जीवनात विनाश घडवून आणला. नागराज किंवा धनंजय काही करेल म्हणून त्याला रोखण्यासाठी प्रकाशने तसे घडण्यामागचे मुळ कारण बदलले परिणामी त्यांना बदलता-बदलता तो स्वत:च कधी बदलता हे त्याला देखील कळले नाही. ज्याप्रमाणे नागराज हे प्रकाशचे दुसरे रुप आहे. त्याचप्रमाणे सैतान हे देवाचे दुसरे रुप आहे. शेवटी चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रवाह अस्तित्वात आहेत म्हणुन तर ह्या सृष्टीचा ताळमेळ राखता येतो.

चांगले कर्म करुन देव बनायचे की वाईट कर्म करुन, सैतान हा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वांच्याच हाती असतो. प्रकाश आपले मुळ स्वरुप समझून घेऊन आपल्यातील ईश्वराला जागृत करु शकला म्हणून तो ईश्वर स्वरुप झाला. परंतू तो परमेश्वर बनू शकत नाही. जोपर्यंत ह्या ब्रह्मांडातील सर्व जीव स्वत:चे मूळ स्वरुप समजुन घेऊन स्वत: ईश्वर होत नाहीत, तोपर्यंत हा खेळ असाच सुरु राहिल. त्यामुळे प्रकाश कोण? नागराज कोण आणि धनंजय व विक्षर कोण? कोण कोणाचा पिता आणि कोण कोणाचा पुत्र? यासर्व व्यर्थ चर्चा आहेत. कारण कुठल्या जन्मात आपला कोण पिता होता, आणि कोण पुत्र? कोण मित्र होता? आणि कोण शत्रु? याचा काहीच नियम नसतो. कारण आज जो आपल्यासाठी चांगला आहे तोच उद्या वाईट बनतो आणि आज जो वाईट आहे तोच उद्या चांगला बनतो. जो पर्यंत आपण ह्या सृष्टीमधील ब्रह्म तत्व समजून न घेता भौतिक

शरीराला पाहून एकमेकांना ओळखतो तोपर्यंत हा भ्रम असाच राहिल. विज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाले तर सर्व ब्रह्मांड उर्जेने व्यापलेले आहे. म्हणजेच आपण आणि ब्रह्मांडातील सर्व गोष्टी एक प्रकारची उर्जाच असते. अगदी अणु- रेणुंपासुन ते चंद्र-सुर्यापर्यंत सर्वत्र विविध रुपाने उर्जाच कार्यरत असते. ज्याला ही उर्जा आपल्या इच्छेप्रमाणे हाताळणे जमते, तो ईश्वर होतो. आणि जो या उर्जेचे मुळ केंद्रबिंदु आहे तो परमेश्वर. ही उर्जा निर्माण करता येत नाही किंवा नष्टही. फक्त तिचे एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात रुपांतर करता येते. म्हणजेच आपल्यातील ह्या उर्जेचे कुठल्या प्रकारात रुपांतर करायचे हा निर्णय आपलाच असतो. ज्यावेळी उर्जारुपी परमेश्वराला साकार व्हावेसे वाटले त्याचवेळी हा विविध रुपांचा खेळ सुरु झाला. परमेश्वराने स्वत:लाच विविध रुपांमध्ये विभागुन तो स्वत: मात्र या खेळापासून अलिप्त राहिला. ज्यामुळे त्याच्या प्रत्येक रुपाला मीच श्रेष्ठ असे वाटू लागले.

हेच रहस्य समजून घेण्यासाठी मी देखिल माझ्या मनात अशा प्रकारचा एक खेळ सुरु केला. हा खेळ होता स्वत:च स्वत:ला शोधण्याचा, स्वत:चे मुळ रुप जाणून घेण्याचा हा खेळ खेळताना मी माझ्याच मनातील विचारांपासून इतका अलिप्त राहिलो की, माझ्या विचारांना स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जाणवू लागले.

तुमच्यासमोर मी उत्पत्तीची रहस्ये उलगडली तरी देखील तुम्ही मी कोण? आणि तू कोण? याच वादात अडकुन पडला. त्यावेळी मी सांगितल्याप्रमाणे ब्रह्माने या सृष्टीमधील जीवांची उत्पत्ती करण्याकरीता आपल्या मनापासून 'प्रजापती दक्ष' यांची निर्मिती केली. त्याचप्रमाणे मी देखील माझ्या मनात तुम्हा सर्वांची निर्मिती करुन स्वत: मात्र ह्या सर्व मायेपासून अलिप्तच राहिलो. त्यामुळे तुमच्या अज्ञानाने, तुम्ही सर्वजण माझ्या मनाशी खेळत आहात असे तुम्हांला वाटले. परंतू कधी-कधी सत्य देखील अविश्वसनीय आणि आपल्याला न पटणारे असते. आपल्या सर्वांचे जीवन देखिल एक खेळच असतो. आपल्याला नेहमीच वाटते की, आपण तो खेळ खेळत आहोत. परंतू खेळ खेळणारा हा भलताच कोणीतरी

असतो. जो ह्या खेळाचा खरा सुत्रधार असतो. आणि आपण त्याच्या हातातील बाहुल्या... आपण सर्व त्याचे खेळणे असतो. पण हे रहस्य तर नेहमीच दुर्लक्षित राहते. म्हणून ज्याला-त्याला तो स्वत: सर्वोच्च अधिकारी असण्याच्या भ्रमात रहाण्याची सवय लागलेली असते. म्हणून तो या मायाजाळात दिवसेंदिवस अधिकच अडकत जातो. परंतू ज्या क्षणी आपली सत्सद्विवेक बुद्धी जागृत होऊन सत्याचा बोध होतो. त्याचक्षणी आपल्याला आत्मसाक्षात्कार होऊन स्वत:ची खरी ओळख पटते. आणि त्याचक्षणी आपल्याला आपल्यातील ईश्वरत्वाची प्राप्ती होते. त्याच क्षणी ईश्वर बनतो.

ही कथा गुंफताना मी स्वत: भावनेच्या भरात वाहून जाऊन संभ्रमात पडू नये यासाठी कथेच्या सुरुवातीलाच मी स्वत:साठी पुरावा म्हणुन एक खूण मागे ठेवली होती. जी मला भावनांच्या भरात वाहून जाण्यापासून रोखून मला सत्य परिस्थीतीची जाणीव करुन देईल. ती खूण म्हणजे कथेच्या सुरुवातीलाच विक्षर'ला मारल्यावर त्याच्या सांडलेल्या रक्तात मी 'प्रत्युषस्वामी' असे लिहून ठेवले होते. हा प्रत्युअष स्वामी म्हणजे दुसरा-तिसरा कोणी नसून माझे अंतरमन आहे. ज्याने मी ही कथा गुंफत असताना सुद्धा मला वेळोवेळी योग्य मार्ग दाखवून भविष्यात घडणाऱ्या घटनांची पूर्वसुचना दिली होती. त्यामुळे माझी कथा अपहरणापासून सुरु झाली नसून ती 'विक्षर'च्या मृत्युपासून सुरू झाली होती. हे आता माझ्या ध्यानात आले आहे.

त्याच्या मुखातुन असे उद्‌गार निघताच क्षणार्धातच कथा जेथून सुरु झाली होती, त्याच टप्प्यावर प्रकाशचे मन केंद्रीत झाले. रक्तात पडलेला विक्षर तेथून नाहीसा झाला आणि ते पोलिसही. आता त्या खोलीमध्ये फक्त 'प्रकाश' होता. खूर्चीवर मागे झोकून दिलेली मान सरळ झाली. प्रकाशचे डोळे उघडले गेले. त्याच्या डोळ्यासमोर सर्वत्र अंधार पसरलेला होता. म्हणून त्याने लगेचच खिडकी उघटली तशी सुर्याची किरणे खोलीच्या आत

शिरली. त्याच्या डोक्यावरील नागमणी ती किरणे परावर्तीत करु लागला. क्षणार्धात सर्वत्र प्रकाश पसरला.

———x———x———

समाप्त

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य